

# मंगलधाम

गोपीनाथ तळवलकर

IRBK-0105323
IRBK-0105323

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय वा.वा.
दा. क्र. ५३२३

# मं ग ल धा म

★

लेखक

श्री. गोपीनाथ तळवलकर

★

चित्रशाळा प्रकाशन, पुणें २

# मंगलधाम

★

लेखक

श्री. गोपीनाथ तळवलकर

५३२३

किंमत

IRBK-0105323

चित्रशाळा प्रकाशन, पुणें २.

मुद्रक व प्रकाशक :
दा. त्र्यं. जोशी,
बी. ए. (टिळक)
चित्रशाळा प्रेस,
१०२६ सदाशिव पेठ,
पुणें २.

☆

प्रथमावृत्ति १९४५

☆

द्वितीयावृत्ति
२६ जानेवारी १९५५

## अनुक्रमणिका


'मंगलधामा'च्या महाद्वारांत ... १ ते ८

१. 'तृणाचें पातें' ... ... ... १

२. 'भक्त व्हा सत्याग्रही' ... ... ८

३. सत्याग्रहाचीं सूत्रें ... ... १५

४. अहिंसा ... ... ... २४

५. अमोघ शस्त्र ... ... ... ३०

६. युद्धें आणि अहिंसा ... ... ३६

७. नम्रता ... ... ... ४२

८. मनाचें सारथ्य ... ... ... ४६

९. अस्वाद ... ... ... ५१

१०. अभय ... ... ... ५५

११. अस्तेय ... ... ... ६१

१२. 'संचय करूं नका' ... ... ६५

१३. 'भेदाभेद भ्रम अमंगळ' ... ... ७०

१४. स्वदेशी ... ... ... ७५

१५. सर्व-धर्म-समभाव ... ... ८०

१६. श्रमसौंदर्य ... ... ... ८५

१७. व्रताची सांगता ... ... ९०

१८. 'जेथें जासी तेथें तूं माझा सांगाती' ... ९७

१९ यंत्रानें केलेला प्रलय ... ... १०४

२०. कांहीं क्रांतिकारी व सुधारणावादी योजना ११२

२१. गांधी-योजना ... ... ... ११८

२२. विधायक कार्यक्रम ... ... १२६

२३. 'अवघाची संसार सुखाचा करीन' ... १३९

२४. फलश्रुति ... ... ... १४७

२५. गांधीजी ... ... ... १५५

# ‘ मंगलधामा ’च्या महाद्वारांत—

म. गांधींच्या अमर तत्त्वज्ञानाचा परिचय करून देणारें हें माझें पुस्तक नऊ वर्षांपूर्वी प्रथम प्रसिद्ध झालें. त्याची ही दुसरी आवृत्ति आज निघत आहे. पुस्तकाची दुसरी आवृत्ति निघणें हा लेखकाला आनंदाचाच विषय वाटतो. मलाहि तो तसाच वाटत आहे. परंतु या आनंदावर विषण्णतेची छायाहि दाट पसरली आहे. ‘ मंगलधाम ’ प्रसिद्ध झालें तेव्हां महात्माजी देहरूपानें आपल्यांत होते. ही आवृत्ति त्यांच्या स्वर्गवासानंतर प्रसिद्ध होत आहे ! येथें सर्वत्र भूतकाळ आढळेल. किंबहुना या नव्या आवृत्तींत फेरफार मुख्यतः केला आहे तो एवढाच. पानोपानीं गांधीजींसंबंधीं ‘ म्हणतात, ’ ‘ आहेत ’ असे असलेले उल्लेख बदलून ‘ म्हणत, ’ ‘ होते ’ असे करावे लागले ! हा बदल करतांना फार यातना झाल्या. दुसऱ्या आवृत्तीच्या प्रकाशनाचा आनंद निर्भेळ नाहीं तो याचमुळें.

परंतु चिरवियोगानें दुःखित होणें हा मनुष्याचा सहजधर्म असला तरी पुनः विवेकाचा उदय होतांच त्या दुःखाची तीव्रताहि कमी होते. महात्माजींचें पार्थिव शरीर नष्ट झालें असलें तरी त्यांच्या यशोरूपी शरीराला जरामरणाचें भयच नाहीं. हा विचार निःसंशय आशाजनक आहे. गेलीं ५० वर्षें ज्या महान् विभूतीनें आपल्या जीवनांत ‘ सत्याचे प्रयोग ’ करीत असतां आजच्या यंत्रपीडित जगाला एक नवें तत्त्वज्ञान शिकविलें तिचें कार्य अमर आहे. इतकेंच नव्हे, तर जसजसा काळ लोटेल तसतसें या कार्याचें महत्त्व अधिक कळूं लागून त्यांतून सतत मार्गदर्शन मिळत राहणार आहे.

आज गांधी-तत्त्वज्ञान जाणून घेण्यास विशेष अनुकूल समय आहे असें मला वाटतें. गांधीजींची एक स्वतंत्र जीवनदृष्टि होती. पण थोर माणसाच्या जीवनांतील स्थूल व कमी महत्त्वाच्या गोष्टीच सर्वांत जास्त प्रसिद्धि पावतात या नियमाप्रमाणें गांधीजींचें राजकीय पुढारीपणच विशेष डोळ्यांत भरलें.

आणि तें साहजिकहि होतें. कारण हा देश स्वातंत्र्यासाठीं तळमळत होता. गांधीजीच या देशाला स्वातंत्र्याची सुप्रभात दाखवूं शकतील अशी जनतेची श्रद्धा होती. पण आतां स्वातंत्र्य मिळालें असल्यानें केवळ राजकारणमय राहण्याची गरज उरलेली नाहीं. तेव्हां जीवनाच्या स्थिर व महत्त्वाच्या शाखांत गांधीजींच्या उपदेशानें कसें मांगल्य निर्माण करतां येणें शक्य आहे हें पाहणें आतां फार सुलभ झालें आहे. गांधीजींची शिकवण म्हणजे फक्त परकीय सत्ता हुसकून देण्याचें एक तंत्र होतें असें नाहीं, तर आपल्या जीवनाचें सर्वांगीण विकसन करणारी एक शाश्वत महत्त्वाची ती आचारपद्धति होती, आहे, व राहील याचा प्रत्यय अधिकाधिक येण्यास आतांच अनुकूल काळ आला आहे.

आमच्या आठवणीच्या उदयकालींच गांधीजींनीं आपली अपूर्व असहकारितेची मोहीम आरंभिली. तेव्हांपासून गांधी-तत्त्वज्ञानाच्या प्रकाशांतच आमच्या मनबुद्धीचीं सामर्थ्यें विकसित झालीं आहेत. पण कांहीं कडक नियमावलि अथवा व्रतसाधना एवढेंच प्रथम आम्हांला गांधी-तत्त्वज्ञानाचें स्वरूप वाटे. जीवनाचें बल संघटित होण्यासाठीं आचरण्याचा कर्मठ धर्ममार्ग यापेक्षां अधिक या शिकवणींत कांहीं आहे याची तेव्हां कल्पना नसे. पण हळू हळू गांधीजींनीं सर्व जीवनांतच कांहीं नवा आशय, नवा प्रकाश, नवी जाणीव कशी आणून दिली आहे हें कळूं लागलें. दुसऱ्या महायुद्धांत तर त्यांच्या तत्त्वज्ञान-सूर्यानें आपले सर्व नेत्र उघडल्याचा भास झाला. त्या वेळीं ‘ हरिजन ’ मधून प्रसिद्ध होणाऱ्या गांधीजींच्या लेखांत मंत्रद्रष्ट्या ऋषीचें सामर्थ्य रसरसत असल्याचा भास होई. हिंसेचा धिंगाणा जगभर चालू असतां गांधीजी अहिंसेचा उपदेश करीत होते. ही अहिंसा विलक्षण सामर्थ्यवान् होती. तिचा पाया अभय हा होता. गांधीजींच्या त्या वेळीं प्रकट झालेल्या उपदेशामृतानें त्यांच्या तत्त्वज्ञानांतलें खरें ओजच नव्हे तर काव्यहि कळून आलें.

गांधीजींना प्रतिगामी म्हणण्याची टूम आतां मागें पडली आहे. भारतीय राष्ट्रवाद हा पुनरुत्थानाला ( Revival ) चालना देणारा अतएव प्रतिक्रांतिकारक आहे आणि गांधीजी हे प्रतिक्रांतिकारकांचे अग्रणी होत असें म्हणणाऱ्या साम्यवादी मानवेन्द्रनाथ रॉयना गांधीजींच्या निधनानें धक्का

बसला, आणि मानवतावादाचा थोर पुरस्कर्ता हरपल्याची तीव्र हळहळ लागली. रॉयच्या ' बुद्धिनिष्ठ मानवतावादा' चा तोंडवळा गांधी-तत्त्वज्ञानाशीं जुळता आहे असें पुष्कळांना वाटतें. भारतांतील समाजवादाचे एक अध्वर्यु साथी जयप्रकाशनारायण यांनीं मार्क्सवादी भूमिकेवरून गांधीजींना विरोध करून गांधी-तत्त्वापेक्षां ' समाजवादच कां ? ' श्रेष्ठ आहे याचा उहापोह केला होता. पण आज तेच जयप्रकाशजी भूदान-जीवनदान या दिशेनें गांधी-पथावरून पावलें टाकीत आहेत. ' साम्राज्यशाहीचा हस्तक ' अशी ज्या कम्युनिस्टांनीं गांधीजींची निर्लज्जपणें निंदा केली त्यांच्या तत्त्वज्ञानांतली हुकूमशाहीची घाण आतां उघडी पडली असून तिचा दर्प जगभर तापदायक होऊन बसला आहे ! संयुक्त राष्ट्रसंघाचा संसार विज्ञानवादी राष्ट्रांनीं थाटला; पण स्वार्थासाठीं का होईना, कौटुंबिक वागणुकीचें अहिंसात्मक गांधी-तंत्र अंतर्राष्ट्रीय राजकारणांत वापरल्याशिवाय युद्धाला कायमची मूठमाती देतां येणार नाहीं हें या राष्ट्रांना तत्त्वतः मान्य करावें लागत आहे. मग त्यांच्या अंमलबजावणींत ते कितीहि गफलती करोत ! आपण सृष्टीचीं रहस्यें उकललीं तीं आतां स्वार्थांध माणसें विनाशासाठीं वापरीत आहेत हें भयानक दृश्य पाहून कपाळाला हात लावून बसलेले विज्ञानमहर्षी आईन्स्टाईन अहिंसामार्गाचें चिंतन करीत आहेत. ख्रिस्तसेवक होम्स, अलेक्झँडर आणि आक्रमक नगीब, हो चि मिन् यांना गांधीजींच्या तत्त्वज्ञानानें सारखेंच आकर्षित केलें आहे. गांधीजींचे राजकीय वारस भारताचे जगविख्यात पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू हे वास्तविक विज्ञानाधिष्ठित पाश्चात्य संस्कृतीचे निष्ठावान् विद्यार्थी. पण त्यांना गांधी तत्त्वज्ञानांतलें ' श्रीमत् ' व ' ऊर्जित ' जेवढें कळलें आहे तेवढें सांप्रदायिक गांधी-शिष्यांना क्वचितच उमगलें असेल. आणि पंडितजींच्या राजकीय धोरणांत याचें प्रतिबिंब पडलेलें पाहायला मिळतें. थोडक्यांत म्हणजे गांधीजींचे जहांबाज विरोधक पराभूत झाले आहेत, तर त्यांना जाणणारे लोक आपापल्या पराक्रमाच्या क्षेत्रांत गांधी-तत्त्वाला यथाशक्ति आकार देण्याच्या प्रयत्नांत आहेत. याचा अर्थ गांधी-तत्त्वज्ञानाचीं सर्व सूत्रें सर्वांनाच समजलीं आहेत किंवा त्यांचा वापर सर्वत्र भरपूर होत आहे असें मुळींच नाहीं. पण ज्या प्रमाणांत गांधी-तत्त्व व्यवहारांत उतरलें आहे त्या प्रमाणांत शांति व स्वास्थ्य जगांत नांदत आहे हें खास. प्रत्येक ठिकाणीं

गांधीजींनीं आवाहन करून किंवा त्यांच्या काटेकोर पद्धतीनें तें व्यवहारांत प्रकट होत नसेल एवढें फार तर म्हणतां येईल.

गांधीजींनीं अगदीं नवें असें कांहीं सांगितलें नाहीं असें त्यांचे टीकाकार म्हणतात. अर्थात् गांधी-भक्तांना या विधानाला हरकत घ्यावीशी वाटत नाहीं. खुद्द गांधीजीहि असा दावा कधीं करीत नव्हते. ‘ मी जुनें धर्मशास्त्र रद्द करण्यासाठीं आलों नसून त्याला पूर्णता देण्यासाठीं आलों आहें, ’ असें ख्रिस्त म्हणाला. गांधीजींचें जीवनकार्य असेंच होतें. पण जुन्या धर्मशास्त्राला पूर्णता म्हणजे त्याचा नव्या प्रभावशाली पद्धतीनें उपयोग असें गांधीजींचें पाहणें होतें. अहिंसा व सत्याग्रह, प्रार्थना व उपवास, अभय व अपरिग्रह इ० गांधीजींचीं सारींच व्रतें वेगवेगळ्या काळीं थोर धर्मोपदेशकांनीं सांगितलीं आहेत. गांधीजींच्या उपदेशांतल्या सर्व तपशीलांच्या स्पष्टीकरणासाठीं जुनेच रूढ शब्द व संकेत वापरतां आले यावरूनहि या तत्त्वांचें प्राचीनत्व सिद्ध होत नाहीं काय ? ‘ सर्वधर्मसमभाव ’ असा एखादाच नवीन शब्द आपल्या उपदेशांत गांधीजींनीं वापरला असेल. पण त्यामागील कल्पना कांहीं नवी नाहीं. पण एकाच रागांतल्या स्वरांच्या मांडणींत फरक झाला आणि तीव्र-कोमल असा भेद पडला कीं राग व रस बदलतात त्याप्रमाणें जुन्या धर्म-तत्त्वांची नवी आचारसरणी गांधीजींनीं शोधून काढल्यामुळें तत्त्वज्ञानांत नवीन निर्मिति झाल्याप्रमाणें वाटत आहे. वास्तविक नवें तत्त्व अथवा नवें ज्ञान यांत कांहीं नाहीं. जुन्याच उच्च मूल्यांचें नव्या तऱ्हेनें मूल्यमापन, वितरण, आणि संयोजन आहे. हा ‘ पुरातना ’ ला दिलेला ‘ नूतना ’ चा साज आहे.

मनुष्य वैयक्तिक जीवनांत अहिंसेचें पालन बऱ्याच प्रमाणांत करूं शकतो. पण मनुष्यांचे समुदाय मात्र हिंसात्मक नव्हे तर प्रसंगीं अगदीं हिंस्रहि बनतात. या झुंडीच्या मनोवेगांत सांपडून माणूस नेहमींचा शांत स्वभाव विसरून क्रूरकर्मा बनतो. हें सतत होत आलें आहे. सामुदायिक हिंसेच्या नेहमीं होणाऱ्या या स्फोटामुळें सामान्य माणसाची अंकुरित झालेली सात्त्विकता पार जळून जाते. मनुष्य एक वेळ स्वतः अहिंसक राहील. पण सामुदायिक हिंसेच्या वावटळींत सांपडल्यावर तो कितीसा भानावर राहणार ? बरें, या हिंसेला पराजित करण्यासाठीं हिंसेनेंच सामना द्यायचा म्हटलें तर हिंसा

शतगुणित होते. आणि हेंच जगाच्या इतिहासांत होत आलें आहे. दयेचे सागर असे महर्षि टॉलस्टाय् यांनाहि हें घातचक्र कसें थांबवावें याचा अंदाज नव्हता. जगाच्या विचारसंपदेंत व संस्कृतींत गांधीजींनीं जर कोणती भर घातली असेल तर ती हीच कीं सामुदायिक हिंसेचा प्रतिकार सत्याग्रहशास्त्रानें करतां येतो हें सिद्ध केलें. मनाची शक्ति अमर्याद आहे. मात्र तिचा विकास व संग्रह नियमबद्ध जीवन घालवून करण्यांत आला पाहिजे. अशी प्रभावशाली शक्ति अभयपूर्वक जगांतल्या अन्यायापुढें व बीभत्सतेपुढें सामना देण्यास उभी ठाकली तरी हिंसेला पांढरें निशाण उभारल्याशिवाय गत्यंतर नाहीं. हा आशावाद गांधीजींनीं निर्माण केला. गांधीवाद व्यक्तीच्या उन्नतीसाठींच मुख्यतः आहे आणि या बाबतींत हिंदु तत्त्वज्ञानाचा तो एक नवा अवतार म्हणतां येईल. कारण हिंदु तत्त्वज्ञान वैयक्तिक मोक्षापासून सुरू होतें आणि तेथेंच विराम पावतें. पण गांधीजींनीं व्यक्तीच्या मोक्षाचें तंत्र समाजाच्या कल्याणास जोडून दिलेलें आहे. म्हणजे गांधीजींच्या व्यक्तिधर्मांत समाज-निरपेक्ष साधनेला जागा नाहीं. असें असल्यानें गांधीजींच्या कल्पनेप्रमाणें व्यक्ति अहिंसक बनल्यास समाज साहजिकच अहिंसक बनेल. व्यक्ति आणि समुदाय यांच्या मानसशास्त्रांतील भेदाच्या भिंती गांधीजींनीं पाडून टाकल्या आहेत.

गांधीजींचा उपदेश हिंदु तत्त्वज्ञानाला जितका जवळ आहे तितकाच जगांतील बहुतेक मुख्य धर्मांच्या मूलतत्त्वांना तो जुळणारा आहे. अंतिम सत्य हें पूर्ण व निरपवाद असलें तरी तें प्राप्त करून देण्याची प्रतिज्ञा करणारे वेगवेगळे धर्म हे थोडेफार अपूर्ण असतात. म्हणून स्वधर्म श्रद्धापूर्वक आचरावा, पण अन्य धर्मांच्याहि विषयीं अनादर दाखवूं नये. इतकेंच काय पण अन्य धर्मांचाहि सादर अभ्यास करावा म्हणजे स्वधर्माविष-यींची श्रद्धा दुणावते असें गांधीजींचें सांगणें असे. ही विशाल बैठक गांधीवादाला असल्यानें जगांतील सर्व धर्मांच्या अनुयायांना त्याबद्दल आपुलकी वाटण्यास हरकत नाहीं. तो विकसनशील आहे. 'माझ्या दैनंदिन जीवनांत माझा आदर्श आचरण्यांत आणण्याचे कामीं मला किती अपयश येते आहे हें पाहिल्याशिवाय माझें तत्त्वज्ञान तुम्हांला नीट समजणार नाहीं,' असें गांधीजींनीं प्रा. निर्मलकुमार बसूंना लिहिलें होतें. हीच त्यांची नेहमींची

सत्यप्रेमी व आत्मपरीक्षक वृत्ति होती. अशी वृत्ति अंगीं असल्याखेरीज गांधीवादाचें सामर्थ्य व सौंदर्य कळणार नाहीं.

आज विज्ञानाधिष्ठित संस्कृतीनें आणलेल्या अवकळेवर गांधीवादाखेरीज दुसरा इलाजच राहिलेला नाहीं. सृष्टीचीं रहस्यें उकलून माणसानें जी ‘ सुधारणा ’ केली तिचा उपयोग माणसाला उच्च पातळीवर नेण्यासाठीं होत आहे काय ? मुळींच नाहीं. पंचेंद्रियांचें कोडकौतुक जास्तींत जास्त कसें करतां येईल, सत्ता, संपत्ति यांचें केंद्रीकरण अधिकाधिक कसें होईल यासाठीं ही ‘ सुधारणा ’ राबविली जात आहे. म्हणजे मनुष्य ज्ञानाच्या जोरावर भोग-वादाच्या कर्दमांत जास्त जास्तच रुतत आहे, तो पशुकोटींत उतरत आहे. गांधीजींचा यंत्रविरोध हें माणसाच्या या अवनतीविरुद्ध बंड करीत आहे. गांधीजी ‘ निसर्गाकडे चला ’ अशी हाक देतात याचा अर्थ आदिमानवाच्या रानटी स्थितीला पोहोंचा असें ते सांगत नाहींत, तर माणसाच्या मूळ शुद्ध व सात्त्विक ब्रह्मस्वरूपाकडे या असें सांगण्याचा त्यांचा उद्देश असतो. आज माणसानें हजारों कृत्रिम व गुंतागुंतीचीं जाळीं निर्माण करून त्यांत आपणांला गुरफटून घेतलें आहे. यामुळें जीवनाच्या शुद्ध व सात्त्विक स्वरूपाचा साक्षात्कार त्याला होत नाहीं. आपली राहणी व वागणूक जितकी साधी असेल तितके जीवनाचे निकोप नियम आपणांला चटकन् कळतात असें गांधीजींचा गुरु थोरो म्हणत असे. याचाच विस्तार व विकास गांधीजींनीं आपल्या तपोबलानें केला आहे.

हें सर्व एकदां नीट उमगलें म्हणजे गांधीवादावरील फोल आक्षेपांचें निरसन आपणांला सहज करतां येतें. गांधीवाद निवृत्तिपर नाहीं; कारण त्यांत समाजसेवा, कर्मयोग यांना प्राधान्य आहे. तो कर्मठ नाहीं, उलट उत्कट सौंदर्यशोधक आहे. मात्र वासनेची दलदल ओलांडून गेल्यावरच खरें सौंदर्यदर्शन होतें असें गांधीवाद प्रतिपादन करीत असल्यानें तो उग्र व कडकडीत भासतो. मनुष्याच्या मूलभूत चांगुलपणावर गांधीवादाची गाढ श्रद्धा आहे. अर्थात् वैफल्यवृत्तीचा तो द्वेष्टा आहे हें सांगणें नकोच. ‘अहिंसा हा शूरांचा धर्म आहे, ’ हें गांधीजींचें नेहमींचें सांगणें असे. गांधी-तत्त्व हें प्रेममय असलें तरी त्याचा आधार अभय हा आहे. हें परममंगल तत्त्वज्ञान म्हणजे आजवरच्या मुख्य मुख्य धर्मांचें मंथन करून काढलेलें नवनीत होय. तें

आजच्या क्षीण व रोगग्रस्त जगाला तुष्टिपुष्टि देईल असें अनेक लोकोत्तर विचारवंतांना वाटतें.

याच विचारवंतांचा एक नम्र ऋणानुबंधी व सहप्रवासी या नात्यानें मी गांधीवादावर हें अंकलिपीवजा पुस्तक प्रसिद्ध करीत आहें. गांधीवादावर मराठींत विपुल वाङ्मय प्रसिद्ध झालें आहे. हें सर्व वाङ्मय प्रायः व्रतधारी व सांप्रदायिक गांधीवादी मंडळींनीं रचलेलें आहे. गांधी-प्रणीत तपश्चरणावर मला जरासुद्धां अधिकार सांगतां येणार नाहीं. पण याच माझ्या अकरणात्मक वैशिष्ट्यामुळें गांधीवादाची विशालता व सर्वंकषता कळून येईल. गांधीवाद म्हणजे अमुक एका संस्थेचें राजकारणहि नव्हे अथवा अमुक प्रकारचा गुप्त तंत्रमार्गहि नव्हे. जीवन-विकास करण्याचा तो एक मंगल दृष्टिकोण व आचारधर्म आहे. हेंच प्रस्तुत पुस्तकांत शक्य तितक्या सुबोध व आकर्षक रीतीनें सांगण्याचा मीं प्रयत्न केला आहे. या पुस्तकांत मी राजकारणाला प्राधान्य मुद्दामच दिलें नाहीं. व्रत एकादशी, विधायक कार्यक्रम, आणि आर्थिक योजना यांत गांधीजींची सर्व शिकवण येतेच. ती दिल्यानंतरहि गांधीजींच्या महानुभावित्वांतला केवढा तरी आकर्षक व स्फूर्तिदायक भाग उरतोच. व्यक्तिविकासाच्या दृष्टीनें त्याची योग्यता फार आहे. म्हणून त्याची तोंडओळख 'गांधीजी' या प्रकरणांत करून दिली आहे. आख्यायिका, दृष्टान्त, रूपककथा, पौराणिक गोष्टी इ० च्या आधारें गांधीजींच्या सामर्थ्यरमणीय जीवनसूत्रांची खुलावट करण्याचें तंत्र मीं या पुस्तकांत योजिलें आहे. तें परिणामकारक होईल अशी खात्री वाटते. या पुस्तकामुळें गांधीजी व त्यांच्या तत्त्वज्ञानाचे तपस्वी भाष्यकार यांचें श्रेष्ठ वाङ्मय समजण्याची भूमिका जिज्ञासु वाचकांचे मनांत तयार व्हावी एवढीच मर्यादित आकांक्षा मीं बाळगिली आहे.

या पुस्तकांत जर कांहीं सौंदर्य उतरलें असेल तर तो मूळ तत्त्वज्ञानाचाच प्रभाव होय. विवेचनास सुबोधपणा येण्याचें बरेंच श्रेय 'आनंदा' च्या संपादकीय आसनाकडे जातें. तसेंच हें पुस्तक रचण्यापूर्वी सेवादलांतील सैनिकांपुढें बौद्धिक वर्गांत हा विषय मीं अनेकदां मांडला होता आणि तेथें बंधुभगिनींनीं विचारलेल्या प्रश्नोपप्रश्नांमुळें या विषयाचें दर्शन मला अधिक स्पष्ट रीतीनें झालें. याहि गोष्टीचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख करणें माझें कर्तव्य

आहे. वर्धा-शिक्षण-योजना शिक्षणक्रमांत दाखल झाल्यानंतर गांधी-तत्त्वज्ञान शिकविण्यास हें पुस्तक अत्यंत उपयोगी पडते असा आपला अनुभव माझ्या अनेक अध्यापक व शिक्षणाधिकारी मित्रांनीं सांगितला आहे. हें पुस्तक पुनः प्रसिद्ध करण्यास मला हुरूप येण्याचें हें मुख्य कारण होय.

या पुस्तकाची पहिली आवृत्ति देशमुख आणि कंपनीनें प्रसिद्ध केली होती. माझे बंधुतुल्य मित्र श्री. अनंतराव कुलकर्णी यांच्या प्रेरणेनें व चित्रशाळा प्रकाशनचे व्यवस्थापक श्री. दामूअण्णा रानडे यांच्या सौजन्यानें ही दुसरी आवृत्ति प्रसिद्ध होत आहे. प्रतिपाद्य विषय हा नित्य नूतन असल्यानें या पुनर्भेटीच्या वेळीं सामान्य वाचक, पालक, शिक्षक व विद्यार्थि-वर्ग पूर्वी इतक्याच उत्साहानें या पुस्तकाचें पूर्वीप्रमाणेंच स्वागत करील ही खात्री वाटते.

गांधी-जयंति ( २।८।५४ )<br>
आनंदकार्यालय, पुणें २

गोपीनाथ तळवलकर

# “ तृणाचें पातें ” : : १

गुजराथेंत एक विशाल वटवृक्ष आहे. पण एक वृक्ष कशाचा? अनेक वृक्षांचा समुदाय आहे तो. मूळ एकच वड होता. पण तो पुरा वाढला आणि त्याच्या पारंब्या पुनः भूमींत शिरून नवीं झाडें जन्माला आलीं. त्यांचाहि वंश पुढें वाढला. आतां नवा कोणता आणि जुना कोणता हें ओळखतां येत नाहीं. सर्वच पुराणपुरुष; सर्व भव्य आणि शांत; सारेच माणसांना आपल्या विस्तीर्ण छायेखालीं येण्याचें आमंत्रण प्रेमानें देणारे. या वृक्षसंघाच्या छायेंत हजारों माणसें बसूं शकतात. या सृष्टिचमत्काराकडे आश्चर्यानें पाहणारा मनुष्य कुतूहलानें शोधूं पाहतो कीं या सर्व वडांत पुरातन वटवृक्ष कोणता? कोणत्या भाग्यशाली वृक्षवराचा वंशविस्तार हा?

या वृक्षविस्ताराची हकीकत आठवली कीं आणखी एक चमत्कार मला आठवतो. पवित्र गंगा नदीच्या मुखांशीं असेंच होत नसेल का? आपण लहानपणीं भूगोलाच्या पुस्तकांत वाचतों कीं गंगा अनेक मुखांनीं बंगालच्या उपसागरास मिळते. नकाशांत आपण या माहितीचें वर्णन पाहूं लागलों कीं पूर्व बाजूला अनेक फांद्या किंचित् अधोमुख होऊन समुद्रापर्यंत पसरलेल्या दिसतात. या अनेक मुखांपैकीं प्रत्येक मुख एक मोठी नदीच आहे. पण या शाखांवर हिंडणाऱ्या माणसाला एक तीव्र जिज्ञासा लागतच असेल कीं मूळ प्रवाह कोणता? आपल्या नगाधिराज पित्याच्या मांडीवरून निघून जगत्-कल्याणासाठीं खालीं उतरलेली मूळ गंगामाई कोणती? काशीविश्वेश्वराच्या पायाजवळून वळसा घालून आणि यमुनेला कुशींत घेऊन पुढें सरकलेली ती एकप्रवाही भागीरथी कोणती?

महात्म्याच्या जीवनाचें असेंच आहे.

मूळ स्फूर्ति एका तत्त्वाची असते. पुढें जीवनांत सर्व शाखांत ती हळूं हळूं पसरूं लागते. महात्म्याचें अवतारकार्य विविध रूपें धारण करूं लागतें.

त्याच्या कर्तृत्वरत्नाचे अनेक पैलू चमकूं लागतात. प्रत्येक पैलू जितका चमकदार, जितका सुंदर, तितकाच मूळ हिऱ्याच्या कांतीला शोभेसा. मग आपण विचार करूं लागतों कीं, जीवनाच्या प्रत्येक महत्त्वाच्या शाखेंत या महात्म्याचें वैभव अलौकिक आहे, पण याचें मूळ जीवनकार्य कोणतें ?

महात्मा गांधी यांनीं तर स्वतःच्या विविध दर्शनांनीं जगाला चकित करून सोडलें आहे. आज पाऊणशें वर्षांचा त्यांच्या जीवनाचा चित्रपट पाहा. अगदीं भिन्न भिन्न असे केवढे रोमांचकारी प्रसंग तुम्हांला दिसतील.

आफ्रिकेंत अगदीं पहिल्या प्रथमच्या लढ्यांतले गांधीजी दिसतात. हजारों हिंदी मजूर उन्हातान्हांत त्यांच्या मागें चालले आहेत. बलिष्ठ सरकारच्या जुलमाला बळी पडूं पण मान वाकविणार नाहीं असा निर्धार त्यांच्या डोळ्यांत दिसत आहे. पुढारी पाहाल तर एक कृश, बावळ्या मुद्रेचा व पोषाखाचा गृहस्थ ! पण या गृहस्थापुढें सरकार नमतें. टेलिफोनवरसुद्धां गांधीजींशीं संभाषण करायला तयार नसलेले स्मट्स्साहेब तह करतात. हातांत शस्त्र नसतां लोकांनीं केलेला लढा यशस्वी होतो.

याच आफ्रिकेंतलीं गांधीजींचीं आणखी कितीतरी दर्शनें आहेत. आपल्या लोकांच्या उद्धारासाठीं एके दिवशीं एकाकी असे ते आफ्रिकेंत उतरतात. स्वतःचा जीव धोक्यांत आहे हें कळूनहि आपला प्रवास ते थांबवीत नाहींत ! शेंकडों गोरे लोक टपून बसलेले असतात. गांधीजींवर ते हल्ला करतात ! सर्वांग रक्तबंबाळ झालेलें; त्राता कोणी नाहीं; दगडफेंक क्रूरपणानें होत आहे ! अखेर एक युरोपियन स्त्री त्यांना लपवून ठेवते ! मरणोन्मुख झालेल्या गांधीजींचे प्राण हिंदुस्थानचें व जगाचें भाग्य म्हणून सुरक्षित राहतात.

पुनः एका शेतावर साध्या शेतकऱ्याप्रमाणें खपणारे गांधीजी दिसतात. आपल्या घामानें जमीन शिंपून उगवेल तें खायचें. साधीं हातसुताचीं जरूरी-पुरतीं वस्त्रें ल्यायचीं. निसर्गाशीं एकरूप व्हायचें. या व्रताचें आचरण चाललेलें दिसतें. त्याचबरोबर दुसराहि एक प्रचंड कल्लोळ झालेला आढळतो. तोफांचा धूमधडाका सुरू आहे. बोअर वॉर पेटली आहे. आघाडीवर रणक्षेत्रांत जखमी झालेल्या सैनिकांना गांधीजी उचलून शुश्रूषेसाठीं आणीत

आहेत ! स्वयंसेवकाच्या वेषांत मृत्यूच्या अगदीं ज्वाळांतून काम करणारे व इंग्रजांचे स्नेही गांधीजी !

हिंदुस्थानांतले कांहीं प्रसंग पाहा !

१९१६ साल. पूज्य मालवीयजींचें बनारस विद्यापीठ मोठ्या थाटानें सुरू झालें. उद्‌घाटन झालें लॉर्ड हार्डिजच्या हस्तें. भव्य मंडप. राजे महाराजे बसले आहेत. किनखाप, जर, रेशीम, हिरे, मोतीं, सोनें यांचा नुसता पाऊस पडलेला दिसत आहे. जणूं इंद्रसभाच ! डोळे दिपविणारें ऐश्वर्य ! कुबेरनगरीच मूर्तिमंत अवतरल्यासारखी वाटते. पण या वैभवशाली वातावरणाचा बेरंग करण्यास काठेवाडी जाडाभरडा पोशाख केलेला एक मनुष्य पुढें सरसावतो. हिंदुस्थानचें अठराविश्वे दारिद्र्यच जणूं त्याच्या रूपानें मूर्तिमंत होऊन बोलत आहे. शांत पण निश्चयी स्वरांत गांधीजी म्हणत आहेत,

" नुसत्या भाषणांनीं कान तृप्त होणें पुरे झालें. आपलीं अंतःकरणें कळवळलीं पाहिजेत आणि आपले हातपाय हलले पाहिजेत.

...पाया घालण्याचा जो समारंभ झाला त्या वेळीं हिऱ्यामोत्यांचें नुसतें प्रदर्शन भरलें होतें. मी या रत्नविभूषित श्रीमंतांची हिंदुस्थानांतल्या लक्षावधि गरिबांशीं तुलना केली आणि मला सांगावेंसें वाटलें; ' हे धनिकांनो ! हें सर्व जडजवाहीर अंगावरून उतरून लोकांसाठीं तें लोकांचें विश्वस्त म्हणून जोंपर्यंत तुम्ही वापरीत नाहीं तोंपर्यंत या देशाचा उद्धार होणें शक्य नाहीं. '

...शेतकरीच आमचें तारण करूं शकतील. वकील, डॉक्टर अथवा मोठे जमीनदार यांच्यानें तें होणें शक्य नाहीं......

इंग्लंड आणि हिंदुस्थान या उभय पक्षांतलें संशयाचें वातावरण मला नाहींसें करून टाकायचें आहे. परस्पर प्रेम आणि परस्पर विश्वास यांवरच मोठें साम्राज्य निर्माण करतां येईल...आपल्या राज्यकर्त्यांना जें निर्भयपणें सांगणें इष्ट असेल तें आपण सांगूं या, मग त्याकरितां कुठलाहि प्रसंग आपणावर आला तरी चालेल......स्वातंत्र्य हें मागून मिळत नसतें. "

अशा सडेतोड भाषणानें सभा पांगते ! राजेमहाराजे उठून जातात !

पुढच्याच वर्षीचें दृश्य ! चंपारण्यांत एकच खळबळ उडाली आहे. ,लाल ' मळेवाले मालक भयंकर लाल झाले आहेत. हिंदी मजुरांना नवें

चैतन्य मिळत आहे. ‘ तो पाहा महात्मा आला ’ या ललकारीनें सर्व अरण्य दुमदुमत आहे. आपल्या स्तनांपासून बालकें ओढून त्यांना गांधीजींच्या पायांवर घालण्याकरितां मजूर स्त्रिया धावत आहेत. गांधीजी सरकारचा मनाई हुकूम मोडून चंपारण्यांत प्रवेश करतात ! सत्याग्रह यशस्वी होतो.

यानंतर प्रळयासारखीं चित्रें दिसतात. परदेशी कापडाच्या होळ्यांच्या ज्वाळा गगनाला पोंचल्या आहेत; लक्षावधि लोकांचे समुदाय, गुत्त्यांचे दारीं चाललेलीं निरोधनें, लाठीबंद पोलिसांचे समुदाय आणि यांच्यापुढें शांतपणें चरखा फिरविणारी गांधीजींची मूर्ति दिसते. उघड्या मैदानावरील देखावे नाहींसे होत होत शेवटीं तुरुंगाच्या भिंती दिसूं लागतात.

दहा वर्षांनंतर ( १९३० ) आणखीच एक नवें दृश्य आतां दिसतें. गुजराथची जानपद भूमि प्रफुल्लित झाली आहे. प्रचंड उन्हाचा ताप टाळण्यासाठीं डोक्यावर गांधीजींनीं फडकें घेतलें आहे. हातांत उंच काठी, कमरेला पंचा आणि खांद्यावर उत्तरीय; बरोबर निवडक सत्तर ऐशीं अनुयायी. रामभद्र परत दंडकारण्यांत शिरले तसाच रम्य प्रसंग. “ झाडांनीं फुलांचे व रसाळ फळांचे अर्घ्य द्यावेत; सुगंधी रानवारे वाहावेत; पक्ष्यांनीं सुस्वर गाणीं गावींत. ” असेंच वनदेवता म्हणत आहेत. गांधीजींचें ठिकठिकाणीं साम्राटा-सारखें स्वागत होतें. समुद्राच्या कांठीं जाऊन गांधीजी बेकायदा मीठ वेंचतात. सर्व हिंदुस्थानभर ‘ नमक का कानून तोड दिया ’ अशी आरोळी उठते.

आतां पाहा. वर स्वच्छ आकाशाचा घुमट. खालीं अथांग सागर कापीत आगबोट चालली आहे. डेकवर गांधीजींनीं आपलें बिऱ्हाड थाटलें आहे. लहान लहान गाजराच्या रंगाचीं गुटगुटीत युरोपिअन् मुलें येऊन त्यांना त्रास देत आहेत. कोणी खाऊ मागत आहेत, नाना प्रश्न विचारीत आहेत. इतक्यांत एक गोरा साहेब येतो. गांधीजींची निंदा करणारें एक काव्य गांधीजींना वाचायला देतो. अशीं काव्यें तो नेहमीं देत असतो. चांगले पांच सहा ताव एका टाचणीला लाविलेले आहेत. गांधीजी त्याकडे पाहून टाचणी आपल्या डब्यांत काढून ठेवतात आणि कागद टाकून देतात. तो गोरा साहेब रागानें म्हणतो, “ मि. गांधी, तुम्हांला या कवितेंत कांहीं तरी सार सांपडलें

असतें. " गांधीजी हंसून म्हणतात, " सार तर मी डबींत काढून ठेवलेंच आहे. अनवश्यक भाग होता तो टाकून दिला. "

१९३२ सालीं येरवड्याचे तुरुंगांत कोण घनघोर प्रसंग ! महात्माजी मरणोन्मुख झाले आहेत. नव्या होऊं घातलेल्या कायद्यानें अस्पृष्ट समाज हिंदुसमाजापासून फुटून निघणार म्हणून गांधीजींना वेदना होत आहेत. " अस्पृष्ट समाज हिंदूंपासून फुटून निघणार असेल तर मी प्राणसमर्पण करीन. " या निश्चयानें गांधीजी आमरण उपोषण करीत आहेत. मोठाले स्पृश्यास्पृश्य पुढारी गांधीजींच्या बिछान्याभोंवतीं चिंतामग्न होऊन बसले आहेत. अखेर स्पृश्यास्पृश्य पुढाऱ्यांची तडजोड होते. सरकार ती मान्य करतें. गांधीजी आपला तो जगविख्यात उपास सोडतात !

यानंतर कॉंग्रेस मंत्रिमंडळांची कारकीर्द; गांधीजींचे अनेक दौरे; चालू महायुद्धाचा आरंभ; गांधीजींचा युद्धविरोध....... एक लाख समुदायापुढें ९ ऑगस्ट ४२ रोजीं मुंबईस गांधीजींनीं केलेलें भाषण. धरपकड; कल्लोळ, दंगेधोपे, ४३ फेब्रुवारींतला उपास...आणि ४४ सालीं सुटका......किती महत्त्वाचे चित्तप्रक्षोभक प्रसंग दिसतात !

स्वातंत्र्य-प्राप्तीपूर्वींची ती नौखालीची महान् यात्रा ! मुसलमानांनीं केलेल्या अत्याचारांमुळें गांजलेल्या नौखालींतला तो पायीं प्रवास ! शेंकडों पीडितांचे अश्रु पुसणें, शेंकडों दुःखितांना धीर देणें !—आणि याबरोबरच ग्रामसफाईपासून चरख्यापर्यंत आपल्या साऱ्या व्रतांचा प्रचार !

३० जानेवारी १९४८ हा दिवस उगवतो. दिल्लीस सायंकाळीं बिर्ला-भवनच्या पटांगणांत प्रार्थनेसाठीं लोक जमले आहेत. गांधीजी प्रार्थनेच्या जागीं येतात. तों एक इसम पादवंदनासाठीं वाकतो आणि लगेच मान उचलून म्हणतो, 'गांधीजी तुम्हांला ५ मिनिटें उशीर झाला' ! गांधीजी कांहीं उत्तर देतात तोंच हा इसम एकामागून एक चार गोळ्या मारतो—" हे राम ! " असा उद्गार काढून गांधीजी खालीं पडतात ! ! थोड्याच वेळांत गांधीजी स्वर्गस्थ होतात ! ! सारें जग दुःखांत बुडून जातें !

एखाद्या सुंदर वस्त्राला झालर असते. महात्म्यांच्या जीवनांत दररोज घडणाऱ्या गोष्टी या झालरीसारख्या असतात. सर्व धर्मांच्या लोकांनीं एकत्र

जमून करावयाची दररोजची प्रार्थना पाहा. महात्माजींच्या उदात्त चरित्रपटाला कितीतरी सौंदर्य देई. आश्रमांत झाडांची निगा, रोग्यांची शुश्रूषा, चरख्याचें व्रत, शिक्षणाचे प्रयोग, इ. प्रत्येक कामीं महात्माजी दक्ष होते. जें अवधान काँग्रेसच्या लक्षावधि समुदायाला युद्धाचा आदेश देतांना तेंच आश्रमांतल्या पीडितांना उपचार सुचवितांना.

पुनः मला पहिल्या मुद्यावर यायचें आहे. वर सांगितलेले कांहीं प्रसंग किंवा दिनचर्येंतल्या गोष्टी यांत प्रत्येकांत एक वेगळें मोठेंपण आहे. अन्यायाची चीड, धैर्य, भूतदया, गरिबांचा कळवळा, विनोद, सहिष्णुता, काटकसर, नवी निर्मिति अशा अनेक उत्तमोत्तम गुणांचा विकास दिसतो. गांधीजी कुठें आपणांला वीर पुरुष दिसतात, कुठें दयाळू संत, तर कुठें प्रेमळ गृहस्थाश्रमी, कुठें कडक स्पष्टवक्ते तर कुठें विनोदी माणूस असे वाटतात. त्या विराट् वडांतला प्रत्येक वड जवळ जवळ तितकाच मोठा किंवा गंगानदीच्या फाट्यांतला प्रत्येक फाटा म्हणजे एक महानदी तसें गांधीजींचें आहे. त्यांची प्रत्येक भूमिका मूळ भूमिकेएवढी आहे. पण प्रत्येक वडांतलीं द्रव्यें मूळ वडांतलींच असतात. प्रत्येक मुखांतलें पवित्र व निरामय पाणी मूळ गंगा नदीचेंच असतें. महात्म्याच्या स्वतंत्र अशा अनेक भूमिका असोत, पण प्रत्येक भूमिकेंतला जीवनरस एकच असणार. तो शोधून काढणें आणि मग त्याचा विस्तार पाहणें म्हणजे त्या उदात्त जीवनकथेचें रहस्य शोधणें होय.

हें जीवनरहस्य शोधणें एक परीनें कठीण आहे. कारण गांधीजी हें एक अद्भुत कोडें होतें. जीवनाच्या दरएक शाखेंत त्यांनीं स्वतंत्र अशी भर घातली आहे. त्यांचें जीवन ही एक प्रचंड प्रयोगशाळा होती. या प्रयोगशाळेंत सत्याचे प्रयोग चाललेले असत. कांहीं प्रयोग अर्धवट वाटतात, कांहीं एक-मेकांच्या विरुद्धहि वाटतात. पण ज्या एका गूढ व सामर्थ्यवान् ध्येयानें हे प्रयोग सुरू होते त्याचा अंदाज जर आपणांला आला तर गांधीजींचें जीवनरहस्य हातीं येणें फारसें अवघड नाहीं.

दुसऱ्या एका दृष्टीनेंहि अवघडपणा कमी झाला आहे. गांधीजींचें सर्व जीवन खुलें, अगदीं आरशाच्या कपाटांत मांडून ठेवलेल्या पदार्थांसारखें होतें. त्यांच्या हातांत चोरपानें नव्हतीं. आणि जगांतल्या लोकोत्तर पुरुषांनीं

गांधी-जीवनाचें रहस्य जाणून घेण्याचा प्रयत्न केला आहे. या प्रयत्नानें पुष्कळ कोडीं सहज उलगडतात.

मानवाचें जीवन ही एक मंगल-यात्रा आहे. मनुष्यानें निसर्गाशीं झुंज केली, क्रूर प्राण्याशीं टक्कर दिली, कला आणि विद्या वाढविल्या. पण पुनः पुनः विरोधी शक्ती निर्माण होतात. ह्या विरोधी शक्ती म्हणजे दर-वेळींच परचक्र, पारतंत्र्य, भूकंप अशा बाहेरून कोसळलेल्या असतात, असें नाहीं. क्रोध, लोभ, मोह ह्यांहि अंतरंगांतल्या शक्तींनीं माणसांचा मंगल प्रवास खुंटतो! असत्याचें धुकें पसरतें! मानवयात्रीचा लवाजमा हिंसेवर आदळून त्याची मोडतोड होते. आतां इथेंच सारें संपलें अशा निराशेच्या तडाख्यांत तो सांपडतो.

यांतून मार्ग पुढें काढण्यासाठीं प्रत्येक व्यक्ति आणि समाज यांनीं मोठी साधना करावयाची असते. आपण 'मंगल धामा' कडे निघालों आहोंत 'जिथें चित्त भयशून्य होतें, मस्तक उंच होतें, संकुचित भिंतींनीं ज्ञानाला मर्यादा घातल्या जात नाहींत,' असें तें मंगलधाम आहे. या 'मंगल धामा'-च्या मार्गावर आपला प्रवास कुंठित होऊं नये म्हणून अंतर्बाह्य शत्रूंशीं आपणांला झगडा करावयाचा आहे. हा झगडा यशस्वी रीतीनें कसा करावा हें शिकविणारा आपला लोकोत्तर नेता पुढें चालला आहे. त्याच्या अंगीं फुलाचें मार्दव आहे, तसें वज्राचें बळहि आहे. तो संत आहे तसाच वीरहि आहे. तृणाचें पातें असतें तसा तो कृश आहे. पण हें पातें केवढें प्रभावशाली आहे! कविवर्य तांबे म्हणतात,

यांतुनि कृष्ण मुरलि वाजवितो।
वामन बळीस यांत दडपतो, ।
यांतुनि नारसिंह गुरगुरतो ।
भ्या रे पातें—
तृणाचें पातें—

या कृश मूर्तीनें शिकविलेली साधना कशाची आहे? सत्याची. सत्य हाच परमेश्वर असें हा महात्मा म्हणतो. त्या सत्याचें स्वरूप कोणतें? आपल्या साधनेची तयारी करण्यापूर्वीं तेंच आपणांला प्रथम पाहावयाचें आहे.

० ० ०

## " भक्त व्हा सत्याग्रही " : : २

आपण जिच्यावर राहतों ती पृथ्वी कशी तयार झाली ? गुरु, शुक्र हे सारे ग्रह तारे कसे जन्मले ? ठाऊक आहे तुम्हांला ! एक खूप मोठा तेज:-समूह होता. आपले अनेक सूर्य त्यांत सामावतील एवढा विराट् होता तो. सारें अनंत आकाश त्याच्यांतून निघणाऱ्या ज्वाळांनीं प्रकाशित झालेलें दिसे. असा तो तेज:समूह कांहीं काळानें दुभंगूं लागला. त्याचे तुकडे पडूं लागले. लहानमोठे आकार होत हे तुकडे मुळापासून वेगळे झाले आणि स्वतंत्रपणें आकाशांत हिंडूं लागले. त्यांनाच शुक्र, गुरु, बुध अशीं नांवें पडलीं. कांहीं तुकड्यांभोंवतीं ज्वाळांचीं कडीं राहिलीं, तर कित्येकांभोंवतीं लहानसे तुकडे चंद्ररूप घेऊन फेऱ्या मारूं लागले. आपली पृथ्वी अशीच निर्माण झाली आहे. तिच्याभोंवतीं एक चंद्र आहे.

गांधीजींचीं अनेक व्रतें आतां प्रसिद्ध आहेत. अहिंसा, अस्तेय ( चोरी न करणें ), अपरिग्रह ( संचय न करणें ), अस्वाद ( खमंग पदार्थ वर्ज्य करणें ) हीं व अशीं कित्येक व्रतें गांधीजींच्या आचरणांत प्रमुख होतीं. पण हीं सारीं मूळ सत्यापासून निघालीं आहेत. सत्य हें आदिकारण, सत्य हा तेज:समूह आणि हीं व्रतें हे ग्रह, तारे आहेत. मुळांतलें तेज त्यांच्यांत आहे आणि मुळांतल्या तेजाची उपासना करण्यासाठीं त्यांचा अवतार आहे. हीं व्रतें सत्यापासून निघालीं आणि सत्याचा शोध घ्यायचा असेल तर आपण या व्रतांची कास धरली पाहिजे.

सत्य म्हणजे खरें एवढेंच आपण जाणतों. सत् याचा अर्थ ' असणें ' असा आहे. अर्थात् सत्य म्हणजे असण्याचा भाव. " सत्यापरता नाहीं धर्म । सत्य तेंचि परब्रह्म " असें आपले संतकवि सांगतात. याचा अर्थ उघड आहे. जें खरेंखुरें अस्तित्वांत आहे त्याची उपासना करणें हा धर्म. तुमच्यावर कोणी मतलबी माणूस माया करीत आहे. खूप गोड बोलतो, तुम्हांला मेवा-

मिठाई खायला देतो, तुमचें कपाळ ऊन झालें की त्याला चिंता लागलेली दिसते. उलट, तुमची आई तुमच्याशीं कडकपणें वागते, तुम्हांला ऐपत असेल त्याप्रमाणें खायला देते; मात्र वेळप्रसंग आल्यास तुमच्यासाठीं प्राण देण्याचीहि तिची तयारी आहे. आतां मतलबी माणसाची माया कितीहि सुखकर भासत असली तरी मुळांत तिला कांहीं अस्तित्व आहे का ? मुळींच नाहीं. पण माता बाह्यतः रुक्ष दिसत असली तरी तिच्या पोटीं उदंड माया आहे. असत् ( नसणें ) आणि सत् ( असणें ) यांतला हाच फरक. अर्थात् या ठिकाणीं ' सत् 'ची उपासना करायची म्हणजे मातेची सेवा करायची हें ओघानेंच आलें.

सत्याचें विलक्षण प्रेम गांधीजींना होतें. वॉशिंग्टनची गोष्ट आपण वाचतों. बापाच्या अत्यंत आवडत्या वृक्षराजावर बाल वॉशिंग्टननें आपली नवी कोरी कुऱ्हाड चालविली. आणि " बाबा माझ्यानें खोटें बोलवत नाहीं. " असें म्हणून खवळलेल्या पित्याजवळ आपला अपराध कबूल केला. मोहनदास गांधी हे असेच सत्याचरणी होते. लहानग्या मोहननें एकदां एक सोन्याचा दागिना विकला आणि बाजारांतून त्या पैशावर खाऊ विकत घेतला. अर्थात् पित्याच्या न कळत हें सर्व झालें होतें ! पण खाऊ खाण्याची वेळ आली तेव्हां आपण हें सर्व पाप करीत आहों, असत्य आचरण आपल्या हातून होत आहे असें मोहनदासांना वाटूं लागलें. त्यांचा कंठ भरून आला. त्यांना हुंदका आवरेना. ते तसेच पित्यापाशीं गेले आणि त्यांनीं आपल्या अपराधाची कबुली दिली !

सत्याची पायमल्ली अगदीं सूक्ष्म प्रमाणांत झालेली सुद्धां गांधीजींना खपत नसे. एकदां एका जिल्हाधिकाऱ्यांनीं एक उर्मटपणाचें पत्र गांधीजींना लिहिलें. पुढें पश्चात्ताप झाला म्हणून म्हणा किंवा वरिष्ठांकडून कान उपटले गेले म्हणून म्हणा तें पत्र त्या अधिकाऱ्यानें मागें घेतलें. आणि तें आपणांकडे परत पाठविण्याविषयीं गांधीजींना विनंति केली. ती गांधीजींनीं मान्य केली. पत्र परत पाठविण्यापूर्वीं कांहीं गांधीशिष्यांनीं त्या पत्राची नक्कल करून घेण्यास सुरुवात केली. ह्याचा कडक शब्दांत गांधीजींनीं निषेध केला. ते म्हणाले, " पत्राची प्रत आपल्याजवळ नसावी ही त्या अधिकाऱ्याची इच्छा आहे. मग पत्राची प्रत करून कां ठेवतां ? हा त्याचा विश्वासघात नाहीं का ?

हें असत्याचरण आहे. " मूळ पत्र नक्कल न होतांच परत करण्यांत आलें हें सांगणें नकोच !

उमर सोभानी हे गांधीजींचे एक आवडते व निष्ठावंत शिष्य होते. एकदां कांहीं प्रचारपत्रिका त्यांनीं छापल्या. पत्रिकांवर जेवढी संख्या घातली होती तीपेक्षां हजारों प्रती त्यांनीं जास्त छापल्या होत्या. हें असत्याचरण होतें. गांधीजींना ही गोष्ट कळतांच ते रागावले. तेव्हां उमर सोभानी यांनीं रातोरात त्या जादा प्रती जाळून टाकल्या. सकाळीं हें त्यांनीं गांधीजींना सांगितलें. तेव्हां गांधीजी म्हणाले, ' प्रती जाळल्या हें ठीक झालें. पण अमुक प्रती छापल्या आहेत असें मुद्रित करून आणि त्यापेक्षां अधिक छापवून घेऊन तुम्हीं सरकारची फसवणूक केली आहे. म्हणून पोलीस कमिशनरसाहेबांना जाऊन ही हकीकत सांगा आणि ते देतील ती शिक्षा भोगा. ' उमर सोभानी यांनीं गांधीजींची आज्ञा पाळली. ह्या सत्यप्रिय गांधीशिष्याचें सरळपण पाहून कमिशनरसाहेब फक्त हंसले एवढेंच.

शिक्षा, अपयश, किंवा अप्रियता, कसल्याहि भयानें सत्यपूजनांत अंतर पडतां कामा नये. एकदां एका सभेंत गांधीजींची सूचना मतासाठीं पुढें आली. तिला मातबर लोकांचा विरोध होता. खूप खडाजंगी उडाली. वादविवादाचा पारा वर चढला. अखेर विरोधक सभागृहांतून बाहेर पडले. पण गांधीजींनीं सूचनेवर मतें घेतांना विरोधकांचीं मतेंहि विरुद्ध मतांत जमेस धरलीं आणि अखेर गांधीजींचा त्या सूचनेवर पराभव झाला ! गांधीजींना हें भविष्य कळून चुकलें होतें तरी सभेंत आपल्याला बहुमताचा विरोध आहे या सत्याला तोंड देण्यास त्यांनीं मागेंपुढें पाहिलें नाहीं.

सत्य हें साध्य. त्याचा शोध हें ध्येय, आणि अहिंसा हें त्या ध्येयाचें साधन. गांधीजींच्या सर्व अवतारकार्याचें हें सार आहे. पाण्यावर जोंवर शेवाळ आहे तोंवर त्यांत सूर्याचें बिंब स्पष्ट दिसत नाहीं. मनावर हिंसा, क्रोध, लोभ यांचें शेवाळ आहे तोंवर सत्यसूर्याचें प्रतिबिंब त्यांत पडणार नाहीं. अर्थातच हें शेवाळ दूर करण्यास झटणें हीच सत्याची साधना.

आईबापांना मुलांचें खरें हित कळत नसलें तरी त्यांचें मुलांवर प्रेम असतें. त्या प्रेमासाठीं आईबाप खस्ता खातात, हातांचा पाळणा आणि डोळ्यांचा

दिवा करून मुलांचें संगोपन करतात, आणि आपल्या सुखसोयींचा आनंदानें यज्ञ करतात पण, अशानें मुलांचें कल्याण होतेंच असें नाहीं. कारण या भाबड्या प्रेमाला खऱ्या हिताच्या बुद्धीची म्हणजे सत्याची जोड नसते. तरुणाचें एखाद्या मुलीबद्दलचें आकर्षण सत्याच्या पायावर आधारलेलें नसेल तर त्याची मोहांत गणना होईल. आणि मोहाचा भर लौकरच ओसरून त्या मोहाचें रागांत, निराशेंत रूपांतर होईल. खऱ्या हितबुद्धीवर आधारलेलें प्रेम हेंच सत्य. याच सत्याच्या नाण्याची एक बाजू प्रेम आणि दुसरी बाजू सत्य. हें नाणें चोहींकडे चालतें. त्याचें मोल करतांच येत नाहीं, तें अमूल्यच असतें.

सत्याच्या पूजनांत हिंसेचा कणहि मनांत उरूं देतां उपयोगी नाहीं. सत्यपूजकाची पहिली तयारी केवढी पाहिजे याविषयीं बुद्धदेवांची एक गोष्ट फार बोधप्रद आहे. " **चरथ भिक्खवे चारिकं, बहुजनहिताय, बहुजन-सुखाय** " ( हे भिक्षूंनो, बहुजनांच्या हितासाठीं आणि बहुजनांच्या सुखा-साठीं जगभर संचार करा ) असा आदेश देऊन भगवान् बुद्धांनीं आपले अनुयायी दाही दिशांना पाठविले हें सर्वविश्रुत आहे. एकदां एका देशांत अनुयायी पाठविण्याची तयारी बुद्धदेव करीत होते. त्या देशांत बौद्ध धर्माची ज्योत प्रथमच प्रज्ज्वालित करावयाची होती. अनेक शिष्यांची पारख बुद्धदेवांनीं केली. पण त्या देशांत पाठविण्याइतका प्रभावी प्रचारक त्यांना सांपडेना. अखेर पूर्ण नांवाचा एक शिष्य पुढें आला.

त्याला बुद्धदेवांनीं विचारलें, " पूर्णा, तुला कोणत्या देशांत जायचें आहे हें माहीत आहे ना ? "

" होय, भगवन्. "

" त्या देशांतले लोक मोठे क्रूर, कठोर, शिवीगाळ करणारे आहेत याची जाणीव आहे ना तुला ? "

" आहे, भगवन्. "

" त्या लोकांनीं तुझी निंदा केली तर काय वाटेल तुला ? "

" त्या वेळीं मी म्हणेन यांनीं माझ्यावर प्रहार केले नाहींत त्या अर्थी हे चांगले लोक आहेत. "

२९८३० 
२००८ 
नो. दि. ३-८

“ आणि त्यांनीं तुझ्यावर हातानें प्रहार केला तर ? ”

“ भगवन्, त्यांनीं दगडांनीं मारलें नाहीं म्हणून ते लोक चांगलेच आहेत असें मी समजेन. ”

“ बरं, पूर्णा, त्यांनीं तुझ्यावर दगडफेक केली तर ? ”

“ त्यांनीं माझ्यावर दंडाचा प्रयोग केला नाहीं म्हणून मी त्यांना दुवा देईन. ”

“ आणि समज, त्यांनीं तुला ठारच केलें तर ? ”

“ भगवन्, शरिराला कंटाळून कित्येक भिक्षु आत्मघात करतात. तशी वेळ न येतां लोकांनीं अनायासें हें माझें शरीर नष्ट केलें हे त्या लोकांचे उपकारच मी मानीन. ”

“ शाबास पूर्णा, धर्मप्रसार करण्यासाठीं तूं सर्वथैव योग्य आहेस. ” असें प्रसन्नपणें बुद्धदेवांनीं म्हटलें आणि पूर्णाला त्या देशांत पाठविलें.

सत्याचा कायदा म्हणजे प्रेमाचा कायदा हें गांधीजी म्हणतात त्याचें रहस्य या कथेवरून स्पष्ट होईल.

सत्याग्रह हा मनुष्याचा श्रेष्ठ धर्म आहे. खऱ्याची पूजा करावयाची, असत्याचा बीमोड आत्मक्लेशानें करावयाचा याचें हें शास्त्र आहे. सत्याचें आचरण करतांना हिंसेचा स्पर्शहि आपणाला होऊं द्यायचा नाहीं ही अत्यंत श्रेष्ठ कला आहे. ज्वाळांच्या कड्यांतून सफाईनें पार होणारे कुशल क्रीडापटु आपण सर्कशींत पाहतों ना ? तशा प्रकारचें कौशल्य सत्यपूजनांत माणसानें कमवावें लागतें. एखाद्या गांवांत लोकांच्या कांहीं हक्कांसाठीं झगडण्यास तुम्ही निघालां तर मन शांत ठेवणें तुम्हांला क्षणोक्षणीं कठीण होईल. तुम्हांला ज्यांच्याशीं सामना द्यावयाचा आहे ते वतनदार लोक तुमच्या भावना चेतवतील, तुम्हांला दंडाचें, तुरुंगाचें भय घालतील, तुमची निर्भत्सना करतील, किंवा तुम्हांला मारेकरीहि घालतील. पण यांत तुम्हांला आपलें धैर्य व शांति ही मेरूप्रमाणें अढळ ठेवावी लागेल. असें करण्यानेंच तुमचा अधःपात होणार नाहीं आणि विजयाची निश्चिती होईल.

सत्याची कास सोडूं नका आणि आपल्या वासनांवर नियंत्रण घालून मन शुद्ध ठेवा, म्हणजे सेवाभाव आणि दयाळुता तुमच्यांत आपोआपच उदय

पावूं लागेल. आपण एकदां आपला राग घालविला आणि क्षमाशील वृत्ति वाढीस लावली म्हणजे अहिंसेचें सौन्दर्य सहजासहजीं अनुभवाला येऊं लागतें; माणसामाणसांतलीं किंवा राष्ट्राराष्ट्रांतलीं भांडणें अहिंसेनें मिटविणें शक्य आहे याचें ज्ञान सहज होतें. रागावलेल्या–खवळलेल्या मुलाला ताळ्यावर आणणें तिऱ्हाइताला कित्येकदां अशक्य होऊन जातें पण बहीण किंवा आई चटकन् त्याची समजूत पाडूं शकते. तें कां ? तिऱ्हाइताला त्या मुलाबद्दल जिव्हाळा वाटत नसतो आणि म्हणूनच मुलाच्या अंतरंगांत सहजासहजीं प्रवेश मिळविणें व त्याच्या असंतोषाचें कारण शोधणें त्याला कठीण होऊन जातें. बहीण किंवा आई या त्या मुलाकरितां जीवाची कुरवंडी करण्यास तयार असतात. म्हणून त्यांना मुलाच्या अंतरंगांत अगदीं गाभाऱ्यापर्यंत सहज जातां येतें. संतोष हें सत्याग्रह–वृक्षाचें मूळ आहे. वस्त्रप्रावरणें, चैनीचे पदार्थ, मोटारी, हिरेमाणकें यांनीं पृथ्वी भरून जावी किंवा आपलें भांडार भरावें असें सत्याग्रह्याला कधींच वाटत नाहीं. तो अल्पसंतुष्ट असतो. दुसऱ्याला देण्यांत व दुसऱ्यासाठीं झिजण्यांत त्याला आनंद वाटत असतो. सत्याग्रह हा यज्ञधर्म आहे.

" हजार सूर्य एकत्र केले तरी सत्यसूर्याच्या प्रकाशाची बरोबरी होणार नाहीं, " असें गांधीजी म्हणत. श्रीमत् भगवद्गीतेंत अर्जुनाला जेव्हां श्रीकृष्णांनीं आपलें विराट् स्वरूप दाखविलें तेव्हां आकाशांत एकदम हजार सूर्य एकाच वेळीं उदय पावले असें तेजस्वी वर्णन आहे. एका सूर्याकडे मध्यान्हीं आपण टक लावून पाहूं लागलों तर आपले डोळे दिपून जातात. मग अर्जुन या हजार सूर्यांच्या प्रकाशाकडे कसा पाहूं शकला, असा प्रश्न पडतो. पण त्याचें उत्तर गीतेंतच आहे. हें विराट् स्वरूप दाखविण्यापूर्वी अर्जुनाला श्रीकृष्णांनीं अगोदर दिव्यदृष्टि दिली होती. त्यामुळें हजार सूर्यांच्या तोडीचा प्रकाश तो डोळ्यांनीं पाहूं शकला.

महात्माजी सत्य-रूपी सूर्याला हजार सूर्यांच्या प्रकाशानें तुलत, तेव्हां त्या सत्य-रूपी सूर्याकडे पाहण्यासाठीं सुद्धां आपण कोणती दिव्यदृष्टि घेतली पाहिजे हेंहि ते सांगत. पांडवांच्या काळीं हव्या त्या माणसाला कांहीं श्रीकृष्णानें आपलें विराट् रूप दाखविलें नाहीं. जें पाहण्यासाठीं मोठमोठे देवहि झुरत होते तें रूप अर्जुनच पाहूं शकला. म्हणजे अर्जुनाला तें दिसावें असा कांहीं

थोर अधिकार अर्जुनानें प्राप्त करून घेतला होता. गांधीजी ज्याचें माहात्म्य वर्णन करीत, तें देदीप्यमान सत्य उगीच वाटेल त्याला दिसणार नाहीं. त्यासाठीं पुराणकालीन अर्जुनाप्रमाणें अधिकार कमवावा लागेल. तो अधिकार कसा कमवावा याचें ज्ञान गांधीजींच्या उपदेशांत व जीवनांत आपणांला सांपडतें.

० ० ०

गांधी-सूक्ति :

“ विपत्तींत धैर्याशिवाय दुसरा इलाज नाहीं. स्मशानांतहि निर्भयपणें झोंप घेणें हें आपलें कर्तव्य आहे, परंतु तेथें निद्रेस सुरुवात करतांच मनुष्य भीतीनें मरणें संभवनीय आहे. तसेंच तुमचें व माझें. हिंदुस्थान हल्लीं स्मशानवत आहे. म्हणून तेथें बैठक घालून मीराबाईचें एखादें पद म्हणत भजन करतां येईल. ही तयारी करणें योग्य आहे व ती करावी लागेल. कोणत्याहि प्रकारें व कोणत्याहि काळीं येणाऱ्या मृत्यूचें आनंदानें स्वागत करतां येईल इतकें बळ प्रत्येक माणसाच्या अंगीं यावें अशी माझी इच्छा आहे. ”

## सत्याग्रहाचीं सूत्रें : : ३

कुठलेंहि ज्ञान, कुठलीहि विद्या किंवा कला मिळविण्याचा उत्कृष्ट मार्ग ठरलेला आहे. माणसाचे अंगीं श्रद्धा पाहिजे, त्या गोष्टीचा उत्कट अभ्यास करण्याचें त्यानें मनावर घेतलें पाहिजे, आणि त्यासाठीं इंद्रियनिग्रह केला पाहिजे. श्रद्धा, तत्परता, आणि इंद्रियनिग्रह असा त्रिवेणी-संगम झाल्या-वांचून कांहींच साध्य होणार नाहीं हा नियम स्वयंसिद्ध आहे. त्याला अपवाद असा दाखवितांच येणार नाहीं.

हा नियम समजून घेणें मुळींच कठीण नाहीं. असें पाहा, एका विद्यार्थ्याला एका कलेंत पारंगत व्हायचें आहे. कोणत्या कलेंत ? सर्वांना प्रिय असलेल्या गायनकलेंत असें समजूं या. ' गायनकला ही एक श्रेष्ठ कला आहे आणि मानवी जीवनाला तिनें सौंदर्य आणिलें आहे. म्हणून या कलेंत पारंगतता मिळविणें हेंच माझ्या जीवनाचें सार्थक आहे, ' ही श्रद्धा त्या विद्यार्थ्याचे अंगीं असणें अत्यवश्य आहे. ही कलाभ्यासाची अगदीं प्राथमिक तयारी झाली. त्यानंतर त्या कलेच्या अभ्यासांत त्यानें तत्पर असणें हें ओघानेंच येतें. गुरूजवळ नव्या चिजेची संथा घ्यायची आणि ती चीज मेहनतीनें बसवायची; आपल्या गाण्यांत सुरेलपणा आणि लयबद्धता यावी यासाठीं सावधानपणें संगीताची तालीम होईल तेवढी करायची. हा अभ्यास तो विद्यार्थी जितक्या तत्परतेनें करील तितका तो आपल्या कलेंत अधिक पारंगत होईल. आणि यासाठीं त्याला इंद्रियनिग्रहहि करावा लागेल. खमंग पण कुपथ्यकारक खाद्य पदार्थ त्याला वर्ज्य करावे लागतील; जाग्रणें टाळावीं लागतील. असें केल्याशिवाय त्याचा गळा साफ व सुरेल राहणार नाहीं. सूक्ष्मपणें विचार केला तर शिल्प, चित्रकला, नृत्य, गणित, वाङ्मय इ. साऱ्याच कला आणि विद्या या वर सांगितलेल्या शिस्तीनेंच मिळवाव्या लागतात.

" श्रद्धावाँल्लभते ज्ञानं तत्परः संयतेंद्रियः । "

ह्या गीतावचनांतलें सत्य त्रिकालाबाधित आहे. जगांतील सर्व ज्ञानी व कलाविद् यांच्या यशाचें रहस्य या एका वाक्यानेंच उकलून दाखवितां येतें.

सत्याचा शोध ही तर अवघडांत अवघड अशी विद्या आहे. सर्व विद्यांची ती जननी आहे. अर्थात् ही सर्वांत अवघड विद्या साध्य करून घेण्यासाठीं वर सांगितलेले नियमहि तितक्याच कडक रीतीनें पाळावे लागतात. या जगाचें जीवन ज्या मूलभूत तत्त्वांवर चाललें आहे त्याचा शोध करणें हें सत्यसंशोधन होय. आणि आपल्या शुद्ध बुद्धीला पटलेलें सत्य हेंच खरें मानणें, तें इतरांस पटाविणें, त्याची गळचेपी होत असेल तर ती नाहींशी करण्यासाठीं स्वतः क्लेश सोसून झगडणें, आणि त्या सत्याला प्रकट होण्यास मार्ग मोकळा करून देणें याला सत्याग्रह म्हणतात. सत्याग्रह याचा अर्थ सरकारचे कायदे मोडून तुरुंगभरती करणें एवढाच नाहीं. सत्याग्रहाचा एवढाच अर्थ करणाराला सत्याग्रहाचें खरें मर्म समजलेलें नसतें. सत्याग्रह हा जीवनाच्या प्रत्येक क्षणीं आचरावयाचा धर्म आहे. सत्याच्या आचरणासाठीं तुम्हांला भावाशीं, बहिणीशीं, आईवडिलांशीं, मित्रांशीं, गुरुजनांशीं प्रसंगीं झगडावें लागेल; प्राणाहून प्रिय असलेलीं प्रेमबंधनें आणि शरीर-मनाला पुष्टि व तुष्टि देणारें ऐश्वर्य यांचा त्याग करावा लागेल.

जितकें शरिरानें व मनानें आपण अधिक शुद्ध होत जाऊं तितकें सत्याचें दर्शन आपणांला अधिक स्पष्ट होत जाईल. लहानसहान गोष्टींतहि सत्याचा आग्रह आपण धरला तर साऱ्या जीवनाला हळूहळू सत्याची बैठक येत तें उन्नत होत जाईल. माझ्या एका श्रेष्ठ सत्याग्रही देशभक्ताची गोष्ट या ठिकाणीं सांगणें अप्रस्तुत होणार नाहीं. आमच्या विद्यार्थिदशेंतली आहे ती गोष्ट. आम्ही मॅट्रिकमध्यें असतांना एक तऱ्हेवाईक शिक्षक वर्गावर आले. बाकांच्या पुढील रांगेंत एक बावळट चेहऱ्याचा विद्यार्थी बसलेला होता. शिक्षकांच्या सौंदर्यदृष्टीला हें दृश्य मानवेना ! त्यांनीं त्या मुलाला सर्वांत मागच्या रांगेंत बसावयास फर्माविलें. आणि मागच्या रांगेंत एक नीटनेटका पोषाख केलेला आकर्षक चेहऱ्याचा विद्यार्थी बसलेला होता. त्याला त्या बावळट विद्यार्थ्याच्या जागीं येण्यास सांगितलें. वास्तविक पुढील रांगेंतला विद्यार्थी त्या जागेवर

अनेक दिवस बसत होता. आडनांवांच्या वर्णानुक्रमानेंहि त्याची जागा तीच येत होती. शिवाय बिचाऱ्याला कमी ऐकूं येत असल्यानें त्याला पुढील रांगेंत बसणेंच सोयीचें होतें. ह्या गोष्टी आम्हां सर्वांना माहीत होत्या. पण नव्या शिक्षकांच्या विचित्र फर्मानाला विरोध करायला आमच्यापैकीं कोणी पुढें येईना. पण आमचा सत्याग्रही मित्र उठला आणि निश्चयी स्वरांत म्हणाला,—

" सर, त्याला पाहिल्या रांगेंतून उठवूं नका. "

" कां ? "

" तिथें तो वर्षाच्या आरंभापासून बसतो आहे. त्याला ऐकायला कमी येतं. तो मागें गेला तर त्याचें नुकसान होईल, सर. "

" बहिरा आहे वाटतं तो ! "

" सर, हे तुमचे शब्द निर्दयपणाचे आहेत. एखाद्याला ऐकायाला कमी येतं हें म्हणणं वेगळं आणि तो बहिरा आहे हें म्हणणं वेगळं. "

" बरं ! (रागानें) तूं मला ब्रह्मज्ञान शिकवूं नकोस ! हा बावळट मुलगा पुढल्या बाकावर बसल्यानं माझ्या वर्गाचा डौल बिघडतो. "

" पण सर, तुमच्या सौंदर्याच्या कल्पनेपायीं या बिचाऱ्याचं नुकसान होईल त्याची वाट काय ? त्याला तुमचं आणि इतर शिक्षकांचं शिकवणं ऐकूं येणार नाहीं; त्याचं वर्ष फुकट जाईल. "

" तुझ्या अशा मग्रुरीनें तुझं मात्र वर्ष फुकट जाईल ! तूं नादार आहेस. शिक्षकाचे हुकूम व शाळेची शिस्त पाळणं हें तुझं कर्तव्य आहे हें लक्षांत आहे ना ? "

" पूर्ण लक्षांत आहे, सर. पण माझ्या एका वर्ग-मित्राच्या हक्कावर गदा येत असेल तर त्याच्या संरक्षणासाठीं पुढें होणं हेंहि माझं कर्तव्य आहे. माझं नुकसान झालं तरी चालेल. मी तुमची अवज्ञा करीत नाहीं. नम्रपणें या मुलाबद्दल न्याय मागतों आहें. "

दिव्यानें दिवा उजळावा त्याप्रमाणें आमच्या सत्याग्रही मित्राच्या बाणेदार वर्तनानें आमच्यांतले कांहीं लोक धीट झाले आणि त्या बावळट मुलाची कड घेऊं लागले. वर्गांतलें विरोधी वातावरण पाहून शिक्षकांनीं

गुरगुरत चरफडत का होईना पण आपलें मूर्खपणाचें फर्मान परत घेतलें ! या एकाच प्रसंगावरून निर्भयता, अनुकंपा, न्यायशीलता, अहिंसा इ. कोणत्या गुणांची आवश्यकता सत्याग्रहाला असते हें समजून येईल. आमचा तो सत्याग्रही बालमित्र तपश्चर्येनें व त्यागानें क्रांतिकारक युवकांचा थोर नेता म्हणून आज सुप्रसिद्ध आहे. महाराष्ट्रांतील कुठल्याहि पक्षांतल्या पुढाऱ्यांना विचारलें तर ‘ बावनकशी सोनें ’ असेंच त्याचें गौरवपर वर्णन तुम्हांला ऐकायला मिळेल.

महात्मा गांधी पहिल्यानें आफ्रिकेंत गेले तेव्हांची गोष्ट प्रसिद्ध आहे. उच्च श्रेणीच्या लोकांसाठीं जे वर्ग राखून ठेवतात त्यांत गांधीजींना बसायला जागा मिळेना. त्यांच्याजवळ त्या वर्गाचें तिकीट होतें. पण या ‘ काळ्या आदमी ’ला आंतले मगरूर गोरे आंत बसूं देईनात. गांधीजींनीं डबा सोडून जाण्याचें साफ नाकारलें. आपलें तिकिट या वर्गाचें आहे, येथें बसण्याचा आपणाला हक्क आहे ह्या सत्याचा आत्मविश्वास त्यांचे अंगीं होता. गोऱ्या लोकांनीं त्यांना मारलें, फेकून दिलें तरी दुसऱ्या म्हणजे खालच्या वर्गांत बसण्याचें त्यांनीं साफ नाकारलें ! केवळ एका डब्यांतील हक्काच्या जागेकरितां गोऱ्या लोकांशीं निर्भयतेनें झगडण्यांत गांधीजींनीं जो सत्याग्रह आचरिला त्याचेंच विराट् स्वरूप आज अर्धशतकानंतर सर्व जगाला चकित करीत आहे !

आफ्रिकेंत झालेल्या सत्याग्रहाच्या साक्षात्काराचें गांधीजींनीं शास्त्र बनविलें. कुठलीहि विद्या किंवा कला मिळविण्याचा जो गीता-प्रणीत तपोमार्ग वर सांगितला त्याच्याच आधारें गांधीजींनीं सत्याग्रहाच्या आचाराविचाराचें शास्त्र बनविलें.

सत्याग्रह याचा विग्रह सत्याचा आग्रह असा होतो. या दोन शब्दांत त्याचा अर्थ झाला आहे. सत्याचा आग्रह धरणाऱ्या साधकाचे अंगीं अनुपम शक्ति येते. ही शक्ति म्हणजे शारीरिक शक्ति नव्हे. अर्थात् एखाद्या मल्लाला सत्याग्रह करतां येईलच असें नाहीं. उलट एखाद्या काडी पेहेलवानालाहि सत्याग्रहाचें बल यशस्वी रीतीनें दाखवितां येणें शक्य आहे. सत्याग्रहाचें बल व्यापक आहे. स्वकीय, परकीय, मित्र, शत्रु, लहान, थोर किंवा स्त्री–पुरुष असा भेद या बलांत नाहीं. या बलाचा उपयोग अमुकच ठिकाणीं करावा लागेल

असें सांगतां येणार नाहीं. तुम्हांला स्वतःच्या पितरांविरुद्ध झगडावें लागेल; पत्नी अथवा पुत्र यांच्याविरुद्ध सत्याग्रह करण्याची पाळी येईल; आपल्या नागरिक-बंधूंना सत्याग्रहानें जिंकण्याची वेळ येईल; सरकारशीं सत्याग्रह संग्राम करावा लागेल. इतकेंच काय, सर्व जग एका बाजूस आणि आपण एकटे एका बाजूस अशाहि परिस्थितींत तुम्ही सांपडाल.

या सत्याग्रह-मार्गांत हिंसेला जागा नाहीं. सत्याग्रहांत जी शक्ति येते ती सर्व अहिंसेनें येते. अहिंसा म्हणजे अपरंपार प्रेम. या दृष्टीनें पाहिलें म्हणजे सत्याग्रह हें शरिराचें किंवा शस्त्रांचें बल नसून तें आत्मबल आहे.

तुम्हांला सैन्यांत जायचें असेल तर तुमची उंची, वजन, वय हीं सर्व पाहतात. दृष्टि नीट आहे कीं नाहीं आणि तिला रंगज्ञान अचूक होतें कीं नाहीं याची परीक्षा घेतात. हें सर्व ठीक जमलें म्हणजे तुम्हांला सैन्यांत प्रवेश मिळतो. पण प्रवेश मिळाला कीं लगेच रणांत शत्रूंशीं तोंड द्यायला तुम्ही पात्र झालां असें ठरतें का ? नाहीं. कांहीं काळ कवाईत करावी लागते, वैयक्तिक व सामुदायिक शिस्तीचे धडे घ्यावे लागतात; आपले अवजड कपडे, शस्त्रास्त्रें, बिस्तरा, अन्नसामुग्री इ. सर्व शरीरावर पेलून सफाईनें हालचाली करण्याचें कौशल्य तुम्हांला कवाइतीनें अंगीं आणावें लागतें; नेमबाजी, आत्मसंरक्षण, सोशीकपणा यांचें शिक्षण घ्यावें लागतें. या सर्वांतून यशस्वी रीतीनें पार पडाल तेव्हां तुम्हांला मर्दुमकी गाजविण्याची लायकी आली असें सिद्ध होईल आणि रणांगणावर तुमची रवानगी करण्यांत येईल.

सत्याग्रही सैनिकाला असेंच कडक शिक्षण घ्यावें लागतें. हिंसात्मक युद्धें हीं कांहीं ठरीव काळ चालतात. तेव्हां तेवढ्यापुरतें आघाडीवर राहून मग बाकीचें आयुष्य निष्क्रियतेंत घालविणें अशा युद्धांतील सैनिकांस शक्य असतें. सत्याग्रही सैनिकाच्या जीवनांत ह्या निवांतपणाला जागा नाहीं. त्याला स्वतःची उन्नति करून घ्यायची असते आणि त्याबरोबर जगालाहि सुधारावयाचें असतें. कुटुंबापासून राष्ट्रापर्यंत किंबहुना सर्व जगापर्यंत सर्वांशीं सर्वदा मतभेद होण्याचे प्रसंग येतात. सत्याच्या आचरणांत कधीं स्वतःच्या हीन वासना अडथळा आणतात, कधीं कुटुंबांतल्या आप्तांचा किंवा मित्रांचा विरोध होतो, आणि कित्येकदां प्रस्थापित सरकारचे कायदे आड येतात. सर्वांशीं सत्याग्रह्याला

झगडावें लागतें. "रात्रंदिवस आम्हां युद्धाचा प्रसंग" हें तुकाराम महाराजांनीं म्हटलें आहे तें अगदीं यथार्थ आहे.

अर्थात् सत्याग्रही हा नेहमीं संनद्ध पाहिजे. आई मुलाच्या हितासाठीं स्वतःचा नाश करते; मुलाला नष्ट करीत नाहीं. हेंच खरें प्रेम म्हणतां येईल. प्रेम दुसऱ्याला जाळीत नाहीं तर स्वतः जळतें. सत्याग्रही आपल्या तत्त्वासाठीं आनंदानें क्लेश सहन करतो. आपल्या सत्याग्रहाचे मार्गात मृत्यूलाहि आलिंगन देण्यांची त्याची तयारी असते.

सत्याग्रह्यानें क्रोधाला यत्किंचितहि थारा देतां कामा नये. प्रतिपक्षाचा जर आपणावर क्रोध झाला तर त्यानें तो सहन केला पाहिजे. आपल्यावर हल्ला झाला तरी त्यानें प्रतिकार करूं नये. पण प्रतिपक्षानें रागाच्या भरांत एखादा अन्याय्य हुकूम दिला असेल तर तो मात्र मुळींच पाळूं नये. शिक्षेची, दंडाची, हालअपेष्टांची भीति बाळगून कुठल्याहि असत्यापुढें किंवा अन्यायापुढें त्यानें मान तुकवितां कामां नये.

कित्येकदां सत्याग्रह्याच्या ताब्यांत कांहीं जोखमीची वस्तु किंवा द्रव्य असतें. त्याचा तो विश्वस्त असतो. ती मालमत्ता दुसऱ्याची असते म्हणूनच सत्याग्रही माणसानें तिचें संरक्षण प्राणपणानें केलें पाहिजे.

आपल्या प्रतिस्पर्ध्याचा अपमान करणें हेंहि सत्याग्रह्यानें कटाक्षपूर्वक टाळलें पाहिजे. एखाद्या चळवळींत माणसें सशस्त्र प्रतिकार करीत नाहींत. आणि तेवढ्यापुरती ती चळवळ अहिंसात्मक असतेहि. पण याच चळवळींत प्रतिपक्षाचा उपहास करणाऱ्या अनेक गर्जना, घोषवाक्यें ( Slogans ) असतात. तीं उच्चारून प्रतिपक्षाची फजिती केल्याचा एक हीन दर्जाचा आनंद माणसें उपभोगीत असतात. असें करणें युक्त नाहीं. यांत अहिंसेचा भंग आहे म्हणून असल्या क्षुद्र गर्जना अथवा घोषवाक्यांचा उच्चार सत्याग्रह्यानें करतां कामा नये.

आपल्या जीवनांत साधेपणा आणणें हें सत्यशोधकाचें आद्य कर्तव्य आहे. अर्थात् चैनीच्या वस्तूसाठीं किंवा इंद्रियाचे कोड पुरविण्यासाठीं सत्याग्रह करणें हा सत्याग्रह धर्माचा दुरुपयोग आहे. एखाद्या वसतिगृहांत शिशवीचे पलंग किंवा उंच उंच गाद्या आपणांला नाहींत म्हणून विद्यार्थ्यांनीं उपवास

सुरू केला तर सत्याग्रह धर्माची ही विटंबनाच म्हणतां येईल. पण शरीरमनाच्या पोषणाला आवश्यक असलेल्या वस्तू, सुखसोयी, अथवा योग्य कामें मिळत नसतील तर सत्याग्रह शस्त्र वापरणें योग्य ठरेल. दे. भ. अप्पासाहेब पटवर्धन यांना हरिजन-कार्याचा उमाळा फार. तुरुंगांत त्यांनीं सफाई करण्याचें काम मागितलें. हरिजनांशीं समरस होण्याच्या दृष्टीनें व मानवतेचें एक अंग म्हणून सफाई करणें हा पटवर्धन धर्म मानीत. तें काम त्यांना देण्याचें सरकारनें नाकारलें तेव्हां पटवर्धनांनीं सत्याग्रह सुरू केला. त्यांच्या न्याय्य मागणीला पाठिंबा देण्याकरितां गांधीजींनींहि सत्याग्रहाचें आवाहन केलें. पण लागलीच सरकारनें पटवर्धनांची मागणी पुरी केली. मात्र एखाद्यानें आपणाला अमुक खाद्य पदार्थ मिळत नाहींत म्हणून सत्याग्रह केला असता तर गांधीजींनीं त्याचा निषेधच केला असता. कुटुंब, वसतिगृह, तुरुंग इ. ठिकाणीं वैयक्तिक सुखसोयींचा बडेजाव माजवूं नये. तेथील अधिकारी व्यक्तींना मान द्यावा. तेथील शिस्त शक्यतोंवर पाळावी. स्वाभिमान किंवा व्रत यांचा भंग होईपर्यंत शिस्तपालनाची मर्यादा येते. ही मर्यादा ओलांडण्याचा प्रसंग गुदरला म्हणजे सत्याग्रहाचा आसरा करणें युक्त होईल. तुम्ही शाकाहारी आहां आणि तुमच्यावर मांस खाण्याची सक्ति करण्यांत आली तर तुम्हांला सत्याग्रह करावा लागेल. वरिष्ठांशीं आदरानें व विनयानें वागावें हें योग्य; पण एखादा अधिकारी चढेलपणें तुम्हांला आपल्या बुटाला पॉलिश करावयला सांगूं लागला तर तुम्हांला त्याचा निषेध करून सत्याग्रहाचें अस्त्र वापरावें लागेल. सेवेला सक्तीचें स्वरूप येऊं देतां कामा नये. तो अधःपात आहे. तसेंच केवळ खुषामतीसाठीं अपमान गिळणें हाहि अधर्म आहे. माणूस क्षुद्र स्वार्थासाठीं खुषामत करतो आणि असा स्वार्थ हा सत्याग्रहाच्या मार्गातला मोठा अडथळा आहे. कारण खुषामत याचाच अर्थ मनांत नसेल तसें बोलणें, खोटे गुण दुसऱ्याच्या अंगीं चिकटाविणें, दंभाचा अंगीकार करणें इ. होय. हें तर सारें असत्याचें स्वरूप !

लोकोत्तर माणसें एखाद्या कमी महत्त्वाच्या प्रसंगांतहि उच्च जीवनाचीं सुवर्णसूत्रें सहज व सुबोध रीतीनें सांगून जातात. राजकोट येथील रहिवाशांना गांधीजींनीं असाच साधा आचारधर्म थोडक्यांत सांगितला.

१ सुसंस्कृत व्हा. मादक पदार्थांपासून दूर राहा. साधेपणा वाढवा.

२ विधायक कार्यक्रमावर श्रद्धा ठेवा.
३ 'माझें तेंच खरें' असें म्हणूं नका.
'खरें तें माझें' असें म्हणा.
४ डामडौल, मत्सर, आणि वाईट संवयी टाळा.
५ दुसऱ्याच्या हक्कावर आक्रमण करूं नका.
६ पीडितांचें रक्षण हाच खरा धर्म.
७ क्षमा हा शूराचा सद्‌गुण आहे.
८ विचार करून जें बोलायचें तें बोला.
ज्याला कांहीं मोल आहे असेच शब्द तोंडांतून बाहेर काढा.
९ मर्द बना.

जीवनव्रताची थोडक्यांत अगदीं स्थूल मानानें यावरून कल्पना येईल. सत्याग्रह्याचें जीवन साधें व शुद्ध असावें आणि परमेश्वरावर त्याची निष्ठा असावी. तसेंच माणसाच्या मूलभूत चांगुलपणावर त्याची अपार श्रद्धा असली पाहिजे. 'माणूस मुळांत चांगला आहे, परंतु कांहीं वाईट कल्पनांचा व भावनांचा वरचष्मा होऊन तो वाईट वागत आहे.त्याला सुधारणें हें माझें कर्तव्य आहे. तो माझ्याहि उन्नतीचाच एक भाग आहे. तेव्हां स्वतः क्लेश सोसून त्या माणसाच्या अंतरंगांतला सद्भाव मी जागृत करीन. त्याचें हृदयपरिवर्तन करीन.' हा विश्वास सत्याग्रहीच्या धर्माचा पाया आहे.

हा सत्यधर्म आचरणारे महात्मे आजवर अनेक होऊन गेले. परमेश्वरभक्ति हीच कृतार्थता मानणारा प्रल्हाद कुणाला ठाऊक नाहीं ! त्यानें कडेलोट सहन केला, पित्यानें क्रोधानें त्याला उकळत्या तेलाच्या कढईत टाकलें पण शांतपणें प्रभुनामाचा जप तो करीत होता ! जिच्या काव्यमाधुर्याचा हृदयंगम प्रभाव आज भारतीय भाषा, संगीत, नृत्य यांवर आज अनेक शतकें पडला आहे, ती मीराबाई श्रेष्ठ सत्याग्रही होती. एवढें थोर राज्ञीपद गेलें आणि वनवास कपाळीं आला, लोकनिंदेचे भयंकर आघात सोसावे लागले पण आपल्या 'गिरिधर नागरा' च्या उपासनेंत तिनें थोडेंहि अंतर पडूं दिलें नाहीं. साक्रेटिसनें सत्याची आराधना चालविली म्हणून त्याचा सरकारनें छळ केला. साक्रेटिसनें सरकारी इन्साफाप्रमाणें विषाचा पेला पिऊन टाकला ! मरणाच्या

दारींहि त्यानें सत्य सोडलें नाहीं किंवा धैर्यशांतीलाहि तो पारखा झाला नाहीं. येशू ख्रिस्तानें सत्यासाठीं शूळ पत्करला! त्याला खिळे ठोकणाऱ्या क्रूर मारेकऱ्यांचेंहि त्यानें अहित चिंतलें नाहीं. 'देवा! त्यांना क्षमा कर, कारण आपण काय करीत आहोंत हें त्यांना माहीत नाहीं.' या उद्गारांतील अपरंपार प्रेमवैभव अद्यापि अजोड राहिलें आहे. प्रल्हाद, मीरा, साक्रेटीस, येशू यांच्यासारख्यांच्या प्रगल्भ चरित्रांतूनच सत्याग्रह धर्माचें शास्त्र बनलें आहे. या शास्त्रांतलीं कांहीं सूत्रें आपण पाहिलीं. पण त्यांतलें मुख्य सूत्र जें अहिंसा त्याचा विचार स्वतंत्र व सविस्तर केला पाहिजे.

o o o

गांधी-सूक्ति

"तुमच्या अंतःकरणाची व्यापकता वाढत असेल तर तुम्ही योग्य मार्गावर आहांत असें समजा. परंतु जर त्यांत संकुचितपणा येत असेल तर कोठें तरी कांहीं बिघडलें आहे असें समजा."

# अहिंसा : : ४

अहिंसा हें एक विश्वव्यापी तत्त्व आहे. तें हिमालयासारखें उत्तुंग आहे. महासागरासारखें खोल आहे, आणि हवेसारखें सर्वसंचारी आहे. सकाळच्या कोवळ्या किरणांत डुलणारें फूल हें अभिमानानें म्हणूं शकेल कीं, 'मी सूर्याच्या तेजानें वाढत आहें.' पण फुलाला फुलविणारें हेंच तेज विशाल महासागराच्या पृष्ठावरील पाणी आटवून ढग निर्माण करतें आणि प्रचंड जलधारांनीं पृथ्वी जलमय करून सोडतें. अहिंसा सूर्यतेजासारखी आहे. ती एका लहान जीवाच्या संवर्धन-संगोपनालाहि उपयोगीं पडते आणि मोठाल्या मानव-समुदायाचेंहि रक्षण करते. अहिंसा हा शाश्वत श्रेष्ठ धर्म आहे. अहिंसा ही पर्वताइतकी जुनी आहे. स्थूल आणि सूक्ष्म जीवनांत तिचा प्रभाव सदैव पडत राहील.

अहिंसा या शब्दाच्या साध्या अर्थावरून हिंसा न करणें एवढाच बोध होतो. आपण कोणाची हत्या केली नाहीं कीं संपलें आपलें कर्तव्य; आपणांला एवढ्यानेंच अहिंसेवर हक्क सांगतां येणार ही समजूत चुकीची आहे. अहिंसेचें पूर्ण पालन करायचें म्हणजे केवळ प्राणिवध किंवा शारीरिक अत्याचार करायचा नाहीं, एवढेंच नाहीं. तर मनानें सुद्धां दुसऱ्याचें अहित न चिंतणें हा खरा अहिंसा धर्म आहे. पण याचा अर्थ मनाला निष्क्रिय बनविणें असा मात्र नाहीं.

न्यूटननें एक पिकलेलें फळ झाडावरून पडतांना पाहिलें, तेव्हां एकदम ज्ञान होऊन त्यानें गुरुत्वाकर्षणाचा नियम शोधून काढला. हा नियम शोधून काढण्यापूर्वींहि लहान मोठ्या पदार्थांचें आकर्षण चालू होतें, पृथ्वी आपणा सर्वांना सारखी आपल्या हृदयाशीं ओढीत होती, आणि ग्रहताऱ्यांच्या प्रवासांत परस्पराकर्षणानें नियमबद्धता राहात आलेली होती. न्यूटनच्या त्या क्रांतिकारक शोधानंतरहि तो विश्वक्रम अव्याहत चालू आहे. अहिंसा हें श्रेष्ठ तत्त्व

महात्म्यांनीं शोधून काढलें त्याच्या अगोदर आणि नंतर लक्षावधि माणसें अहिंसेच्या कृपाप्रसादाचा लाभ प्रतिक्षणीं घेत होतीं. इतकेंच काय, अहिंसा तत्त्व इतकें प्रबळ होतें म्हणूनच माणसाची जात आजवर एवढी वाढली व इतकी सुसंस्कृत राहिली.

हवा, प्रकाश, किंवा पाणी या द्रव्यांइतकें विपुल व तितकेंच जीवनदायी अहिंसा हें तत्त्व आहे. आपला गर्भभार आई वाहते आणि प्रसूतीच्या भयंकर यातना आनंदानें सहन करते याहून अहिंसेचा उत्कर्ष दुसरा कोणता असेल ! अहिंसा म्हणजे अमर्याद प्रेम, अहिंसा म्हणजे मृत्यूलाहि न घाबरणारें धैर्य. अहिंसा म्हणजे दुसऱ्या जीवाकरितां आनंदानें सोसलेल्या यातना. प्रेम, धैर्य, आणि यातना हीं अहिंसेचींच तीन रूपें आहेत. आणि या तीन रूपांचें एकत्र दर्शन मातेखेरीज दुसरें कुठें होणार ? 'मातेसारखें दुसरें दैवत नाहीं' असें आपण म्हणतों. तेव्हां वास्तविक अहिंसेचाच महिमा आपण गात असतों.

मनुष्य कुटुंब करून राहूं लागला तेव्हांपासूनच अहिंसेची व्याप्ति वाढून तिला सामुदायिक शक्तीची प्रतिष्ठा मिळाली. आपलें सुख बाजूला ठेवून बाप मुलांकरितां झटूं लागले. भावाभावांनीं एकमेकांच्या सोई-गैरसोई पाह्यचें ठरविलें. कुणी हट्टवाद केला तर समंजस माणसांनीं माघार घ्यायची व आपल्या वांट्यांतला भाग दुसऱ्याला देऊन त्या आडमुठ्याची समजूत काढायची; नवरे वाईट निघाले तर क्लेश सोसून पत्नींनीं त्यांना ताळ्यावर आणण्यासाठीं झटायचें व आपल्या अश्रूंनीं त्यांच्या मनांतील पापविचार धुवून टाकावयाचे; मोठ्या माणसांनीं कदान्न खायचें पण मुलांना दूध पुरवायचें असें अहिंसाव्रत घरोघरीं पाळलें गेलें. अहिंसेचा व्यापार इतक्या प्रचंड प्रमाणावर सदासर्वकाळ चालू राहिला म्हणूनच माणसाचें माणूसपण टिकलें आणि देवपण मिळविण्याची ईर्षा त्याचे ठिकाणीं आली. कुटुंबसंस्था हें अहिंसेचें मंदिर आहे. येथेंच तिची खरीखुरी उपासना आजवर होत आली आहे.

अहिंसा हें केवळ ऋषिमुनींनीं किंवा महात्म्यांनींच आचरण्यासारखें तत्त्व आहे. असें म्हणणारांना कुटुंबसंस्था हेंच सुंदर उत्तर आहे. प्रत्येक

माणसाच्या मनांत अहिंसेचा थोडा ओलावा हटकून असतोच असतो. रस्त्यांत कोणी घेरी येऊन पडूं लागलें तर त्याला सावरायला माणसें धांवतात; कुठें बाचाबाची होऊन हातघाईवर प्रसंग आला तर भांडण तोडण्यासाठीं कांहीं भले गृहस्थ पुढें सरसावतात: गाडींत अगदीं खेचाखेच असली तरी आजारी माणूस निजला असल्यास सहसा त्याला कुणी उठवीत नाहीं आणि वृद्ध व जर्जर माणसाला अगोदर जागा करून देतात. हे अनुभव नित्याचे आहेत. अगदीं कर्दनकाळ हिंसावादी म्हणून जे लोक प्रसिद्ध आहेत तेहि नाइलाज म्हणून आपणांस हिंसा करावी लागली किंवा अगदीं अवश्य तेवढीच आपण हिंसा केली असें जगाला भासविण्याचा प्रयत्न करतांना आढळतात. याचा अर्थ असाच नव्हे का कीं त्यांनीं स्वतः चालविलेले अत्याचार त्यांना योग्य वाटत नाहींत आणि त्यांच्या पाषाणहृदयांत कुठें तरी खोल खोल अहिंसेचे निर्झर झुळझुळत असतात ?

इतिहासाच्या आधारें मनुष्याच्या प्रवृत्तीचें निदान करणारे चिकित्सक लोक सांगतात कीं, " अहो, इतिहासाचा सारा कल पाहिला तर हिंसेकडे आहे. इतिहास कशानें खचून भरला आहे ? खून, मारामाऱ्या, रक्तपात, कलह, वर्गयुद्धें यांनींच ना ? मग इतिहासांत प्रकट झालेल्या मनुष्यस्वभावापेक्षां वेगळें असें हें अहिंसा तत्त्व माणसाच्या कसें पचनीं पडणार ? इतिहासाचा ओघ तुम्ही बदलणार कीं काय ? शक्य नाहीं तुम्हांला तें ! " अहिंसेच्या विरुद्ध मोठा भरभक्कम पुरावा आणला; आतां अहिंसेचे चहाते पराजयाची सरळ कबुली देणार असें या चिकित्सकांना वाटतें.

पण इतिहासाचा पुरावा हा वरवर जेवढा दिसतो तेवढा तो मुळांत भक्कम नाहीं. थोड्याशा विचारानें त्याचा ठिसूळपणा कळून येण्यासारखा आहे. अहिंसा ही स्वभावतः नम्र असल्यानें तिची नोंद इतिहासांत होत नाहीं. जेव्हां माणसाच्या स्वाभाविक प्रवृत्तींत कांहीं विकृति निर्माण होते तेव्हां त्या विकृतीला प्रसिद्धि मिळते. आज आपणांला दररोज सकाळीं जीं वृत्तपत्रें वाचायला मिळतात त्यांवरून देखील हें समजून येईल.

कसें तें पाहा. दररोज जगांतील प्रमुख स्टेशनांतून शेंकडों आगगाड्या निरनिराळ्या ठिकाणीं जातात. त्यांच्याकडून उतारू व माल यांची बिनबोभाट वाहतूक चाललेली असते. त्यांच्या त्या कार्यक्रमाची माहिती कुठें

वर्तमानपत्रांत येते का ? नाहीं. ‘ आज फ्रॉंटियर मेल बोरीबंदरहून निघून लाहोरपेशावरकडे गेली. ’ अशी वार्ता कांहीं वृत्तपत्रें देत नाहींत. पण ती फ्रॉंटिअर मेल कुठें अपघातांत सांपडली कीं वृत्तपत्रांत भडक मथळे येतात. “ फ्रॉंटिअर मेलला भयंकर अपघात ! ! ” माणसांच्या जीवनांतली सुद्धां कोणती नोंद होते पाहा. ‘ नवऱ्यानें बायकोचा खून केला. ’ ‘ भावानें लहान भावावर कुऱ्हाड चालविली ’ असे मथळे आपण वाचतों. वास्तविक शेंकडों घरांतून नवराबायकोचीं भांडणें होत असतील, भावाभावांत तंटे लागत असतील. पण अहिंसेनें म्हणजेच प्रेमानें हीं भांडणें व हे तंटे मिटतात. पड खाऊन, क्लेश सोसून, किंवा त्याग करून माणसें पुनः संसाराचा गाडा सुरळीत चालू करतात. घरोघर होत असलेले कलहाचे हे गोड शेवट वृत्त-पत्रांत येत नाहींत. ठिकठिकाणीं प्रकट होणारें अहिंसेचें हें उदंड कार्य अप्रसिद्ध राहतें आणि मग वृत्तपत्रांत येतें काय ? जें भांडण सामोपचारानें न मिटतां वर सांगितल्याप्रमाणें ज्याचा हिंसेंत शेवट होतो तें ! याचा अर्थच असा कीं, क्वचित् होणाऱ्या हिंसेची मोठ्या प्रमाणांत जाहिरात होते आणि जिचें स्थूल व सूक्ष्म कार्य जगभर चाललें आहे ती अहिंसा अप्रसिद्ध राहते. तेव्हां इतिहासांत केवळ हिंसेचींच वर्णनें अधिक आहेत. एवढ्यावरून मनुष्य-स्वभावांतला तोच एक प्रमुख धर्म म्हणणें कसें योग्य ठरेल ? आजवर अहिंसेनें कोट्यवधि कुटुंबांत जो प्रभाव दाखविला त्याची नोंद करण्याची कुवत इतिहासांत मुळींच नाहीं.

‘ बळी तो कान पिळी ’ किंवा ‘ जीवो जीवस्य जीवनम् ’ या वचनाचा आधार घेणारे लोक इतिहासभक्तांचेच सोयरे असतात. ‘ पारवा मुंग्यांना खातो, ससाणा पारव्यावर झडप घालतो; मोठा मासा लहान माशाला गट्ट करतो असा सृष्टीचा कायदा आहे. जीवसृष्टींत अहिंसा आहेच कुठें ? ’ असा यांचा युक्तिवाद असतो. पण पशुपक्ष्यांवर सर्व हवाला देऊन स्वस्थ बसलों तर ‘ माणुसकी ’ म्हणून जो गुण आपण वाढीला लावला आहे त्याचें काय ? माणसाला बुद्धि म्हणून एक अलौकिक देणगी परमेश्वरानें दिली आहे. त्या देणगीचा उपयोग करून त्यानें पृथ्वी, आप, तेज, इ० पंचभूतांना कामाला लाविलें, डोंगर खोदून सुंदर लेणीं तयार केलीं, नगरें वसविलीं, काव्यें लिहिलीं, निरनिराळ्या विद्या व कला वाढीला लाविल्या.

पशुपक्ष्यापेक्षां एवढी थोर प्रगति केल्यानंतर केवळ आपल्या एका हीन भावाच्या समर्थनाकरितां पशुपक्ष्यांचा निर्वाळा देणें योग्य कसें ठरेल ! पशुपक्ष्यांत एक नर अनेक माद्यांशीं संसार थाटतो. आपण एकपत्नीव्रताला आदर्श समजतों. रामचंद्र हा आपला ध्येयपुरुष आहे. आपण अधिक उन्नत होत चाललों आहोंत. इतरांकरितां त्याग करण्यांत आपण श्रेष्ठता मानतों. मारणाऱ्यापेक्षां रक्षण करणारा माणूस आपणांस श्रेष्ठ वाटतो. या क्रमानें आपण सुसंस्कृत होत गेलों तर हिंसेचें तांडव बंद पडेल अशी आशा आपण कां करूं नये ?

अहिंसा हें दुबळ्याचें शस्त्र आहे याहून हास्यास्पद गैरसमज जगांत दुसरा कोणताच नसेल ! अगदीं साध्या व्यवहारांत देखील आपण पाहतों कीं, नेहमींच रागावण्यापेक्षां वृत्ति शांत ठेवणें हें फार कठीण असतें. चिडून दुसऱ्याला मारण्यापेक्षां शांतपणें स्वतः मरण पत्करण्यांत कितीतरी पटींनीं अधिक धैर्य लागतें. गांधीजी म्हणतात–" अहिंसेचें सामर्थ्य अतुलनीय आहे. तें जीवनसर्वस्व आहे. अहिंसा हा शूरांचा धर्म आहे. भेकडांच्या आटोक्यांत अहिंसा येणें शक्य नाहीं. अहिंसा हा एखादा ठोकळेवजा निर्जीव सिद्धान्त नसून ती जिवंत व चैतन्यदायी शक्ति आहे. आत्म्याचा तो विशेष गुण आहे. म्हणून 'अहिंसा परमो धर्मः' असें म्हणतात...दुर्वृत्ति अहिंसेपुढें उभी राहूं धजणार नाहीं. मत्सर, क्रोध, द्वेष इ० चा अंधकार अहिंसासूर्याच्या उदयाबरोबर नष्ट होतो....नामर्दपणापेक्षां हिंसा केव्हांहि बरी; हिंसावादी माणसाला केव्हां तरी अहिंसावादी होण्याची आशा आहे. पण नामर्दाला मुळींच नाहीं. तलवार हातीं घेऊन लढत मरणारा तर शूर खराच; पण न भितां किंवा लहानसें बोटहि न उचलतां जो मरण पत्करतो तो खात्रीनें अधिक शूर आहे...खरा अहिंसक स्वतःचा वध होत असतांहि ओंठावरील हसें मावळूं देणार नाहीं."

हिंसात्मक शस्त्रें परत आपल्याच अंगावर उलटतात. हिंसा ही भस्मासुरासारखी आहे. तिला वरदान देणाऱ्यावर केव्हांतरी ती उलटल्याखेरीज राहात नाहीं. " तलवार चालवितील ते तलवारीनेंच मरतील " हें जें येशू ख्रिस्तानें सांगितलें त्याचें मर्म हेंच आहे. हरबरा पेरून गहूं उगवत नाहीं. आपण हिंसात्मक साधनें वापरलीं तर त्याचा शेवट अखेर हिंसेंतच होतो.

आपलीं साधनें अहिंसात्मक असलीं पाहिजेत असें जें गांधीजी सांगतात तें याचसाठीं.

अहिंसेचें शस्त्र परिणामकारक झालें तर तें वापरणाराची व ज्याविरुद्ध तें वापरलें जातें त्याची दोघांचीहि उन्नति होईल. तसें हिंसेचें नाहीं. आतां एक दाखलाच घेऊन हें स्पष्ट करूं या. दिलीप नांवाचा कोणी माणूस माझ्या विरुद्ध भांडण करीत आहे. त्याला धाकदपटशानें, माराच्या भीतीनें किंवा खराच चोप देऊन मी गप्प बसविलें तर काय होईल? भांडण मिटणार नाहीं. माझ्या आणि दिलीपच्या मनांत क्रोध धुमसतच राहील. योग्य संधि साधून आपल्या पराभवाचें उट्टें काढण्याची तयारी दिलीप सारखी चालू ठेवील आणि मीहि केव्हां तरी आपणावर संकट येणार, या भयानें सारखा संशयी वातावरणांत वावरत राहीन; याचाच अर्थ क्रोध, द्वेष, भीति, संशय इ. विकारांनीं आमचीं दोघांचीं मनें सारखीं ग्रस्त राहतील व त्यामुळें आमची अवनति होईल. पण मी हिंसेऐवजीं अहिंसेचा मार्ग पत्करला; प्रेमानें, त्यागानें व आत्मक्लेशानें दिलीपला वश केलें तर माझें व दिलीपचें मन प्रसन्न व निर्मळ होईल. मग द्वेषाचा अंधार उरणार नाहीं. असें अहिंसेचें शस्त्र आहे. तें निष्प्रभ ठरलें तर कोणाचेंच नुकसान होत नाहीं. पण यशस्वी झालें तर दोनहि पक्षांत मंगलाचा प्रकाश पडतो आणि जो विजय मिळतो तो शाश्वत स्वरूपाचा असतो.

o o o

**गांधी-सूक्ति**

"सूर्य जसा स्वतःचा प्रकाश लपवून ठेवूं शकत नाहीं त्याप्रमाणें सत्याचा प्रकाश आपोआपच पसरतो."

एखादें तत्त्व नुसतें हवेंत तरंगणारें असेल, प्रत्यक्ष व्यवहारांत तें वापरतां येण्यासारखें नसेल तर त्यावर श्रद्धा ठेवणें जड जाईल. अहिंसा हें आपल्या आटोक्यापलीकडील तत्त्व प्रथम वाटलें तरी त्याचीं मुळें आपल्यांत किती खोल गेलीं आहेत हें आपण पाहिलें. पण कुटुंबांत किंवा फार तर समाज-कारणांत ह्या तत्त्वाचा अधिकार माणसें मान्य करतात. आपल्या आवडत्या व्यक्तींशीं वागतांना अहिंसेची कास सोडूं नये, हें तर कोणालाच सांगावें लागत नाहीं. परंतु राजकारणाचा प्रांत हा मात्र अहिंसेच्या व्यापाराला सर्वस्वीं अयोग्य आहे असाच पुष्कळांचा समज अद्यापिहि आहे. कुटिल नीति, कारस्थानें, सत्तासंपादन, युद्धें इ. प्रकारांना ज्या क्षेत्रांत चलती आहे तेथें अहिंसेच्या सात्त्विक मूर्तीला सुरक्षित राह्यला वाव आहे कुठें ? तिचा चक्काचूर जरी झाला नाहीं तरी तिला तडे जाणार, ती भंगणार हें निश्चित ! असेंच बहुतेकांना वाटत असतें.

पण आज आपल्या पिढीला अहिंसेचा गाजावाजा जो ऐकूं आला तो मात्र राजकारणाच्या द्वारेंच आला हें विसरतां कामा नये. प्राचीन धर्मज्ञ आणि प्रेषित यांनीं मनुष्याच्या विकासासाठीं जी अहिंसा श्रेष्ठ म्हणून सांगितली ती राजकारणाला गांधीजींनीं लाविली हें त्यांचें मोठें अवतारकार्य आहे. याच्या पूर्वींहि कांहीं प्रयत्न झाले. पण ते वैयक्तिक व तात्त्विक स्वरूपाचे होते. ज्या अमेरिकन महापुरुषाचें ऋण गांधीजी मान्य करतात, त्या थोरोनें सविनय कायदेभंगाचा मंत्र निर्माण केला. आपणांस जर आपल्या सरकारचा एखादा कायदा अमान्य असेल तर शांततेनें व संघटित होऊन तो कायदा मोडावा व तुरुंगांत जावें असा थोरोचा उपदेश असे. 'सत्यप्रिय मनुष्याचें खरें स्थान म्हणजे तुरुंगच होय' अशा तऱ्हेचे उद्गार थोरोनें काढले आहेत. सविनय कायदेभंग ( Civil disobedience ) हें नांव थोरोनेंच काढलें. पण थोरोला अहिंसा-बलाची पूर्ण कल्पना नव्हती.

मागील शतकाचे आरंभीं गॉडविन् नांवाचा एक सत्प्रवृत्त व क्रांतिकारक विद्वान् इंग्लंडांत होऊन गेला. आपलीं गाऱ्हाणीं राजसत्तेकडून दुरुस्त करून घेण्यासाठीं अहिंसात्मक सत्याग्रह करावा हें मत त्यानें मांडलें. त्या वेळीं फ्रान्समधील हिंसात्मक क्रांतीच्या ज्वाळा नुकत्याच खालीं येऊं लागल्या होत्या. युरोपीय वातावरणांत हिंसेचें प्राबल्य फार होतें. तेव्हां गॉडविनचें हें अहिंसेचें धोरण सर्वांना नवें व उदात्त वाटूं लागलें. अंतराळीं हिंडत राहणाऱ्या ढगांत, आकाशांत भराऱ्या घेणाऱ्या चंडोलांत, घोंघावणाऱ्या झंझावातांत, नव्हे सर्वच चराचर सृष्टींत सौन्दर्याचा साक्षात्कार 'घेणारा इंग्लिश महाकवि शेली हा तर ह्या अहिंसा तत्त्वानें वेडावून गेला. त्याच्या एका जगद्विख्यात काव्यांत या तत्त्वाच्या मंडनपर कांहीं सुरेख कविता आहेत. गांधीजींना त्या फार आवडत. शेली म्हणतो,

शांत निश्चयें उभे रहा रे! वीरांनो! खंबीर
दाट अरण्यांतील जसे ते वृक्ष शांत गंभीर
आवरुनी कर आपुले ठेवा भाव असे नेत्रांत
विजयी युद्धांतील आयुधें तीं जगता वाटोत।
असेल छाती तर येऊं द्या जुलमी आक्रमकांना
तुडवूं द्या, खुपसूं द्या खड्गें, उधळूं द्या टापांना
मनसुराद या हिंसेमधुनी सांडे मग जें रक्त
त्यानें त्यांचे कपोल होतिल लज्जेनें आरक्त
उठा उठा! रे! सिंहांनो! व्हा जागे झोंपेमधुनी
अजिंक्य अगणित संख्येनें या सिद्ध रणीं होवोनी ॥

अहिंसात्मक सेनेच्या सात्त्विक शौर्याची शेलीला यथार्थ कल्पना होती हें वरील ओळी दर्शवितात. परंतु या सेनेचा अभ्यासक्रम कसा असावा याविषयीं शेली काय किंवा त्याचा गुरु गॉडविन् काय कांहींच सांगूं शकत नव्हते.

रशियाचे महर्षि कौंट टॉलस्टाय हे येशू ख्रिस्ताचे परम भक्त होते. श्रीमंतांनीं गरिबांस पिळून काढावें, पुष्कळांच्या घामावर थोड्यांनीं चैन करावी ही जगाची क्रूर रीत पाहून टॉलस्टॉयच्या अंतःकरणाचें पाणी होई. रशियांत झारची जुलमी राजवट चालू होती. हिंसा, चैन, अन्याय, पिळवणूक यांचा

नंगा नाच सर्व रशियाभर चालू होता. टॉलस्टॉयनीं याविरुद्ध आपल्या तेजस्वी वाङ्मयांत जोराचा प्रचार केला. साधी राहणी व उच्च विचारसरणी यांचा आदर्श जगाला दाखविण्यासाठीं त्यांनीं आपलीं सरदारकीचीं वस्त्रें फेंकून दिलीं आणि साध्या शेतकऱ्यासारखे ते राहूं लागले. जगावर ‘ परमेश्वराचें राज्य ’ अवतरावें यासाठीं येशू ख्रिस्ताचा प्रेमाचा उपदेश प्रत्येक माणसानें आचरणांत आणावा असा कळकळीचा उपदेश टॉलस्टॉय करूं लागले. तथापि जगांतला अन्याय व विषमता दूर केल्याखेरीज देवाचें राज्य स्थापन होणार कसें ? आणि ती दूर करायची म्हटलें तर सरकार, सरंजामशाही, धनिकशाही यांच्याशीं झगडावें लागणार ! अर्थात् ह्या झगड्यांत अहिंसेचा बोज कसा ठेवतां येणार याविषयीं टॉलस्टॉय्‌ना नीट कल्पना येईना. अन्यायाचा प्रतिकार हिंसेनें करूं नये ह्याविषयीं त्यांचें मन निःशंक होतें. पण अन्यायाला तोंड देण्यासाठीं कोणतें अहिंसात्मक तंत्र वापरावें याची स्पष्ट कल्पना त्यांना येईना. म्हणून गांधीजींनीं दक्षिण आफ्रिकेंत सरकारविरुद्ध सत्याग्रह लढा सुरू करून एक नवें प्रतिकाराचें तंत्र जगाला दाखविलें तेव्हां रशियाच्या या ऋषिवर्याला अत्यानंद झाला. त्यांनीं गांधीजींना धन्यवादाचें एक पत्र पाठविलें, “ जगांतल्या अन्यायाचा अहिंसात्मक प्रतिकार करण्याचा जो अभिनव प्रयोग तुम्ही करीत आहां त्याकडे सर्व जगाचें लक्ष वेधलें आहे. ” असे गौरवाचे उद्गार टॉलस्टॉयच्या त्या पत्रांत होते.

हिंदुस्थानच्या भूमीवर गांधीजींनीं अहिंसेचा प्रयोग १९१७ सालीं चंपारण्य ( बिहार ) येथें प्रथम केला. चहाच्या मळ्यांतील मजुरांचीं गाऱ्हाणीं दूर करण्यासाठीं गांधीजींनीं कायदा मोडून तेथें प्रवेश केला. ‘ अमुक कायदा हा अन्यायाचा आहे, तो मीं मोडला आहे, या कायदेभंगासाठीं मला द्याल ती शिक्षा सोसण्यास मी तयार आहें. ’ असें म्हणून प्रतिपक्षापुढें उभा राहणारा अहिंसात्मक सैनिक ही एक अपूर्व गोष्ट होती. सरकारी नोकरशाहीला कायदा चुकवून चळवळी करणारे देशसेवक माहीत होते; तसेंच आपल्या बुद्धिबलानें कायद्याचा कीस काढून प्रस्थापित कायद्याच्या आधारेंच आपण दोषी नाहीं असें सिद्ध करणारे थोर राष्ट्रभक्त सरकारनें पाहिले होते. पण अन्यायी कायदा जाणूनबुजून मोडायचा आणि न घाबरतां किंवा शारीरिक प्रतिकार न करतां आत्मक्लेश सोसायला तयार व्हायचें हा प्रकार अगदींच

२९८३२
२००७
३-०७

नवा होता. अधिकारी व न्यायाधीश भांबावून गेले! हिंदी लोकांना एका नवीन महाशक्तीचा प्रत्यय आला.

यानंतर गेल्या ३० वर्षांत दोन तीन राष्ट्रव्यापी चळवळींचा विस्तार व सामर्थ्य आपण पाहिलें आहे. गांधीजींनीं दोन तपांपूर्वी हिंदुस्थानांत हा प्रयोग प्रथम केला त्या वेळीं काय स्थिति होती? शेतकरी घाबरलेले होते; मध्यम वर्ग उदासीन होता, आणि मूठभर वतनदारांना राष्ट्राची फिकीर वाटत नव्हती! सर्वसामान्य जनतेवर भीतीचें प्रचंड दडपण होतें. आपलें रक्तशोषण सरकार व धनिकशाही यांच्याकडून कितीहि होत असलें तरी त्यावर इलाज काय करायचा? सैन्यें, तोफा, तारायंत्रें, रेल्वे अशी अवाढव्य सामुग्री ज्या बलाढ्य सरकारजवळ आहे त्याला आपण तोंड कसें देणार? लोक भयभीत झाले होते! तळमळीचे देशभक्त जीवावर उदार होऊन एखादें दहशतवादी कृत्य करीत. पण तेवढें कारण पुढें करून सरकारनें अशी उग्र हिंसात्मक दडपशाही करावी कीं जनतेचा स्वराज्यसंपादनाचा असेल नसेल तो उत्साह पार दबून जावा! चोहींकडे काळाकुट्ट अंधार! ही काळरात्र आतां कल्पान्तापर्यंत अशीच राहणार अशा निराशेंत सर्वजण बुडून गेले होते!!

याच वेळीं गांधीजींनीं अहिंसात्मक प्रतिकाराचें तंत्र निर्माण केलें. मृतवत् राष्ट्राला चेतना आली! विशेषतः बहुजनसमाजाला धीर वाटूं लागला! आपण या मार्गानें कांहीं हालचाल केली तर आपल्या उद्धाराचा दिवस निश्चित उगवेल हा आत्मविश्वास लोकांना आला. गांजलेल्या जनतेची हांक परमेश्वरानें ऐकली, अशी श्रद्धा वाटूं लागली. जीमध्यें हिंसेचा थोडा तरी वास येतो अशी कुठलीच जहाल राष्ट्रीय संघटना इंग्रज साम्राज्यशाही सरकार उघडपणें वाढूं देत नसे अशी संघटना गुप्तपणें वाढवावी लागे. पण मग तिचा प्रचार मर्यादितच होई, जागृत झालेल्या मध्यम वर्गांतल्या कांहीं लोकांपलीकडे तिचे हात पोंचत नसत; सर्व कांहीं गुप्तपणें व संशयाच्या वातावरणांत करावें लागल्यानें स्वार्थी व संधिसाधु यांना त्यांत घुसायला सवड मिळे आणि हेच लोक या संघटनांचीं पाळेंमुळें खणून काढायला मदत करीत. गांधीजींनीं संघटना काढली ती पूर्ण अहिंसात्मक होती. सत्य हें तिचें ध्येय होतें. साधनें व

साध्यें यांत एकरूपता पाहिजे यावर गांधीजींचा कटाक्ष होता. त्यामुळें ही उघड व अहिंसात्मक चळवळ हिंसेनें दडपणें सरकारला नैतिक दृष्ट्या प्रशस्त दिसलें नसतें. सरकार झालें तरी लोकमत आणि जगांतलीं इतर प्रमुख राष्ट्रें यांच्या मताला थोडाफार मान देतेंच कीं नाहीं ! अर्थात् पूर्ण शांततामय संघटना हिंसात्मक शस्त्रें वापरून मारून टाकणें हें सरकारच्या इभ्रतीला कमीपणाचें असतें. यामुळें अहिंसात्मक संघटनेचा विकास होण्यास वेळ लागला नाहीं. सर्व कार्य उघड झाल्यामुळें जनतेला संशयाची कसलीच बाधा होत नव्हती. पाया अहिंसात्मक असल्यानें सरकार एकदम हिंसात्मक उपाय योजण्यास तयार नव्हतें. अशा रीतीनें गांधीजींनीं अहिंसात्मक सत्याग्रहाचें शास्त्र लोकप्रिय केलें आणि अलम् हिंदी जनता खडबडून जागृत झाली. राष्ट्रीय जीवनांत झालेल्या या चमत्कारावर लिहितांना आपले जगविख्यात लोकनेते पं. जवाहरलाल नेहरू म्हणतात—

"ही अहिंसा चैतन्यशाली आहे, निष्क्रिय नाहीं. अहिंसा म्हणजे नुसती विरोधशून्यता नव्हे, तर दुष्कृत्याला विरोध. मात्र या विरोधाचें स्वरूप शांततामय असावयाचें. केवळ व्यवहारांतच अहिंसेनें दृश्य फायदे दिले असें नव्हे, तर राष्ट्राचें शील बळकट करणें आणि शांततामय व शिस्तीच्या कार्याचें शिक्षण लोकांस देणें हेंहि महत्कार्य साधलें."

हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याकरितां झुंजणारी सर्वश्रेष्ठ संस्था अहिंसात्मक संघटनेच्या व प्रतिकाराच्या मार्गानें स्वातंत्र्यसंग्राम चालवूं लागली तेव्हां हिंदी स्वातंत्र्य जगाच्या कुतूहलाचा विषय झाला. देशांत प्रांतोप्रांतीं आपल्या बुद्धिवैभवानें जे मातबर लोकनेते प्रतिष्ठित झालेले होते ते गांधीजींच्या नव्या प्रयोगाकडे आकर्षित झाले. जनतेला नवा हुरूप आला. हिंदुस्थानांतील अकरा प्रांतांपैकीं सात आठ प्रांतांत १९३७ सालीं राष्ट्रीय सभेचें अधिराज्य स्थापन झालें आणि राहिलेल्या प्रांतांतील सरकारांत राष्ट्रीय सभेचें छुपें अनुकरण करण्याची प्रवृत्ति दिसूं लागली. कॉंग्रेसच्या अहिंसात्मक चळवळीचेंच हें दृश्य फल होतें हें कांहीं हट्टी व असंतुष्ट जीवांखेरीज सर्वांनाच मान्य करावें लागलें.

पण मिळालेलें यश हें अगदीं सोळा आणे आहे असें गांधीजीहि म्हणत नव्हते. अहिंसात्मक सत्याग्रहाचें शास्त्र हें अद्यापि प्रयोगावस्थेंतच आहे. खुद्द

गांधीजी स्वतःलाच अपूर्ण समजत तेव्हां सामान्य अहिंसात्मक सैनिक हे अगदीं शंभर नंबरी व्रतधारी आहेत असा खोटा अहंकार कोण कसा वाहील? काँग्रेस संस्थेनें जो अहिंसावाद पत्करला तो व्रत म्हणून नव्हे तर धोरण म्हणून हें आतां स्पष्ट आहे. सामुदायिक प्रमाणावर सत्याग्रह आरंभावा आणि त्यांत अहिंसेचा व्रतभंग झाला असें कुठें दिसतांच तो आवरावा लागावा असेंहि झालें. जगाच्या अलीकडील इतिहासांत मिळालेलें पाव शतक हें सत्याग्रहाच्या यशस्वितेची कसोटी ठरविण्यास पुरेसें आहे असें कोण म्हणेल? पण गांधीजी म्हणत त्याप्रमाणें इतक्या मर्यादा पडून व हिंसेचें थोडेंफार मिश्रण असूनहि अहिंसा इतकी विजयी झाली हा एक चमत्कार आहे. त्यावरून निर्भेळ अहिंसेच्या पराक्रमाला किती अमर्याद क्षेत्र आहे आणि किती उदंड यश येण्याचा संभव आहे हें सहज सिद्ध होतें.

'हिंदी स्वातंत्र्याचा प्रश्न अहिंसा बलानें सोडविण्यासाठीं देवानें माझा साधन म्हणून उपयोग करावयाचें योजिलें आहे.' असें गांधीजी श्रद्धापूर्वक मानीत. जर हें साधन संपूर्णपणें विजयी झालें (आणि त्याच्या व्रताचें जितकें पालन होईल तितकें तें खात्रीनेंच यशस्वी होणार) तर हिंदी स्वातंत्र्यापासून जगाला एक नवा शांतिसुखाचा आदर्श मिळेल. अशा आदर्शाकरितां आज जग धादावलें आहे. राक्षसी संशयवृत्ति आणि हुकूमशाही यांमुळें आज अनन्वित हालअपेष्टा जग सोशीत आहे. एका महायुद्धांतून दुसरें महायुद्ध निघालें. आतां त्या दुसऱ्याची आग संपूर्ण विझणार कीं त्यांतून कांहीं निखारे धुमसत राहून तिसरें महायुद्ध पेटणार असा भयग्रस्त लोकांपुढें प्रश्न आहे. हीं जगाची राखरांगोळी करणारीं युद्धें कायमचीं कशीं थांबणार?

## युद्धें आणि अहिंसा : : ६

युद्धें थांबावींत, नव्हे थांबलींच पाहिजेत असें म्हणणारे विचारी लोक पाश्चात्य देशांत पुष्कळ होऊन गेले. पण केवळ चांगली इच्छा करीत राहण्यानें का चांगलें घडून येतें ? या सर्व शांततावादी लोकांच्या उदात्त आकांक्षा भाकड ठरल्या आणि युद्धाचे अनर्थ जगावर वेळोवेळीं कोसळतच राहिले. कित्येकदां तर शांततेच्या काळीं युद्धविरोधाचा प्रचार कळकळीनें करणारे कित्येक सज्जन लोक युद्धाच्या रणभेरी वाजूं लागतांच गांगरले आणि कांहींतरी सबबी सांगून युध्यमान पक्षांच्या हाताला हात मिळवूं लागले. पण यावरून ते केवळ संधिसाधुच होते असें म्हणतां यावयाचें नाहीं. त्यांना युद्ध नको होतें, अगदीं मनापासून नको होतें. पण युद्धांत सामुदायिक प्रमाणावर होणारी ही हिंसा बंद कशी करावी याचें तंत्रच त्यांना ठाऊक नव्हतें. हिंसेचें निर्मूलन करण्यासाठीं तेवढया प्रमाणावर सामुदायिक अहिंसाबल निर्माण करून हिंसेला तोंड द्यायचें हें शास्त्र त्यांना येत नव्हतें. हें अभिनव शास्त्र गांधीजींनीं काढलें. विशेषतः दुसऱ्या महायुद्धांत या शास्त्राचें तेज व बल त्यांनीं जगाला विशेष स्पष्ट करून दाखविलें.

हिंसात्मक युद्ध कायमचें बंद करण्यास हिंसाप्रवृत्ति वाढविणाऱ्या सर्व गोष्टींवर तिलांजलि सोडली पाहिजे. आपणांस जास्तींत जास्त सुख व ऐश्वर्य लाभावें म्हणून माणसें धडपडत असतात आणि अधिकांत अधिक पैसा व प्रदेश मिळविण्याची आसुरी महत्त्वाकांक्षा बाळगतात. ज्या गटाला ऐश्वर्य व सत्ता कमी पडते तो गट चरफडत युद्धाची तयारी करीत राहतो व वेळ येतांच प्रतिपक्षावर घाव घालतो. ( जर्मनी व त्याचे दोस्त हा असा गट होता. ) युद्ध पेटविण्यास कारण झालेल्या या असंतुष्ट गटाचा कांटा काढण्याकरितां त्याचे प्रतिपक्षी शस्त्रास्त्रांच्या कौशल्याची कमाल मर्यादा गांठतात. दोनहि पक्ष हिंसेच्या बाबतींत सारखी चढाओढ करीत असतात. म्हणजे बराच संहार

होऊन युद्ध थांबलें तरी हिंसेचा उत्कर्ष होऊनच तें थांबतें. " तुम्ही हिटलेरचा वध करून कांहीं नाझीझम् नष्ट करूं शकत नाहीं. " असें गांधीजी म्हणाले त्यांत फार खोल अर्थ होता. हिटलेरचा नाश करण्याकरितां तुम्हांला जर नाझींहूनहि जास्त क्रूर व्हावें लागलें आणि नाझींपेक्षांहि अधिक हिंसा करावी लागली तर मग नाझींचें क्रूर व हिंसात्मक तत्त्वज्ञान अप्रत्यक्षपणें तुम्हींच पत्करल्यासारखें होत नाहीं काय ? असा गांधीजींचा सरळ सवाल होता. झेक व ब्रिटिश लोकांना त्यांनीं हिटलेरला अहिंसात्मक प्रतिकार करा असा उपदेश केला. युद्धाच्या गर्दींत जरी त्या उपदेशाचें गांभीर्य व रहस्य ओळखणें जड गेलें असलें तरी आज युद्धाची मगरमिठी ढिली झाली असल्यानें गांधीजींच्या त्या उपदेशांतील बिनतोड युक्तिवादाची व संदेशाची महती कळणें जड जाणार नाहीं.

तोफा, रणगाडे, बॉम्ब्स् हीं अस्त्रें अक्राळविक्राळ तर खरींच, पण तीं कांहीं स्वतः माणसांवर चालून येत नाहींत. चिडलेल्या रानडुकरांप्रमाणें किंवा माजलेल्या हत्तीप्रमाणें रणगाडा इतस्ततः माणसांचा संहार करीत आपणहून धांवत सुटतो काय ? एखाद्या ज्वालामुखीप्रमाणें आपणहून कुठें तरी बॉम्बचा स्फोट होतो काय ? असें तर मुळींच नाहीं. बिचारा रणगाडा स्तब्धच असतो. पण माणूस त्यावर बसून त्याला गति देतो आणि आपल्या मनाप्रमाणें त्याच्याकडून संहाराचें काम करवून घेतो. बॉम्बचे सारे घटक जड व स्थिरच असतात. पण माणूस त्याला कुठेंतरी आदळून त्याच्याकडून माणसांचा व संपत्तीचा नाश करवितो. म्हणजे रणगाडे, बॉम्ब्स् इ. शस्त्रास्त्रें संहारक करण्यांत प्रमुख कारण मनुष्याचा हात असतो. आणि या हाताला त्याचें मन चालना देत असतें. या मनाला सुधारलें, त्यानें गोळ्या झाडून मनुष्यहानि करूं नये असें त्याला वाटायला लाविलें तरच हिंसेला कायमचा विराम देतां येईल. तेव्हां हिंसा करणाऱ्या मनाला आत्मक्लेशानें वळविणें हाच युद्धें, पिळवणूक, आक्रमण इ० अनर्थांवर खराखुरा प्रभावशाली उपाय आहे असें गांधीजी सांगत.

शस्त्रास्त्रापेक्षांहि अहिंसाबल हें अधिक सामर्थ्यवान् कसें आहे याचें आणखी थोडें दिग्दर्शन करतां येण्यासारखें आहे. शस्त्रास्त्रांनीं एखादा प्रदेश जिंकतां येतो, पण तो शस्त्रबळावर कायमचा ताब्यांत ठेवतां येत नाहीं.

म्हणून तुम्हांला दिसेल कीं, शस्त्रास्त्रांची झुंज संपून एखादा देश ताब्यांत आला कीं, जेते लोक तेथील प्रजेला संरक्षणाची हमी देतात, ऐश्वर्याची लालूच दाखवितात, आणि त्यांचे हक्क मान्य करण्याचीं आश्वासनें देतात. शिपाई काय किंवा राज्यकर्ते काय माणसेंच असतात. अन्न, वस्त्र, निवारा यांची आवश्यकता त्यांनाहि असतेच. आणि अन्न, वस्त्र निर्माण करणारे हे कांहीं हिंसावादी सैनिक नसतात, ते साधे शेतकरी कामकरी असतात. त्यांनीं मृत्यूला न भितां हिंसात्मक आक्रमकांशीं अहिंसावादी असहकार पुकारला, हवे ते क्लेश सहन केले तर कालांतरानें आक्रमकांचीं तोफा-रणगाडे इ० शस्त्रास्त्रें निष्प्रभ होतील. त्यांना या अहिंसात्मक प्रतिकाराशीं तडजोड करावीच लागेल. युद्धें, आक्रमण, पारतंत्र्य यांचा नाश करायचा असेल तर केवळ युयुत्सु राष्ट्राला शस्त्रबलानें नेस्तनाबूद करून भागणार नाहीं तर हिंसात्मक शक्तीचा सर्वांनीं संघटित होऊन अहिंसेनें प्रतिकार केला पाहिजे. हाच एक श्रेयस्कर मार्ग आहे. गांधीजींनीं हें सप्रमाण दाखविलें आहे. जगांतील थोर थोर विचारवंत गांधीजींच्या तत्त्वज्ञानाकडे आकर्षित झाले याचें कारण हेंच होय.

गांधीजींची ईश्वरावर गाढ श्रद्धा होती. त्याच्या इच्छेवांचून झाडाचें पानहि हलूं शकत नाहीं असें गांधीजी मानीत. आत्मा या गोष्टीवर त्यांचा विश्वास होता आणि आत्मशुद्धि केल्याशिवाय मोक्ष नाहीं अशी त्यांची दृढ समजूत होती. पण ईश्वर, आत्मा, आत्मशुद्धि इ० तत्त्वांना न मानणारे कित्येक आधुनिक बुद्धिवादी लोकसुद्धां सामुदायिक अहिंसेची अमोघ शक्ति मान्य करूं लागले आहेत. मात्र त्यांची अहिंसेकडे पाहण्याची दृष्टि पूर्ण व्यवहाराची आहे.

आज हिंसात्मक युद्धाचें किंवा चळवळीचें तंत्र अत्यंत खर्चाचें होऊन बसलें आहे. एक रणगाडा, एक बॉंबर विमान, किंवा एक पल्लेदार तोफ तयार करण्यास हजारों रुपये लागतात. शिवाय हीं जगड्व्याळ साधनें तयार करण्यास कारखान्यांचा केवढा तरी व्याप मांडावा लागतो. त्यामुळें संघटित व सामर्थ्यशाली सरकारलाच हें युद्धतंत्र तयार करणें परवडेल व सज्ज ठेवणें शक्य होईल. पूर्वी जेव्हां जनता सरकारच्या जुलुमी वर्तनाविरुद्ध बंड करून उठत असे तेव्हां लष्करी तंत्र इतकें अवजड नव्हतें. तलवारी, बंदुका यांसारखीं साधींसुधीं शस्त्रास्त्रें जनतेजवळ असलीं तरी काम भागे. तेवढ्या

शस्त्रास्त्रांच्या जोरावर जनता एकत्र येऊन सरकारशीं यशस्वी सामना देऊं शके. पण आजच्या काळांत शेंकडों लोकांनीं बंदुकीच्या नळ्या जमविल्या आणि समुदायानें सरकारवर चाल केली तरी दहा पांच विमानांतून मशीनगन्सच्या साह्यानें सरकार ह्या जमावाची सहज पांगापांग करूं शकेल. या लोकांना पळतां भुई थोडी होईल. रणगाडे, विमानें यांसारखीं प्रचंड व महाग शस्त्रास्त्रें हीं जनतेला कशीं मिळणार? तीं सरकार जनतेला स्वतः होऊन पुरविणार तर नाहींच पण जनता जर तीं निर्माण करूं म्हणेल तर सरकार तिला कडक उपाय योजून बंदी करील. गुप्तपणें तीं उत्पन्न करणें आंवाक्याबाहेरचें आहे. संहाराचीं अजस्र साधनें ही सरकारची मिरास होऊन राहिल्यानें जनतेला आपल्याजवळच्या तुटपुंज्या साधनांनीं आपल्या हक्कासाठीं कसें झगडतां येणार? पण वरील अजस्र शस्त्रास्त्रांना चालना देणाऱ्या मनाला वळविणें मात्र जनतेला अहिंसात्मक प्रतिकारानें शक्य होईल. असे प्रयोग थोड्याफार प्रमाणावर झाले आहेत आणि त्यांना जें यश आलें आहे त्यावरून अहिंसेच्या उपासकांना निश्चित व आशावादी राहण्यास कांहींच हरकत नाहीं. हिंदुस्थानांत झालेल्या सत्याग्रहांतील घटना ताज्याच आहेत. रशियन राज्यक्रांतींत सरकारचे शिलेदार सरकारी हुकुमावरून लोकपक्षाचें बंड मोडायला निघाले. वाटेंत कामकरी स्त्रियांनीं धैर्यानें त्यांच्यापुढें येऊन सांगितलें कीं, "बाबांनो! तुम्ही ज्यांच्यावर घोडदळें घालून गोळ्या चालविणार आहांत ते तुमच्याच हाडामांसाचे लोक आहेत. तुम्ही आणि ते एकाच सत्तेखालीं भरडले जाणार आहां..." शिलेदार स्तब्ध झाले आणि सरकारी हुकूम मोडून त्यांनीं आपला मोर्चा मागें वळविला!! अहिंसाबलाचा हा विजय स्फूर्तिदायक नाहीं असें कोण म्हणेल? आधुनिक बुद्धिवाद्यांना सुद्धां बहुजनसमाजाला अहिंसा हेंच बल अखेर उपयोगीं पडणार आहे असें वाटतें तें यामुळें. आपल्यावर आक्रमण करणाऱ्या हुकूमशाहीला विरोध करायचा असेल, आपल्यावरील परसत्तेचें जोखड दूर करायचें असेल, किंवा कुठल्याहि प्रकारच्या वतनदारीचें उच्चाटन करायचें असेल तर अहिंसाबल हेंच एकमेव व सामर्थ्यवान् शस्त्र जगांतल्या बहुजनसमाजाच्या हातीं आहे. श्रद्धावादी आणि बुद्धिवादी अशा उभयतांना याची प्रचीति आतां येत आहे.

मोटेंतून पाणी धों धों करीत बाहेर पडतें आणि पाटांतून झुळझुळ वाहात तें बागेंतील झाडांच्या तळवटापर्यंत जाऊन पोंचतें. झाडांचें पोषण हें या पाण्याचें खरेंखुरें जीवनकार्य होय, पण इतर कितीतरी सुंदर गोष्टी त्याच्या जीवनकार्यांतून सहजासहजीं घडतात. पाटांतून हें पाणी जात असतां बाजूला हरळी व रानफुलें या पाण्यावरच वाढतात. तहानेलेलीं पांखरें व जनावरें या पाण्यानें आपली तहान भागवितात. या पाण्यांत प्रतिबिंबित झालेले आकाशाचे रंग, ढग, ग्रहतारे इ० ची शोभा पाहून एखाद्या कवीला स्फूर्ति येते. एक कार्य करण्यास निघालेली सात्त्विक शक्ति भोंवतीं इतके विविध चमत्कार व आल्हाद निर्माण करूं शकते.

अहिंसेचें अगदीं असेंच आहे. जुलमी सत्तेला अहिंसाबलानें एखादा बहुजनसमाज विरोध करायला निघाला तर काय होईल पाहा! हें काम मूठभर लोकांनीं होण्यासारखें नाहीं; समाजांतील सर्वांना एकत्र यावें लागेल. आजवर जगांत जेथें जेथें लोकशाहीचे लढे झाले तेथें तेथें ते हिंसात्मक बळावर एकेका संघटित पक्षानें नेतृत्व घेऊन केले. त्या त्या वेळीं बहुजनसमाजाची सहानुभूति जरी या क्रांतिकारक पक्षाला असे तरी सर्व लोकांनीं त्यांत भाग घेतला नाहीं. त्यामुळें क्रांति यशस्वी होतांच नेतृत्व घेणारा तो पक्ष अधिकारारूढ होई. म्हणजे खरीखुरी लोकशाही न येतां एका कर्तृत्वशाली पक्षाची सत्ता प्रस्थापित होई. अहिंसात्मक लढ्यांत सर्व बहुजन-समाजाचाच भाग येत असल्यानें अशा लढ्यांतून जें राज्ययंत्र निर्माण होईल तें खरेंखुरें लोकसत्तात्मक असेल. समाजांतील सर्व थर एकत्र आल्यानें उच्चनीचतेच्या कल्पनेचे कंगोरे साफ होतील व बंधुता वाढेल. सर्वांनीं आत्मक्लेश एकत्र सोसण्यानें मिळालेले हक्क सर्वांचे आहेत ही भावना वाढीला लागेल. अहिंसात्मक सेनेंतल्या प्रत्येक सैनिकाचें शील व धैर्य तर सहस्र पटींनीं वाढेलच वाढेल. एका तत्त्वासाठीं अहिंसा संग्राम सुरू झाल्यावर त्यांतून इतकी विविध प्रकारची समृद्धि होण्याचा योग आहे. अहिंसात्मक लढ्यानेंच खरीखुरी लोकशाही उदयाला येणार आहे.

गांधीजी म्हणत, "माझी लहानपणापासूनच सत्याकडे प्रवृत्ति होती. पण अहिंसा मात्र मी हळूं हळूं शिकलों. सत्याचा शोध मी करूं लागलों तेव्हां मला अहिंसेचा एकच मार्ग तिकडे नेणारा आहे असें कळून आलें."

गांधीजींना सुद्धां अहिंसेचें दर्शन प्रयत्नें करून होत गेलें हें लक्षांत ठेविलें पाहिजे. व्यक्तीच्या जीवनापासून समुदायापर्यंत हें तत्त्व उत्कृष्ट रीतीनें कसें प्रभाव पाडूं शकतें हें आपण पाहिलें. पण पुनः पुनः हें सांगायला पाहिजे कीं, व्यक्ति काय किंवा समुदाय काय सहजासहजीं अहिंसेचें बल वापरण्यास समर्थ होणार नाहीं. त्यासाठीं व्यक्तीला व समाजाला मोठी साधना करावी लागेल. डोंगर-प्रदेशांतल्या लहानसहान नद्या विद्युद्गृहाला जन्म देतात. पण केव्हां? पद्धतशीर रीतीनें अडवून उंचावरून खालीं त्याचें पाणी सोडलें जातें त्या वेळीं. अहिंसेचे प्रवाह घरोघर आहेत. पण ते एकत्र आणून जर जनता जागृत केली तरच मोठी शक्ति निर्माण होणार आहे. ही शक्ति मानवी अंतरंगांतील द्वेषक्रोधादिकांचा अंधार नाहींसा करून सर्व प्रदेश प्रकाशमय करील. मात्र हें होण्यासाठीं व्यक्ति आणि समाज यांनीं या आश्चर्यमय शक्तीची आराधना व संघटना कशी करावयाची याविषयींचें ज्ञान सांगोपांग मिळवून त्याप्रमाणें आचरण केलें पाहिजे. या आचरणासाठीं जीं व्रतें पत्करायचीं त्यांतलीं सत्य व अहिंसा ह्या दोन्हींचें विवेचन झालें. या व्रतांना नम्रतेची अट मुख्य आहे. म्हणून त्या अटीचा विचार प्रथम घेऊं. मग ब्रह्मचर्य, अस्वाद, अभय, अस्तेय, असंग्रह इ. व्रतावलि क्रमानें येईलच.

○ ○ ○

### गांधी-सूक्ति

"जेथें धर्म नाहीं तेथें विद्या नाहीं, लक्ष्मी नाहीं, आरोग्य नाहीं; धर्मरहित स्थितींत सर्वत्र शुष्कता व शून्यताच राहावयाची. म्हणून हा धर्म जसा प्रत्येक व्यक्तीनें आपल्या प्रपंचांतल्या आचारांत पाळणें अवश्य आहे, तसा समाजानें राष्ट्रीय प्रपंचांतहि तो पाळला पाहिजे."

## नम्रता : : ७

भारतीय युद्ध चालू होतें. महापराक्रमी भीमसेन प्रळयमेघासारखा गर्जत आघाडीवर शत्रूंना तोंड देत होता. इतक्यांत शत्रूकडील एका महारथी योद्धयानें नारायणास्त्र नांवाचें एक विलक्षण अस्त्र भीमसेनावर सोडलें. संध्याकाळीं अस्ताचलावर टेकलेल्या लालभडक सूर्यासारखा एक तापलेला धगधगीत लोखंडाचा गोळा होता तो. भोंवतालचें वातावरण कंपित करीत तो भीमसेनाच्या रोखानें धुुंऽधुुंऽऽ करीत येऊं लागला. भीमसेन सावध होता. गोळा जवळ येतांच त्यानें आपल्या गदेचा एक तडाखा त्या गोळ्याला मारला. कुशल क्रीडापटूनें तुफानी गोलंदाजाच्या चेंडूला टोला लगावतांच तो चेंडू जसा सर सर सर सीमापार होतो, त्याप्रमाणें तो तेजोगोल दूर क्षितिजापर्यंत मागें गेला. भीमसेनानें विजयी मुद्रेनें पाहिलें पण काय चमत्कार ! तो तेजोगोल पुनः दुप्पट वेगानें भीमसेनाकडे येऊं लागला. पुनः गदा सावरून भीमानें दुप्पट जोरानें त्याला तडाखा मारला. तें अस्त्र पुनः अधिक मागें गेलें, पण चौपट वेगानें भीमसेनाकडे परत येऊं लागलें ! असें सारखें होऊं लागलें. भीमसेनानें तें अस्त्र जवळ येतांच आपली सर्व शक्ति एकवटून तें मागें टोलवावें आणि पुनः अधिक वेगानें तें भीमसेनाचा चक्काचूर करण्यासाठीं त्याकडे धुुं ऽ धुुं ऽ ऽ करीत यावें, या प्रकारांत खंड पडेना ! भीमसेनाच्या बाहूंतली शक्ति सारखे जबरदस्त टोले मारमारून क्षीण झाली होती. गोळ्याचा वेग मात्र सारखा वाढत होता. अखेर भीमसेन अगदीं गळून गेला. आतां मात्र गोळ्याला परतवून लावण्याइतक्या जोरानें गदाप्रहार करतां येईल असें त्याला वाटेना. जवळच अर्जुनाच्या रथावर असलेल्या त्रिकालज्ञ भगवान् श्रीकृष्णांनीं भीमसेनाची स्थिति जाणली. त्यांनीं भीमाला सांगितलें, " भीमसेना, हें नारायणास्त्र अमोघ आहे. याच्यावर तोड असें दुसरें अधिक प्रबळ अस्त्र माझ्याजवळसुद्धां नाहीं. याला जितके तूं टोले

देशील तितकें हें अधिक सामर्थ्यवान् होईल आणि अखेर तुझा या अस्त्राखालीं चुराडा उडेल. ह्या अस्त्रावर एकच उपाय आहे. हें तुजपुढें येतांच निःशस्त्र होऊन त्याला नमस्कार कर. आपोआप तें अदृश्य होईल." भीमानें श्रीकृष्णाच्या उपदेशाप्रमाणें केलें. तें नारायणास्त्र—तो धगधगीत गोळा भीमाच्या नमस्कारानें जणूं संतुष्ट होऊन मागें सरकला व हळूं हळूं अंतर्धान पावला !

जगांतील हिंसेचें असेंच आहे. तिला हिंसेनेंच आपण प्रतिकार करूं लागलों तर आपण अधिक अधिक क्षीण होत जातों आणि तिचें बळ मात्र वाढतें. अशा वेळीं नम्रता हाच एक रामबाण उपाय आहे. आपला कपाळमोक्ष करूं पाहणारे कितीतरी प्रश्न नम्रतेनें सहज सुटण्यासारखे असतात. नम्रता ही अहिंसेची अत्यंत तेजस्वी मूर्ति आहे; नम्रता ही अहिंसेची अंतिम सीमा आहे.

भक्त असतील त्यांना नम्रतेची साधना विनासायासच करतां येते. सारें जग हें परमेश्वराच्या आदेशाप्रमाणें चाललें आहे अशी दृढ श्रद्धा बाळगणाराला गर्व राहणार कशाचा ? भक्त हा कुठल्याच कार्याचें श्रेय आपणांकडे घेत नाहीं. 'अमानित्व' हाच त्याचा स्वभाव. आपण जें केलें, बांधलें, किंवा गायिलें तें परमेश्वरानेंच आपणाकडून करवून घेतलें असें त्याला वाटतें.

"ही बासरी घेऊन तूं गिरिदरींत हिंडलास आणि तीमधून विविध सूर काढलेस." हे रवीन्द्रनाथांनीं परमेश्वराला उद्देशून काढलेले मधुर उद्गार भक्ताचें हृदय स्पष्टपणें व्यक्त करतात. "लीनतेनें चालणारेच परमेश्वराचे खरे सेवक होत." हें कुराणवचन प्रसिद्ध आहे. शपथ न घेण्याविषयीं लोकांना निक्षून सांगतांना येशू म्हणतो—

"आकाशाची शपथ वाहूं नका. कारण तें देवाचें सिंहासन आहे. पृथ्वीची शपथ वाहूं नका. कारण तें त्याचें पदासन आहे. फार काय आपल्या डोक्यांचीहि शपथ वाहूं नका. कारण तुमच्या डोक्यावरील एक पांढरा केसहि काळा करण्याचें सामर्थ्य तुमच्यांत नाहीं."

आपले साधुसंतहि नम्रतेवर मुख्य भर देतात. "**नम्र झाला भूतां । तेणें कोंडिलें अनंता ।।**" सर्व प्राणिमात्रापुढें जो नम्र होतो तोच

परमेश्वराला आपल्या हृदयांत कोंडून ठेवूं शकतो. नम्रता हें परमेश्वराला वळविण्याचें सामर्थ्य आहे.

पण मनुष्य भक्त नसून ज्ञानी किंवा शास्त्रज्ञ असेल तरीहि तो नम्रच झाला पाहिजे. न्यूटनचें प्रसिद्ध वचन ठाऊक आहे कीं नाहीं? एकदां समुद्रकांठीं वाळवंटांत हिंडत असतां न्यूटन वाळूचा एक कण हातांत घेऊन आपल्या मित्राला म्हणाला, " या जगांत जेवढें ज्ञान आहे त्या मानानें माझें ज्ञान म्हणजे या विस्तीर्ण वाळवंटाच्या मानानें ह्या एका कणाएवढें आहे. " संशोधक जों जों सृष्टीचे व्यापार शोधूं लागतो, तीमधील भव्यता त्याला जों जों दिसूं लागते तों तों आपलें ज्ञान किती अल्प आहे याचा त्याला प्रत्यय येत जातो. दूरदूर अंतरावरील ग्रहतारे दाखविणाऱ्या नव्या नव्या अधिकाधिक शक्तीच्या दुर्बिणी काढल्या तरी शास्त्रज्ञांची मजल कोठवर जाते? त्यांना एवढेंच कळतें कीं ज्या परार्धावधि मैलांच्या हद्दीपर्यंत आपली दृष्टि पोंचली तिच्या पलीकडे अशींच आणखी अगणित परार्धें आहेत! आधुनिक जगांतले सर्वश्रेष्ठ विज्ञानमहर्षि अलबर्ट आइन्स्टाईन यांनींहि न्यूटनप्रमाणेंच उद्गार एके ठिकाणीं काढले आहेत. ते म्हणतात, " माझा गौरव करूं नका! या आश्चर्यमय सृष्टीच्या व्यापारांत मला कांहीं गति असली तरी ती एवढीच आहे कीं, तुम्हां लोकांपेक्षां आपलें ज्ञान किती अल्प आहे हें मला जास्त चांगलें समजतें. " थोर भक्त आणि श्रेष्ठ शास्त्रज्ञ यांची ही लीन वृत्ति पाहिली म्हणजे सामान्य माणसांनीं अहंकार बाळगावा याला अर्थच उरत नाहीं.

पण दोन गोष्टी लक्षांत ठेवल्या पाहिजेत. नम्रतेला ढोंगीपणाचें स्वरूप येतां कामा नये. कांहीं माणसें हवें तें दुष्ट कृत्य करण्यास मागेंपुढें पाहात नाहींत. पण नेहमीं लहानथोरांपुढें हात जोडून व लाचारी तोंडावर आणून वागतात. ही नम्रता फार घातुक आहे. कित्येक सज्जन पण दुर्बळ माणसें उगीचच आपणांकडे कमीपणा घेतात आणि ज्याला त्याला भिऊन सारखीं लीनता दाखवितात. नम्रता व्रताचें हें विडंबन आहे!

खरा नम्र माणूस निर्भय असतो. त्याचा आत्मविश्वास कधीं डळमळत नाहीं. आपलें म्हणणें बावगें आहे कीं काय अशा संशयांत तो गुरफटत नाहीं. सायकल चालविण्यांत कुशल असलेला माणूस मुद्दाम तोल सावरतांना

कधीं दिसतो का ? नाहीं. रहदारींत किंवा विरळ गर्दींत सहजासहजीं तोल सावरीत आहोंत याचेंसुद्धां त्याला भान नसतें. खरी नम्रता अशी असली पाहिजे. आपल्या आचारविचारांना तिच्यामुळें गति व लयबद्धता तर यावी पण त्यांत प्रयत्न दिसूं नये. सायकल चालविण्यांत तोलाचें जें महत्त्व तेंच सत्यसंशोधनांत नम्रतेचें आहे. म्हणूनच गांधीजी म्हणत, " सत्याचा शोध करूं इच्छिणाऱ्यानें धुळीच्या कणापेक्षांहि नम्र झालें पाहिजे."

o o o

### गांधी-सूक्ति

मी हिंदुस्थानांतील गरिबांतल्या गरीब भंग्या-पुढें, हरिजनांपुढें गुडघे टेकीन. कारण त्याला शतकानुशतकें चिरडण्यांत आम्ही भागीदार आहोंत. मी त्याच्या पायाची मातीहि डोक्याला लावीन. पण मी राजपुत्रापुढेंच काय, पण राजापुढेंहि लोटांगण घेणार नाहीं. कारण तो एका उन्मत्त सत्तेचा प्रतिनिधी आहे.

# मनाचें सारथ्य : : ८

एक होती सासू आणि एक होती सून. सासूचा वृद्धापकाळ झाला होता. तेव्हां सर्व घरदार सुनेवर सोंपवून ती काशीयात्रेला गेली. सासू वृद्ध होती तरी संसारांतलें तिचें लक्ष कमी झालें नव्हतें. सून तरुण होती तरी तिला परमेश्वरभक्तीची गोडी फार होती. काशींत देवदर्शनें घेत असतां सासूच्या मनांत सारखे घरचे विचार येत. "आतां सून आपल्या झाडांना पाणी घालीत असेल....ती पिवळी गाय घरीं आली असेल....त्या बागेंतून नेहमीं-इतकीं फळें यंदा आलीं कीं नाहीं कोण जाणे!...सूनबाई दूधदुभत्याचं नीट करते कीं नासधूस करते?...तिचा स्वभाव नाहीं तरी जरा उधळाच आहे!..." या आणि अशा विचारांत तिचे ते यात्रेचे दिवस जात. मधून मधून घरची आठवण होऊन तिला अगदीं वेड लागण्याची पाळी येई! इकडे सून जरी आपल्या गांवीं स्वतःच्या संसारांत मग्न होती तरी तिचें सारें मन सासूच्या काशीयात्रेसंबंधींच्या विचारांत असे. "आतां सासूबाई गंगाकांठीं भूपाळ्या म्हणत असतील...सासूबाईंनीं दूर दिसणाऱ्या काशी–विश्वेश्वराच्या शिखराला नमस्कार केला असेल...आतां गंगामातेच्या कांठीं बसलेल्या एखाद्या साधूला त्या वंदन करीत असतील." अशीं कल्पनाचित्रें रंगवून सून त्यांत दंग होई. सासू मनानें संसारांत होती. सून मनानें परमार्थ आचरीत होती. एके दिवशीं नित्याप्रमाणें सासू गंगेवर गेली. पवित्र तीर्थांत स्नान करीत असतांहि घरचेच विचार तिच्या मनांत येत होते. इतक्यांत गंगेच्या प्रवाहांत तिच्या कानांतील मोत्यांचें कुडें पडल्याचें तिला आढळलें. तें कांहीं केल्या सांपडेना. ती घाबरली! त्याच वेळीं इकडे सून अंग धूत होती. "हर गंगे, भागीरथि" अशीं पुण्यनामें उच्चारीत जणूं पुण्य-तीर्थांत आपण स्नान करीत आहोंत असा निर्मळ आनंद ती उपभोगीत होती. "सासूबाई तिकडे गंगामाईत बुड्या घेत असतील. शेंकडों भक्त

जयघोष करीत गंगेच्या पात्रांत उतरत असतील. ” असें सुनेचें चित्रण मनांत चालू होतें. इतक्यांत गंगाळांत तिला चकचकीत पदार्थ दिसला. तिनें नीट निरखून पाहिलें आणि एकदम तिच्या तोंडांतून आश्चर्योद्गार निघाले, “ अग बाई, सासूबाईचें कुडें कीं हें ! ” गंगामाईत सासूचें हरवलेलें कुडें सुनेला घरच्या गंगाळांत सांपडलें !

या दृष्टान्त-कथेंत मोत्याचें कुडें म्हणजे तीर्थयात्रेचें पुण्य असें घेतलें कीं गोष्टीचा ताळा नीट जुळतो. काशीयात्रेला गेलेल्या सासूला संसाराचा लोभ सुटला नव्हता म्हणून गंगेच्या पवित्र जलांत स्नान करतांनाहि तिला पुण्य गांठीं ठेवतां आलें नाहीं. उलट नेहमीं तीर्थयात्रा व परमेश्वरदर्शन यांच्या चिंतनांत राहिल्यामुळें सुनेला तीर्थयात्रेचें पुण्य घरच्या घरीं मिळालें ! श्रद्धेचा महिमा असा आहे. जशी ज्याची श्रद्धा असेल तसा तो होतो. “ **यो यश्रद्धः स एव सः** ” हें गीतावचन सार्थ आहे.

मनाची अशी तंद्री आपण जर श्रेष्ठ गोष्टीकडे नेहमीं लावत राहिलों तर आपण श्रेष्ठ होऊं. सत्याकरितां जो अहिंसा मार्ग आचरायचा त्यांत या गोष्टीचा साक्षात्कार आपणांला झाला पाहिजे. ब्रह्मचर्य हें अहिंसेच्या यशाला किती आवश्यक आहे याचा विचार या भूमिकेवरून झाला पाहिजे. ब्रह्मचर्य म्हणजे ब्रह्माच्या ( सत्याच्या ) शोधासाठीं केलेलें आचरण हा मूळ अर्थ लक्षांत घेणें जरूर आहे. ब्रह्मचर्याचा अर्थ केवळ कामवासनेचें निरोधन एवढाच घेणें सर्वस्वीं चूक आहे. सत्याच्या शोधासाठीं चित्तशुद्धि अवश्य असते. आणि तिच्यासाठीं सर्व इंद्रियांचा निग्रह अवश्य हवा. पण तो केवळ बाह्यात्कारी असतां कामा नये. आपण उपवास केला, अगदीं पाण्यावर राहिलों, पण मन चमचमीत पदार्थांकडे धांवूं दिलें तर तो खरा उपवास होत नाहीं. खरें ब्रह्मचर्य मनानें आचरिलें जातें.

पण याचा अर्थ उपवासादिक व्रतें निषिद्ध आहेत असा मात्र नव्हे. मन हें ओढाळ गुराप्रमाणें आहे. वारंवार कामक्रोधादि विकारांच्या आधीन होऊन तें इकडे तिकडे भटकत असतें. त्याला वेळोवेळीं आवरून श्रेष्ठ गोष्टींच्या चिंतनांत गुंतवून ठेवणें हा खरा मोक्षमार्ग आहे. अहिंसापालनाचें तर हें सारच होय. यासाठीं मन आवरण्याचा आपण प्रयत्न करीत असतां शरिराचें चोज न पुरविणें हें केव्हांहि साह्यकारक होतेंच.

श्रीरामचंद्र वनवासांत असतां लक्ष्मण राम-सीतेसाठीं दररोज फळें आणी. सीतेला वाटे हा बाहेरून फळें घेऊन स्वतः पोटभर खाऊन येत असेल. म्हणून ती त्याला खाण्याचा आग्रह करीत नसे. लक्ष्मण उपाशीच राही. रात्रीं राम-सीतेवर कोणी निशाचरानें हल्ला करूं नये म्हणून पर्णशय्येवर न झोपतां तो सक्त पहारा करीत राही. विवाहित असून तो ब्रह्मचारी होता. सीतादेवीच्याहि फक्त पायांकडेच तो दृष्टि लावी. रावणानें सीतादेवीला हरण करून नेल्यानंतर जेव्हां तिचे दागिने सांपडले तेव्हां फक्त पायांतील नुपूर काय ते लक्ष्मणाला ओळखतां आले ! कारण पादाभिवंदनाच्या वेळीं जेवढें तिचें शरीर दृष्टीस पडे त्याव्यतिरिक्त तिच्या इतर देहाकडे त्यानें टक लावून पाहिलेंच नव्हतें. असा निग्रही, संयमी, व्रतधारी लक्ष्मणच इंद्रजितासारख्या अजिंक्य राक्षसाला मारूं शकला. चौदा वर्षें सर्वसुखत्याग केलेला धनुर्धारीच इंद्रजिताला मारूं शकेल असा इंद्रजिताला वर होता. एका परीनें रामालाहि अवघड असलेलें कार्य लक्ष्मणानें साधलें. याचें कारण त्याची उग्र तपस्या व ब्रह्मचर्य. रामचंद्राला हें माहीत होतें म्हणून, लक्ष्मणाच्या व्रतसाधनेला त्यानें अडथळा केला नाहीं. असे थोर आदर्श आपल्या धर्मग्रंथांत पुष्कळ आहेत. हनुमान् व भीष्म यांना आपण भक्ति, सामर्थ्य, निश्चय, शौर्य व शील यांचे सर्वश्रेष्ठ पुतळे समजतों. वृद्धापकाळानें जर्जर झालेल्या मारुतीचें शेपूट भीमसेनासारख्या बलाढ्य मल्लाला उचलतां आलें नाहीं आणि वृद्ध भीष्मांच्या शरसंधानांनीं तरुण पांडवांची दाणादाण उडाली ! ब्रह्मचर्याच्या प्रभावाचीं हीं मोठीं उदाहरणें होत. इंद्रियनिग्रहाची महती इतर धर्मांतहि सांगितली आहे.

केवळ अविवाहितांनाच ब्रह्मचर्य पाळतां येणें शक्य आहे असें नाहीं. गांधीजी म्हणतात—

" विवाहितांनीं अविवाहितासारखें बनून जावें. यासारखी सुंदर स्थिति मीं दुसरी कोणती अनुभविलेली नाहीं...जगांतील प्रत्येक स्त्री आपली भगिनी आहे, आई आहे, कन्या आहे हा विचारच माणसाला एकदम उच्च स्थितीप्रत नेणारा, बंधनांतून मुक्ति देणारा होऊन जातो. " हा विषय जरा गहन आहे म्हणून त्याची खोली अजमावण्याचें कष्टाचें काम जरा बाजूला ठेवूं आणि त्यांतलें रहस्य तेवढें नेमकें उचलून घेऊं.

सत्याग्रहाच्या मार्गांत ब्रह्मचर्य व्रताची अत्यंत जरूरी आहे हेंच रहस्य

आपल्या हातीं येतें. ब्रह्मचर्य हें अत्यंत कठीण व्रत आहे असें सांगण्यांत येतें. तेव्हां ब्रह्मचर्य याचा फार संकुचित अर्थ केला जातो. वास्तविक कानांनीं आपण चांगल्याच गोष्टी ऐकत राहिलों, डोळ्यांनीं आपण हितप्रद देखावेच पाहिले, जिभेला सात्त्विक अन्नाचीच गोडी पाहिल्यापासून लाविली, आणि सर्वच इंद्रियांना साध्या सवयी लाविल्या तर ब्रह्मचर्याचें पालन पुष्कळ सुलभ होतें. एखाद्या मोठ्या राज्यांतला प्रत्येक प्रांत सुव्यवस्थित राहत असला म्हणजे मध्यवर्ती सत्ता सहजच सुदृढ राहते. भगवान् बुद्धाच्या मंगल उपदेशांत एके ठिकाणीं आपणाला पुढील सुंदर वचनें आढळतात.

“ जो केवळ सुखाच्या मागें धांवत नाहीं, जो आपल्या वासनांवर नीट नियंत्रण ठेवतो, जो भोजनांत नेमस्त आहे, ज्याची श्रद्धा अढळ आहे, आणि जो आपली शरीरमनाची शक्ति सांठवून ठेवतो त्याच्यावर माराचा ( दुष्ट शक्तीचा ) कांहीं परिणाम होत नाहीं; वादळी वारा खंबीर पहाडावर आदळला तरी तो काय करूं शकणार ! ”

बुद्धदेवाच्या या रमणीय सूक्तींत ब्रह्मचर्यव्रताची सर्व रूपरेषा आली आहे.

मागें एका पंजाबी मुलीनें गांधीजींना विचारलें होतें कीं, पापी लोकांच्या त्रासांतून आम्ही सुरक्षित राहण्याकरितां अहिंसाबल उपयोगीं पडेल काय ? त्या वेळीं याविषयीं झालेल्या वादविवादांत गांधीजींनीं अत्यंत सूक्ष्म व मननीय विचार प्रदर्शित केले. पूर्ण अहिंसेचें पालन करण्याकरितां आपल्या जीवनांत व दृष्टिकोणांत सर्वस्वीं क्रांति झाली पाहिजे. आपण वासना चेतविण्याकरितां कृत्रिम उपायांचा अवलंब केला, मुलींनीं रंगरंगोटी करून खोटें सौंदर्य आणिलें व आपल्याकडे हजार जणांची दृष्टि वेधावी असें केलें तर अहिंसा-बलाचा उपयोग त्यांना करतां येणार नाहीं. जे साधेपणा सोडीत नाहींत, मनाचें पावित्र्य टिकविण्याचा आटोकाट प्रयत्न करतात आणि वासनांचे दास होत नाहींत त्यांनाच अहिंसेचें अस्त्र वापरतां येतें. असें गांधीजींनीं सांगितलें.

आपण आपल्या मनाचे सारथी झालें पाहिजे. मनाला मंगल धामाकडेच जातां यावें यासाठीं आपणांला कुशल सारथ्य करतां आलें पाहिजे. विकारांना आपण आवरूं शकलों म्हणजे जी प्रसन्नता येते तिला मोलच नाहीं.

तिच्याबरोबर शरीरशक्ति भरपूर राहणें वगैरे मोठे फायदे आहेत. पण या प्रसन्नतेपुढें ते गौणच म्हटले पाहिजेत. मनोविजयाचें ऐश्वर्य कांहीं वेगळेंच आहे.

गांधीजी म्हणतात—

" हिमालयाचें मोजमाप तुम्ही करूं शकलां तर त्यायोगें होणारा आनंद अल्पकालच टिकेल. पण आपल्या मनावर संपूर्ण विजय तुम्हीं मिळविला तर त्याचा आनंद कधींच कमी होणार नाहीं, उलट वाढतच जाईल. "

o o o

गांधी-सूक्ति

" मीं मला शून्याकार बनविलें पाहिजे. जोंपर्यंत मनुष्य आपण होऊनच आपल्या सर्व बांधवांपेक्षां कमी दर्जाचें स्थान घेत नाहीं तोंवर त्याला मुक्ति नाहीं. "

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा,
वा. क्र...५३२३ नों. दि ..........
वि. ...... क्र. ..........

## अस्वाद : : १

एक राजा होता. त्याचा आहार साधा व सात्त्विक असे. उघड्यावर आकाशाच्या तारकांकित छताखालीं साध्या अंथरुणावर तो झोपे. त्याच्या राहणींत छानछोकी, चैन, ऐषाराम यांना बिलकूल थारा नसे. तो मोठा दक्ष, काटक, व शूर म्हणून प्रसिद्ध होता. त्याच्या शत्रूंना त्याचा फार दरारा वाटे.

एकदां काय झालें ? हा राजा गेला शिकारीला. दुपारपर्यंत सर्व जंगल त्यानें पायाखालीं तुडविलें. शिकार कांहीं मिळाली नाहीं. खूप दमून तो एका झाडाखालीं स्वस्थ बसला. पोटांत भूक खूप लागली होती. छावणीपासून दूर दूर शिकारीच्या नादांत तो आला होता. त्यामुळें सेवकांची व त्याची चुकामूक पडली होती. अर्थात् दुपारीं जठराग्नि शांत कसा करावा याची त्याला पंचाईत पडली. इतक्यांत त्याला समोर मधाचें पोळें दिसलें. त्यानें तें साफ करून खाण्यास सुरुवात केली. त्याच्या अन्नांत अत्यंत गोड, तिखट, झणझणीत अशा पदार्थांचा समावेश कधीं नसे. मधाचें पोळें चांगलेंच गोड होतें. त्यामुळें तें गोड पोळें त्याला अमृतासारखें वाटलें.

त्या मधाच्या पोळ्यानें राजाच्या जीवनांत भयंकर क्रांति केली. त्याच्या जिभेला गोड पदार्थांची चटक लागली.. शक्तिवर्धक व साधें जेवण त्याला दृष्टीसमोर नकोसें झालें. उंची पक्वान्नें, खमंग पदार्थ मादक पेयें हीं त्याला आवडूं लागलीं. सहज नमुना म्हणून एक एक पदार्थ चाखतां चाखतां जिभेचे चोजले पुरविणें एवढा एकच त्याचा आवडता उद्योग होऊन बसला. पक्वान्नांनीं पोट भरलें म्हणजे साहजिकच त्याला सुस्ती येई. त्याचा व्यायाम सुटला. त्याचें शरीर स्थूल व अवजड झालें, इतरहि विलासांचा शोक तो करूं लागला. राज्यकारभारांत ढिलाई होऊं लागली. त्याला तलवार पूर्वींसारखी सफाईनें चालवितां येईना. अखेर याचा सुगावा त्याच्या शत्रूंना लागला. राज्याच्या ढिलेपणाचा फायदा त्यांनीं पुरेपूर घेतला. त्या दुर्बळ झालेल्या

राजावर स्वारी करून त्यांनीं त्याचें राज्य बळकाविलें ! आणि त्याला देशो-धडीस लाविलें !

या गोष्टींतला अतिशयोक्तीचा भाग आपण वगळूं. पाहिजे तर. पण एक तत्त्व या गोष्टीवरून शिकायला हरकत नाहीं कीं माणसाचा जिव्हेवरचा ताबा सुटला कीं त्याच्या एकंदर जीवनांत ऱ्हास सुरू होतो. जीभ हें फार महत्त्वाचें इंद्रिय आहे. तिची आवड निरोगी राहिली पाहिजे. तिला एकदां लाडावून ठेविली म्हणजे तिची मिजास वाढत जाते. तिचे चोज पुरवितां पुरवितां आपण आपलें पोट आणि डोकें किती बिघडवून घेत आहों याची आपणांस शुद्ध नसते. काम, क्रोध, मोह इ. आपल्या वासनांना मसालेदार पदार्थ खाऊन आपण उत्तेजन देत असतों. या वासना अहिंसेला फार घातक आहेत. म्हणूनच अहिंसेचें व्रत पत्करणारांनीं स्वादिष्टपणाच्या वाऱ्याला उभें राहतां कामा नये. स्वादाचा–स्वादिष्टपणाचा त्याग म्हणजेच ‘ अस्वाद ’ हें अहिंसा-धर्मांतलें एक प्रमुख व्रत होय.

आपलें शरीर हें आत्म्याचें मंदिर आहे. हें मंदिर जितकें स्वच्छ व भक्कम असेल तितकें आत्म्याला समाधान होईल. या शरिराच्या साह्यानेंच आपणांला लोकसेवा करायची आहे, आपला ध्येयमार्ग गांठायचा आहे, आणि स्वतःची व त्याबरोबरच जगाची उन्नति साधायची आहे. निसर्गानें आपणांला दिलेली ही बहुमोल संपदा आहे. “ आरोग्य हाच परम लाभ आहे. ” ( धम्मपद ) “ शरीर हेंच पहिलें धर्मसाधन होय. ” ( कुमारसंभव ) अशीं वचनें आपण सर्व उत्कृष्ट ग्रंथांतून वाचतों. ‘ युक्त आहार-विहार करणारालाच योगसाधन शक्य होईल ’ असें श्री गीता उच्चरवानें सांगत आहे.

खाण्याच्या प्रकारावर माणसाच्या वृत्तीची वाढ अवलंबून असते. खमंग व चुरचुरीत पदार्थांसाठीं धादावलेलीं माणसें चंचल, तापट, सुखासीन असतात हा अनुभव कांहीं दुर्मिळ नाहीं. आहाराच्या अतिरेकामुळें किंवा चुकीच्या आहारामुळें शरिराचें चापल्य व सामर्थ्य नष्ट होतें. कित्येकदां खाण्याच्या हव्यासामुळें माणसें लाचार होतात किंवा स्वाभिमान विसरतात. कित्येकदां मादक पदार्थ मिळावे यासाठीं तुरुंगांत वरिष्ठांची हीन खुषामत करणारे किंवा खोटें बोलणारे बंदी नेहमीं आढळतात. ज्याचा जिभेवर ताबा नाहीं

त्याच्या बुद्धीची व करारीपणाची धार बोथट होण्याचा धोका नेहमींच असतो. अशा माणसाचे मज्जातंतू क्षीण होतात आणि मनाची प्रसन्नता व शांति राखणें त्याला अशक्य होऊन जातें. अर्थात् ब्रह्मचर्याचें पालन त्याच्या हातून होत नाहीं आणि म्हणूनच सत्यअहिंसेच्या मार्गावर तो पाऊल पुढें टाकूं शकत नाहीं.

आपण सत्याचे उपासक आहोंत या श्रद्धेनें शरीर, मन, आणि आत्मा यांना सुस्थित व कार्यक्षम ठेवणारा आहार आपण शोधून काढला पाहिजे. "शाकाहार ही हिंदु धर्मानें जगाला दिलेली एक उत्कृष्ट देणगी आहे." असें गांधीजी म्हणत. ह्या देणगीचा अवमान करून मांसाहारी जनावरांचें अनुकरण करणें प्रशस्त नाहीं अशी त्यांची शिकवण आहे. मादक पेयें व पदार्थ हीं तर विषवत् मानावींत.

मांसाहार वर्ज्य केल्यानें आत्म्याच्या विकासाला पुष्कळच मदत होते. पण एवढें केलें म्हणजे आपलें कर्तव्य संपलें असें होत नाहीं. परमेश्वराला भिऊन वागणारा मनुष्य हा मांसाहारी असला तरी तो मोक्षाच्या जवळ आहे; उलट केवळ दुग्धाहारावर राहणारा माणूसहि शीघ्रकोपी व दुराचरणी असूं शकतो असें गांधीजी म्हणत. पण हें सांगण्यांत सात्त्विक अन्नाचा निषेध करण्याचा उद्देश नसे. आपण मनावर विजय मिळविण्याच्या प्रयत्नांत असलों म्हणजे सात्त्विक आहाराची मदत होतेच होते. पण सात्त्विक आहार हा मदतनीस एवढेंच यांत समजायचें.

जो मनुष्य आपली जीभ आवरूं शकतो तो आपल्या वासनांवर नियंत्रण सहज घालूं शकतो. भूक लागेल तेव्हांच खावें. आपलें रोजचें अन्न मिळविण्यासाठीं आपण घाम गाळला आहे हें समाधान प्रत्येकानें अवश्य मिळविलें पाहिजे. अन्नाला त्यामुळें अपूर्व रुचि येते. कच्च्या भाज्या व ताजीं फळें यांचा आहारांत समावेश करावा. अन्न शिजविल्यानें त्यांतील जीवनसत्त्वें कमी होतात. म्हणून अन्न असें निःसत्त्व करूं नये. शिजविण्यापेक्षां उकडणें भाजणें चांगलें. जिव्हालौल्यामुळें आपण वाजवीपेक्षां अधिक खातों, म्हणजे इतरांच्या हिश्शांतला कांहीं भाग फस्त करतों हें अन्यायाचें आहे; ही एक प्रकारची हिंसाच आहे. दुसरें, अधिक खाण्यानें आपण आपलें

शरीरस्वास्थ्य बिघडवून घेतों. निवडक खाद्य पदार्थ आपण त्यांच्या नैसर्गिक रूपांत म्हणजे त्यांवर मसाले वगैरेंचे संस्कार न करतां खाल्ले तर ते थोडे पुरतात आणि अत्यंत आरोग्यदायक होतात. दूध, लिंबू, ऊस, कांदे, टमाटो, मुळे, गाजरें, पपई, केळीं, पालेभाज्या इ. आपल्या दाट ओळखीच्या पदार्थांत आपणांला ओज व स्वास्थ्य देण्याची केवढी प्रचंड शक्ति आहे हें आपण पुरें जाणून घेतलें पाहिजे. आपला आहार हा निसर्गाशीं जितका मिळता जुळता असेल तितकें आपणांस ब्रह्मचर्यपालन सोपें जाईल हें निर्विवाद आहे.

मागील युद्धांत नव्या शस्त्रास्त्रांची तपासणी करून पसंती नापसंती ठरविण्यासाठीं ब्रिटिश सरकारनें एक तज्ज्ञांची समिति नेमली होती. एखादी नवीन नमुन्याची बंदुक आली कीं समितींतले तज्ज्ञ ती २५० फूट उंचीच्या एका मनोऱ्यावरून खालीं टाकीत. एवढ्या उंचीवरून कोसळूनहि ती बंदूक नादुरुस्त झाली नाहीं तर तो नमुना पसंत झाला असें ठरवीत असत. एका प्रख्यात सेनासागरानें रणांगणावरील सैनिक कसा असावा यासाठीं हा दृष्टान्त दिला आहे. परीक्षणासाठीं आलेल्या बंदुकीप्रमाणें फार प्रचंड अपघात किंवा ताण पडला तरी ज्याचें शरीर व मन जायबंदी होत नाहीं असा सैनिकच रणधुमाळींत यशस्वी ठरतो असें या सेनासागराचें म्हणणें आहे.

सत्यपूजकाला तरी दुसरी कोणती कसोटी असणार ! जीवनाच्या संग्रामांत आपलें सत्यव्रत पाळीत असतांना मोह, आळस, लोभ, अपयश, निराशा यांचे प्रचंड धक्के बसण्याचा संभव नेहमींच असतो. अशा धक्क्यांतूनहि शरीर–मनाचें सामर्थ्य अबाधित राहिलें पाहिजे. ब्रह्मचर्याचें माहात्म्य याचसाठीं फार गायिलें जातें. जगाच्या झंझावातांत मेरुपर्वतासारखें स्थिर राहण्याची विद्या ब्रह्मचर्यानेंच साध्य होईल. अशा अमोघ ब्रह्मचर्याच्या आचरणाला साह्यकारी होणारें ‘ अस्वादा ’ सारखें दुसरें व्रत नाहीं.

० ० ०

२९८३४
प्रा. ना.
२००७
३-७-५७
१०

# अभय

एका इंग्लिश मुलाची गोष्ट सांगतात कीं, रात्रींच्या अंधारांत तो बाहेर जायला निघाला तेव्हां आई त्याला म्हणाली, " बाळा, बाहेर जातो आहेस खरा. पण भीति वाटेल तुला. " तेव्हां मुलानें विचारलें, " आई, भीति म्हणजे कशी असते ग ! मीं अजून पाहिलें नाहीं तिला. " हा निर्भय मुलगा प्रकृतीनें नरमच होता. पण त्याच्या निर्भयपणामुळें तो पुढें स्वतःच केवळ कीर्तिमान् झाला असें नाहीं, तर त्यानें आपल्या देशाचेंहि नांव उज्ज्वल केलें. इंग्रज दर्यासारंग वीर होरेशिओ नेल्सन तो हाच. जन्मभर भूमध्य समुद्र व अटलांटिक महासागर यांतील वादळांशीं टक्कर देत व नेपोलियनचा प्रतिकार करीत नेल्सन झुंझत होता. अखेर ट्राफल्गार येथील आरमारी लढाईत तो कामास आला ! " प्रत्येक नागरिकानें आपलें कर्तव्य करावें ही इंग्लंडची इच्छा आहे. " हा अमर संदेश मरतांना नेल्सननें दिला. त्याचें बलिदान व्यर्थ गेलें नाहीं. त्याच्या पराक्रमामुळें नेपोलियनचे पाय इंग्लंडला लागले नाहींत. इंग्लंडच्या राष्ट्रपुरुषांत नेल्सनला अढळ स्थान मिळालें.

निर्भयपणा हा एक असा गुण आहे कीं, शरीरमनाच्या साऱ्या शक्ति त्यामुळें अधिकांत अधिक विकसित होतात. अभय हें दैवी गुणांतलें अगदीं पहिलें व्रत होय. शरीर बांधेसूद व कांतिमान् होण्याला निरोगीपण हें पहिल्यानें अवश्य आहे. निरोगीपणा असल्यावांचून सामर्थ्यवान् व सौष्ठवपूर्ण शरीराची कल्पना तरी करतां येईल काय ? अभय आणि सत्य-अहिंसादि व्रतें यांचें असेंच आहे. अभयाच्या आधाराखेरीज सत्याची उपासना शक्य नाहीं. अभयाखेरीज अहिंसेचें आचरण अशक्यच होणार ! फार काय, कुठलेंहि ज्ञान, संशोधन, पराक्रम इत्यादि सर्व कांहीं अभयाची जोड नसल्यास साध्यच होणार नाहीं. म्हणूनच गांधीजी म्हणतात—

" जगांत ज्याला कांहीं टिकाऊ कार्य म्हणून करायचें आहे त्याला अभयाचें व्रत प्रथम संपूर्णपणें आचरलें पाहिजे. "

अभयाचा आधार नसेल तर मनुष्याचें मन भोंवऱ्यांत सांपडतें आणि मग त्याच्या एकंदर कौशल्याला बाध येऊं लागतो. मोठाल्या पुरांत निधड्या छातीनें पोहलेलीं माणसें साध्या शांत पाण्यांत केवळ भयग्रस्त होतांच बुडालेलीं आपण पाहतों. एखाद्या विषयावर बोलण्याची खूप तयारी आपण कितीहि केलेली असली तरी ऐन वेळीं श्रोतृवृंदाचें भय आपणांला वाटूं लागलें कीं स्मृति दगा देते, कांहीं आठवेनासें होतें, हा अनुभव पुष्कळांना आला असेल. सर्व अपयशाला एकच कारण म्हणजे मनांतला गोंधळ असें जाणते लोक सांगतात. आणि असा गोंधळ नेहमीं भयामुळेंच उत्पन्न होतो. म्हणूनच भयानें ग्रासलेल्या माणसाच्या पदरीं अपयश हें ठेवलेलेंच.

शंकर ही देवता शौर्याची मूर्ति आहे. मोठाले राक्षस, यक्ष, किन्नर, देव, ऋषि ज्याला मानतात, ज्याच्या नेत्रांतल्या ज्वाळांनीं सारें विश्व जळून जातें, आणि ज्याच्या क्रोधाच्या भीतीनें महाबलाढ्य पुरुषहि चळचळां कापतात त्या रुद्रालाहि भयानें एकदां निष्क्रिय केलें होतें हें ठाऊक आहे तुम्हांला ? ती गोष्ट अशी : ज्याच्या राशीला जाईल त्याचें वाटोळें करणारा पापग्रह शनि एकदां शंकराला म्हणाला, " देवा, मी तुमच्या राशीला एक प्रहर येतों आणि तुम्हांला माझा तडाखा दाखवितों. " यावर भगवान् शंकरांनीं हसून सांगितलें, " ये बापडा. पण मला तूं आपला प्रताप काय दाखविणार ? तुझी इच्छाच असेल तर ये. " ज्या प्रहरांत शनीची वक्रदृष्टि महादेवावर पडणार होती त्या प्रहरभर शंकर समाधि लावून बसले ! समाधि लावलेली असली म्हणजे पापग्रहांना आपले पाश टाकतां येत नाहींत. शनीच्या वक्रदृष्टीचा प्रहर संपतांच महादेवांनीं समाधि विसर्जन केली. आणि मग हसत हसत ते शनीला म्हणाले, " काय त्रास देऊं शकलास तूं मला ? " शनि महाराजांनीं विजयी मुद्रेनें उत्तर दिलें, " महाराज, माझ्या भीतीनें कांहीं हालचाल न करतां प्रहरभर आपणांला स्वस्थ बसावें लागलें हा माझा प्रभाव नाहीं काय ? आपणांस मी प्रहरभर निष्क्रिय ठेवूं शकलों हा माझा विजयच आहे. "

शनीच्या या गोष्टींतलें रहस्य नीट ध्यानीं घेतलें पाहिजे. भयानें माणसाच्या

कामांत गोंधळ तरी निर्माण होईल किंवा त्याला निष्क्रिय तरी राहावेंसें वाटेल आणि निष्क्रियता हा एक प्रकारचा मृत्यूच नव्हे का? "**थांबला तो संपला**" हेंच सत्य. भयामुळें कित्येक चांगल्या कामांना आपण हातच घालीत नाहीं. त्या कामांची उपयुक्तता आपणांला दिसत असते. पण तीं कामें आपण हातीं घेतलीं तर लोकनिंदेच्या तडाख्यांत आपण सांपडूं, शरीरकष्ट करावे लागतील, कदाचित् अपेशीहि ठरूं. अशा अनेक भयांनीं ग्रस्त झाल्यामुळें तीं कामें डावलून आपण स्वस्थ बसतों.

अभय याचा अर्थ बेछूटपणा असा कोणीच समंजस मनुष्य करणार नाहीं. पण पुष्कळदां वरवर पाहणाराला सर्व विधिनिषेध गुंडाळून फिरणारे गुंड हेच अभयाचे चालतेबोलते पुतळे वाटतात. हा भ्रम थोड्याशा सूक्ष्म निरीक्षणानें सहज नष्ट होणारा आहे. हेच गुंड आपल्यापेक्षां जबरदस्त शक्तीच्या समोर उभे राहिले म्हणजे त्यांची बेगुमानी कितीशी टिकते! गांवांतल्या शांततावादी नागरिकांना कर्दनकाळ वाटणारे हे लोक 'पिवळी पगडी' पाहतांच नांगी टाकतात! आपल्यापेक्षां बलवत्तर शक्तीशीं संग्रामाची वेळ आली असतांहि ज्यांना कंप येत नाहीं तेच अभयाचे खरे व्रतधारी. सत्याचें चिलखत असल्यावांचून असलें अभय व्रत शक्य नसतें. या अभयाला नम्रतेचें कोंदण असतें. दुसऱ्याचें म्हणणें सहानुभूतीनें ऐकून घेण्याची उदारवृत्ति या अभयाजवळ असते.

अभयावांचून शील ही गोष्ट अशक्य आहे असें गांधीजी सांगत. हें म्हणणें आपल्या राष्ट्राला जेवढें अधिक पटेल तेवढें आपलें उज्ज्वल भाविष्य अधिक जवळ येईल. भयावर आधारलेलें शील हें शीलच नव्हे, तो एक दंभाचा प्रकार आहे. आपल्या हृदयांत ज्या सत्याचा साक्षात्कार झाला आहे त्याचें आचरण करण्यास घाबरणें हें खरें पाप होय. पण पुष्कळदां हेंच पाप आपण कळत न कळत भयामुळें करीत असतों. कारण आपणांला पटलेल्या सत्याप्रमाणें आचरण करायचें म्हटलें तर पुष्कळदां समाजाच्या विरुद्ध वागावें लागतें. असें वागणें हें तर समाजानें पाप ठरविलेलें असतें. ह्या सामाजिक पापाला आपण घाबरतों. हें पाप जर हातून घडलें तर आपण समाजाच्या मोहबतीला पारखे होऊं, आपणांला मानमरातबाच्या जागा मिळणार नाहींत, आपणांला दुर्लक्षित स्थितींत एका कोपऱ्यांत पडून राहावें

लागेल ह्या प्रकारांना भिऊन आपण सामाजिक पाप करीत नाहीं. पण खरें पाप मात्र करतों, म्हणजे समाजाचे नियम पाळतों परंतु आपल्या अंतःकरणांत पडलेल्या सत्याच्या प्रकाशाकडे पाठ फिरवितों.

हें एका उदाहरणानें अधिक स्पष्ट होईल. एक मंदिर आहे. प्रभाकर या नांवाचा एक दयाळू माणूस त्या मंदिराचा एक विश्वस्त आहे. मंदिरांत जाऊन देवदर्शन घ्यावें अशी मंदिराभोंवतीं राहणाऱ्या अस्पृष्ट लोकांची इच्छा आहे. प्रभाकराला ती रास्त वाटते. माणसा–माणसांत भेद कुठलाच नाहीं. म्हणून उच्च वर्णीय म्हणविणाऱ्या लोकांप्रमाणें अस्पृष्ट मंडळींनाहि मंदिराचे दरवाजे खुले असावेत असें प्रभाकराची विवेकबुद्धि त्याला आग्रहानें सांगते. हा प्रभाकराच्या अंतःकरणांतला सत्यप्रकाश झाला. पण गांवच्या लोकांना व मंदिराच्या इतर विश्वस्तांना अस्पृष्टांनीं मंदिराच्या आंत पाऊल टाकणें ही घोर आपत्ति वाटते! अर्थात् अस्पृष्टांच्या मंदिरप्रवेशाला त्यांचा विरोध आहे. प्रभाकरानें स्वतःला सत्य वाटतें तें केलें तर लोकांचा व विश्वस्तांचा त्यावर रोष होईल; त्याला वाळींत टाकतील; त्याची गांवांतली प्रतिष्ठा जाईल. म्हणून मंदिरप्रवेशाच्या चळवळीला तो उत्तेजन देत नाहीं. याचा अर्थ आपणांला प्रतीत झालेल्या सत्याविरुद्ध प्रभाकर वागतो. म्हणजे खरें पाप करतो! लोकांच्या अन्याय्य दडपणाला बळी पडतो. तो खोट्या पापाला भितो आणि खरें पाप करतो.

कित्येकदां अज्ञानानें अभयाचें आचरण मनुष्याच्या हातून घडल्यासारखें वाटतें. विंचू किंवा साप यांच्या विषारी दंशाची कल्पना नसल्यामुळें अज्ञानानें मूल त्यांना हात लावतें. भांगेच्या तारेंत बेसावध झालेला माणूस जळत्या दिव्याची काच पकडतो. याला कोणी अभय म्हणेल काय? कुणीच म्हणणार नाहीं. पुढें कोणतें संकट वाढून ठेविलें आहे याची अज्ञानामुळें ज्याला यत्किंचित् कल्पना नाहीं त्याचें अभय खरें निर्भयपण नव्हेच. अज्ञानाप्रमाणें विकाराधीन होऊन एखादा मनुष्य कडेची गोष्ट करूं लागला तरी तेंहि अभय नव्हे. पुढील घोर परिणामाचें यथार्थ ज्ञान आहे आणि मन विकारांनीं व्यापलेलें नाहीं अशा वेळीं जो मर्दपणा दाखवील त्याची–नव्हे त्याचीच फक्त निर्भयता अभय व्रताची मान्यता पावेल!

आपला बहुतेक काळ कुठल्या तरी भयाच्या छायेंत जातो. रोगाला आपण घाबरतों, धनदौलत चोरीस जाईल ही आपणांला काळजी असते, कुणी आपल्यावर नाराज होईल का या धास्तीनें आपण थबकत अडखळत वावरत असतों. आपणांला राजदण्डाचें भय असतें. अशा एक ना दोन हजारों भीतींनीं आपलें दररोजचें जीवन व्यापलेलें असतें. मृत्यूचें भय सोडलें कीं आपण सर्व भयांपासून मुक्त झालों असें समजूं नये. कित्येक माणसें मरणाची कदर मुळींच करीत नाहींत. यमराजाची स्वारी येऊं लागली तर हे थोर लोक हसत हसत चार पावलें त्याला सामोरे जातील इतकी यांची निर्भयता स्पष्ट असते. परंतु मृत्यूला न भिणारे हे लोक कित्येकदां आपल्या प्रियजनांचा वियोग चार घटकाहि सहन करूं शकत नाहींत. यांपैकीं कित्येकांना आपले पैसे बुडाले या विचारानें वेड लागण्याची पाळी येते. हें खरें अभय कसें म्हणतां येईल ? सर्व बाह्य गोष्टींच्या भयापासून चित्त अलित ठेवणें याला खरें अभय म्हणतात.

ज्ञान आणि विज्ञान यांचा एवढा उत्कर्ष अभयानेंच केला आहे. पंच-महाभूतांची भीति झुगारून जे ऋषिमुनि घोर तपश्चर्या करीत राहिले त्यांनीं आपल्या अमर संस्कृतीचा पाया घातला. देहदंड, उपासमार, मृत्यु इ. चा संभव दिसत असतांहि उत्तुंग शिखरें व दुर्लंघ्य सागर ओलांडून जे धर्मोपदेशक धर्मप्रचारासाठीं बाहेर पडले त्यांनींच आज माणसांच्या जातीपुढें उच्च जीवनाचा आदर्श कायमचा तेवत ठेवला आहे. अज्ञात प्रदेश शोधून काढा-यला गेलेले कोलंबस, मार्कोपोलो आणि इतर शेंकडों संशोधक अभयव्रतधारी होते म्हणून तर दूरदूरचे देश जवळ आले. पृथ्वी सूर्याभोंवतीं फिरते हें सांगणारा गॅलिलिओ केवढा शूर ! कारण हें पाखंडी मत सांगण्याचा घोर अपराध केला म्हणून कदाचित् सनातनी समाजाकडून त्याचा वधहि होणें शक्य होतें ! मार्टिन ल्यूथर किंवा एकनाथ महाराज यांनीं प्रचलित धर्म-कल्पनांविरुद्ध खरा मानवधर्म सांगण्यांत अभयाचा केवढा उत्कर्ष केला ! या अभयमूर्तींची स्मृति आपण करूं लागलों म्हणजे ज्ञान आणि विज्ञान, विद्या आणि कला यांत बहुमोल भर घालणारे अभयाचे शेंकडों आदर्श आपणांला आठवूं लागतील.

आपल्या राष्ट्राला अनेक सद्‌गुणांची आज जरूरी आहे. पण अगदीं एकच एक निकडीचें व्रत कोणतें आचरलें पाहिजे असें विचारलें तर अभय हेंच उत्तर देतां येईल. आपल्या नैतिक, आर्थिक, राजकीय सर्व ऱ्हासाचें कारण अभयाचा अभाव हेंच सांगतां येईल. आजचीं झुंजार व पुढारलेलीं राष्ट्रें हीं हिंसावादी आहेत हें खरें, पण अभयाचा कळसच त्यांनीं एकापरी गांठला आहे हें विसरून चालणार नाहीं. आणि या एका गुणाच्या प्रकर्षानें जगाचें पुढारीपण त्यांनीं मिळविलें आहे. नाझी राक्षसांना आपल्या देशांत हातपाय पसरूं द्यायचे नाहींत या निर्धारानें रशियन वीरांनीं जेव्हां नीपरचें प्रचंड धरण उध्वस्त केलें तेव्हां जीवित, वित्त, सगेसोयरे, घरदारें यांपैकीं कशाचीच शाश्वति त्या जलप्रलयांत नाहीं हें निश्चित होतें. पण रशियन लोकांनीं कशाचीच तमा न बाळगतां अभयाचा एक नवा उज्ज्वल इतिहास निर्माण केला. यांतलें निर्भयत्व एवढेंच आपणांला उचलावयाचें आहे. आपलें अभय सात्त्विक पाहिजे. आपण एका जगच्छक्तीचे अंश आहोंत आणि आपली सारी काळजी घेणारा कुणी नियंता आहे या श्रद्धेनें येणाऱ्या अभयासारखी उत्तम स्थितिच नाहीं. पैसा, कुटुंब, शरीर यांकडे 'देणें ईश्वराचें' या वृत्तीनें जो पाहूं लागेल त्याला भय उरणार कशाचें? म्हणूनच गांधीजी म्हणतात.

"आपण परमेश्वराबद्दल भीति बाळगूं या म्हणजे माणसाविषयीं आपणांस वाटणारें भय आपोआप नष्ट होईल."

○ ○ ○

## गांधी-सूक्ति

"स्त्री ही अहिंसेची मूर्ति आहे. अहिंसा म्हणजे अथांग प्रेम. म्हणजेच कष्ट करण्याची अमर्याद शक्ति. मनुष्याला जन्म देणाऱ्या स्त्रीवांचून अशी शक्ति कोण दाखविणार? ... अहिंसा हा आपल्या जीवनाचा धर्म झाला तर स्त्रियांच्या हातींच भवितव्य राहील."

गांधीजी जेव्हां मंडलाकार परिषदेकरितां गेले तेव्हां ईजिप्तमध्यें त्यांना एक मधाचा कलश लोकांनीं नजर केला होता. लंडनमध्यें असतांना आपल्या निवासापासून ते दररोज कामासाठीं दूर येत. त्यांचें दुपारचें जेवण घरून येई तेव्हां वर सांगितलेल्या कलशांतील मध त्या जेवणांत येत असे. एकदां गांधीजींच्या शिष्या मीरा बेन मध आणायला विसरल्या. तेव्हां कोणीं चटकन् पैसे टाकून एक मधाची बाटली जवळून विकत आणली. हें लक्षांत येतांच गांधीजी खवळले ! आणि म्हणाले, " घरीं भरपूर मध असतां आपण चुकीनें तो आणायचा विसरलों—म्हणून हा जादा खर्च केलात ना ! हें चूक आहे. एक दिवस मध मिळाला नसता तर काय माझा अंत झाला असता ! हा पैशाचा अपव्यय आहे. "

एकदां गांधीजींचा हातरुमाल हरवला. तो नुकताच त्यांनीं वापरायला काढला होता. हातरुमाल हरवल्याचें पाहून दुसरा हातरुमाल कोणी त्यांच्या-पुढें केला. त्यावर तो घेण्याचें नाकारून गांधीजी म्हणाले, " माझा हरवलेला हातरुमाल दोन आठवडे पुरला असता. तेव्हां अद्यापि दोन आठवडे मला हातरुमालाशिवाय काढले पाहिजेत. "

प्रसंग साधेच आहेत. पण गांधीजींची प्रखर तत्त्वनिष्ठा त्यांत सुंदर रीतीनें प्रकट झाली आहे. असें सांगतात कीं आग्र्याच्या किल्ल्यांतील एका महालांत बहुमोल पैलूदार हिरे बसविले होते. यांतल्या पैलूंत दूर असलेल्या ताजमहालाचें लहानसें पण स्वच्छ प्रतिबिंब दिसे. लोकोत्तर पुरुषांचें असेंच असतें. त्यांच्या जीवनांतल्या साध्या प्रसंगांतहि त्यांच्या रमणीय तत्त्वज्ञानाचें दर्शन आपण घेऊं शकतों. वर गांधीजींच्या जीवनांतल्या ज्या दोन गोष्टी आल्या त्यांत अस्तेय या व्रताची अगदीं सूक्ष्म छाननी सहज येऊन गेली आहे. अस्तेय याचा अर्थ चोरी न करणें. पण दुसऱ्याची वस्तु त्याच्या न कळत घेणें

एवढाच संकुचित अर्थ चोरी या शब्दाचा घेतां येणार नाहीं. आपणांला ज्या वस्तूची आवश्यकता नाहीं ती घेणें हेंहि चोरींतच येतें. आणि गरज असतां बेफिकीरपणें वस्तु हरवणें, पदार्थांची नासधूस करणें याहि गोष्टी चोरींतच जमा होतात.

पण या व्रताला आणखीहि पापुद्रे आहेत. तुम्ही अगदीं निर्जळी एकादशी केली आणि समोर असलेल्या मेवामिठाईवर तुमची वासना गेली तर ती एक प्रकारें चोरीच होते. समोरचे खाद्य पदार्थ जागच्या जागीं आहेत, त्यांना तुम्हीं हात लावला नाहीं हें सर्व खरें. पण मनानें तुम्ही जर त्याचा उपभोग घेण्यांत रंगून गेलांत तर अस्तेय व्रताची ती एकपरीनें पायमल्लीच होते. यासारखाच चौर्यकर्माचा एक अगदीं सूक्ष्मांतला सूक्ष्म प्रकार आहे आणि तो म्हणजे विचारचौर्याचा. मीं एखाद्या ग्रंथांतले मौलिक विचार वाचले आणि पुढें ते आपले म्हणून सांगूं लागलों किंवा लिहूं लागलों तर या माझ्या कृत्याची गणना चौर्यांत करावी लागेल. असें सूक्ष्म रीतीनें आपण चिंतन करूं लागल्यास दररोजच्या जीवनांत आपल्या हातून अस्तेयाचा भंग केवढ्या मोठ्या प्रमाणांत होत आहे याचा अंदाज येईल. अर्थात् या अंदाजाचा परिणाम गोंधळून निष्क्रिय होण्यांत होऊं नये, तर अभ्यासपूर्वक अस्तेयाचें पालन अधिकांत अधिक आपल्याकडून कसें होत जाईल याचा बोध या अंदाजावरून आपण घ्यावा.

आत्मसंशोधन हें आपल्या विकासासाठीं अवश्य आहे. नेहमीं आपल्या एकंदर आचरणाची संगति लावण्याची व ध्येयापासून अजून किती दूर आहोंत हें पाहण्याची संवय असावी. ज्या गोष्टीवर कुणाचीच मालकी नाहीं ती गोष्ट घ्यायला कांहीं हरकत नाहीं असें आपणांस वाटतें. पण तेंहि चूक आहे. रस्त्यांत एखादी मूल्यवान् वस्तु सांपडली तर ती आपली असें कसें म्हणतां येईल ? ती कुणाच्या तरी मालकीची आहे त्या अर्थीं ती मालकापर्यंत पोंचविणें आपलें कर्तव्य आहे. मालक न सांपडला तर सरकारांत ती दाखल केली पाहिजे. कारण ज्या वस्तूला कोणी मालक नाहीं तीवर सरकारची सत्ता असते.

प्रूधाँ म्हणून एक प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ होऊन गेला. " सर्व खाजगी संपत्ति ही एक चोरी आहे." असें सूत्र त्यानें प्रथम सांगितलें. याचा अर्थ स्पष्ट

आहे. जेव्हां आपण खाजगी संपत्ति सांठवितों तेव्हां दुसऱ्याच्या हक्काचें कांहीं तरीं लुबाडून घेतों. कुणाला तरी अन्नवस्त्रावांचून ठेवतों. प्रूधाँच्या या सूत्राचा पुढें आणखी विचार होईलच. युरोपमध्यें संपत्तीची खाजगी मालकी नष्ट करावी यासाठीं जें समाजवादाचें तत्त्वज्ञान उदयाला आलें त्याचें बीज प्रूधाँच्या वरील सूत्रांत सांपडेल.

आपण अस्तेयाचा अंगीकार ज्या प्रमाणांत करूं त्या प्रमाणांत देशांतलें दैन्य कमी होईल. आपण अनवश्यक वस्तू सांठवून दुसऱ्याच्या हक्काचें धन चोरतों यामुळें आपण तर पापाचे धनी होतोंच परंतु इतरांनाहि पाप करायला प्रवृत्त करतों. कारण आपल्या संचयामुळें जे कफल्लक झाले त्यांना चोरी करण्याखेरीज कोणता मार्ग उरला ? म्हणजे समाजांतील एक लहानसा भाग ऐश्वर्य व सत्ता यांचे मागें लागून अस्तेय व्रताचा भंग करतो आणि राहिलेल्या मोठ्या भागाला चोरी केल्यावांचून गत्यंतर राहात नाहीं. प्रचंड प्रमाणांत होत असलेलें हें चौर्यकर्म थांबलें पाहिजे. सत्याची पूजा बांधूं इच्छिणाऱ्या साधकांनीं अस्तेयाचा अवलंब केलाच पाहिजे. व्यक्ति आणि समाज यांच्या सुस्थितीची हमी अस्तेयच एक देऊं शकेल.

या विवेचनाची सांगता गांधीजींच्या स्फूर्तिदायक शब्दांत करूं या. ते म्हणतात, "आपल्या दैनंदिन गरजा भागण्याइतके पदार्थ निसर्ग उत्पन्न करतो, आणि म्हणून प्रत्येकानें आपल्या गरजेपुरतेंच घेतलें, अधिकांना हात लावला नाहीं तर जगांत कंगालपणा औषधालासुद्धां उरणार नाहीं. भुकेनें मरण्याचा प्रसंग एकाहि माणसावर येणार नाहीं. पण आपण जोंवर अस्तेय व्रत पत्करलें नाहीं तोंवर जगांत विषमता राहणारच. मी समाजसत्तावादी नाहीं आणि ज्यांच्यापाशीं संपत्ति आहे त्यांना निर्धन करण्याची आकांक्षाहि मी बाळगीत नाहीं. पण ज्यांना अंधारांतून प्रकाशाकडे जावयाचें आहे त्यांनीं हें व्रत पत्करलेंच पाहिजे. कुणाची संपत्ति हिरावून घेणें हें अहिंसेला मारक आहे. माझ्यापेक्षां कुणाजवळ अधिक जिंदगी असेल तर असूं द्या. पण माझ्या स्वतःच्या जीवनांत मात्र अनवश्यक वस्तू मी जवळ बाळगणार नाहीं. हिंदुस्थानांत चिमूटभर मीठ आणि एक भाकर एवढेंच फक्त एक वेळ खाऊन राहणारे कोट्यवधि लोक आहेत. या लोकांना पोटभर जेवण व पुरेसें वस्त्र

मिळाल्याखेरीज तुम्हांला आणि मला कुठल्याहि वस्तू सांठविण्याचा अधिकार नाहीं. या अर्धपोटी लोकांचें पोषण नीट व्हावें, त्यांना अंगभर वस्त्र मिळावें, आणि त्यांची शुश्रूषा नीट व्हावी यासाठीं तुमच्या माझ्या-सारख्या जाणत्या माणसांनीं आपल्या गरजा कमी केल्या पाहिजेत, वाटल्यास उपासाचें व्रत अंगिकारलें पाहिजे. स्वेच्छेनें फकिरी पत्करणें हें यांतून आपो-आपच येतें."

०  ०  ०

## गांधी-सूक्ति

"विद्यार्थ्यांनीं आपल्या सुटीचे सर्व दिवस ग्रामसेवेकडे लावावेत. त्याकरितां नेहमीं त्याच त्याच रस्त्यानें फिरायला जाण्याऐवजीं आपल्या राहण्याच्या ठिकाणापासून जवळ असलेल्या खेडेगांवांत त्यांनीं फिरायला जावें. गांवांतील लोकांच्या परिस्थितीचें निरीक्षण करावें, आणि त्यांच्याशीं मित्रत्वाचे संबंध जोडावे."

# “ संचय करूं नका ” : : १२

डायोजीनीस नांवाचा एक ग्रीक तत्त्वज्ञानी होता. तो अगदीं दिगंबर वृत्तीनें राही आणि परमात्म-चिंतनांत निमग्न असे. पाणी पिण्यासाठीं एक कमंडलूच काय तो त्यानें जवळ बाळगिला होता. त्याच्यापाशीं त्याची स्वतःच्या मालकीची म्हणतां येईल अशी वस्तु एवढीच ! एकदां हा अवलिया नदीवर गेला आणि पिण्यासाठीं पाणी घेण्यास त्यानें नदींत आपला कमंडलु बुडविला. इतक्यांत समोर त्याची दृष्टि गेली. तों गुरें पाणी पीत होतीं. डायोजीनीस म्हणाला, “ अरे, या गुरांना पाणी पिण्यासाठीं एखादा कमंडलु लागत नाहीं. खुशाल पाण्याला तोंड लावून तीं पाणी पिऊं शकतात. मग मीं तरी ही कमंडलूची उपाधि जवळ कशाला बाळगावी ? ” असें म्हणून त्यानें तो कमंडलु फेंकून दिला आणि तेव्हांपासून तो पाण्याला तोंड लावून पाणी पिऊं लागला.

अपरिग्रह म्हणजे संग्रह न करणें या व्रताची ही अगदीं सीमा झाली. याच डायोजीनीसची एक गोष्ट अशी सांगतात कीं तो थंडीच्या दिवसांत रस्त्यावर एका खोक्यांत झोपून राही. त्याच्या या अद्वितीय वैराग्याची कीर्ति जगज्जेता शिकंदर बादशहा याच्या कानीं गेली. तेव्हां मोठाले नजराणे घेऊन आपल्या लवाजम्यासह शिकंदर त्याच्या दर्शनाला गेला. वेळ सकाळची होती. थंडी होती तरी सूर्यकिरणांनीं जरा वातावरणांत ऊब उत्पन्न केली होती. डायोजीनीस महाराज खोक्यांत पडून राहिले होते. शिकंदरानें त्याला वंदन केलें आणि म्हटलें, “ महाराज, मी बादशहा शिकंदर आपल्या भेटीला आलों आहें. आपण काय पाहिजे तें मागा. ” यावर डायोजीनीस हंसून म्हणाला, ‘ माझ्या अंगावर जें ऊन येत आहे तें तूं मध्यें उभें राहिल्यामुळें अडलें आहे. तेवढें सोड म्हणजे झालें. याहून मला दुसरें कांहीं तुझ्याजवळ मागावयाचें नाहीं. ’

या वैराग्याला तोड म्हणजे श्रीतुकाराम महाराजाचें उदाहरण आपणांकडे सांगतां येण्यासारखें आहे. 'सोनें मोतीं आम्हां मृत्तिकेसमान' असें म्हणून शिवाजी महाराजांनीं पाठविलेले नजराणे तुकाराम महाराजांनीं परत केले ही गोष्ट प्रसिद्ध आहे. डायोजीनीस, तुकाराम इ० पुरुष हे असंग्रहाचे दिव्य आदर्श होत. आपण तेथपर्यंत कधींच पोंचणार नाहीं हें खरें असलें तरी त्या आदर्शांचें माहात्म्य आपणांला डोळ्यांआड करतां येणार नाहीं. ध्रुव ताऱ्या-पर्यंत कोणी पोंचत नाहीं. पण अंधारांत त्याकडे दृष्टि लावून आपणांला आपल्या दिशा व मार्ग नीट कळतो कीं नाहीं ? डायोजीनीस किंवा तुकाराम यांची स्फूर्ति अशीच आपल्या उपयोगीं पडेल.

गाण्याचें ज्ञान ज्या लोकांना आहे त्यांना हें ठाऊक असेल कीं कित्येक रागांतील सूर अगदीं सारखे असतात. वादी संवादी स्वरांत फरक पडतो म्हणून या रागांचीं नांवें वेगळीं होतात इतकेंच. भूप आणि देसकार या दोन रागांचे स्वर अगदीं सारखे आहेत. पण एकांत गंधार वादी तर एकांत धैवत वादी. म्हणजे वेगवेगळा सूर अधिक प्राचुर्यानें यायचा एवढ्यामुळेंच हे दोन राग वेगळे झाले. मागल्या प्रकरणांतलें अस्तेय व्रत आणि आतां आपण ज्याचें निरूपण ऐकत आहोंत हें अपरिग्रह व्रत हीं दोन्ही व्रतें भूप-देसकारां-प्रमाणें स्वभावधर्मानें अगदीं एकच आहेत. दोघांचे घटक सारखेच. फक्त वेगळ्या घटकावर जोर दिल्यानें एक व्रत दुसऱ्यापासून स्वतंत्र मानलें गेलें इतकेंच.

आपण आपलें जीवन तपासून पाहात असलों म्हणजे सहज कळून येतें कीं, अनवश्यक वस्तूंचा केवढा तरी सांठा आपण करीत असतों. "हें उद्यां उपयोगीं पडेल, त्याचें परवां काम लागेल," असें म्हणत आपण आपलीं कोठारें वाढवीत असतों. कित्येकदां तर अमुक वस्तु कां जपून ठेवणार आहोंत हेंहि आपणांस सांगतां येत नाहीं ! केवळ संग्रहाचें व्यसन म्हणूनच या वस्तू सांठविण्याचा आपला क्रम चालू असतो. गरजेनें गरज वाढते. संग्रहांतून संग्रहाला फाटे फुटतात. एखादी दिखाऊ पण बहुमोल वस्तु आपण खरीद केली कीं मग काचेच्या कपाटाची आवश्यकता निर्माण होते. तें शोभिवंत दिसेल असा दिवाणखाना पाहिजे. तो स्वच्छ ठेवण्यासाठीं माणूस नको का मग ठेवायला ?...अशी ही शृंखला वाढत जाते, आपण खर्चांत गुरफटून

परावलंबी किंवा दुर्बळ होत जातों. व्याप तितका संताप ! संग्रहाच्या वाढीबरोबर काळजीहि वाढत जाते. अवश्य कर्तव्याचा वेळ आपण संग्रहाकडे देऊं लागतों. पण आपली विवंचना वाढते आणि कर्तव्याकडे दुर्लक्ष होऊं लागतें, एवढेंच संग्रहाचें संकट नाहीं. या व्यक्तिगत अपायापेक्षां सामाजिक अपाय फार मोठा आहे. किंबहुना असें म्हणतां येईल कीं आज युद्धाच्या ज्वाला गगनाला जाऊन भिडल्या आहेत आणि सारें सुसंस्कृत जग त्यांत होरपळून निघत आहे याचें कारण माणसाची संग्रह-वृत्तिच होय.

माणसें आपल्या जवळ संग्रह करून ठेवतात म्हणून इतरांना अवश्य वस्तू सुद्धां मिळत नाहींत. मागें एकदां एका ठिकाणीं समुद्र खूप मागें हटल्याचें दिसून आलें. पण या बातमीच्या मागोमाग दुसरी बातमी आली कीं कुठेंतरी समुद्रकांठचीं बारा गांवें समुद्राच्या पाण्याखालीं गेलीं ! म्हणजे इकडे हटलेलें पाणी तिकडे जमिनीवर चढलें. संपत्ति किंवा संग्रह यांचा हाच नियम आहे. एका ठिकाणीं संपत्ति कमी झालेली दिसते याचा अर्थ कुठें तरी ती निश्चित वाढते. एक लाखोपति कोट्यधीश होतो तेव्हां शेंकडों गरिबांचे लहान लहान कुणगे रिते पडतात आणि त्यांतलें धन या कोट्यधीशांच्या तिजोरींत येऊन पडतें. श्रीमंताच्या घरीं शेंकडों वस्तू कुजत पडलेल्या असतात. आणि त्याच वस्तू न मिळाल्यामुळें हजारों गरीब मृत्युपंथाला लागलेले असतात ! इकडे श्रीमंतांचा लोभ सारखा वाढतच असतो आणि गरिबांच्या असंतोषाची आग सारखी भडकत राहते !

—आणि राष्ट्राराष्ट्रांचे संबंध किंवा हेवेदावे तरी याहून कोणत्या वेगळ्या तत्त्वावर चालतात ! सुधारलेलीं राष्ट्रें आपापला संग्रह सारखा वाढवीत असतात. मागासलेल्या राष्ट्रांतला कच्चा माल घ्यायचा, पर्वतप्राय पक्क्या मालाचे ढीग तयार करायचे, ते खपून टक्के करण्यासाठीं जगाच्या बाजारपेठा काबीज करायच्या या उपद्व्यापांत सुधारलेलीं राष्ट्रें मग्न आहेत. संपत्ति आणि वस्तू यांचा संग्रह एकापाशीं अधिक व्हायचा म्हणजे दुसऱ्याची जिंदगी लुबाडणें किंवा त्याला संपन्न न होऊं देणें हे दोन मार्ग असतात. म्हणून सुधारलेलीं प्रबळ राष्ट्रें मागासलेल्या राष्ट्रांची प्रगति एका ठराविक मर्यादेपलीकडे होऊं देत नाहींत. ही सर्व परिस्थिति लक्षांत घेतली म्हणजे निरनिराळीं आमिषें दाखवून लोकांना आपल्या सत्तेखालीं आणणें आणि इतर राष्ट्रांचा वरचष्मा

होऊं न देणें हे उद्योग साम्राज्यवादी राष्ट्रें कां करतात हें सहज कळेल. संपत्ति किंवा सत्ता यांचा संग्रह करण्याच्या वेडामुळेंच श्रीमंत व गरीब यांतलीं वर्गयुद्धें आणि दोन किंवा अधिक राष्ट्रांतलीं साम्राज्यवादी युद्धें आजवर पेटत आलीं आहेत. उपासमार, अपमृत्यु, कलह, चोऱ्यामाऱ्या, खून इ० प्रकारांना या संग्रहवृत्तीनें चांगलेंच पोषण दिलें आहे.

आपण संग्रह करतों तेव्हां दुसरे कंगाल बनतात हें तर खरेंच. पण म्हणून आपण तरी सुखी होतों का? संग्रहाची वाढ करण्याची आपली बुद्धि संग्रहानंतरहि अतृप्त राहते. सर्व जग जिंकल्यावर शिकंदर बादशहा म्हणे ढळढळा रडूं लागला. कां? तर आतां जिंकायला अधिक उरलें नाहीं! सर्व पृथ्वी उद्यां जिंकून झाल्यावर मग काय करायचें याची विवंचना सेसिल-ऱ्होडस् नांवाच्या एका कट्टर साम्राज्यवादी मुत्सद्याला नेहमीं हैराण करीत असे. शेवटीं रात्रीं आकाशाकडे पाहात असतां त्याला एकदम सुचलें कीं, 'खरेंच हे अगणित तारे, नक्षत्रें अजून जिंकायचींच आहेत कीं! खूप सामर्थ्यवान् विमानें तयार करूं आणि अंतराळांत एकदां आपण स्वारीला निघूं.' ज्या तारांगणाच्या अनंत व आश्चर्यमय विस्ताराकडे पाहून मन दिव्य भावांनीं भरून जावें त्याकडे पाहून ऱ्होडस्ला असले तामसी विचार सुचले! कोण ही राक्षसी महत्त्वाकांक्षा!! कोण ही मनाची विकृति!!

या राक्षसी महत्त्वाकांक्षेतूनच आजचीं बहुतेक दुःखें निर्माण झालीं आहेत. संग्रह विषमता वाढवितो आणि विषमतेंतून क्लेश व कलह उत्पन्न होतात. भौतिक वस्तूंचा किंवा संपत्तीचाच संग्रह नव्हे तर निरर्थक ज्ञानाचा संग्रहसुद्धां वाईट आहे. कांहीं माणसें उगीच्या उगीच फालतू ज्ञान डोक्यांत सांठवीत राहतात. कित्येकदां ज्ञानाची ही अडगळ आवरतां न आल्यामुळें बुद्धीचें निर्मळपण नाहींसें होतें. सत्याचा प्रकाश दिसेनासा होतो. म्हणून असंतोष, अहंकार व अनर्थ फैलावणाऱ्या ज्ञानाचा उगाच संग्रह करणें घातक आहे.

वास्तविक परमेश्वर रोजच्या रोज आपणांसाठीं शेंकडों वस्तू उत्पन्न करीत असतो. त्यांतून आपण अवश्य तेवढ्याच वस्तू उचलल्या तर कुणालाच कांहीं कमी पडणार नाहीं. प्रभु येशू म्हणतो, "संचय करूं नका, आकाशांतील पांखरांकडे पाहा! तीं पेरीत नाहींत. पण आपला देव त्यांना दररोज चारा

देतोच कीं नाहीं ? " या रमणीय उद्गाराला सदृश अशी " **पक्षी अजगर, न करी संचित, तयासी अनंत, प्रतिपाळी** " ही आपल्या संतवर्यांची उक्ति सहज आठवण्यासारखी आहे. पण ही सिद्धावस्था येशू–तुकारामासारख्या अलौकिक विरक्तांनाच शक्य होईल. हें लक्षांत घेऊनच गांधीजींनीं म्हटलें आहे—

" असल्या अवधूत स्थितीला क्वचितच कोणी पोंचणार. आपण पडलों सामान्य दर्ज्याचे सत्याग्रही, जिज्ञासू. आपण आदर्शावर नजर ठेवून आपला परिग्रह नेहमीं तपासीत जावें. खऱ्या सुधारणेचें, खऱ्या संस्कृतीचें लक्षण परिग्रहाची वाढ नसून त्याचें विचारपूर्वक व इरादापूर्वक आकुंचन करणें हेंच होय. आपण परिग्रहांत जसजशी कपात करीत जातों तसतसें खरें सुख व खरा संतोष हीं वाढत जातात, सेवाशक्ति वाढते. "

० ० ०

गांधी-सूक्ति

" धर्म ही एक व्यक्तीपुरती गोष्ट आहे. मनुष्य स्वतःच ती राखूं शकतो किंवा गमावूं शकतो. केवळ संख्याबलावरच टिकून राहणारा तो धर्म नसून तें मत होय. "

## " भेदाभेद भ्रम अमंगळ " : : १३

मंडलाकार परिषदेच्या वेळचाच प्रसंग आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनीं गांधीजींवर खूप ताशेरे झाडले. अंबेडकर जरा उग्रप्रकृति असल्यामुळें त्यांचे टीकेचे शब्द प्रखर होते. सौजन्याचा तोल सुटला आहे असें वाटण्या-सारखा दंश व उपरोध त्यांच्या भाषणांत होता. गांधीजींनीं त्यावर भाष्य करतांना शांत रीतीनें सांगितलें कीं, " आंबेडकरांनीं फार मोठा संयम दाखविला. आम्हीं उच्चवर्णीय समजल्या जाणाऱ्या हिंदूंनीं हरिजनांना शेंकडों वर्षें इतक्या भयंकर रीतीनें वागविलें आहे कीं, आंबेडकरांनीं मला गोळी घातली तरी तें क्षम्यच ठरेल. "

या उद्गारांत गांधीजींचें माहात्म्य जेवढें प्रकट झालें आहे तेवढीच अस्पृश्यतेची हृदयविदारक कहाणी देखील स्पष्ट झाली आहे ! आपण हजारों वर्षें अस्पृश्यांना दूर ठेवीत आहोंत ! त्यांनीं गांवाबाहेर राहावें; सभ्य व सुंदर वस्तींत येऊं नये, आपल्या चार वर्णांच्या जीवनाचा निर्माल्य उरेल त्यावर गुजराण करावी, आणि त्याच्या मोबदला आपल्या जीवनांतली घाण उपसावी हा संकुचित विचार आपल्या मनांत अगदीं दृढमूल होऊन बसला आहे. तो इतका कीं आपणांला तो धर्म व नीति याप्रमाणें अगदीं रास्त वाटतो ! हरिजनाचें दुरून दर्शन झालें तरी आपण तें अशुभ समजतों आणि त्याची सावली अंगावर पडल्यास आपला देह अपवित्र झाल्यासारखें आपणांला वाटतें ! सर्व चराचर सृष्टि ही ज्याची निर्मिती त्या परमेश्वराच्या मंदिरांतहि आपण हरिजनांना येऊं देत नाहीं ! आणि यासाठीं देवानें दिलेलें सारें बुद्धिकौशल्य खर्च करून आपण प्राचीन धर्मग्रंथांतले आधार देत बसतों !

हा अधर्म थांबलाच पाहिजे. प्राचीन काळीं हिंदुस्थानांत जेव्हां आर्योंनीं प्रवेश केला तेव्हां त्यांना आपली संस्कृति निर्मळ राहावी यासाठीं कांहीं दक्षता घ्यावीशी वाटली आणि वर्णव्यवस्थेबाहेर त्यांनीं एक वर्ग निर्माण

करून ठेवला. कित्येकदां असें झालें कीं हलकीं व अस्वच्छ कामें करणाऱ्या माणसांना दूर ठेवणें आरोग्याच्या दृष्टीनें अवश्य आहे असा समज होऊन बसला. कांहीं प्रसंगीं समाजानें नेमून दिलेलीं कर्तव्यें व आचार यांचा भंग करणारे जे बंडखोर निघाले त्यांना समाजशासकांनीं दूर ढकललें. या व अशा कारणांनीं अस्पृष्टांचा वर्ग वाढतच गेला. आणि आज ज्याला साधे धार्मिक व सामाजिक हक्क नाहींत असा हिंदुधर्माचा एक विचित्र भाग होऊन तो राहिला आहे ! !

अस्पृश्यता हा हिंदुधर्मावरील कलंक आहे. तो दूर झाल्याशिवाय हिंदुधर्माला संपूर्ण तेजस्विता येणार नाहीं. आर्यांनीं फार प्राचीन काळीं जी दक्षता घेतली तिचें प्रयोजन आतां काय आहे ? आज या देशांत आपण अनेक मानववंशाचे लोक किती तरी दिवस राहात आहोंत. आपले हितसंबंध आतां एकमेकांशीं निगडित झाले आहेत; खरें पाहिलें तर अस्पृश्यता-निवारणाचें काम युगयुगीं होतच आलें आहे.

" केवळ जन्मानें कोणी ब्राह्मण होत नाहीं. कर्मानें मनुष्य ब्राह्मण किंवा चांडाळ ठरतो. "

हा उदात्त आदेश देऊन बुद्धदेवांनीं आपल्या भिक्षुसंघांत सोपाक नांवाचा एक चांडाळ घेतला व अस्पृश्यतानिवारणाची मोहीम दोन हजार वर्षांपूर्वींच या पवित्र देशांत सुरू केली होती. नव्हे, त्याच्याहि पूर्वीं शबरीचीं उष्टीं बोरें स्वीकारून श्रीरामचंद्रांनीं आर्य व आदिवासी यांच्या मैत्रीचा पाया घातला. हें व्रत पुढें अनेक संतांनीं चालविलें. एकनाथ महाराजांचें उज्ज्वल उदाहरण कोणास माहीत नाहीं ? आज अस्पृश्यतानिवारणाचें व्रत पत्करणारांना या दिव्य मालेची परंपरा पुढें चालवावयाची आहे.

आज जेथें जेथें यंत्रसुधारणा गेली आहे तेथें तेथें शिवाशिवीची भावना पुष्कळच कमी झाली आहे. तथापि केवळ नाइलाजानें किंवा काळाच्या प्रवाहांत सांपडून ही सुधारणा पत्करण्यानें आपली खरी उन्नति होणार नाहीं. अजून अस्वच्छ कामें करणाऱ्या माणसांना माणुसकीनें वागविण्याची आपली तयारी नाहीं. पण हें भावनेला आणि तर्कबुद्धीला पटतें का ? आपल्या दैनंदिन अस्वच्छतेची जे वासलात लावतात आणि आपलीं घरें निर्मळ ठेवून

आरोग्यकारक वातावरण ठेवण्यास साह्यकारी होतात त्यांच्याविषयीं आपण कृतज्ञ राहायचें कीं तिरस्कार दाखवायचा? मळ का त्यांच्या अंगावर कायम चिकटून राहतो? आपली आई लहानपणीं आपलें मलमूत्र काढते. तिला आपण किती पूज्य मानतों बरें! मग सर्व समाजाची स्वच्छता ठेवण्यास जे झटतात, त्यांच्याविषयीं आदर बाळगण्याचें सोडून त्यांनाच अपवित्र आपण समजावें का? आपलें अवश्य पण अस्वच्छ काम हे लोक करीत आहेत तोंवर त्यांना अस्पृश्य मानणें कदाचित् युक्त होईल. पण त्यांनीं आपलें काम आटोपल्यावर स्नान केलें, ते स्वच्छ झाले, त्यांनीं उत्तम पोषाख चढविला, तर मग त्यांचें अस्पृश्यत्व कुठें व कसें उरतें?

आपल्या राष्ट्राच्या प्रपंचांत हरिजनांचें स्थान फार महत्त्वाचें आहे. पूर्वी गांवगाडयांत त्यांना इतर वर्णांप्रमाणें कर्तव्यें नेमून दिलेलीं असत आणि गांवगंगेनें त्यांचा चरितार्थ चालवावा अशी कायमची योजना असे. खरेदीविक्रीचे व्यवहार होतांना गांवच्या महाराच्या साक्षीची मातब्बरी मोठी असे. शिवाजी महाराजांनीं महारांचीं पलटणें बनविलीं होतीं. सोशिकपणा, साधी राहणी, श्रम करण्याची चिकाटी, स्वामिभक्ति इ० गुणांत हरिजनांतल्या अनेक पोटजाती फार नामवंत आहेत. चोखोबासारख्यांनीं संतमालिकेंत फार वरचें स्थान मिळविलें आहे. असें सांगतात कीं पंढरपुराहून कांहीं मैलांवर एका भिंतीचें काम चाललें असतां ती भिंत कोसळून त्यांत चोखोबा व त्यांची कांहीं मित्रमंडळी मृत्युमुखीं पडली. ही वार्ता पंढरपुरास पोंचून संतवर्य नामदेव यांना फार दुःख झालें! ते अपघाताच्या जागीं गेले आणि चोखोबांच्या अस्थी तरी निदान पंढरपुरास न्याव्या म्हणून त्या धुंडूं लागले. पण भिंतीच्या ढिगाऱ्यांत कितीएकांचे तरी सांगाडे छिन्नविच्छिन्न पडले होते. त्यांतून चोखोबाच्या अस्थीच नेमक्या कशा सांपडणार? अखेर नामदेवाच्या हृदयांत एकदम प्रकाश पडला. त्या अस्थिपुंजांतून एक एक हाड उचलून नामदेव कानाशीं लावून पाहूं लागले. जीं चोखोबाचीं हाडें होतीं त्यांमधून 'विठ्ठल विठ्ठल' असे शब्द घुमत होते! अशी सूक्ष्म तपासणी करून नामदेवांनीं चोखोबांचीं हाडें जमविलीं आणि तीं समारंभपूर्वक पंढरपुरास देवालयाच्या महाद्वारीं पुरलीं! ही अद्भुत कथा तेथें भाविक आज अनेक शतकें सांगत आले आहेत. या कथेवरील चमत्काराचें आवरण आपण दूर

केलें तर भक्तिभाव हा हरिजनांच्या हाडींमांसीं कसा खिळला आहे हें सत्य आपणांला सहज दिसून येईल.

हिंदुस्थानांतील सात कोटी हरिजन समाज हा निर्धन आहे. घाम गाळूनच त्याला आपली रोजची भाकरी मिळवावी लागते! शिक्षण व संस्कृति या कामीं त्याचें दैन्य व मागासलेपण केवळ हृदयद्रावक आहे! म्हणूनच अस्पृश्यता–निवारणाचें कार्य फार मोठ्या प्रमाणावर व्हायला पाहिजे. एवढा मोठा श्रमजीवी व भक्तिमान् समाज संघटित व सुबुद्ध झाला तर आपल्या देशांत केवढी प्रचंड शक्ति निर्माण होईल! या शक्तीचा उपयोग स्वातंत्र्यसंपादन किंवा स्वातंत्र्यरक्षण दोन्हीकडे आपणांस करतां येईल.

. अस्पृश्यतानिवारणाचें व्रत हें आपल्या नियमावलींत घेण्याचा मुख्य उद्देश हा कीं हिंदुधर्माचें अस्पृश्यता हें एक अंग नाहीं याची जाणीव सर्वत्रांस झाली पाहिजे. अस्पृश्यता हें एक पाप आहे आणि पापाचें क्षालन करण्यासाठीं हिंदुमात्रानें प्रायश्चित्त घेतलें पाहिजे. अस्पृश्य लेखल्या गेलेल्या लोकांत मिसळणें, त्यांचा स्पर्श झाल्यास स्वतःस धन्य समजणें, त्यांची सेवा करणें, त्यांना साक्षर व सुसंस्कृत करणें हें अस्पृश्यतानिवारणाचें मुख्य स्वरूप सांगतां येईल. या बाबतींत ज्या कांहीं हाल–अपेष्टा सोसाव्या लागतील त्या आनंदानें सोसण्यांत मोठें पुण्य आहे.

सत्याचा उपासक अस्पृश्यता निवारणाचे राजकीय किंवा आर्थिक फायदे गौण समजतो. या व्रताकडे पाहण्याची त्याची दृष्टि अगदीं वेगळी असते. या व्रतानें फार मोठ्या क्षेत्राला स्पर्श केला आहे.

" अस्पृश्यता–निवारण करणारानें महार–चांभारांना आपलेंसें करणें एवढ्यावर संतोष मानून बसतां कामा नये. जोंपर्यंत त्याला जीवमात्रामध्यें स्वतःची ओळख पटली नाहीं, आणि स्वतःला त्यानें जीवमात्रामध्यें संपूर्ण अर्पून टाकलें नाहीं तोंपर्यंत तो स्वस्थ बसणार नाहीं. अस्पृश्यतानिवारण म्हणजे उभ्या जगाशीं मैत्री जोडणें, त्यांचा सेवक बनणें. अशा तऱ्हेनें पाहिलें असतां अस्पृश्यता–निवारण हें अहिंसेचे जोडीदार बनून जातें, व खरोखरी तें तसें आहेच. अहिंसा म्हणजे जीवमात्राबद्दल पूर्ण प्रेम. अस्पृश्यता–निवारणाचा तरी तोच अर्थ आहे. जीवमात्राबरोबरचा भेद पुसून टाकणें म्हणजे

अस्पृश्यता-निवारण, ” सत्य-अहिंसेच्या भक्तानें व्रताकडे कोणत्या विशाल दृष्टिकोणानें पाहिलें पाहिजे हें गांधीजींनीं या उताऱ्यांत सांगितलें आहे.

गांधीजींच्या उपदेशांत व्यक्ति आणि समाज यांच्या उन्नतीची योजना एकत्रच आंखलेली असते. अस्पृश्यतानिवारण हें एक सामाजिक सत्कार्य आहे यांत शंका नाहीं. पण गांधीजींनीं त्याला व्यक्तिजीवनाचा विकास करणाऱ्या व्रताची एक नवी प्रतिष्ठा दिली आहे. आपण आपल्या संकुचित जीवनांत गुरफटलेले असतों. व्यक्तिजीवनाच्या बालेकिल्ल्याभोंवतीं भेदाचे खोल खंदक खणून ‘ आपलें ’ म्हणून जें तें जपत असतों. आपली जात, आपलें कुटुंब, आपला देह यापलीकडे आपली दृष्टि जात नाहीं. आपल्या सुंदर वस्त्रावर शिंतोडा उडेल कीं काय, आपल्या घराच्या भिंतीला कुठें छिद्र पडेल कीं काय या भीतीच्या आहारीं आपण नेहमीं जात असतों. ही भीति दूर केली पाहिजे. व्यक्तिजीवनाचे खंदक ओलांडून सर्व प्राणिमात्राच्या सुखदुःखांशीं आपण समरस झालें पाहिजे. सर्व जनता हाच ईश्वर आहे. त्यांत आपल्या स्वतंत्र व्यक्तित्वाचें विसर्जन करणें म्हणजेच “ मीतूंपणाची बोळवण ” करणें होय. अस्पृश्यता-निवारण या व्रताचा अर्थ याहून दुसरा कोणताच नाहीं.

० ० ०

### गांधी-सूक्ति

“ ज्यांना सत्याबद्दल प्रेम आहे आणि ज्यांनीं द्वेष व कटुता काढून टाकली आहे त्यांना जगभर नातलग आहेत. ”

## स्वदेशी : : १४

माझ्या घरांत दोन आजारी माणसें आहेत. माझ्या घरापासून पांचसहा मैलांवर असलेल्या उपनगरांतील एका घरांत चारसहा बिछाने पडले आहेत. त्या घराचें अगदीं इस्पितळ झालें आहे ! माझ्या घरांतल्या रुग्णांची शुश्रूषा करण्याचें टाकून त्या दूरच्या माणसांची सेवा करण्याचें मीं ठरविलें तर काय होईल पाहा ! दूरस्थपणामुळें त्या माणसांची सेवा मला नीट करतां तर नाहींच येणार पण त्यांच्या सेवेंत गुंतल्यामुळें जवळचीं रुग्ण माणसें आबाळलीं जातील आणि त्या दूरच्या माणसांची जबाबदारी ज्यांच्यावर आहे त्यांना मी आळशी बनविलें असें होईल. म्हणजे माझ्या खऱ्या कर्तव्यांत चुकारपणा होणार आणि दुसऱ्या लोकांना कर्तव्यापासून विमुख व्हायला मी संधि देणार. आतां याऐवजीं मीं स्वतःचें कर्तव्य नीट बजावलें, माझ्या घरच्या माणसांची शुश्रूषा केली तर तीं माणसें नीट बरीं होतील आणि दूर जे रुग्ण आहेत त्यांच्या आप्तांस मीं धडा घालून दिल्याचें श्रेयहि मला मिळेल. या दृष्टान्तात स्वदेशीचें सर्व मर्म आलें आहे असें समजण्यास हरकत नाहीं.

स्वदेशी व्रताचें स्वरूप प्रथम वंगभंगाचे वेळीं विशेष स्पष्ट झालें. आपल्या देशाची चीरफाड करण्याचा नीच डाव नोकरशाहीनें टाकल्यामुळें हिंदी लोक खवळून उठले आणि संघटित रीतीनें प्रतिकार करण्याची योजना सुरू झाली. बंगालची आपत्ति तीच सर्व हिंदुस्थानची आपत्ति अशी राष्ट्रीय वृत्ति निर्माण झाली आणि ‘ स्वदेशी व बहिष्कार ’ या सूत्राचें आचरण होऊं लागलें ! परदेशी कपड्यांच्या होळ्या होऊं लागल्या. देशी उद्योगधंद्यांविषयींचें ममत्व वाढूं लागलें. आणि स्वदेशीच्या प्रतिज्ञा घेणाऱ्या व्रतधाऱ्यांची संख्या वाढूं लागली.

महाराष्ट्रापुरतें बोलायचें झालें तर स्वदेशीचें सामर्थ्य १९ व्या शतकाच्या अखेरीस महाराष्ट्राला प्रतीत झालें होतें. ‘ आमच्या देशांत उद्योगधंद्यांची

वाढ मुळींच झाली नाहीं तेव्हां तुम्हां पुढारलेल्या देशांतल्या अर्थशास्त्राचे नियम व औदार्य आम्हांला लावूं नका. आमचें हिंदी अर्थशास्त्र वेगळें पाहिजे.' असें नव भारताचे एक द्रष्टे न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे यांनीं प्रथम घोषित केलें आणि हिंदी अर्थशास्त्राचा पाया घातला. 'सार्वजनिक काका' या नांवानें प्रसिद्ध असलेल्या व्यक्तीनें स्वदेशीचें तत्त्व आचरावें कसें हें शिकविणें आपलें जीवनकार्य केलें. पुढें नामदार गोखले यांनीं आपल्या बुद्धिबलानें हिंदुस्थानच्या आर्थिक परिस्थितीचें मोठ्या कळकळीनें सप्रमाण निदान करून स्वदेशी धर्माची महती प्रस्थापित केली. वंगभंगाच्या वेळेला जी 'स्वदेशी व बहिष्कार' याची चळवळ सुरू झाली तिच्या अगोदर एवढी पार्श्वभूमि महाराष्ट्रानें तयार करून ठेविली होती.

लोकमान्य टिळक हे तर स्वदेशीचे फार श्रेष्ठ पुरस्कर्ते होते. स्वदेशीचा प्रचार सुरू झाला तेव्हां हा ब्रिटिशांच्या द्वेषाचा कार्यक्रम आहे अशी कागाळी करण्यास मतलबी लोकांनीं सुरुवात केली. त्यावेळीं लोकमान्यांच्या 'केसरी'नें स्वदेशी व्रतांतील द्वेषाची चर्चा फार सुंदर केली आहे.

"स्वदेशीवरील प्रेमामुळें स्वदेशी माल झीज सोसूनहि आम्ही खरेदी करतों. या प्रसंगीं तशाच प्रकारच्या परदेशी स्वस्त मालाला आम्ही दूर सारतों ही गोष्ट खरी; पण हें दूर सारणें, हें व्रर्जन किंवा हा बहिष्कार द्वेषमूलक नव्हे. तर आमच्या प्रेमाच्या-आड ती वस्तु येते म्हणून तिला दूर करावी लागते. हा प्रत्यक्ष द्वेष नव्हे, हा प्रेमोद्भव द्वेष आहे. प्रेमाचा अनुभव येण्यास किंवा प्रेमाला भरती येण्यास असल्या द्वेषाची जरूरी असते...हा असला द्वेष जगांतील सर्व शिष्टांना संमत असून सर्व कायद्यांनीं याकडे आदरानेंच पाहिलें आहे. इतकेंच नव्हे, तर जगांतील सर्व तत्त्ववेत्त्यांनीं व कवींनीं प्रेमाइतकेंच या प्रेमोद्भव द्वेषाचें किंवा क्रोधाचें कौतुक केलें आहे. यालाच सात्त्विक क्रोध—Righteuous Indignation म्हणतात. स्वदेशी व बहिष्कार या चळवळींनीं ही स्वदेशप्रीतीची दुसरी बाजू आमच्यामध्यें जोरावली तर हिंदुस्थानचें राष्ट्र बनण्याच्या कामीं या वृत्तीचा उपयोग झाल्याखेरीज राहणार नाहीं."

आपण राष्ट्रगीतांत आपल्या मातृभूमीचें वर्णन 'सुजला सुफला' असें करतों. पण आज आपल्या देशांत लक्षावधि माणसें उपाशी राहतात!

कोट्यवधि लोकांना अर्धपोटीं राहावें लागतें ! अन्नवस्त्र, औषधपाणी, घरदार याविषयींचा कंगालपणा तर विचारूंच नका ! आपला देश संपन्न व सुपीक असतां आपलें हें भेसुर दैन्य कां दिसावें ? याचें एकच कारण पारतंत्र्य हें सांगतां येतें. साम्राज्यशाहीनें आपली सत्ता येथें पक्की राहावी याकरितां स्वार्थाच्या पोटीं प्रमुख हिंदी धंद्यांची गळचेपी केली त्यामुळें आम्ही या वैभवशाली देशांत जन्मास येऊनहि कंगाल राहिलों. ही स्थिति दूर करण्याचा एकच उपाय होता आणि आहे. आणि तो म्हणजे स्वदेशी. स्वदेशी हा या युगांतला महान् धर्म आहे. या धर्माचें पालन आपण जितक्या उत्कटपणें करूं तितकी आपणांवरील पारतंत्र्याची मगरमिठी ढिली होईल. स्वदेशी, स्वधर्म यांत भेद नाहीं. आणि म्हणूनच स्वदेशी धर्माच्या पालनांत मृत्यु आला तर तो श्रेयस्कर म्हटला पाहिजे.

माझ्या देशांत जे पदार्थ निर्माण होतात आणि माझे देशबांधव आपला घाम गाळून जो माल तयार करतात तो वापरणें हा माझा धर्म आहे. हा माझा धर्म पाळल्यानें परदेशी कारखानदारांचें नुकसान होईल ही गोष्ट निर्विवाद आहे. पण त्यामुळें स्वदेशीला दोष येत नाहीं. अन्यायानें किंवा चोरीनें सांठविलेला माल कुणाला द्यावा लागला तर त्यांत त्यांचें भौतिक व व्यावहारिक नुकसान आहे हें तर खरेंच. पण म्हणून त्याची चोरी त्याचेजवळ राहूं द्यावी हें कांहीं योग्य नाहीं. दारूबंदी केल्यानें मक्तेदारांचा तोटा होत असला तरी तो तोटा सोसण्यानेंच त्यांना पुण्य लाभणार आहे. शिवाय नुकसान थोड्यांचें आणि फायदा मात्र शेंकडों लोकांचा असा हा धर्म आहे. मी जेव्हां स्वदेशीचें पालन करतों, तेव्हां मला दुसऱ्याचा द्वेष करायचा नसतो. स्वदेशीची चळवळ गांधीजींनीं जशी सर्वव्यापी केली, तसेंच तिला एका उच्च पातळीवर नेलें. गांधीजी म्हणतात—

" जी वस्तु स्वदेशी बनत नाहीं, किंवा महाकष्टानेंच बनवितां येते, ती कोणी परदेशाच्या द्वेषाखातर स्वतःच्या देशांत बनविण्याच्या मार्गाला लागला तर तो स्वदेशी धर्म नव्हे. स्वदेशी धर्माचें आचरण करणारा परदेशीचा द्वेष कधीं करणारच नाहीं. म्हणजेच पूर्ण स्वदेशीमध्यें कोणाचा द्वेष नसतो. हा संकुचित धर्म नव्हे; हा प्रेमांतून, अहिंसेतून उत्पन्न झालेला सुंदर धर्म आहे. "

ग्रा० ०१
२००८
३-४-६१

आपण अफाट सागरांतून चाललों असतां होकायंत्राचे कांटे हे नेहमीं दक्षिणोत्तर असतात. तसें गांधीजींच्या सर्व तत्त्वज्ञानाचे किंवा अनेक विशाल चळवळींचे भव्यपट आपण पाहात असलों तरी सर्वत्र सत्य व अहिंसा या दोन दिशांकडे त्यांचा कायमचा इषारा असतो. अन्नशास्त्राचा विचारसुद्धां सत्याग्रह-मार्गाला साह्य या दृष्टीनेंच गांधीजींनीं कसा केला हें आपण पाहिलें. अर्थशास्त्र हेंहि नीतिधर्माशीं एकजीव झालें पाहिजे असा गांधीजींचा आग्रह आहे. केवळ राजकीय किंवा आर्थिक फायदे मिळविण्याच्या दृष्टीनें अर्थशास्त्राची रचना करणें गांधीजींना मंजूर नाहीं. आत्मा जेथें वास करतो तेथल्याच धर्मांत त्यानें मोक्ष मिळविण्यासाठीं झटावें त्याप्रमाणें ज्या देशांत आपण राहतों त्या देशांतल्या स्वदेशी धर्मावर आपण आपला निर्वाह करावा. स्वधर्म अपुरा अथवा अडचणीचा पडत असेल तर तो विशाल करण्याची अथवा त्यांतल्या वाईट गोष्टी साफ करून टाकण्याची कामगिरी आत्म्यानें पत्करिली पाहिजे. तसेंच स्वदेशीचें व्रत आपल्या जीवनांत संकुचितता आणीत असेल तर ती काढून टाकण्यास आपण झटलें पाहिजे. पण कांहीं झालें तरी आत्म्याचा मोक्ष हा जसा स्वधर्मांत तशीच माणसाची उन्नति स्वदेशींतच व्हावयाची.

ह्या सुंदर व्रताच्या अर्थामध्यें व आचरणांत आपण खोल खोल शिरत गेलों कीं त्याचें सौंदर्यपूर्ण माहात्म्य आपणांस अधिकाधिकच पटत जातें. स्वदेशीची प्रतिज्ञा आपण घेतली कीं परदेशी वस्तूंच्या भरगच्च व उंची दालनांकडे दृष्टि वळायलाच नको. म्हणजे असंग्रहाच्या व्रताचें पालन करायला केवढी ही मदत होते पाहा ! अनायासें मोहलोभाचे किती तरी डोंगर दृष्टिआड गेले ! आपल्या देशांत होईल तीच वस्तु असेल तशी पत्करायची असें एकदां ठरलें कीं आपल्या आवडीनिवडींची मिजास सहज उतरेल. वस्तूच्या मुलायमपणापेक्षां तिच्या स्वदेशीपणाकडे आपण पाहणार याचा अर्थ वस्तूच्या बाह्य रूपापेक्षां तींत गुंतलेल्या भावनेला आपण अधिक महत्त्व देणार. "साधी राहणी आणि उच्च विचारसरणी" या धर्माचे पालनाला याहून अनुकूल स्थिति कोणती असणार ?

स्वदेशी व्रताचे ऐहिक फायदे सहज कळण्यासारखे आहेत. आपल्या देशांतलीच प्रत्येक वस्तु वापरायची असें ठरल्यावर ज्या आवश्यक पण परदेशी वस्तु आहेत त्यांच्यासारख्या वस्तु कशा निर्माण कराव्या याकडे आपली

बुद्धि लक्ष देईल, नवे शोध लागतील, स्वदेशीच्या पालनामुळें आपल्या देशांतले कंगाल, अर्धपोटी, उपासपोटी लोक अर्धकोर भाकरतरी खाऊं लागतील. आपण स्वावलंबी होऊं. आपला आत्मविश्वास वाढेल. आणि आपलें सर्वतोपरी रक्तशोषण ज्यांनीं चालविलेलें आहे त्या सत्तेचें तामसी बल आपोआप क्षय पावत अखेर नष्ट होईल.

गांधीजींचें स्वदेशी व्रत अहिंसेपासून आपणांला विभक्त करतां येणार नाहीं हें लक्षांत घेतलें पाहिजे. आणि म्हणूनच गिरण्या, कारखाने स्वदेशी मालकीचे झाले म्हणजे देश स्वदेशी व्रताचा निःसीम उपासक बनला असें गांधीजी कधींहि म्हणणार नाहींत. ज्या यंत्रांमुळें बेकारी वाढते, संग्रहाचा प्रळय होतो, आणि माणसाची भोगलालसा अनिवार होत राहते तीं यंत्रें हिंसात्मकच होत. तीं स्वदेशी असलीं तरी सत्याग्रही माणसाला त्यांचा कांहीं उपयोग नाहीं. याकरितां चरखा हें खरेंखुरें स्वदेशी यंत्र गांधीजींनीं देशाला आदेशिलें आहे.

इतर देवतांना अंशावतार म्हणतात. श्रीकृष्ण हा मात्र पूर्णावतार. कारण त्यांत परमेश्वर आपल्या सर्व अंशांनीं प्रगट झाला आहे. चरखा हें असेंच संपूर्ण स्वदेशीचें प्रतीक आहे. चरख्यानें खेडेगांवांतल्या कोट्यवधि शेतकऱ्यांना काम व वस्त्र मिळतें. प्रत्येकाला श्रमसौंदर्याचें दर्शन होतें. चरखा मालाचे ढीग उत्पन्न करून कोणाला भिकेला लावणार नाहीं. तो भुकेलेल्यांना अन्न देईल. कोणाच्या तोंडचा घास काढणार नाहीं. संचयासाठीं किंवा आक्रमणासाठीं त्याचा जन्म नाहीं. म्हणून तो स्वभावतःच नम्र आहे. चरख्याचे उपासक कुठल्याहि जातीचे असूं शकतात. हे सर्व गुण लक्षांत घेऊनच गांधीजींनीं म्हटलें आहे कीं,

"चरखा हें जीवनाचें संपूर्ण तत्त्वज्ञान आहे. तो अहिंसेचें जिवंत प्रतीक आहे. कोणत्याहि प्रकारच्या शोषणापासून सर्वस्वीं मुक्त अशा अहिंसक समाजाची रचना करणें हा त्याचा उद्देश आहे."

० ० ०

## सर्व–धर्म–समभाव



नरहरि नांवाचा एक सोनार होता. मोठा कट्टा शंकराचा भक्त. इतर देवांच्या मंदिरांचे कळस किंवा शिखरें हीं देखील पाह्यचीं नाहींत असा त्याचा बाणा असे. एकदां विठ्ठलाच्या मूर्तीचा करदोडा तुटला. तो नवा करावा असें भक्तमंडळींनीं ठरविलें. या कामांतली नरहरि सोनाराची कुशलता फार प्रसिद्ध होती. दागिने घडविणें आणि गुंफणें या कलांत तो इतकें सौंदर्य ओती कीं नरहरीचा दागिना कुणीहि हजार नगांतून ओळखून काढावा इतकें देखणेंपण त्यांत असे. विठ्ठलाच्या भक्तांनीं निश्चय केला कीं विठ्ठलाला करदोडा करायचा तो नरहरि सोनाराच्या हातूनच घडवायचा. पण हें जुळून येणें अशक्यच. कारण शंकराशिवाय देवांच्या मंदिराचे कळसहि जो पाह्यला तयार नाहीं तो विठ्ठल–मंदिरांत येणार कसा आणि देवाच्या कमरेचें माप घेणार कोठून! पण भक्तांचा निश्चय दृढ होता. त्यांनीं नरहरि सोनाराला गळ घातली. पहिल्यानें तर त्यानें धुतकारूनच लाविलें. पण भक्तांनीं आर्जवानें त्याच्या पुष्कळ विनवण्या केल्या. तो देवाचें माप घेऊन करदोडा बनविण्यास तयार झाला.

मात्र त्यानें अट अशी घातली कीं, "मी डोळे मिटून आंत येईन व माप घेईन. विठ्ठलाच्या मूर्तीचें दर्शन घेणार नाहीं." भक्तांनीं ती अट मान्य केली. नरहरि विठ्ठलाच्या देवळांत आला. डोळे मिटून आंत शिरला. चांचपडत तो गाभाऱ्यांत गेला आणि देवाची मूर्ति माप घेण्यासाठीं चाचपूं लागला. त्याला शंकराची प्रतिमा आपण चाचपीत आहोंत असा भास झाला. डोक्याला जटाभार आणि त्यांत गंगेचें मुख, हातांत त्रिशूळ, सर्पाचें वेटोळें अशा स्पष्ट खुणा त्याच्या हाताला लागल्या! चकित होऊन त्यानें डोळे उघडले तों विठ्ठलाची मूर्ति समोर. नरहरि चिडला आणि पूर्ववत् डोळे मिटून तो माप घेऊं लागला. पुनः त्याला शंकराच्या मूर्तीलाच आपण

स्पर्श करीत आहों असा भास झाला. पुनः त्यानें डोळे उघडले तों विठ्ठल–मूर्ति कायम. असा चमत्कार अनेकदां घडला. तेव्हां नरहरि सोनाराच्या हृदयांत प्रकाश पडला ! मूर्ति वेगवेगळ्या असल्या तरी देव एकच आहे हा साक्षात्कार नरहरीला झाला.

या कथेंतील तत्त्व ज्याला पटेल त्याला सर्व धर्मोविषयीं समभाव ठेवण्याचें व्रत आचरणें मुळींच जड जाणार नाहीं. आपल्या देशांत तर या व्रताची फार जरूरी आहे. या देशाला फार प्राचीन इतिहास आहे. अगदीं पहिल्यानें येथें राहणारे अनार्य लोक जे होते त्यांचीं दैवतें कांहीं वेगळींच होतीं. नंतर जे आर्य आले त्यांनीं प्रथम सृष्टितत्त्वाचें पूजन सुरू केलें आणि पुढें मूर्ती घडविण्यास सुरुवात केली. जैन आणि बौद्ध यांनीं भक्तीपेक्षां नीतीवर अधिक भर दिला. तथापि या धर्मपंथांतील आचार्यांच्या मूर्ती देवत्वाच्या प्रतिष्ठेला चढल्या. मुसलमानांचा चंद्रतारकांकित ध्वज येथें आला. हे लोक निर्गुणोपासक होते. पारशी आले ते अग्निदेवाची ज्वलन्त प्रतिमा घेऊन आले आणि प्राचीन वैदिक धर्माशीं आपलें नातें दाखवूं लागले. अगदीं अलीकडे ख्रिस्ती आले ते क्रॉस खांद्यावर टाकून उतरले. खुद्द हिंदुस्थानांत हिंदु धर्मांत अनेक दर्शनें व अनेक पंथ जन्माला येतच होते. अनेक स्वर अकुशलपणें वाजविले तर गोंधळ निर्माण होतो. पण त्याच स्वरांचें कौशल्यानें व शास्त्रशुद्ध पद्धतीनें संमीलन केलें तर त्यांतून हृदयाला उदात्त करणारें संगीत उदय पावतें. हिंदुस्थान हें धर्मक्षेत्र आहे. ही अनेक उच्च संस्कृतींची कर्मभूमि आहे. भारतीय संस्कृतीनें आपलें ऐश्वर्य उणें न होऊं देतां नव्या नव्या धर्मांचें व संस्कृतींचें येथें स्वागत केलें आहे. त्यांना आसरा दिला, इतकेंच नव्हे, तर आपल्या गुणधर्माशीं जुळेल असें त्यांच्यांतलें सौंदर्यहि भारतीय संस्कृतीनें आत्मसात् केलें. हा चमत्कार 'सर्व–धर्म–समभाव' या व्रताच्या जोरावरच करून दाखवितां आला. भारतीय संस्कृतीचें हें अद्वितीय वैशिष्ट्य आपण आचरणें हें आपल्या साधनेंतील अवश्य व्रत आहे.

'वैष्णव जन तो तेणे कहिये' हें गीत आतां सर्वत्र प्रसिद्ध आहे. अत्यंत सात्त्विक व धर्मशील मनुष्याचा आदर्श यांत वर्णिला आहे. मनुष्यांतली श्रेष्ठता मोजण्याचा पुरा गज या गीतामुळें आपल्या हातीं येतो. एकदां

गांधीजींच्या एका भाविक खिस्ती मित्रानें म्हटलें, "बापूजी, आज प्रार्थनेच्या वेळीं 'वैष्णव' या ठिकाणीं 'खिश्चन' हा शब्द घालून हें गीत गावें." गांधीजींनीं या गोष्टीला तात्काळ संमति दिली. 'खिश्चन जन तो तेणे कहिये' असा आरंभ होऊन तें गीत गायिलें गेलें. खिश्चन हा शब्द केवळ मात्रांच्या दृष्टीनें मूळ ठिकाणीं चपखल बसला असें नाहीं तर भगवान् येशूची जीवन-मूल्येंच जणूं या पदांत विशद केलीं जात आहेत असा रम्य भास भाविकांना झाला. खरा वैष्णवधर्म हा खऱ्या खिस्ती धर्माच्या मूळ नीतितत्त्वांशीं सर्वांशीं जुळता आहे हा प्रत्यय आला.

निरनिराळ्या धर्मांतील व पंथांतील भांडणें आपण बारकाईनें तपासलीं तर धर्मश्रद्धेपेक्षां धर्मवेडेपणावरच तीं आधारलेलीं असतात हें स्पष्ट दिसून येईल. याखेरीज महत्त्वाकांक्षा, आर्थिक व राजकीय प्रभुत्वाची इच्छा इ० अनेक गोष्टी धर्माभिमानाचा मुखवटा लावून या भांडणांना प्रेरणा देत असतात. जेरूसलेमसाठीं येथें मध्ययुगांत जीं धर्मयुद्धें खिस्ती व मुसलमानी राष्ट्रांत चाललीं होतीं त्यांत धर्मश्रद्धेची स्फूर्ति फार थोडी होती. युरोपमधून आशियांत जाणारा व्यापारी खुष्कीचा मार्ग कोणाच्या ताब्यांत असावा यासाठीं ही झुंज होती. कारण पुढें खिस्ती राष्ट्रांना हिंदुस्थानला जाण्याचा जलमार्ग सांपडतांच हीं युद्धें थंडावलीं. पवित्र जेरूसलेम कोणाच्याहि ताब्यांत आतां जावो असा समंजस विचार खिस्ती राष्ट्रांनीं एकदम केला! सोमनाथाच्या मूर्तीवर गदा घालणारा व आपणांस 'बुत्शिकन' (मूर्तिभंजक) म्हणवून घेणारा गजनीचा महमूद पुढें हिंदु सैन्यें बरोबर घेऊन बगदादच्या मुस्लिम खलिफाशीं लढला. सिंधमध्येंहि मुसलमान सरंजामदारांची त्यानें राळ उडविली होती. याचा अर्थच असा कीं त्याची विजिगीषा राजकीय स्वरूपाची होती. फक्त त्यावर त्यानें धर्माचें आवरण घातलें होतें. धर्मासाठीं होणाऱ्या बहुतेक कटकटींचें खरें स्वरूप हेंच असतें. भौतिक आकांक्षा किंवा धर्मवेड यांतून कलह उद्भवतात. खरी धर्मश्रद्धा संपूर्णपणें अहिंसामय असते. अनेक धर्मांतील व उपासनांतील संगति व एकता तिला दिसत असते. आजवर सर्व धर्मांबद्दल असा समभाव बाळगणारे धर्मशील सत्पुरुष आपल्या या विराट धर्मभूमींत अनेक अवतरले आहेत.

अगदीं चालू युगांत श्रीमत् रामकृष्ण परमहंस हे असे एक महान् धर्म-

पुरुष झाले. हिंदुधर्मांतले साधनेचे सर्व मार्ग त्यांनीं आचरून पाहिले. त्यांनीं समाधीचा अभ्यास केला, शक्तीची उपासना केली, राधेचा वेष घेऊन ‘मधुर भावा’ नें श्रीकृष्णप्रेमाचा आनंद लुटला, आणि इतरहि योग आचरिले. पुढें मुसलमानांप्रमाणें नमाज पढून व ख्रिस्त्यासारखे चर्चमध्यें प्रार्थनेंत सामील होऊन त्यांनीं जिवाशिवाचें ऐक्य साधण्याचा प्रयत्न केला. आणि अखेर सर्व धर्मांचा मूळ गाभा एकच असतो या श्रद्धेचा त्यांना साक्षात्कार झाला. ह्या साक्षात्काराचा अर्थ मनुष्यमात्राला कळला पाहिजे.

धर्मांची मूळ प्रेरणा दैवी असते तरी धर्मांचें स्वरूप मनुष्येंच ठरवितात. आणि यामुळें त्यांत अपूर्णता अशी थोडी राहतेच. कारण मनुष्य अपूर्ण आहे. पूर्णतेपर्यंत त्याला पोंचायचें आहे. धर्म जेथें उत्पन्न झाला तेथील भौतिक परिस्थिति, माणसांचे स्वभाव व त्यांच्या गरजा, त्यांचे परस्पर संबंध इत्यादि अनेक गोष्टींचा परिणाम धर्मांच्या बाह्य स्वरूपावर साहाजिकच होतो. मूळ वृक्ष एक. पण त्याच्या शाखा व पानें वेगवेगळ्या आकाराचीं किंवा विविध छटांचींसुद्धां असलेलीं आपण पाहतों कीं नाहीं ? तसेंच धर्मांचें आहे. मूळ धर्मप्रेरणेला वेगवेगळ्या धर्मांच्या व पंथांच्या रूपानें फांद्या फुटल्या आहेत एवढेंच. मनुष्यानें हें जाणावें कीं आपण आपल्या धर्मांच्या द्वारें अनुभवूं शकतों तें सत्य थोडें फार अपूर्ण असणार, तेव्हां अन्यधर्मीयांच्या साक्षात्काराला हेटाळण्याचा अधिकार आपणांला नाहीं; संपूर्ण सत्य काय तो परमेश्वरच जाणूं शकतो. मग माणसांनीं आपल्या धर्मांची अंधभक्ति करून इतर धर्मांना कां तुच्छ लेखावें ?

ज्याचा हात सतारीवर सफाईदार रीतीनें चालतो तो मनुष्य सारंगी शिकूं लागला तर तितक्याच कौशल्यानें सारंगीवर गजाहि फिरवूं शकेल. शिवाय त्याचा फायदा असा होईल कीं नादब्रह्मांत तो अधिक ज्ञानी होईल आणि पहिल्यानें शिकलेल्या वाद्यावर म्हणजे सतारीवर तो विविध प्रकारचें नाद-सौंदर्य अधिक जाणकारपणानें निर्माण करूं शकेल. म्हणूनच एका हिंदु विद्यार्थिसंघापुढें बोलतांना गांधीजींनीं सांगितलें कीं, भगवान् येशूच्या चरित्राचा व तत्त्वज्ञानाचा अभ्यास तुम्हीं केला तर तुमचें धर्मज्ञान अधिक पूर्ण होईल. सर्व-धर्म-समभावाचा आदेश देतांना गांधीजी म्हणतात—

"...आपण सर्वधर्मांबद्दल समभाव बाळगावा. यामध्यें स्वतःच्या धर्मांबद्दलची उदासीनता येत नाहीं, तर स्वतःच्या धर्माविषयींचें आपलें प्रेम आंधळें असेल तर तें ज्ञानमय बनतें, अर्थात् त्यायोगें तें अधिक सात्विक आणि निर्मळहि बनतें. सर्व धर्मांविषयीं समभाव बाणेल तेव्हांच आपले दिव्यचक्षू उघडतील. धर्मांधता व दैवी साक्षात्कार यांमध्यें उत्तर दक्षिण ध्रुवाइतकें अंतर आहे. धर्मज्ञान होतांच आडपडदे उडून जातात व समभाव उत्पन्न होतो. आपण जसजसा या समभावाचा अभ्यास करूं तसतशी आपल्याला आपल्या स्वतःच्या धर्माचीहि ओळख अधिक चांगली पटत जाईल."

○ ○ ○

### गांधी-सूक्ति

"धार्मिक वृत्तीचा माणूस दुसऱ्याची प्रतिज्ञा मोडण्यास कधीं कबूल होणार नाहीं व कधीं अशा कामांत भाग घेणार नाहीं, इंद्रियांचे चोचले पुरवून मी कांहीं करीत नाहीं. इंद्रियें आपापलें काम करतात असें म्हणणें व मी तर कृष्णच आहे वगैरे मिथ्या वादाची बड-बड करणें हें तो करीत नाहीं. ज्यानें पूर्ण इंद्रियदमन केलें आहे व शरीरयात्रेकरितांच ज्याचीं इंद्रियें कार्य करतात त्यासच असें म्हणतां येईल."

## श्रमसौंदर्य : : १९

एक वैद्य आपल्या विद्येंत फार कुशल होता. तसेंच मानसशास्त्रहि त्याला चांगलें कळे. एकदां पोटदुखीनें पीडलेला एक रोगी या वैद्यराजाकडे आला. या रोग्याला कांहीं पचत नसे. तो चांगला धनाढ्य व सुखवस्तु होता. पण पोटदुखीनें हैराण झाल्यामुळें त्याला जीवित अगदीं नकोसें झालें होतें. वैद्यानें त्याची सर्व परिस्थिति बारकाईनें विचारून घेतली. त्याची दिनचर्या त्याला विचारली आणि नंतर क्षणभर ध्यानस्थ बसल्यासारखें करून त्यानें एकदम त्या रोग्याला म्हटलें, " हें पहा, तुम्हांला शरीराची विकृति अशी कांहीं नाहीं. तुमच्यावर गांवच्या मुख्य देवतेचा कोप झाला आहे. माझ्यावर विश्वास ठेवा. मला या दैवी बाबतींतलं थोडंफार कळतं. तुमच्यावर कुठल्याहि औषधाचा परिणाम होणार नाहीं. पण एक दैवी उपाय मात्र आहे. आपल्या गांवीं मुख्य देवतेचें जें मंदिर आहे त्यांतल्या सभामंडपापुढची जमीन तुम्हीं अंगमेहनतीनें करावी. मात्र अट ही कीं सकाळीं सहाला कामाला लागायचें तें बारापर्यंत काम करायचें. आणि जमीन करतांना वारंवार जें पाणी शिंपडावें लागेल तें एकदम न सांठवितां एका फुलपात्रानें जवळच्या नदीतून वेळोवेळीं लागेल तसें घेऊन यायचें. पाहा, आतां मी ध्यानस्थितींत असतां हा उपाय मला ईश्वरी आदेशासारखा सुचला. तुम्हीं करून पाहा." रोगी अगदीं हताश झाला होता. त्यानें वैद्याचें म्हणणें ऐकलें. दुसरे दिवशीं-पासून ग्रामदेवतेच्या मंदिरांतली जमीन तो करूं लागला. एक फुलपात्र पाणी आणण्यासाठीं घाटाची चढउतार करून यावें लागे. अनेक दिवस दररोज त्याला भरपूर अंगमेहनत होत गेली. त्यामुळें पोटाला खूप व्यायाम मिळत गेला. त्याची जन्माची तक्रार दूर झाली. तो उत्साही, आनंदी व निरोगी झाला.

या सुखवस्तु रोग्याप्रमाणेंच पुष्कळांना अंगमेहनतीची गरज असते. ज्यांना पोटासाठीं घाम गाळावा लागतो असे लोक वगळले तर सुसंस्कृत

समजला जाणारा समाज लोकांच्या श्रमावर जगणारा आहे. " तूं आपली भाकर घाम गाळून मिळव." हा बायबलचा उपदेश चहूंकडे दुर्लक्षिला जातो. हेंच साऱ्या सामाजिक अनर्थांचें मूळ आहे. बौद्धिक काम तें श्रेष्ठ दर्जाचें काम आणि अंगमेहनतीचें तें मात्र कनिष्ठ दर्जाचें ह्या प्रवृत्तीचा रोग आपल्या विचारांत अगदीं हाडींमासीं खिळला आहे. आणि आजच्या पिळवणुकीवर उभारलेली समाजरचना व तिचे दुर्धर परिणाम हें त्या रोगाचें बाह्य रूप आहे.

बौद्धिक जीवन आणि शारीरिक श्रमजीवन यांत कुठलीहि विषमता नाहीं असें आपल्या तेजस्वी वाणीनें सिद्ध करणारा पहिला पुरुष जॉन् रस्किन् हा होय. ' अन् टू धिस् लास्ट् ' हें त्याचें पुस्तक जगप्रसिद्ध आहे. रस्किन् कळकळीचा सुधारक होता तसा श्रेष्ठ सौंदर्यवादीहि होता. कांहीं माणसांनीं इतरांच्या अंगमेहनतीवर जगावें यांत त्याला अन्याय, पाप, कुरूपता दिसली आणि आपलें क्रांतिकारक मत तितक्याच प्रभावशाली शब्दांत त्यानें जगापुढें मांडलें. गांधीजी म्हणतात, " ' अन् टू धिस् लास्ट् ' या पुस्तकानें एका रात्रींत मला संपूर्ण बदलून टाकलें. मी सुखवस्तु शहरी माणूस होतों तो साधा श्रमजीवी झालों." रस्किन ' ब्रेड-लेबर ' म्हणजे भाकरीसाठीं करावी लागणारी मेहनत असें नांव शरीरश्रमाला देतो. गांधीजींनीं आपल्या एकादश व्रतांत ' अंगमेहनत ' म्हणून जें व्रत सांगितलें आहे तें हेंच.

भारतीय संस्कृतीनें ज्या अमोलिक वस्तु जगाला दिल्या त्यांत ' यज्ञ ' ही कल्पना प्रमुख आहे. यज्ञ म्हणजे त्याग, इतरांच्या सुखासाठीं आत्मसमर्पण. यज्ञांत सेवा मुख्यतः येते. समाजधारणेसाठीं झटणें आणि समाजपुरुषाची सेवा करणें हें यज्ञाचें खरें स्वरूप होय. ' यज्ञ केल्याशिवाय जो जेवतो तो चोर आहे ' असें श्री भगवद्गीता आपणांस सांगते. याचा अर्थ आळशीपणें काम न करतां जो अन्न खातो तो समाजांतला लुटारूच म्हणतां येईल. या ठिकाणीं यज्ञ म्हणजे खरें पाहतां अंगमेहनत असें म्हणतां येईल.

आपण या यज्ञाचीच नेमकी आबाळ करतों ! अंगमेहनत हें सुसंस्कृतीला अपायकारक लक्षण आहे असें आपण समजतों. अमेरिकेचा स्वातंत्र्यदाता लोकनायक जॉर्ज वॉशिंग्टन् हा एकदां साध्या वेषांत देशाची पाहणी करीत

असतां, त्याला एका ठिकाणीं कांहीं मजूर एक तुळई वर चढावावर नेत आहेत असें दिसलें. तुळई फार जड होती आणि ती चढवितांना मजूर अगदीं घामाघूम झाले होते. मजुरांच्या कामावर देखरेख करणारा अधिकारी दूर उभा राहून त्यांच्यावर ' लवकर काम करा ' म्हणून खेकसत होता. हा प्रकार पाहिल्यावर वॉशिंग्टन् त्या अधिकाऱ्याला म्हणाला, " अहो, तुम्ही जरा हात लावा कीं त्या तुळईला. मजुरांना तेवढेंच काम हलकें होईल. " त्या अधिकाऱ्याला आपण कोणाशीं बोलत आहोंत याची ओळख नव्हती, कारण वॉशिंग्टनला त्यानें कधींच पाहिलें नव्हतें. तो उमटपणें वॉशिंग्टन्ला म्हणाला, " अहो दीड शहाणे ! मी मजूर नाहीं, अधिकारी आहें. मी या मजुरांना मदत करूं लागलों म्हणजे माझा दर्जा काय राहिला ? " आणि नंतर तुच्छतापूर्वक हंसून वॉशिंग्टनला तो म्हणाला, " का हो तुम्हांला जर या मजुरांची इतकी दया येत असेल तर व्हा पुढें आणि तुम्हीच लावा ना हात." वॉशिंग्टननें अस्तन्या मागें सारल्या आणि खालील बाजूनें तुळईला हात दिला. मजुरांचें काम बरेंच सोपें झालें आणि तुळई वर चढविणें त्यांना शक्य झालें. नंतर जॉर्ज वॉशिंगटननें कपडे साफ केले आणि त्या उमट अधिकाऱ्याला सलाम ठोकून म्हटलें, " महाराज, येतों मी. पुनः असें कांहीं काम लागलें तर आपल्या देशाच्या सर सेनापतीला—जॉर्ज वॉशिंग्टनला कळवा. तो आजच्या-प्रमाणें तुमच्या कामाला मदत करायला येईल. " त्या उमट अधिकाऱ्याला वाटलें आपल्या पायाखालची जमीन दुभंगून आपणांला पोटांत घेईल तर बरें !

शरीरश्रमाबद्दलची तुच्छता या उमट अधिकाऱ्यासारखी आपणां सर्वांनाच वाटते. आणि म्हणूनच वॉशिंग्टन्, रस्किन् किंवा गांधीजी यांच्यासारख्या महापुरुषांना वेळोवेळीं आपल्या डोळ्यांत अंजन घालावें लागतें. रस्किनच्या मतें कवि आणि मुत्सद्दी यांचा दर्जा सुतारापेक्षां कांहीं अधिक नाहीं. राष्ट्रोपयोगी कार्यांत प्रत्येकाला वांटा उचलतां येईल आणि प्रत्येकाच्या त्यागाला महत्त्व येईल. मग बौद्धिक काम श्रेष्ठ आणि अंगमेहनतीचें काम कनिष्ठ असें कसें म्हणतां येईल ? वीरानें आपलें काम केलें नाहीं तर देश परचक्रानें ग्रासला जाईल हें खरें, पण वीरांचीं हत्यारें तयार करणारे लोहार सुतार जर कार्यप्रवण न राहिले तर हत्यारें कुठलीं तयार होणार ! आणि हत्यारें मिळालीं

नाहींत तर वीर कसा लढणार ? हेंच काय पण अगदीं गलिच्छ समजलें गेलेलें गांवसफाईचें काम करायचें नाहीं असें भंग्यांनीं ठरविलें तर दुर्गंधि व रोगराई यांचा प्रळय सर्वत्र होईल. प्रत्येकाच्या कामाचा राष्ट्राला उपयोग असल्यानें प्रत्येक कामाला समान दर्जा मिळाला पाहिजे. रस्किन तर याहिपुढें जाऊन म्हणतो कीं, खरें श्रेष्ठ काम म्हणजे अंगमेहनतीचेंच काम.

तसें पाहिलें तर जगांतील शेंकडा नव्वद टक्के माणसें अंगमेहनतीवरच जगतात आणि त्यांच्या श्रमावर इतर दहा टक्के माणसें चैन करतात. हीं दहा टक्के माणसें शहाणीं झालीं आणि इतर नव्वद टक्के माणसांचें अनुकरण करूं लागलीं तर विषमता, दारिद्र्य, रोग आणि युद्धें नाहींशीं होतील. मी श्रम करून आपलें जेवण मिळवूं लागलों कीं माझें जेवण मला रुचकर लागतें, माझें आरोग्य उत्तम राहतें, आणि श्रमाचें महत्त्व कळल्यानें दुसऱ्याच्या श्रमाकडे मी आदरानें पाहूं लागतों. साहजिकच दुसऱ्याच्या श्रमावर आपण जगूं नये या वृत्तीचें पोषण होतें. गांधीजी सांगतात–

" अंगमेहनतीचा हा निरपवाद कायदा सर्वांनीं मान्य केला तर उच्च व नीच हा भेद राहणार नाहीं...सर्वांनींच आपापल्या पोटापुरतें काम केलें तर उच्चनीच भेद निघून जाईल; इतक्या उपरहि धनिक वर्ग राहील त्यानें आपल्याला आपल्या मिळकतीचा मालक न समजतां केवळ रखवालदार किंवा पंच मानावें व तिचा मुख्यतः केवळ लोकसेवेसाठीं उपयोग करावा. "

गांधीजींनीं सांगितलेलीं अकरा व्रतें येथें संपतात. आत्मविकासाचा श्रेष्ठ मार्ग या ' व्रत–एकादशी ' नें आपणांला सांगितला आहे. सत्यापासून सुरुवात केली. नम्रता हें व्रत असें स्वतंत्र म्हणतां येणार नाहीं. पण हीं ११ व्रतें आचरण्यास अवश्य असलेली ती मनःस्थिति आहे. या सर्व व्रतांचा क्रम कसाहि घेतला तरी हरकत नाहीं. यांतलें प्रत्येक व्रत संपूर्ण आहे, तसेंच दुसऱ्या कुठल्या तरी व्रताला पूरकहि आहे. आत्मविकासाचें हें संगीत सत्य आणि अहिंसा या दोन वादी–संवादी स्वरांवर आधारलेलें आहे. प्रत्येक व्रत हें माणसाच्या सर्व सात्त्विक शक्ति जास्तींत जास्त वाढीला लागाव्यात यासाठीं आहे आणि तेवढ्या दृष्टीनें त्याचें स्वरूप व्यक्तिगत आहे. पण आचारतंत्रांत समाजाच्या सुखाला प्राधान्य आहे. विद्युद्यंत्रांतली वीज निघते तेथेंच पुनः

परत येते. पण एवढ्या प्रवासांत लोकांचीं यंत्रें चालविणें किंवा त्यांचीं घरें उजळणें हें लोककार्य ती साधते. गांधीजींच्या आत्मविकासाचा आरंभ व शेवट अखेर प्रत्येकाच्या अंतरंगांत होतो. पण या दोन टोकांच्या मधला प्रवास समाजजीवनांतून होतो हें गांधीजींच्या उपदेशाचें वैशिष्ट्य आहे. आत्मोन्नति आणि समाजसुख यांची सांगड गांधीजींनीं आपल्या मोक्षमार्गांत घातली. अर्नेस्ट बार्कर या जगविख्यात इंग्लिश विद्वानानें गांधीजींच्या सर्व उपदेशाचें सार थोडक्यांत मार्मिकपणें सांगितलें आहे.

" मनुष्यानें सर्व कार्य पूर्ण प्रेमानें व पूर्ण प्रेमाखातर करावें. तें पूर्ण अहिंसेनें करावें, आणि त्यांत शरीरश्रमाला पूर्ण प्राधान्य द्यावें. "

गांधीजींच्या ' व्रत–एकादशीं ' तलें प्रत्येक व्रत याच साध्याला जवळ आणणारें आहे.

o o o

### गांधी-सूक्ति

" तुम्ही मोह सोडून जर निर्णय कराल तर तुमच्या प्रेमाला निर्मळ व दिव्य स्वरूप येईल. तुम्ही आपलें प्रेम सर्व जगताला देऊं शकाल, अर्थात् तसें करण्याचा प्रयत्न करूं शकाल. हाच मातृभक्तीचा उद्देश आहे. "

व्रत–एकादशीची सांगता करण्यासाठीं गांधीप्रणीत जीवनांतल्या आणखी दोन-तीन गोष्टींचा परिचय करून घेतला पाहिजे. यांचीं वर्णनें कानावर येतात. पण त्यांचें रहस्य कधींच पूर्णपणें चर्चिलें जात नाहीं. गांधीजी दर सोमवारीं **मौन** पाळत ही गोष्ट प्रसिद्ध आहे. त्यांनीं केलेले पांचसहा मोठे **उपवास** जगभर गाजले, आणि त्यांची **प्रार्थना** हा सर्वांच्या सादर कुतूहलाचा विषय झालेला आहे. आपलें शरीर परमेश्वरी शक्तीच्या निवासाचें खरेंखुरें मंदिर बनविण्यासाठीं आपलें जीवन कसें शुद्ध राखिलें पाहिजे आणि शरीर व मन यांचा विकास अखंड सावधानतेनें कसा केला पाहिजे याचा नियमबद्ध मार्ग आपणांस अकरा व्रतांत मिळतो. मौन, उपवास आणि प्रार्थना यांची सहायता या आचारमार्गाला फार होत असते.

शक्ति सांठवून ठेवणें हें जीवन सामर्थ्यवान् करण्याचें एकमेव साधन आहे याविषयीं कोण वाद करील ? शक्ति ही शारीरिक असते तशीच मानसिकहि असते. या दोनहि प्रकारची शक्ति एकमेकांवर अवलंबून आहे. आपण आरामखुर्चीवर पडून वाचत असतों तेव्हां शारीरिक श्रम करीत नाहीं, असें आपणांला वाटतें. पण कांहीं वेळानें आपणांस थकवा येतो आणि खाण्यापिण्याची आवश्यकता वाटूं लागते. म्हणजे वाचनासारख्या केवळ बौद्धिक वा मानसिक कामांतहि शरीराची झीज होतच असते. उलट, अंगमेहनतीचीं कामें किंवा शारीरिक व्यायाम करण्यांत मनाची एकाग्रता अगत्य असते, म्हणून अशा कामांत मनाला कांहीं वेळानें क्षीणता येऊं लागतेच. शरीर व मन यांचे व्यापार असे परस्परावलंबी आहेत. म्हणून शक्तिसंवर्धन किंवा शक्तिसंचय या दोन्ही कामीं शरीर व मनाची गाढ सहकारिता पाहिजे.

मौन हें शक्तिसंचयाचें फार मोठें साधन आहे. रोगी माणसांनीं गप्पागोष्टी न करतां बराच काळ मौन धरलें तर त्यांना हुशारी वाटते. निरोगी माणसेंहि

मौनानें शक्तीची पुष्कळ बचत करूं शकतात. एखाद्या हौदाला भेगा असल्या किंवा त्याची तोटी नादुरुस्त असली तर त्यांतलें पाणी हळुहळू बाहेर झिरपत जातें. तसेंच बोलण्यानें शरीर-मनाचें बल हळुहळू कमी होत असतें. हा ऱ्हास थांबविण्यासाठीं मौनाचा आश्रय घेणें जरूर आहे. मौन म्हणजे विश्रांति. मौन म्हणजे शक्तिसंचय. नदीकांठीं वाळूमध्यें पिण्याच्या पाण्याचे झरे खोदतात. हें पाणी सारखें उपसत राहिलें तर ते झरे कोरडे पडतात. म्हणून कांहीं वेळ ते तसेच पडूं देतात. त्यांकडे कोणी जात नाहीं. मग पुनः ते पाण्यानें समृद्ध होतात. आपल्या मनाची शक्ति सांठण्याकरितां असाच भाषणाचा उपसा कांहीं काळ थांबविणें अगत्य असतें.

आत्मविकासाला तर मौनाची जरूरी फारच आहे. पूर्वी पूजा किंवा देवधर्म करतांना मौन स्वीकारण्याचा नियम फार चांगला होता. तेवढा काळ तरी सक्तीनें आपण बोलण्यावर नियंत्रण घालून अंतर्मुख होत होतों. आज त्या नियमाला आपण अडगळींत टाकलें आहे ! बीं जमिनींत रुजून वर येण्यासाठीं त्यावर माती पसरावी लागते, त्याला खतपाणी घालावें लागतें. तें वारंवार वर काढून पाहिलें तर तें नीट रुजणार नाहीं. तें कांहीं काळ दृष्टीआडच झालें पाहिजे. तसे आपले अनुभव व विचार परिपक्व होण्यासाठीं त्यांवर मौनाचें आवरण कांहीं काळ घालणें जरूर असतें. मननचिंतनानें त्यांना पोषण मिळतें आणि मग त्यांना शब्दरूपानें व आकाररूपानें गोमटीं फळें येतात. गांधीजींच्या उत्कृष्ट भाषाशैलीचें रहस्य ते आठवड्यांतून एक दिवस मौन पाळतात यांत आहे असें एका पाश्चात्य विचारवंतानें म्हटलें आहे. याची यथार्थता मौनाचें खरें सामर्थ्य कळल्यावांचून पटणार नाहीं. शब्दांचा संयमाग्नींत होम करणें ही एक तपश्चर्याच आहे असें गीतेंत सांगितलें आहे. हा यज्ञ म्हणजेच मौन.

मौनाप्रमाणेंच उपवासांतहि जिभेच्या विश्रांतीची योजना आहे. पण उपासाचें कार्य आणि आवाहन फार व्यापक आहे. मौनाप्रमाणेंच उपवास हें अत्यंत प्राचीन व्रत आहे. ऋषिमुनि वायु भक्षण करून अनेक वर्षें तपस्या करीत असें आपण वाचतों. बुद्ध, येशू, महंमद इ० थोर प्रेषितांनीं साक्षात्कारासाठीं उपवास केले. सीता-पार्वतीसारख्या आदर्श स्त्री-रत्नांनीं आपल्या प्रियतमाच्या प्राप्तीसाठीं किंवा मीलनासाठीं उपवास केल्याचे दाखले आहेत.

असें हें पवित्र आणि प्राचीन व्रत आहे. शरीरशुद्धि, आत्मशुद्धि आणि हृदयपरिवर्तन हे उपवासाचे प्रमुख हेतु असतात.

शरीरशुद्धीसाठीं उपवास ही गोष्ट आतां अधिकाधिक लोकप्रिय होत आहे. अलीकडील शास्त्रीय संशोधनहि या गोष्टीला मान्यता देत आहे. शरीर व मन यांना खरी विश्रांति उपवासकालांतच मिळते. शेंकडों रोगांचें कारण पचनेंद्रियाची विकृति हेंच असतें. आणि ही विकृति नाहींशी करण्यास उपवासासारखा दुसरा इलाज नाहीं. अपचन, संधिवात, डोकेंदुखी, रक्तक्षय, गुडघी इ० रोगांवर उपवास हें रामबाण औषध आहे. शरीरांतील विषें नष्ट करून शरीर कार्यक्षम करण्यास व मनाला प्रसन्नता आणण्यास हा बिनतोड उपाय आहे. शोक किंवा हर्ष यांच्या अतिरेकामुळें कित्येकदां शरीराची क्रिया बेताल होऊं लागते आणि एखादी कायमची विकृति जडण्याचाहि संभव असतो. अशा वेळीं उपवासानें शरीराला स्वास्थ्य आणणें शक्य होतें.

अर्थात् उपवास हें एक शास्त्र आहे. त्याचें योग्य ज्ञान करून घेतल्या-खेरीज उपवासास प्रवृत्त होणें केव्हांहि धोक्याचें असतें. केवळ शारीरिक तंदुरुस्तीसाठीं जे कोणी उपवास करतात त्यांच्यासाठीं गांधीजींनीं पुढील उपयुक्त सूचना दिल्या आहेत.

१ पहिल्यापासून आपल्या शारीरिक व मानसिक शक्तीचा संचय करा.

२ उपवास करीत असतां खाण्याचा विचारहि मनांत आणूं नका.

३ तापवून व उकळून थंड केलेलें पाणी मधून मधून शक्य तेवढें पीत जा. त्यांत थोडा खाण्याचा सोडा टाकण्यास हरकत नाहीं.

४ दिवसांतून एक वेळ स्पंजानें ऊन पाण्याचें स्नान करा.

५ दररोज एक वेळ एनिमा घ्या. आपल्या शरीरांतून केवढीं तरी विषें बाहेर पडतात याचें तुम्हांला आश्चर्य वाटेल.

६ उघड्या हवेंत शक्य तेवढी झोप घ्या.

७ सकाळचीं सूर्यकिरणें अंगावर घ्या. सूर्यस्नान आणि हवा हीं पाण्याइतकींच शुद्धिकारक आहेत.

८ आपल्या उपवासविषयीं यत्किंचित् चिंतन करूं नका.

१ तुम्ही कुठल्याहि उद्देशानें उपवास आरंभिला असला तरी आपला स्रष्टा आणि त्यानें निर्माण केलेली सृष्टि यांच्याशीं आपला ऋणानुबंध कोणता याचाच विचार करीत राहा. कधीं स्वप्नांतहि येणार नाहींत अशा गोष्टीचें ज्ञान तुम्हांला होईल.

कित्येकदां वासना अनावर होऊं नयेत यासाठीं माणसें उपवास करतात. वासनांचा संयम करण्याचे कामीं उपवासाची मदत जरूर होते. पण त्या उपवासांत मनावर ताबा मिळविण्याचा प्रामाणिक प्रयत्न पाहिजे. याचा अर्थ इतकाच कीं केवळ शारीरिक दृष्टीनें उपवास करून मनःसंयम साधणार नाहीं. नुसता न खाण्याचा नेम पाळणें हा झाला शारीरिक उपवास. अशा उपवासानंतर कित्येकदां जीभ अधिक चवचाल होते, वासना अधिक प्रबळ बनतात. म्हणून शारीरिक उपवासाबरोबर मन आवरण्याचाहि यत्न केला तरच त्याचा आत्मशुद्धीला उपयोग होतो.

उपवास हें प्रार्थनेचें उत्कट स्वरूप आहे. "हें शरीर तुझेंच आहे. सर्व सुखोपभोगापासून तोडून मी तें तुला वाहात आहें." अशी परमेश्वरापाशीं प्रार्थना करणें हा उपवासाचा पवित्र उद्देश असतो. "देह जावो अथवा राहो." अशा बेपर्वाईनें, निःसंगपणें, पण आनंदानें परमेश्वरापाशीं जाणें हें उपवासांतलें रहस्य आहे. अन्नाचा किंवा पाण्याचा त्याग ही त्या रहस्याची अगदीं पहिली अवस्था आहे.

आतां उपवासप्रकरणांतील एका वादग्रस्त मुद्याचा विचार शेवटीं यावयाचा आहे. उपवास हें सत्याग्रहाच्या शस्त्रागारांतील एक प्रमुख शस्त्र आहे. उपवास ही जबरदस्ती आहे, ती हिंसा आहे असें एक मत अनेकांनीं जोरदार रीतीनें मांडलें आहे. एकाद्या व्यक्तीला किंवा संस्थेला उपवासाच्या जोरावर, आपणांस हवी ती गोष्ट करायला लावणें हें उपवासाचें तंत्र आहे. या तंत्रांत जबरदस्ती नाहीं का? अमुक एक मनुष्य उपवास करून आपल्यासाठीं मरतो आहे, म्हणून आपलें मत बदलून त्या मनुष्याच्या मनासारखें कोणीं केलें तर तें हिंसेला बळी पडूनच केलें असें होत नाहीं का?

ह्या व अशा शंका मोठमोठ्या विचारवंतांनींहि घेतल्या आहेत. तथापि उपवास केव्हां करायचा, कोणी करायचा, त्याच्या मर्यादा कोणत्या व

पथ्योपपथ्यें कोणतीं, हें जर कळलें तर या शंका फारशा भयंकर किंवा बिनतोड वाटणार नाहींत.

दुसऱ्याच्या मनांतील सद्‌भावना आत्मक्लेशानें जागृत करणें हें सत्याग्रहाचें मुख्य सूत्र आहे. या सूत्राचा आधार संपूर्ण अहिंसा आहे. अर्थात् ज्याच्या विरुद्ध उपवास करायचा त्याच्याबद्दल उपवास करणाऱ्याचे मनांत प्रेम असलें पाहिजे. तसेंच त्यालाहि उपवास करणाऱ्याच्याबद्दल आदर वाटत असला पाहिजे. ज्या कारणाकरितां उपवास करावयाचा तें कारण न्याय्य व नीतितत्त्वास धरून असलें पाहिजे. त्यांत हीन स्वार्थ असतां उपयोगी नाहीं. 'मला अमुक इतकी दारू प्यायला द्या किंवा अमुक इतके पैसे द्या' अशी मागणी करून कोणी उपवास करूं लागला तर प्रतिपक्षाच्या हृदयांत पालट तर होणार नाहींच; पण उपवास करणारा मात्र जननिंदेस पात्र होईल.

माझ्यावर ज्याचें प्रेम आहे त्याचेंच माझ्या क्लेशानें मतपरिवर्तन होऊं शकतें. ज्याला आपल्याबद्दल यत्किंचित् जिव्हाळा नाहीं त्याच्याविरुद्ध उपवासाचा प्रयोग करतां येत नाहीं. 'जनरल डायर नरमावा म्हणून मीं कधींच उपवास केला नसता.' असें गांधीजींनीं म्हटलें त्याचें हेंच मर्म होय. उपवास करणाऱ्याचे मनांत हिंसेनें जरा देखील प्रवेश करतां कामा नये. नाहीं तर या उपवासाला दमदाटीचें स्वरूप येईल. अहिंसेंत आग्रह असतो, जबरदस्ती नसते. आणि जो आग्रह असतो तोहि प्रेममूलक असतो. अहिंसा आत्मक्लेशानें क्रियावान् होते. उपवास हें अहिंसेला अधिकांत अधिक क्रिया-वान् करण्याचें साधन आहे.

गांधीजींनीं हिंदु-मुसलमानांत प्रेमभाव निर्माण व्हावा यासाठीं उपवास केला. तसेंच अस्पृष्ट समाज हिंदु समाजांतून फुटूं नये या हेतूनें १९३२ सालीं त्यांनीं अस्पृष्टांचें स्वतंत्र मतदार संघ रद्द व्हावे यासाठीं केलेला उपवास प्रसिद्धच आहे. राजकोट संस्थानच्या सत्ताधीशाविरुद्धहि त्यांनीं उपवास केला होता, पण त्यांत हिंसा होती असें कळून येतांच त्यांनीं तो माघारा घेतला! १९४३ सालीं आगाखान प्रासादांत स्थानबद्ध असतांना गांधीजींनीं २१ दिवसांचें जें उपोषण केलें तें तर एक महान् दिव्य होतें. त्यांतून आत्मबलावर गांधीजी बचावले. ऑगस्ट १९४२ मध्यें गांधीजींना स्थानबद्ध केल्यानंतर देशांत झालेल्या अत्याचाराची जबाबदारी सरकार

गांधीजींवर टाकीत होतें आणि तुरुंगाच्या चार भिंतींतून ही जबाबदारी आपणांवर नाहीं असें गांधीजींना सांगतां येत नव्हतें. ४३ सालच्या त्रि-साप्ताहिक उपोषणानें गांधीजींनीं सरकारच्या त्या खोडसाळ प्रचाराचा जगावर झालेला परिणाम धुवून काढला. तीन आठवडे जगाचें लोकमत घुसळून निघालें आणि अहिंसेचा प्रेषित निष्कलंक ठरला ! आणखीहि गांधीजींनीं कांहीं लहानमोठे उपवास वेगवेगळ्या कारणांकरितां केले. ' आतां उपवास सुरू करावा ' अशा आशयाचा आदेश आपणांस परमेश्वरच देतो अशी गांधीजींची श्रद्धा असे. गांधीजी हे उपवासतंत्राचे एकमेव अधिकारी होते. इतर साधकांनीं या खडतर तंत्राचा अवलंब शक्य तोंवर करूं नये हेंच चांगलें. सत्य, अहिंसा ही अकरा व्रतांची साधना ज्यानें फार मोठ्या प्रमाणावर केलेली असेल त्यालाच हें तंत्र जमेल. बुद्धि अत्यंत शुद्ध झाल्यामुळें तिच्या पलीकडील अनंताचा साक्षात्कार ज्याला होणें शक्य असतें असाच योगी हें उपवासतंत्र कुशलतेनें वापरूं शकेल.

प्रार्थना हा सत्याग्रही जीवनाचा एक अवश्य भाग आहे. गांधीजी म्हणत, ' प्रार्थनेनें मला अनेक वेळां वांचाविलें आहे. ' आपण ज्या विराट् विश्वशक्तीचे अंश आहोंत तिच्यापुढें स्वतःला तृणवत् लेखून नम्र होणें, तिच्याविषयीं कृतज्ञता प्रकट करणें व तिच्या साह्याची, मार्गदर्शनाची याचना करणें हीच प्रार्थना होय. महाकवि खलिल गिब्रान म्हणतो—

" दररोज सकाळीं उठल्यावर आणखी एक दिवस प्रेम करायला मिळाला यासाठीं परमेश्वराचे आभार माना. "

'प्रेम' या शब्दाचे ठिकाणीं गांधीजींनीं 'सेवा' हा शब्द घातला असता. पण खरें पाहतां प्रेम आणि सेवा या एकाच महत्तत्त्वाच्या दोन बाजू आहेत. सकाळीं जागृतीचे दरवाजे प्रार्थनेनें खुले व्हावेत त्याप्रमाणें रात्रींहि प्रार्थनेनेंच आपल्या दिवसभरच्या कार्यक्रमावर पडदा टाकावा.

" मागा म्हणजे मिळेल, ठोठावा म्हणजे उघडेल. " अशा श्रद्धेनें प्रार्थनेचे कार्यक्रम व्हावेत. गांधीजींनीं प्रार्थनेच्या स्वरूपाविषयीं सांगतांना म्हटलें आहे,

" प्रार्थना म्हणजे याचना नव्हे. ती आत्म्याची इच्छा आहे. दररोज दिलेली आपल्या दुर्बलतेची ती कबुली आहे. आपल्यांतला पर्वताएवढा जो

कोणी असेल त्यालाहि मृत्यु, जरा, व्याधि, अपघात इ० पुढें आपण शून्यवत् आहोंत याची जाणीव असली पाहिजे...आपण परमेश्वरासाठीं प्रत्येक गोष्ट करीत आहोंत ही जाणीव असली कीं सूर्यप्रकाशाप्रमाणें सर्व स्पष्ट दिसतें. मग कशाचाच नाश होत नाहीं...प्रार्थना ही एक मागणीच्या स्वरूपाची असेल किंवा आपल्या जीवात्म्याची परमात्म्याशीं एकतानता करण्याचा यत्न असेल. दोहींचाहि प्रयत्न एकच. प्रार्थनेंत मागणी असेल तर ती अंतरात्म्याच्या शुद्धीची पाहिजे, अज्ञान आणि अंधकार यांच्या पुटांतून आपणांला मुक्त करावें अशी विनवणी असावी......"

गांधीजींच्या प्रार्थनेंत सर्व धर्मांतल्या भक्तिगीतांचा समावेश असतो हें सुप्रसिद्ध आहे. पुणें–मुंबईसारख्या शहरीं त्यांच्या सार्वजनिक प्रार्थनेचे भव्य देखावे पाहिले म्हणजे नाना धर्मांचे, नाना पंथांचे मानवयात्री विश्वशक्तीच्या पायाशीं नम्र भावानें स्थिरावले आहेत असें वाटून मन रोमांचित होई! गांधीजी परमेश्वराचे अनन्य भक्त होते. आजच्या चिकित्सेच्या युगांत त्यांनीं भगवद्भक्तीची व अध्यात्मवादाची पताका उंच केली इतकेंच नव्हे जुन्या अनेक श्रेष्ठ तत्त्वांना त्यांनीं जसा नवा आशय व नवें तेज आणिलें. तसेंच परमेश्वरभक्तीलाहि त्यांनीं कांहीं वेगळा अर्थ आणून दिला आहे. त्यांतील रसाची गोडी प्राचीन असली तरी त्याचा अन्वय मात्र नवीन युगांतहि चित्ताकर्षक वाटेल असा आहे. गांधीजींची ईश्वरविषयक दृष्टि आकलन करतां आली नाहीं तर त्यांच्या तत्त्वज्ञानाची बाराखडी सुद्धां गिरवितां येणार नाहीं. निरनिराळ्या व्रतांच्या चर्चेंत ती दृष्टि आपल्या तोंडओळखीची झालीच आहे. आतां या तोंडओळखीचें रूपांतर स्नेहांत करणें अगत्याचें नाहीं का?

० ० ०

# " जेथें जासी तेथें तूं माझा सांगाती " : : १८

आपल्या घरांत वावरत असतांना मूल निर्भयपणें वावरतें. त्याच्या सर्व हालचाली मोकळ्या व सफाईदार होतात. एकाद्या गोष्टींत तें सहज तन्मय होतें. खेळांत जास्तींत जास्त प्रावीण्य दाखविण्याचा उत्साह त्याला असतो. कारण आपली संरक्षक देवता 'आई' येथें आहे ही श्रद्धा त्याच्या अगदीं खोल खोल मनांत दृढ होऊन बसलेली असते. आपण थकलों, दमलों तर आपलें विसांव्याचें ठिकाण निश्चित आहे या श्रद्धेच्या जोरावर त्याचे सर्व व्यापार निःशंक मनानें आणि सफाईनें होत असतात.

गांधीजींच्या साऱ्या शक्तीचा व कार्यकुशलतेचा उगम या दृष्टान्तावरून सहज समजून येण्यासारखा आहे. या जगाच्या प्रचंड प्रासादांत आपली 'त्रिभुवन जननी' आपल्यावर मायेची पांखर घालीत आहे, एक क्षणहि आपणास ती विसंबत नाहीं ही जाणीव माणसाच्या रोमरोमीं भिनली म्हणजे त्याच्या सर्वच वागणुकीला एक सौष्ठव येतें, निर्भयपणाचें सौंदर्य येतें.

गांधीजी म्हणतात—

" प्रत्येक वस्तूला व्यापून राहिलेली एक गूढ अनिर्वचनीय शक्ति आहे. मला ती दिसत नाहीं, पण तिचा अनुभव निश्चित येतो ... परमेश्वराचें अस्तित्व पटवून देणें बुद्धीला कांहीं एका मर्यादेपर्यंतच शक्य आहे, कारण इंद्रियजन्य ज्ञानाच्या पलीकडला तो अनुभव आहे. "

आपण डोळ्यांनीं पाहतों, कानांनीं ऐकतों, जिव्हेनें रसास्वाद घेतों, अशा कांहीं इंद्रियांखेरीज मन म्हणून न दिसणारी चीज आहे. पण ती आपणांला कळते आणि तिच्या योगें कांहीं ज्ञान आपणांला होतें. भीति, क्रोध, आनंद या भावना आपण मनानें अनुभवतों. बुद्धि म्हणून आणखीहि एक शक्ति आहे. तिनें आणखी बरेंच ज्ञान आपणांला होतें. आपण ऐकतों,

वाचतों, विचार करतों; न पाहिलेल्या गोष्टींचा तर्क करतों; अमुक अनुभव आला कीं अमुक समजावें असे आडाखे बसवतों. दोन गोष्टींतला अथवा प्रसंगांतला सारखेपणा अथवा विसदृशपणा आपणांला पारखतां येतो. या बुद्धीच्या जोरावर माणसानें केवढी प्रचंड संस्कृति, शास्त्रें, विद्या, कला निर्माण करून ठेविल्या आहेत ! पण परमेश्वराच्या स्वरूपाचें पूर्ण ज्ञान होण्यास मात्र हीं नेत्र-कर्णादि इंद्रियें, मनाच्या शक्ति, अथवा बुद्धि यांचें फार म्हणजे फारच थोडें साह्य होतें. या सर्व साधनांनीं परमेश्वराचें अस्तित्व सिद्ध करा असें म्हटलें तर तें शक्य होईलसें नाहीं. कारण परमेश्वर या सर्वांपलीकडील आहे.

तरी पण बुद्धीपलीकडे प्रदेश आहे. तो अमर्याद आहे, आणि त्यांत पाऊल ठेवण्याचें सामर्थ्य आलें कीं परमेश्वरी शक्तीचा साक्षात्कार माणसास होतो असा अनुभव सांगणारे सिद्ध पुरुष वेळोवेळीं होऊन गेले आहेत, आजहि आहेत. आपण स्थूल इंद्रियांच्या अनुभवापासून जसजसें दूर जाऊं, सूक्ष्म अनुभव घेत आपली प्रगति करूं तसतसें त्या साक्षात्कारासमीप जाणें आपणांस शक्य होईल. उत्तम पदार्थ चाखला तर जिभेला तात्काळ समाधान होतें, पण तें थोडा वेळ टिकतें. हा अगदींच स्थूल प्रत्यय झाला. गाणें ऐकल्यानें कान तृप्त होतील. रुचीपेक्षां हा आनंद कदाचित् जास्त वेळ टिकेल. गोड भाषण ऐकलें तर मन संतुष्ट होईल. मन अदृश्य आहे. हा आपला संतोष बराच काळ टिकणें आहे. खूप सूक्ष्म प्रत्यय आहे हा. वाचन वगैरे गोष्टींनीं बुद्धीला तन्मय झाल्यासारखी धुंदी येते तीहि अशीच सूक्ष्मतम असते. पण परमेश्वरी साक्षात्काराचा आनंद सूक्ष्मांत सूक्ष्म असतो तसाच तो अधिकांत अधिक काळ टिकणाराहि असतो. सिद्धवर्य रामकृष्ण परमहंस हे म्हणतात,

"दूध हें जोंपर्यंत दूध आहे तोंपर्यंत तें पाण्यांत मिसळून जाण्याची भीति असते. पण एकदां मंथन करून त्याचें लोणी झालें कीं मग तें विरघळून जाण्याची भीति नाहीं."

साक्षात्काराचा हा अनंत व अखंड आनंद मिळविणें हें जगांतल्या प्रमुख धर्मांनीं माणसाचें ध्येय म्हणून सांगितलें आहे. गांधीजी या विचाराहून वेगळें कांहींच सांगत नाहींत. गांधीजींचें वेगळेपण आहे तें ध्येयसाधनेच्या

2८८२ प्रा ११ 2007

पद्धतींत. एका माणसानें साक्षात्काराच्या पायरीपर्यंत चढायचें म्हणजे इतरांसाठीं, समाजासाठीं, मानवतेसाठीं झटायचें असें गांधीजींच्या उपदेशाचें सार आहे. हें कसें तें पुढील विवेचनाच्या ओघांत एकएका पाकळीनें उकलत जाईलच.

मनुष्यदेहाचें सर्वांत श्रेष्ठ सार्थक कोणतें तर परमेश्वराचा शोध. पण तो शोध करायला निघण्यापूर्वी असा कोणी परमेश्वर आहे याविषयींची श्रद्धा पाहिजे. परमेश्वर हेंच केवळ शेवटचें सत्य आहे याचा गाढ विश्वास रोमरोमीं भिनला पाहिजे. बुद्धिवाद किंवा तर्क यांनीं हें पूर्ण सिद्ध नाहीं झालें तरी हरकत नाहीं. आपण भूमिति शिकतों. भूमितीनें केवढ्या कारागिरीला मदत होते; किती शास्त्रें, पदार्थ, चमत्कार यांचें मोजमाप घेतां येतें. पण ही भूमिति ज्या बिंदूवर आधारलेली आहे त्या बिंदूची व्याख्या काय? तर ज्याला लांबी, रुंदी, उंची नाहीं तो बिंदू! पटते का बुद्धीला ही व्याख्या? होतें का या व्याख्येनें तर्काचें समाधान? मुळींच नाहीं! पण ही व्याख्या आपण गृहीत धरून चालतों म्हणूनच भूमितीचे पुढचे एकाहून एक गुंतागुंतीचे सिद्धान्त आपणांला उलगडत जातात ना? परमेश्वर आहे हें प्रमेय एकदां मान्य केलें कीं पुढील प्रवास करतांना आपणांस अडचणी येत नाहींत.

जगाच्या एकंदर व्यापारांत कांहींतरी संगति दिसते. कांहीं नियम आहेत आणि त्यावर जगाचीं चक्रें फिरत आहेत. एखाद्या कारखान्यांत तुम्हांला सहस्र चक्रें फिरतांना दिसतील. त्यावर शेंकडों यंत्रें चाललेलीं आढळतील. पण हीं लहानमोठीं चक्रें व यंत्रें फिरवणारें भलेमोठें एक चाक असतें तें मूळ यंत्राशीं जोडलेलें असतें. या चाकावरून जो पट्टा येतो तो सर्वांना गति देतो. सृष्टिव्यापाराचें असेंच नसेल का? सूर्याचे उदयास्त वेळच्या वेळीं व्हायचे; चंद्राची एक एक कला वाढत जायची आणि पूर्णबिंब झाल्यानंतर क्रमानें एक एक कला कमी होत यायची; समुद्र तापून त्याचे ढग व्हायचे आणि त्यांनीं पाऊस पाडून शेतें पिकवायचीं; मनुष्य व इतर प्राणी यांना जन्म, तारुण्य, वार्धक्य व मृत्यु या अवस्थांतून जावें लागावयाचें; ठराविक ऋतूंत सृष्टीवर तेच रंग दिसायचे आणि रसायनांच्या मिश्रणांचे परिणाम ठरलेलेच व्हायचे; हलकी वस्तू वर जायची, हवेंत गेलेली वस्तू गति संपतांच खालीं पडायची;

पृथ्वी, ग्रह, तारे यांचीं परिभ्रमणें त्यांच्या कक्षांतून नियमित गतीनें व्हावयाचीं. अशा आश्चर्यकारक नियमबद्ध गोष्टी पाहिल्या म्हणजे सर्वांना कांहीं नियम लावून देऊन त्यांना व्यवस्थित वागायला लावणारी कोणी सर्वश्रेष्ठ शक्ति आहे असा विश्वास दृढ होतो. गांधीजींसारखे महात्मे याच विश्वासांतून आपलें नीतिशास्त्र निर्माण करतात.

" धर्माची शेवटची व्याख्या म्हणजे ' धर्म हा देवाचा कायदा आहे ' ही होय. या ठिकाणीं देव आणि त्याचा कायदा हीं एकरूपच आहेत म्हणून देव हें न बदलणारें असें चैतन्यमय सत्य आहे. खरोखरी त्याचा शोध कोणाला लागला नाहीं. परंतु अनेक अवतार व साधू हे वेळोवेळीं उत्पन्न होऊन आपल्या तपस्येनें त्यांनीं त्या शाश्वत धर्माची ( ईश्वराची ) थोडीशी ओळख करून दिली आहे. आपल्यापैकीं प्रत्येकानें शुद्ध होऊन आपलीं अंतःकरणें निर्मल करून ( परमेश्वरी साक्षात्कारासाठीं ) तयार होऊन राहायचें हा त्यांचा आदेश आहे. " असें गांधीजींचें सांगणें होतें.

आपण एखाद्या खेड्यांत गेलों आणि तेथील लोकांना विचारलें, ' तुमच्यावर कोण राज्य करतो ? ' त्यांना कांहीं या प्रश्नाचें उत्तर देतां येणार नाहीं. फार झालें तर ते सांगतील ' सरकार. ' कोणी सांगेल ' मंत्री. ' हें 'सरकार' अथवा हा ' मंत्री ' त्यांनीं कधीं पाहिलेला नसतो. पण त्यावर त्यांची भक्ति असते. त्याचा कायदा मोडला तर आपणांला शिक्षा होईल अशी त्यांना सतत जाणीव असते. एखादे वेळीं कलेक्टर किंवा प्रांत येतो. मोठ्या समारंभानें त्याचें स्वागत होतें. ' सरकार ' किंवा ' मंत्री ' यांचे हे प्रतिनिधी आहेत अशी त्यांची खात्री असते. आणि म्हणून ' सरकार ' किंवा ' मंत्री ' यांना मान द्यायचा तसा ते या अधिकाऱ्यांना देतात. या खेड्यांतील भाविक जनांचें अनुकरण आपण केलें पाहिजे. सर्व जगच निर्माण करणारी शक्ति आपणांस कदाचित् कधींच दिसणार नाहीं. पण तिचे नियम आपण पाळले पाहिजेत. आणि वेळोवेळीं जे प्रेषित उदयाला येतात त्यांचा सत्कार आपण केला पाहिजे. कारण त्या अगम्य शक्तीचे हे लोक प्रतिनिधी आहेत. आपण तिचे नियम नीट पाळीत आहोंत कीं नाहींत हें पाहण्याकरितांच ते येथें अवतरले आहेत.

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
५३२३ नों. दि. १०१
वि. ... क. ...



गांधीजींची ही विचारसरणी प्राचीन अवतारवादाशीं तंतोतंत जुळणारी आहे. आपणांपासून परमेश्वर दूर आहे असें गांधीजी क्षणभरहि समजत नाहींत. त्याच्या सान्निध्यांतच आपण आपलें प्रत्येक कार्य करीत आहों ही त्यांची श्रद्धा असते. मुसलमानी धर्माचा संस्थापक महंमद शत्रूंना चुकविण्याकरितां आड-रानानें जात असतां एका गुहेंत शिरला. बरोबर त्याचा एकनिष्ठ अनुयायी अबूबकर काय तो होता. गुहेच्या एकांतांत अबूबकर जरा घाबरल्यासारखा झाला. तो महंमदाला म्हणाला, ' हजरत, आपण दोघेच या ठिकाणीं आहोंत' महंमदानें निश्चयी स्वरांत म्हटलें, ' तिसराहि एक आहे. '

' कोण ? '

' अल्ला. ' या उत्तरानें अबूबकरला समाधान वाटलें. असें सांगतात कीं महंमदाचे शत्रू त्याच बाजूनें जात होते. इतक्यांत एका कोळ्यानें गुहेच्या तोंडाशीं झपाट्यानें जाळें विणिलें. शत्रू गुहेजवळ आले तेव्हां गुहेंत महंमद आहे कीं काय अशी त्यांना शंका आली. पण गुहेच्या तोंडावरचें कोळ्याचें जाळें पाहून त्यांनीं स्वतःच त्या शंकेचें निरसन केलें. महंमद आंत गेला असता तर हें जाळें तोडून त्याला आंत जावें लागलें असतें. तें शाबूद आहे त्या अर्थी महंमद आंत शिरलेला नाहीं असें त्यांच्या मनाला ठाम वाटलें. आणि ते निघून गेले ! हा पुढील चमत्कार जरी बाजूला ठेवला तरी महंमदाच्या अढळ परमेश्वरनिष्ठेचें उदाहरण ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. आपल्याकडील साधुसंत याच विश्वासावर आपल्या जीवनांतला प्रत्येक क्षण काढतात.

" झाड लोट करी जनी । केर काढी चक्रपाणि " ॥

हे उद्गार हाच विश्वास दर्शवितात. आपल्या जीवनांतले रोजचे व्यवहारदेखील परमेश्वराच्या साह्यानेंच होतात.

पण एकदां ही श्रद्धा बाळगली कीं संपलें असें गांधीजी समजत नसत. या श्रद्धेपासूनच कर्तव्याला सुरुवात होते. सर्व ठिकाणीं, सर्व प्राणिमात्रांत परमेश्वर आहे असें पटलें कीं सर्व प्राणिमात्रांचा परामर्श हीच परमेश्वराची सेवा हें ओघानेंच येतें. मी आपला एकटा सदाचारी राहीन आणि मोक्ष मिळवीन या कल्पनेला गांधीवादांत स्थान नाहीं. स्वतः तर धुतल्या तांदळा-सारखें निर्मळ आचरण पाहिजेच. पण भोंवतालीं असलेल्या पापाचें व

अन्यायाचें निर्मूलन करण्यास झटणें हेंहि आपल्या तपश्चर्येचें महत्त्वाचें अंग असलें पाहिजे.

" मी जितका अधिक शुद्धाचरणी असेन आणि जेवढ्या प्रमाणांत जगांतलें पाप नाहींसें करण्यास झटेन तेवढा मी परमेश्वराजवळ जाईन. " असें गांधीजी म्हणत.

खिस्ती पुराणांत एक कथा आहे. जगाच्या अंतीं परमेश्वर माणसांचा निवाडा करण्यास बसतो. एक एक माणूस पुढें येतो. एक धनिक, पुण्यवान् व कर्मठ म्हणून प्रसिद्ध असलेला माणूस देवापुढें येतो. प्रभु त्याला नरकाकडे घेऊन जाण्यास सांगतो. तेव्हां चकित होऊन तो म्हणतो, " प्रभो, माझ्या साऱ्या आयुष्यांत माझ्या हातून पापाचरण घडल्याचें मला आठवत नाहीं. मीं खूप दानधर्म केला, अनेक संस्था नांवारूपाला आणल्या...... "

आपल्या सत्कृत्याचा त्या माणसानें असा मोठा पाढा वाचल्यावर प्रभु म्हणतो, " अरे, तूं हे आपल्या दिखाऊ पुण्याचे पोवाडे गाऊं नको. तूं एकदां मला तुझ्या दारांतून हांकून लाविलेंस ! "

तो माणूस चकित होऊन विचारतो, " मी प्रभो ! आपणांला कसें घालवून देईन ? "

यावर प्रभूचें उत्तर पहा. " अरे, एकदां रात्रीं एक दीन, पंगु भिकारी तुझ्या दारीं आला होता. त्याला आश्रय न देता तूं हांकून लावलेंस ना ? त्याला हाकललेंस म्हणजे तूं माझीच दुर्दशा केलीस. जा ! तूं नरकाचा अधिकारी आहेस. " देवदूत त्याला घेऊन नरकाकडे जातात. नंतर दुसरा माणूस पुढें येतो. हा कांहीं पुण्यकृत्याकरितां मोठा विख्यात नाहीं. पण तो पुढें येतांच प्रभु मोठ्या आनंदभरानें म्हणतो, " अरे, तूं स्वर्गाचा अधिकारी आहेस. तूं माझ्याशीं किती उत्तम रीतीनें वागलास. " " प्रभू, आपली सेवा माझ्या हातून घडल्याचें मला तरी कांहीं आठवत नाहीं. " तो मनुष्य गांगरून जाऊन बोलतो ! तेव्हां प्रभु उत्तर देतो, " अरे, एकदां एका भुकेल्या अतिथीपुढें तूं आपलें ताट सरकाविलेंस. त्याची भूक तूं शांत केलीस हीच माझी सेवा. " ह्या माणसाला स्वर्गाचीं दारें खुलीं होतात.

परमेश्वराच्या सेवेविषयीं गांधीजींची कल्पना या खिस्ती पौराणिक कथेंत

अत्यंत सुंदर रीतीनें प्रतिबिंबित झालेली आहे. परमेश्वर हेंच एक सत्य किंबहुना परमेश्वर आणि सत्य हीं एकरूपच आहेत हा विश्वास; आणि त्या सत्यरूपी परमेश्वराजवळ जायचें म्हणजे आपलें जीवन अधिक शुद्ध करीत राहायचें आणि पापाचें निर्मूलन करावयास झटायचें हें ध्येय. माझ्या गांवांत कांहीं माणसांना गुरांसारखें वागविलें जातें, हा अन्याय आहे आणि परमेश्वर तर न्यायी आहे; तेव्हां गांवांतला अन्याय नाहींसा करायची प्राणपणानें खटपट करणें हीच माझी न्यायी परमेश्वराची आराधना कोणी कुणास लुबाडत असेल तर त्या असत्यवादाला विरोध करणें आणि त्यासाठीं वेळप्रसंगीं प्राणहि देणें हीच माझी देवपूजा, " देह जावो अथवा राहो । पांडुरंगीं दृढ भावो ॥ " ह्या ओळीचा अर्थ गांधीजींच्या तत्त्वाप्रमाणें घ्यावयाचा म्हणजे सत्यासाठीं शिर धडावेगळें झालें तरी होऊं द्यायचें असें होईल.

गांधीजी भक्त होते, पण जग सोडून दूर एकांतांत ब्रह्मानंदीं टाळी लावणारे विरक्त नव्हते. हें जग त्यांना परमेश्वरमय वाटे. आणि म्हणूनच सत्याची, न्यायाची जेथें जेथें अवज्ञा होईल तेथें तेथें धांवून जाणें व सत्य, न्याय पुनः प्रतिष्ठित करण्यास झटणें हाच खरा धर्म ते मानत. गांधीजींचा आस्तिकवाद दुबळा नव्हता; तो झुंझार होता; तो क्रांतिकारक होता. आत्म-शुद्धीपासून राष्ट्राच्या स्वातंत्र्यापर्यंत आणि कुटुंबापासून अखिल मानवजाती-पर्यंत सर्वांची उन्नति त्यांच्या ईश्वरप्रेमांत येते. आत्मशुद्धि ही प्राथमिक तयारी, सत्याचा शोध हें ध्येय, आणि लोकसेवा ही साधना हाच गांधीवाद.

o o o

### गांधी-सूक्ति

" प्रत्येक क्षण कामांतच गेला पाहिजे. एवढेंच कीं तें काम सात्त्विक असावें, सत्याकडे घेऊन जाणारें असावें. "

# यंत्रानें केलेला प्रलय : : १९

माणसानें आपल्या जीवनाचा सर्वांगीण विकास करून घ्यावा यासाठीं गांधीजींनीं कोणती अभ्यासपद्धति आदेशिली याचा आतांपर्यंत विचार केला. यांत समाजजीवनाचा स्पर्श सर्वत्र आहे. पण प्राधान्य व्यक्तिजीवनाला आहे. आतां समाजजीवनाला संपन्न करण्याचे कामीं गांधीजींनीं आपल्या अभिनव तत्त्वज्ञानांत कोणती योजना आंखली आहे याची चर्चा केली म्हणजे गांधीवादाचा संपूर्ण परिचय झाला असें आपणांला म्हणतां येईल.

कोणताहि नवा पंथ किंवा नवें तत्त्वज्ञान उदयाला येतें तें आपापल्या काळांतल्या उणीवा व गरजा नष्ट करण्याचें कंकण हातीं बांधून येतें. ब्राह्मणांचें वर्चस्व फार माजलें आणि यज्ञांतल्या हिंसेला चैनीचें स्वरूप येऊं लागलें तेव्हां भगवान् गौतम बुद्ध अवतरलेले आपणांला दिसतात, त्यांनीं वर्ण व यज्ञसंस्था यांविरुद्ध प्रचंड क्रांति केली. ज्यू लोकांनीं धर्मांत कर्मकांडाचा व समाजरचनेंत वरिष्ठ वर्गाचा बडिवार माजविला म्हणून प्रभु येशूनें ‘ देवाच्या राज्या ’ चा साधा व सर्वस्पर्शी संदेश दिला आणि बहुजनसमाजांत नवी चेतना आणली. गांधीजींनीं असें कोणाविरुद्ध बंड उभारलें ? गांधीवादांतला क्रांतीचा इषारा कोणाविरुद्ध आहे ? याचें एका शब्दांत उत्तर ‘ यंत्राविरुद्ध ’ असें देतां येईल. आतां यंत्राविरुद्ध एवढें रान उठविण्याची जरूरी या लोकोत्तर पुरुषाला कां वाटली याचा शोध नीट घेतला पाहिजे, तर-नव्हे तरच गांधीजींच्या एकंदर आदेशांतील सूक्ष्म संगति लक्षांत येईल.

यंत्र-संस्कृतीचा उदय आणि विकास युरोपमध्यें झाला. माणसानें निसर्गावर हळूं हळूं प्रभुत्व बसविण्यास सुरुवात केल्यानंतर निसर्गशक्तींना आपल्या सुखासाठीं राबविण्याचा हव्यास माणसांना सुटला. घोड्याच्या गाडीऐवजीं स्टीम एंजिनें आलीं आणि ताशीं वीसपंचवीस मैल वेगानें माणसाला जातां येऊं लागलें. पण त्यांत हरतऱ्हेच्या सुधारणा करून माणूस वेग वाढवूं लागला.

पुढें वीज आली, स्थळांवर आणि जळावर यंत्राच्या जोरावर संचारितां येऊं लागतांच अंतराळांत विहार करण्याची कल्पना व्यवहारांत आणण्यासाठीं माणूस झटूं लागला, आणि त्यांत तो यशस्वीहि झाला! विमानांतहि जास्तींत जास्त सुखसोयी कशा निर्माण करतां येतील याची त्याला सारखी चिंता वाटूं लागली. ऐंद्रिक सुखाचें कोड पुरविण्यासाठीं नवे नवे पदार्थ, अधिक तलम कपडे व सुंदर वस्तु कशा करतां येतील या महत्त्वाकांक्षेनें मनुष्याला घेरून टाकिलें. आपण अधिक संपन्न व्हावें व अधिक भौतिक सुखें मिळवावीं यासाठीं मनुष्य आपली सारी प्रतिभा खर्च करूं लागला.

अर्थात् नवे पदार्थ निर्माण करावयाचे म्हणजे कच्चा माल पुष्कळ प्रमाणांत पाहिजे. तो सर्वच कांहीं स्वदेशीं मिळणें शक्य नाहीं! मग 'चला इतर संपन्न देशांत आणि करा त्यांना अंकित!' हें आक्रमणाचें धोरण ओघानेंच आलें. कारखान्यांच्या बकासुराची भूक मोठी विलक्षण! त्याला सतत खाद्यपेयांचे डोंगर पाहिजेत! मग जेथें कारखाने नाहींत अशा देशांत जाऊन तेथें सत्ता स्थापायची, कच्च्या मालाची पद्धतशीर लूट करून आणायची आणि बकासुराची भूक भागवायची हा प्रकार सुरू झाला! यालाच साम्राज्य-शाही हें नांव पडलें. ही भांडवलशाहीची पुढची पायरी म्हणतां येईल. भांडवलशाही आणि साम्राज्यशाही या दोन कृत्या जगभर थैमान घालूं लागल्या आणि त्यांच्या पायीं बेकारी, चढाओढ, उपासमार, पारतंत्र्य, गुन्हेगारी इ० संकटांचें थैमान सुरू झालें!

मनुष्य जास्तींत जास्त समर्थ व्हावा म्हणून त्यानें यंत्रें शोधून काढलीं. आपल्या इंद्रियांचें कोड पुरविणें हा एक त्याचा मुख्य उद्देश होता. पण सारें गाडें उलटलें! यंत्रामुळें पुष्कळ माणसांचें काम थोड्या माणसांना करतां येणें शक्य झालें. यायोगें काय झालें? जीं माणसें बेकार होऊन पडलीं, त्यांना खाण्याची भ्रांत पडली. उपासमारीचें प्रमाण बेसुमार वाढलें. हजारों माणसांना उद्यांची शाश्वति उरली नाहीं. कमींत कमी पैशांत माल निर्माण करावयाचा म्हणजे मजूर जितक्या हलक्या मजुरीवर मिळतील तितके भांडवलवाल्यांना फायदेशीर होतें. अर्थात् बेकारी जितकी वाढेल, जितके लोक अधिकाधिक कंगाल होतील तितके कमी रोजमुऱ्यावर मजूर मिळणें भांडवलवाल्यांना शक्य होणार. म्हणूनच लोकांत कायमची बेकारी ठेवणें हा भांडवलशाहीच्या कार्यक्रमांतला

एक भाग होऊन बसला. आणि मग म्हणतात ना बुभुक्षित मनुष्य कोणतें पाप करीत नाहीं ! खायलाच मिळेनासें झालें म्हणजे आततायी मार्गाचा मनुष्य अवलंब करतो, लाचारी पत्करतो. गुन्ह्यास प्रवृत्त होतो. म्हणजे यंत्रांनीं बेकारी आणली आणि बेकारीनें माणसांचा नैतिक ऱ्हास होऊं लागला !

आतां जीं थोडीं माणसें आपल्या सुदैवानें यंत्राच्या कामावर गुंतलीं गेलीं त्यांना तरी खरें सुख मिळतें का ? मुळींच नाहीं. त्यांचें मन व शरीर यांत्रिक जीवनांत पिळलें जाऊन निःसत्त्व होतें. कारखान्यांतल्या प्रचंड यंत्रांतला एक भाग एवढेंच माणसाला अस्तित्व उरतें. सारखें एकाच पद्धतीचें काम करावें लागल्यामुळें मज्जातंतू क्षीण व विकृत होतात. " मॉडर्न टाइम्स " म्हणून एक प्रख्यात चित्रपट आहे. अमेरिकेचा उदारमतवादी व प्रतिभासंपन्न नट चार्ली चॅपलिन् यानें तो काढला. विनोदी घटनांतून चालू परिस्थितींतल्या दंभावर खुमासदार टीका करावयाची आणि अखेर मानवतेचा संदेश मनावर ठसेल असें कथानकाचें पर्यवसान करायचें अशी अलौकिक कला चार्ली चॅपलीन्नें अनेक चित्रपटांत प्रकट केली आहे. " मॉडर्न टाइम्स " ( आधुनिक काळ ) या चित्रपटांत तर या कलेचा परमोत्कर्ष साधला आहे. यंत्रामुळें माणुसकीचा व गरिबांच्या सुखाचा घात कसा होतो याचें सुंदर चित्र या चित्रपटांत आहे. या चित्रपटांत चार्ली एका कारखान्यांत कारागीर म्हणून राहतो. समोरून वेगानें चाललेल्या पट्ट्यांतले स्क्रू हातांतील पान्ह्यानें पिळत राहणें एवढेंच काम त्याला असतें. हें काम तासन्‌तास करीत राहिल्यानें त्याच्या मनांतले दुसरे विचार नाहींसे होतात आणि हाताला तर स्क्रू पिळल्याशिवाय दुसरा इतर चाळाच उरत नाहीं. कारखान्यांतून बाहेर पडल्यावर जो कोणी भेटेल त्याचें नाक, कान, बटन, हातांचीं बोटें इ० पिळण्याचा प्रयत्न करीत चार्ली वाट चालत असतो. यांतला अतिशयोक्तीचा भाग वगळला तरी पण त्यांतली विदारक टीका खरीच आहे ! यंत्रामुळें माणसाच्या जीवनाला कंटाळवाणा एकांडेपणा येतो आणि त्याचे मज्जातंतु कमजोर होतात. टांचण्यांच्या कारखान्यांत टांचण्यांच्या डोक्यांना झिलई देण्याचें काम स्त्रिया करतात. एका सेकंदांत अनेक टांचण्यांचीं टोंकें झिलईदार करायचीं असतात. दररोज अशा हजारों टांचण्यांना झिलई देण्याचें तेंच तें काम अविश्रांत केल्यानें या

स्त्रियांना पुढें पुढें फेंपरें येऊं लागतें. किंवा त्या वेड्या होतात असें अनुभवाला आलें आहे. यंत्रबद्ध जीवन म्हणजे नीरस कंठाळीपणा, रुक्ष पुनरुक्ति !

सुखोपभोगाचे पदार्थ व सोयी विपुल प्रमाणावर निर्माण करावयाच्या ही यंत्रांची प्रतिज्ञा होती. पदार्थांचे पर्वतप्राय ढीग पडले, पदार्थांचा दर्जा व मुलायमपणा फारच सुधारला. सुखसोयींची समृद्धि झाली. पण या सर्व सुधारणांचा फायदा मात्र फारच थोड्यांना मिळाला.अजूनहि यंत्रसंस्कृतीनें निर्मिलेलें ऐश्वर्य फार थोड्यांच्या वांट्याला येत आहे. इतर बहुसंख्य जनता आपली जीवनयात्रा रखडपट्टीनेंच चालवीत आहे. या दुर्दैवी जीवांची आणि त्यांच्या हालअपेष्टांची संख्या उलट वाढतच आहे. मोटारी, सुंदर घरें, खाद्य वस्तु, रामबाण औषधें, एअर कंडिशन्ड डबे, शस्त्रक्रियेच्या सोयी, इ० सुधारलेल्या जगतांतील अनेक गोष्टी गरिबांच्या कितीतरी आटोक्याबाहेर आहेत. अल्पसंख्य लोकांना या सुखसोयी मिळतात आणि त्यासाठीं अगणित जनतेला आपल्या प्राथमिक गरजा म्हणजे अन्नवस्त्र व घरदार याहि पुरविणें कठीण होऊन बसतें !

आणि याचें अगदीं साधें कारण म्हणजे यंत्रानें सुरू झालेल्या चढाओढींत बहुसंख्य माणसांच्या सुखाचा विचार नाहीं. मालांचे प्रचंड पर्वत, त्यांचें केंद्रीकरण, चढाओढ ह्या नादांत यंत्रसंस्कृति गुंग असते. ' डंपिंग ' नांवाचा जो अमानुष व्यापारी प्रकार आहे तो यंत्रसंस्कृतीच्या क्रूरपणाचा एक नमुना म्हणून सांगतां येईल. किंमतीचें प्रमाण खालीं उतरूं नये म्हणून कच्चा अथवा पक्का माल कांहीं प्रमाणांत नासून टाकणें याला 'डंपिंग' म्हणतात. असें सांगतात कीं पाश्चात्य देशांतील कित्येक शहरीं दूध वाजवीपेक्षां अधिक स्वस्त होऊं नये म्हणून हजारों मण दूध नदींत लोटून देतात ! आणि दूध न मिळाल्यानें गरिबांचीं अगणित अर्भकें मृत्युमुखीं पडतात किंवा जरत्कारूच्या दशेला पोंचतात ! ! आमच्या इकडे सुद्धां यंत्रानें जेथें आपला अंमल बसविला आहे तेथें कापसांच्या गांठींना आगीच्या भक्ष्यस्थानीं टाकण्याचा छुपा पराक्रम गाजविण्याचे प्रकार घडतात ! आणि देशांत केळीच्या सोपटांनीं किंवा प्रेतावरच्या वस्त्रांनीं लज्जारक्षण करण्याचा अनवस्था प्रसंग गरीब रयतेवर येत आहे ! कोण ही भेसूर विषमता ! माणुसकीची कोण ही क्रूर पायमल्ली !

यंत्रसंस्कृतीनें माणसांचें सुख अतोनात वाढविण्याचा संकल्प सोडला होता त्याचें हें पर्यवसान झालें. तिच्या आणखी एका प्रतिज्ञेची काय वासलात लागली तें पाहूं. ती प्रतिज्ञा म्हणजे प्रत्येक माणसाला स्वातंत्र्य देण्याची. यंत्रसंस्कृतीच्या ध्वजावर 'लोकसत्तेचा विजय असो' हीं अक्षरें अगदीं सोनेरी वर्खानें प्रथम लिहिलीं होतीं. यंत्रसंस्कृतीचा अवतार येण्यापूर्वी बहुजनसमाज राजे व सरंजामी सरदार यांच्या गुलामगिरींत खितपत होता. त्याला या सरंजामशहांचे कष्ट उपसण्याखेरीज दुसरें भवितव्य नव्हतें. जन्मोजन्म सरंजामशाहीच्या हुकमतींत राहावें हाच त्याचा कंटाळवाणा कार्यक्रम होता. यंत्राचे शोधक निघाले ते बहुजनसमाजांतले होते. त्यांच्या शोधांचा फायदा घेणारा महत्त्वाकांक्षी व्यापारी वर्ग पुढें येऊं पाहात होता. या व्यापारी वर्गाच्या मनांत यंत्राच्या साह्यानें प्रचंड उत्पादन करावें, तें सगळ्या जगांत पसरावें आणि बाजारपेठा काबीज करून समाजाचें व राष्ट्राचें नेतृत्व घ्यावें अशी प्रबळ महत्त्वाकांक्षा निर्माण झाली होती. जे सरंजामशहा शेतीच्या उत्पन्नावर वंशपरंपरेनें वतनदारी भोगत होते त्यांना या महत्त्वाकांक्षी व्यापारी वर्गाच्या उदयामुळें धास्ती उत्पन्न झाली. माणुसबळावर करावयाच्या शेतीच्या उत्पन्नाला केव्हांहि मर्यादा असतात. अमुक एका रेषेच्या वर तें वाढूं शकत नाहीं. पण याच शेतांत कारखाने निघाले किंवा शेतीचा कारभार यंत्रानें ताब्यांत घेतला कीं मग उत्पन्न किंवा पैसा बेसुमार मिळूं लागतो. शेती किंवा व्यापार यंत्रकुशल व्यापाऱ्यांच्या ताब्यांत जायचा म्हणजे सरंजामदारांचें वर्चस्व व वैभव संपुष्टांत आलें हें निश्चितच! कारखान्यांत मजुरी जास्त मिळते म्हणून शेतांतला मजुर तिकडे जाणारच! सरंजामशहांना हें भय वाटूं लागलें म्हणून त्यांनीं नव्या व्यापारी वर्गाला म्हणजे नव्या येऊं घातलेल्या यंत्रसंस्कृतीला कडाक्याचा विरोध केला. मध्ययुग संपण्याच्या वेळचे इंग्लंड-युरोपचे इतिहास जर आपण पाहिले तर राजा व त्याचे सरदार हे एका बाजूला आणि यंत्रकुशल व्यापारी वर्ग दुसऱ्या बाजूला असे लढे राष्ट्रोराष्ट्रीं चाललेले तुम्हांला दिसतील. अर्थात् या लढ्यांत राजे–सरदारांच्या विरुद्ध व्यापारी वर्गाला मदत पाहिजे होती. व्यापाऱ्यांनीं पाहिलें कीं बहुजनसमाज सरंजामशाहीच्या पिळवणुकीनें भयंकर गांजला आहे; त्याला सुस्थित व स्वतंत्र करण्याचें आश्वासन दिलें कीं त्याची लढाऊ शक्ति आपणांकडे येईल. म्हणून

या महत्त्वाकांक्षी वैश्यांनीं लोकशाहीचा जयजयकार केला. जनतेला आपल्या दास्यविमोचनाचा दिवस जवळ येऊन ठेपला असा आनंद झाला. आणि ती वैश्यांच्या लढाऊ पथकांत सामील झाली. अशा रीतीनें वैश्यांना म्हणजेच यंत्रसंस्कृतीला लोकांचें साह्य मिळालें आणि त्यामुळें राजे-सरदारांचा तिला सहज मोड करतां आला. यंत्रसंस्कृतीनें सरंजामशाही नेस्तनाबूत केली आणि नव्या लोकसत्तेच्या युगाचा पाया घातला. ' समता, बंधुता, व्यक्तिस्वातंत्र्य ' इ० उदार शब्दांचे पडसाद सर्वत्र घुमूं लागले.

पण सरंजामशाही नष्ट करण्याचें कार्य संपल्यावर हळूं हळूं महत्त्वाकांक्षी यंत्रपूजक वैश्यांचा खरा अवतार प्रकट होऊं लागला. जनतेंतल्या प्रत्येक घटकाला जें स्वातंत्र्य मिळालें होतें तें केवळ राजकीय होतें. पैशाच्या दृष्टीनें मोठा समाज गुलामच राहिला. सरंजामशाहीची जी सत्ता होती ती जाऊन भांडवलशाहीची आली एवढेंच काय तें! पण प्रत्येक मनुष्याला अर्थसंपादनाचें स्वातंत्र्य मिळेनासें झालें. आपल्या राक्षसी महत्त्वाकांक्षेच्या पूर्तीसाठीं नवे उद्योग काढणें, जुने बंद पाडणें, आपल्यास हव्या त्या वस्तु ( जनतेच्या गरजा लक्षांत न घेतां ) उत्पन्न करणें, बेकारी माजविणें इ० प्रकार करून मूठभर भांडवलवाल्यांनीं राष्ट्राचे अर्थव्यवहार आपल्या मर्जीप्रमाणें सुरू केले. लोकशाहीचें स्वरूप दिखाऊ होतें. कारण पक्ष किंवा पक्षनेते द्रव्याच्या जोरावर निर्माण करून आणि गरीब जनतेचीं मतें विकत घेऊन आपल्या मर्जीप्रमाणें वागणारें ' लोकनियुक्त ' सरकार अधिकारावर आणणें हा भांडवलवाल्यांच्या हातचा मळ होऊन बसला. या सरकारला इतर देशांवर आक्रमण करायला लावून भांडवलशाहीनें साम्राज्यशाहीचा मांड मांडून दिला.

नुसता अधिकार असून भागत नाहीं; तो वापरण्याची ताकदहि अंगीं आली पाहिजे. एक मोठा मासा होता आणि एक लहान मासा होता. लहान मासा मोठ्या माशाला म्हणाला, " काय रे, तूं मला खाऊन टाकणार हा अन्याय नाहीं का? " मोठा मासा म्हणाला, " नाहीं रे! मी समान संधीचा भोक्ता आहें. मी तुला संधि देतों. हा मी तुझ्यापुढें उभा आहें. खा मला. " लहान मासा भोळसर होता. त्यानें मोठ्या माशाला गिळण्याचा प्रयत्न केला. पण त्याच्या चिमुकल्या तोंडांत एवढें धूड कसें येणार? त्याचा प्रयत्न निष्फळ झाला. मग लगेच मोठा मासा म्हणाला, " आतां माझी

पाळी. तुला मी अगोदर संधि दिली होती. मी अन्याय केला असें तुला म्हणतां येणार नाहीं. " आणि मोठ्या माशानें लहान माशाला गट्ट करून टाकलें !! या रूपककथेवरून एक गोष्ट स्पष्ट होते कीं प्रत्येक माणसाला केवळ समान संधि किंवा व्यक्तिस्वातंत्र्य या गोष्टी मिळाल्या आणि अर्थोत्पादनाची शक्ति जर त्याच्या जवळ नसली तर या गोष्टीची मातब्बरी मुळींच नाहीं. यंत्र-संस्कृतीनें माणसांना लोकसत्ता दिली, पण अर्थस्वातंत्र्य मात्र दिलें नाहीं. म्हणूनच त्या लोकसत्तेचा शेवट माणसांच्या दुर्दशेंत झालेला आपणांला दिसतो आहे !

आतां एका गोष्टीचें स्पष्टीकरण मात्र अवश्य केलें पाहिजे. ज्या प्रतिभा-शाली मंडळींनीं निसर्गाचे गूढ व्यापार आपल्या बुद्धिबलानें शोधून काढले त्यांच्याशीं यंत्रानें केलेल्या प्रळयाचा संबंध नाहीं. ते लोक शुद्ध ज्ञानाच्या मागें लागलेले सिद्ध पुरुष होते. आकाशाकडे दुर्बिणी लावून रात्रीच्या रात्री खगोलशास्त्रांतलीं तत्त्वें हुडकून काढण्याचा प्रयत्न करणारे संशोधक केवढे योगी ! आपल्या प्रयोगशाळेंत दिवसच्या दिवस स्वतःला कोंडून पदार्थ-विज्ञानाचा किंवा रसायनाचा एखादा सिद्धांत शोधण्यासाठीं तहानभूक विसरून झटणारे वैज्ञानिक द्रष्टे ऋषिच नव्हेत काय ? ज्ञानासारखें पवित्र जगांत दुसरें कांहीं नाहीं. ( **न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते** ) हाच त्यांचा श्रेष्ठ मंत्र होता. चढाओढीसाठीं किंवा व्यापारासाठीं त्यांनीं आपलें संशोधनकार्य खासच चालविलेलें नव्हतें. ज्ञानाइतकीच मानवतेच्या विकासाची आंच त्यांना होती. त्यांची प्रेरणा फार उच्च होती. डायनामेट ज्यानें शोधून काढला त्याला पर्वताचें कठीण अंतःकरण द्रवावें, त्यांत पाणी सांपडावें, किंवा त्यांतून पलीकडील देशांतल्या मानवसमाजाशीं दळणवळण करण्यास वाट मिळावी असें वाटत होतें. अंतरिक्ष-भ्रमणाचा आनंद मिळावा किंवा दूरचे देश जवळ यावे हा विमानाच्या शोधांत हेतु होता. असे इतरहि शोध सद्धेतूनें काढले गेले.

पण आज डायनामेटचा उपयोग लोकांचीं निवासस्थानें उध्वस्त करण्या-कडे होतो ! विमानें दुसऱ्याच्या प्रदेशांत जाळपोळ करण्यासाठीं आपली शक्ति वेंचतात ! विजेनें आपलीं घरें उजळण्याऐवजीं दुसऱ्याचीं घरें जमीनदोस्त करण्याकडे तिचा अधिक उपयोग होतो ! म्हणजे मूठभर ऋषितुल्य संशोधकांनीं

उपलब्ध करून दिलेलें ज्ञान माणसांनीं आपल्या राक्षसी स्वार्थाकरितां सर्रहा वापरलें आहे. इतकेंच नव्हे, तर संहाराचीं व प्रळयाचीं शस्त्रास्त्रें अधिकाधिक प्रबळ व प्रखर कशीं होतील, यासाठीं संशोधन सुरू आहे. आगलावे बॉंब निघाले कीं त्यांना सव्वाशेर म्हणून किंचाळणारे बॉंब आले! आणि अणु-बॉंबनें तर प्रळयच केला!! त्याचा काका हैड्रोजन बॉंब आतां येत आहे. दुसऱ्यावर यशस्वी आक्रमण कसें करतां येईल व आपल्या तिजोऱ्या व कोठारें कशीं भरतील या विवंचनेनें माणसांचे वैज्ञानिक व्यापार होऊं लागले.

आणि याचें कारण अगदीं सहज कळण्यासारखें आहे. यंत्रानें प्रचंड सामर्थ्य निर्माण केलें, जगाला पालाण घालण्याची शक्ति माणसांचे हातीं आली. पण ती समतोलपणें व न्यायीपणें वापरण्याइतकी माणसाची मानसिक संस्कृति वाढली नाहीं. आंतरराष्ट्रीय दळणवळणाचीं साधनें निघालीं, सुखाच्या सोयी आल्या. पण हीं साधनें व या सोयी वापरण्याइतकें माणसाचें मन मात्र मोठें झालें नाहीं. त्यामुळें यंत्रसंस्कृतीच्या आरंभीं कांहीं द्रष्ट्यांची जी शुद्ध ज्ञानाची भूमिका होती ती सुटून तिची जागा अफाट स्वार्थबुद्धीनें घेतली. कांहीं वतनदार व महत्त्वाकांक्षी मनुष्यसमूहांच्या मनोरथाला इष्ट स्थळीं नेण्याचे कामीं विज्ञानशास्त्रांना जुंपण्यांत आलें! नेमकें हेंच लोकसत्तेचे बाबतींतहि झालें! पहिल्या विज्ञानपंडितांप्रमाणें लोकसत्तेचे अध्वर्यु हेहि श्रेष्ठ हेतूनें प्रेरित झाले होते. प्रत्येक माणूस स्वतंत्र असावा, त्याच्या विकासाला पूर्ण संधि असावी हें या अध्वर्यूंना तळमळीनें वाटत होतें. पण स्वार्थी व साहसी माणसांनीं न्यूटन, एडिसन्प्रभृति शास्त्रज्ञांच्या शोधाचा जसा दुरुपयोग केला तशींच रूसो वगैरे लोकसत्तावाद्यांचीं स्वप्नेंहि त्यांनीं धुळीला मिळविलीं!

यामुळेंच आज जग हें दैन्य, आक्रमण, हिंसा, अस्थैर्य, अन्याय इ० चें भेसुर क्रीडास्थान होऊन बसलें आहे. यंत्रसंस्कृतीनें केलेल्या प्रळयांतून मनुष्य-जात वांचविण्यासाठीं कांहीं नवे प्रयत्न, नव्या योजना, नवे पंथ निघत आहेत. म. गांधींनीं प्रवर्तित केलेली विचार–आचार–पद्धति ही याचपैकीं एक होय. 'गांधीवाद' या नांवानें ती ओळखली जाते. तिची शक्ति किती अमोघ आहे याचा प्रत्यय येण्यास आजच्या युगांतील तिच्या प्रतिस्पर्धी योजनांची व पंथांची माहिती आपण करून घेतली पाहिजे.

० ० ०

## कांहीं क्रांतिकारी व सुधारणावादी योजना : : २०

'खडूची कांडी' या विषयावर एका इंग्रज लेखकानें एक मजेदार गुजगोष्ट लिहिली आहे. पांढरा रंग हा इतका विपुल आणि आपल्या रोजच्या परिचयाचा असतो कीं, त्याला कांहीं स्वतंत्र अस्तित्व असेल अशी कल्पनाच आपणांला नसते असें हा लेखक म्हणतो. जो काळा नाहीं, जो तांबडा नाहीं किंवा जो अमुक नाहीं तो पांढरा रंग असें आपणांला वाटत असतें. याविषयीं आपली फजिती झाल्याची हकीकत सदर लेखकानें वरील गुजगोष्टींत मोठ्या गमतीदार पद्धतीनें सांगितली आहे. तो म्हणतो, "मला थोडा चित्रकलेचा नाद आहे. एकदां सायंकाळीं सूर्यास्ताचा देखावा रंगवायला मी समुद्रकांठीं टेकडीवर जाऊन बसलों. तपकिरी रंगाच्या ड्रॉइंग पेपरवर मी कांड्यांच्या रंगांनीं देखावा चित्रित करणार होतों. काळा, निळा, तांबडा, हिरवा इ० सर्व तऱ्हेच्या कांड्या मीं बरोबर घेतल्या होत्या. पण किरणांची चकाकी, लाटांचा फेस इ० रंगविण्यासाठीं पांढऱ्या रंगाची कांडी पाहूं लागलों तेव्हां ती मात्र दिसेना! मला कळून चुकलें कीं, पांढरा हा एकादा स्वतंत्र रंग आहे ह्याची जाणीवच मला नव्हती. पांढरा रंग मी गृहित धरूनच चाललों होतों. पण इतर रंगांशीं गांठ पडली तेव्हां पांढरा हा एक स्वतंत्र रंग आहे, हें मला कळून चुकलें."

गांधीजींच्या उपदेशाचें अगदीं असेंच झालें आहे. गांधीजी सांगत त्या गोष्टींबद्दल दोन गैरसमज अगदीं दृढमूल झालेले आहेत. एक, पांढरा रंग म्हणजे जसें काळ्या, निळ्या इ० रंगांचा अभाव असें आपण समजतों तसें संचय, हिंसा इ० गोष्टींची गैरहजेरी एवढेंच गांधीजींच्या शिकवणीचें वैशिष्ट्य आपणांस वाटतें. दुसरें, वर सांगितलेल्या लेखकानें जसें पांढऱ्या रंगाचें अस्तित्व मुळांतच आपल्याजवळ असलें पाहिजे असें न कळत मानून घेतलें तसें गांधीजी सांगत तें इतकें साधें आहे कीं तें अगोदरच हस्तगत

आहे असा आपला ठाम ग्रह असतो. पण गांधीजींची शिकवण केवळ नकारांची नाहीं अथवा विनासायास त्यांतलें कांहीं अगोदरच प्राप्त झालें आहे अशीहि स्थिति नाहीं. हवा अथवा प्रकाश इतकें अहिंसेचें व्यापकत्व गांधीजी गृहित धरीत हें खरें. पण गांधीजींना मानवी जीवनाचा विकास ज्या पूर्णतेपर्यंत व्हावा असें वाटतें तीपर्यंत तो होण्यास ह्या अहिंसेला व्यवस्थित स्वरूप देण्यासाठीं मानवजातीला झटावें लागेल. वैयक्तिक व सामुदायिक शिस्त आमरण पाळावी लागेल. गांधीजींचें तत्त्वज्ञान असें भावात्मक (Positive) आहे. यंत्राच्या प्रलयांत सांपडलेल्या मानवजातीच्या उद्धारासाठीं त्यांनीं प्रवर्तित केलेली आचारपद्धति निश्चित स्वतंत्र आहे. यंत्राचे दुष्परिणाम टाळायचे तर यंत्रांपासून केवळ विन्मुख होऊन भागणार नाहीं, एका सहकार्याच्या तत्त्वावर व अहिंसेवर आधारलेली नवी समाजरचना उभी करावी लागेल हें गांधीजींनीं आपल्या प्रतिभाबलानें दाखविलें आहे.

तुलना ही ज्ञान होण्याच्या दृष्टीनें फार प्रभावी ठरते, नाहीं ? आरंभीं ज्या गुजगोष्टीचा उल्लेख केला तींत लेखकानें इतर रंगांचा मागोवा घेतच पांढऱ्या रंगाचें स्वतंत्रपण सिद्ध केलें ! यंत्राच्या प्रळयावर गांधीजींनीं कोणता उपाय सांगितला हें नीट कळण्यास तर याच हेतूनें निघालेल्या प्रमुख पंथांची माहिती अगोदर होणें इष्ट होईल. कारण, त्यांच्या काळ्या, गुलाबी, तांबड्या पार्श्वभूमीवरच गांधी–तत्त्वप्रणालीची शुभ्र मूर्ति अधिक खुलून दिसेल.

यंत्रानें भांडवलशाही निर्माण केली आणि तिनें आपल्या राक्षसी प्रतिस्पर्धेनें बेकारी, उपासमार यांचीं भुतें उठविलीं. या भुतांना थोडें फार संतुष्ट केलें नाहीं तर हीं भुतें आपल्यालाच गिळंकृत करतील अशी भीति भांडवलशाहीला वाटूं लागली. हीमधूनच 'नाझीवाद' अथवा 'फासीवाद' जन्माला आला. राष्ट्रांतील बेकारी घालविण्यासाठीं हिटलरनें प्रचंड कारखाने काढले. पण त्यांत युद्धोपयोगी वस्तू व शस्त्रास्त्रें यांचेंच विशेष प्राबल्य राहिलें. खाजगी मालकी नियंत्रित झाली, पण नष्ट झाली नाहीं. राष्ट्र-सत्तेपुढें व्यक्तिस्वातंत्र्य साफ नाहीसें झालें. वंशाभिमान व राष्ट्राभिमान यांचा इतका भयंकर पारा चढला कीं ज्यूसारख्या सुसंस्कृत व संपन्न जातीच्या रक्ताचे पाट जर्मनींत वाहूं लागले. हिंसावृत्तीचा प्रळय झाला आणि अखेर जगाला युद्धाच्या खाईंत लोटण्याचें महापातक शिरावर घेऊन आपला व आपल्या नेत्यांचा नाश नाझीवादानें

ओढवून घेतला. इटलीचें असेंच झालें आणि जपाननें आपली हुकूमशाही वृत्ति न सोडली तर असेंच होणार !

अमेरिका ही भांडवलशाहीची आवडती क्रीडाभूमि. तिथें तर भांडवलशाहीचे दुष्परिणाम फारच मोठ्या प्रमाणांत दिसूं लागले. तेव्हां स्वर्गवासी उदार अध्यक्ष रूझवेल्ट यांनीं 'न्यू डील' म्हणून एक योजना आंखली. पण ह्या योजनेंत क्रांतिकारकत्व असें कांहीं नव्हतें. भांडवलवाल्यांना अमर्याद होऊं लागलेला फायदा थोड्या फार प्रमाणांत राष्ट्राच्या तिजोरींत येऊन पडावा म्हणून वाढत्या उत्पन्नावर वाढते कर बसविण्याची क्लृप्ति या 'न्यू डील'-मध्यें सुचविण्यांत आली. कांहीं कामें नवीन काढण्यांत आलीं, तितकी बेकारी कमी झाली. कांहीं उत्पादनाची खरेदी–विक्री सरकार करूं लागल्यानें मालाच्या उठावांत थोडी स्थिरता आली. पण या सर्व खटाटोपाच्या मागें भांडवलशाही टिकविण्याची वृत्ति होती. भांडवलशाहीचा अडलेला गाडा सुरळीत चालावा एवढ्यासाठींच ही खटपट होती.

इंग्लंडमध्यें ' बेव्हरीज् ' योजनेसारख्या ज्या योजना निघाल्या त्याहि याच स्वरूपाच्या होत्या व आहेत. या योजनांत बेकारी नष्ट करण्याची व्यवस्था आहे. परंतु ती नष्ट करण्याकरितां मोठ्या प्रमाणावर विविध तऱ्हेचें उत्पादन करावें लागेल आणि तें बाहेरच्या जगांत खपविण्यासाठीं पाठवावें लागेल. इंग्लंडच्या सुदैवानें आफ्रिका, ऑस्ट्रेलिया, हिंदुस्थान इ० मोठ्या वसाहती त्याच्या हुकमतीखालीं आहेत आणि तेथील बाजारपेठा इंग्लंड अंकित ठेवूं शकतें. तेव्हां नव्या योजनेंत इंग्लंडांत जे नवे उद्योगधंदे निघतील त्यांनीं तयार केलेला माल या वसाहतींच्या माथीं मारणें इंग्लंडला शक्य आहे. पण अशा रीतीनें इतर बाजारपेठा इंग्लंडनें काबीज केल्या आणि स्वदेशांतली बेकारी कमी झाली तरी ज्या देशांतल्या बाजारपेठा इंग्लंडच्या मालांनीं भरून जाणार तेथल्या देशी उद्योगधंद्यांचें काय ? ते तर बुडणारच कीं नाहीं ? आणि ते बुडले कीं त्या त्या देशांत बेकारी अधिकच माजणार कीं नाहीं ? म्हणजे इंग्लंड स्वतःची बेकारी नष्ट करण्यासाठीं इतर देशांना बेकार बनविणार ! दुर्दैवानें इंग्लंडच्या या स्वार्थी धोरणाची झळ गेलीं शें दीडशें वर्षें या देशाला लागली आहेच, आणि आणखी नव्या रक्तशोषक योजना आंखून इंग्लंड हिंदुस्थानला अधिक कंगाल बनवील कीं काय अशी भीति वाटते ! असो. अशा रीतीनें

यंत्रानें केलेल्या प्रलयावर इंग्लंडनें जो तोडगा काढला त्यानें इंग्लंडचें थोडेफार भलें कांहीं दिवस होण्यासारखें असलें तरी त्यानें जगांत इतरत्र असंतोष वाढणार हें निश्चित आहे.

यंत्रानें उत्पन्न केलेल्या भांडवलशाही संस्कृतीचे भीषण दुष्परिणाम नष्ट करून ती संस्कृति आमूलाग्र बदलण्याचा फार मोठा यत्न रशियांत साम्य-वादानें केला. खाजगी स्वार्थासाठीं बेसुमार चढाओढ हें साऱ्या अनर्थाचें मूळ आहे हें रशियानें ओळखलें आणि खाजगी मालमत्ता अथवा मालकी संपुष्टांत आणली. लोकांच्या सुखाचा व गरजांचा विचार केला आणि दोन पंचवार्षिक योजना आंखून पुऱ्या केल्या. सर्व उत्पादन संयोजनपूर्वक केल्यानें आणि सरकारनेंच त्याची धुरा वाहिल्यानें भलती चढाओढ अथवा नासधूस झाली नाहीं. सोव्हिएट रशियांत सामान्य माणसाला नोकरीची व सुरक्षिततेची पंचाईत उरली नाहीं. जगांतला दलित व परतंत्र बहुजनसमाज या ‘लाल’ क्रांतीनें सानंद चकित झाला आणि रशियाला धन्यवाद देऊं लागला. त्यांतच नाझी राक्षसांचा निःपात करण्याचे कामीं रशियानें अतुलनीय त्याग व शौर्य प्रकट करून अपूर्व यश मिळविलें. त्यामुळें तर रशियाची लोकहितपर योजना ही एक जगाच्या कौतुकाचीं गोष्ट होऊन बसली.

पण भरती ओसरूं लागली म्हणजे खडक व गाळ दिसूं लागतो. रशियाच्या योजनेंतले धोके व उणीवा आतां हळूहळूं स्पष्ट होत आहेत. समाजवादानें खाजगी मालकीचें तत्त्व नष्ट केलें ह्या प्रगतीबद्दल मानवी इतिहास त्याला सदैव दुवा देत राहील. पण मागील शतकांत समाजवादाचा विकास कोणत्या पद्धतीनें होईल याचें भविष्य ज्या मार्क्सप्रभृति महर्षींनीं वर्णिलें त्यांचे शब्द खोटे पाडण्याची वेळ रशियानें आज आणली आहे! ‘एकदां वतनदार वर्गाकडून खाजगी मालमत्ता हिसकावून घेतली कीं लोकांना सामुदायिक सहकाराची संवय लागावी एवढ्यासाठीं कांहीं काळ कामगार–शेतकरी यांचें राज्ययंत्र राहणें अवश्य होईल; पण लौकरच त्याची पकड ढिली पडत जाऊन अखेर तें पूर्ण नष्ट होईल व समाजाचे कायदे–स्वयंस्फूर्तीनें पाळणारा बहुजन-समाज अस्तित्वांत येईल. अर्थात् हें एका राष्ट्रापुरतेंच न राहतां सर्व जगालाच असें स्वरूप येईल.’ समाजवादी क्रांतीची मार्क्सची कल्पना या प्रकारची होती.

पण समाजवादाची कर्मभूमि जी रशिया तिथें ही कल्पना कितीशी मूर्त

स्वरूपांत येत आहे हें पाहिलें तर निराशा वाटते. अगोदर आपली राजवट टिकविण्यासाठीं स्टॅलिननें केवढें हत्याकांड मांडलें! एका खुनासाठीं शेकडों लोकांना फांशी आणि हजारों लोकांना कडक शिक्षा! शूर मित्रांचे वध! व्यक्तिस्वातंत्र्य तर शून्याच्या अंशाखालीं उतरलेलें! भयंकर गुप्त पोलिसांचा सर्व देशभर संचार! म्हणजे राज्ययंत्राची पकड ढिली होऊन शासनमुक्त समाज निर्माण होत जाण्याऐवजीं राज्ययंत्र अधिकच भेसूर व राक्षसी बनत चालल्याचा देखावा तेथें आज दिसत आहे. हिंसेचा नंगानाच सुरू आहे.

आपला पंथ सर्व जगभर पसरून प्रत्येक राष्ट्रांतली वतनदारी नष्ट करण्याचा संकल्प रशियानें प्रथम सोडला होता. त्यावर आतां संपूर्णपणें हरताळ फांसण्यांत आला आहे. रशिया हें राष्ट्र, त्याचें अधिराज्य, त्याचें राष्ट्रगीत असा एक नवा राष्ट्राभिमान तेथें वाढत आहे. बरें, इतकें करून उत्पन्न व अधिकार यांच्या बाबतींत पूर्ण समता राहती तर रशियाचें हें विक्राळ राज्ययंत्र थोडें तरी सह्य झालें असतें. पण त्याहि बाबतींत तेथील लोकांची निराशाच झालेली आहे! श्रीमंत भांडवलदार व जमीनदार यांचा वर्ग नष्ट झाला हें खरें, पण यंत्रें चालविणारा वर्ग व उत्पादनाचें वांटप करणारा जो तज्ज्ञ व अधिकारी वर्ग तो राष्ट्राचा मालक बनला आहे. या लहानशा वर्गाचें उत्पन्नहि बहुजनसमाजाच्या मानानें खूप आहे. यंत्रें व राज्यव्यवस्था ही सर्व या वर्गाच्या हातीं आहे. अशा रीतीनें भांडवलशाही गेली आणि तिची जागा तिच्याच इतक्या अरेराव जुलमी तज्ज्ञसत्तेनें घेतली! बहुजनसमाज तसाच परस्वाधीन राहिला.

यंत्राच्या प्रळयांतून जगाला वांचविण्याचे हे प्रमुख पंथ व योजना आपण पाहिल्या. यांतले अनर्थ अगदीं उघड आहेत. रोग्याच्या वेदना थांबाव्यात म्हणून गुंगीचें औषध देतात तशी नाझीवादी योजना होती. तिनें वेदना कांहीं काळ थांबल्याशा वाटल्या तरी ती कृत्रिम व अघोरी पद्धति होती व तिचा दुष्परिणाम झालेला आज आपण पाहतोंच आहोंत. 'न्यू डील' किंवा 'वेव्हरीज् योजना' ही वरवरची मलमपट्टी किंवा अंजन होय. यांनीं किंचित् आराम वाटेल पण रोगाचें निर्मूलन मुळींच होणार नाहीं. रोगाचें स्थान कदाचित् बदलेल एवढेंच. समाजवाद हा जालीम व रामबाण उपाय आहे खरा. भांडवलशाही रोगाच्या मुळावरच त्यानें घाव घातला हें कांहीं खोटें

नाहीं. पण हा उपाय मोठा विषारी आहे. एका विषारी औषधानें शरीरांतील रोगाचें विष मरतें खरें. पण तिसरीच विकृति निर्माण होते, हा अनुभव कांहीं दुर्मिळ नाहीं ! कोयनेल प्रचंड प्रमाणांत घेतल्यानें हिंवताप जातो, पण पित्ताचा भडका उठतो हें आपल्या परिचयाचें आहे. समाजवादानें खाजगी संपत्तीचा स्वामी असलेला वर्ग नाहींसा केला पण नवीन तज्ज्ञांचा एक वर्ग उदयाला आणिला ! !

म्हणून यंत्राच्या प्रळयावर अशी योजना पाहिजे कीं जी मूळचीं संकटें तर नाहींशीं करीलच पण नवीन विघ्नें उत्पन्न होऊं देणार नाहीं. गांधीजींनीं उपदेशिलेलें अर्थशास्त्र हें कार्य करण्यास पूर्ण समर्थ आहे अशी आतां विचारी जगाची खात्री पटत चालली आहे. जग सुखी होण्यास मुख्यत: दोन गोष्टींची आवश्यकता असते. एक व्यक्तीच्या स्वातंत्र्याची पूर्ण हमी पाहिजे आणि दुसरें मानवी समाजांतीलसर्व घटकांचें एकमेकांशीं सहकार्य पाहिजे. गांधीजींच्या पद्धतींत या दोनही गोष्टींना योग्य तो मान देण्यांत आला आहे.

भांडवलशाहीनें व्यक्तिस्वातंत्र्य दिलें पण लोकांना तें वापरतां येईल अशी परिस्थिति उरूं दिली नाहीं. कारण संग्रह आणि त्यासाठीं हिंसा हीं भांडवलशाहीचीं मुख्य लक्षणें होतीं. म्हणूनच "अहिंसेशिवाय खरी लोकशाही अशक्य आहे." असें गांधीजींनीं म्हटलें. नाझीवादानें सामाजिक सहकार्याला प्रतिष्ठा दिली. पण ती देतांना जबरदस्त सक्ति केली आणि व्यक्तिस्वातंत्र्य पार मारून टाकिलें ! संग्रहाची वृत्ति मर्यादित केली परंतु ती समूळ नाहींशी करणें नाझीवादाला जमलें नाहीं. समाजवादानें संग्रहाला आळा घातला खरा, पण हिंसेचें थैमान तसेंच चालू राहिलें आणि व्यक्तीला राष्ट्राच्या चक्रांतल्या एकाद्या निर्जीव स्क्रूचें स्वरूप आलें. हे सारे अनर्थ टाळतां येतील हें गांधीजींनीं स्पष्ट केलें. व्यक्तीला विकासाची पूर्ण संधि मिळावी पण सामाजिक कर्तव्यें आनंदानें करण्यांतच तिनें आत्मविकास साधावा; कोणी कुणाची पिळवणूक करूं नये; धनिकांनीं श्रमिकांसारखें खपावें व श्रमिकांना चारितार्थाची चिंता उरूं नये; सत्तेची जागा प्रेमानें घ्यावी अशा निर्दोष व उन्नत समाजाचें स्वप्न गांधीजींनीं रंगविलें. आणि त्यांच्या उपदेशांतलीं सूत्रें आपण नीट समजून घेतलीं व यथाशक्ति आचरलीं तर तें स्वप्न सत्यसृष्टींत उतरायला फारसा कालावधिहि लागणार नाहीं.

० ० ०

"भगवान् शंकर मोठे. पण त्यांना पेलणारा कैलास पर्वत त्याहूनहि मोठा! आणि त्या कैलासाला गदगदां हालविणारा रावण तर कैलासाहून किती भारी! पण अशा त्या अति बलाढ्य रावणाला ठार करणारा रामचंद्र तर सर्वांहून श्रेष्ठ! आणि त्या सर्वश्रेष्ठ रामाला कोंडून ठेवणारें माणसाचें मन हेंच अखेर सर्वसमर्थ!" अशा अर्थाचें एक सुभाषित आहे. यांत माणसाच्या मनाचें सर्वस्पार्शित्व फार चमत्कृतिपूर्ण शैलीनें वर्णन केलें आहे. जगाचे सर्व व्यवहार, संस्कृति, धर्म इ० मध्यें महत्त्व माणसाच्या मनाला आहे. प्राचीन काळचे मंत्रद्रष्टे ऋषि आपल्या मनाला जगाचा मध्यबिंदु मानीत. आपला उद्धार किंवा अवनति ही सर्व मनाच्या ताब्यांत आहे. 'मन हेंच माणसाच्या स्वातंत्र्याचें किंवा बंधनाचें कारण.' 'मन निर्मळ असेल तर आपल्या परसांत गंगा आहे असें समजावें.' अशा अर्थाचीं सुभाषितें सर्वत्र विखुरलेलीं आहेत. प्राचीन काळापासून आजपर्यंत मनुष्याचें मन हेंच माणसाच्या सुखदुःखाचें एकमेव कारण आहे हा सिद्धांत श्रेष्ठ पुरुषांनीं वेगवेगळ्या दृष्टीनें मांडला आहे.

त्या दिव्य मालिकेंतच गांधीजी येतात. आधुनिक यंत्रसंस्कृतीनें जगभर जो दुःखाचा प्रळय मांडला त्याला कारण मन. हा विषयच त्या संस्कृतीनें डावलून टाकला. मनुष्यानें आपल्या बुद्धीनें यंत्र निर्माण केलें खरें पण नंतर तें त्याच्या हातांत राहिलें नाहीं. आपल्या निर्माणकर्त्यावरच तें उलटलें! असें सांगतात, एका माणसाला एक समंध वश झाला; "तूं सांगशील तें काम मी करीन. पण मला काम द्यायला तुजजवळ नसेल तर तुला खाऊन टाकीन." असें तो समंध म्हणाला. तो माणूस वेळोवेळीं कांहीं काम त्याला सांगे. 'एक राजवाडा तयार कर, एक बाग उभी कर.' अशीं अनेक मोठालीं कामें तो मनुष्य समंधाला सांगे. पण यांपैकीं प्रत्येक काम अगदीं

थोड्या वेळांत संपवून पुनः ' नवें काम दे ! ' म्हणून समंध त्या माणसापुढें येऊन उभा राही. काम दिलें नाहीं तर हा समंध आपणांला खाणार या भीतीनें तो माणूस झुरणीस लागला. म्हणजे हवें तें वैभव मिळवून देणारी शक्ति लाभून तो प्रत्येक क्षणीं दुःखभयानें ग्रासला गेला ! यंत्र हा असाच एक समंध माणसाच्या मागें लागला आहे. त्याला काम पुरवितां पुरवितां माणूस टेकीस येतो. आणि यंत्राला काम न मिळालें तर तें माणसाला खायला उठतें ! माणसाला माणुसकी देणारी जी सर्वांत श्रेष्ठ गोष्ट म्हणजे मन. त्याची यंत्राला फिकीर उरलेली नाहीं. आणि जगांतल्या अशांततेचें हेंच खरें कारण आहे.

गांधीजींनीं याविरुद्धच बंड पुकारलें. ते म्हणत, " माझा यंत्राला विरोध नाहीं पण यंत्राबद्दल माणसाला जी आत्मघातकी आसक्ति आहे तिला मी विरोध करतों. " यंत्रानें तुम्ही काय साधतां ? वेळाची आणि माणसांची बचत. म्हणजे पूर्वी एक काम करायला शंभर माणसें लागत त्याऐवजीं यंत्राच्या जोरावर एक मनुष्य तें काम करूं शकतो. पण या योगानें ९९ माणसें बेकार होतात, त्यांना उपाशीं राहावें लागतें याची वाट काय ? माणसांचें जीवन अशा रीतीनें उध्वस्त करणारें यंत्र जगांतून कायमचें नाहींसें झालें तरी अश्रु ढाळण्याचें प्रयोजन नाहीं !

आज यंत्र काय करतें ? कांहीं लोकांना बहुसंख्य समाजावर सत्ता चालविण्याची संधि आणून देतें. प्रचंड प्रमाणावर उत्पादन हा यंत्राचा स्वभावधर्म आहे. कापड, चैनीचे पदार्थ, वाहनें इ० वस्तूंचे ढीग निर्माण करावयाचे हा यंत्राचा राक्षसी उद्योग असतो. यांत माणसांच्या गरजांकडे किंवा त्या वस्तूंचें वांटप नीट होतें आहे कीं नाहीं याकडे यंत्राचें लक्ष नसतें.

हिंदुस्थानांतली परिस्थिति तर फारच विचित्र आहे. एक यंत्र अनेक माणसांचें काम करतें यांत सोय निःसंशय आहे. पण ही सोय केव्हां ? तर ज्या-वेळीं देशांत माणसें थोडीं आणि काम करायला त्या मानानें माणसें पुष्कळ हवीं असतील तेव्हां. हिंदुस्थानांत माणसेंच मुळीं अगणित आहेत आणि त्यांपैकीं बऱ्याच माणसांना काम नाहीं. शेतीचे ३–४ महिने काम संपलें कीं वर्षाच्या राहिलेल्या भागांत कुठें खपावें आणि काय खावें अशी कोट्यवधि हिंदी

माणसांची स्थिति असते ! बारा महिने काम मिळतें तें अगदीं थोड्या लोकांना. आतां जागोजाग यंत्रें उभीं राहिलीं म्हणजे त्यांच्यांतहि कांहीं बेकार होणार आणि अगोदरच असलेल्या बेकारांच्या प्रचंड संख्येंत भर पडणार !

आतां असा एक सुबुद्धांचा पंथ निघाला कीं यंत्राचा फायदा सर्वांना मिळावा यासाठीं उत्पादनाची व्यवस्थाच बदलून टाकण्याचें या पंथानें ठरविलें. मागें या पंथाचा विचार केलाच होता. खाजगी संपत्तीचा नायनाट केला, सर्व कारखाने समाजाच्या मालकीचे केले तर समाजाच्या प्रत्येक घटकाला यंत्रसंस्कृतीचा फायदा मिळेल. समाजवाद व त्याचे भाऊबंद या बाबतींत अतिशय आशावादी आहेत. समाजांत माल निर्माण करण्याची आणि त्याचें वांटप करण्याची पद्धति बदलली कीं माणसें सुधारतील, स्पर्धेऐवजीं सहकार्याचें राज्य सुरू होईल. युद्धें थांबतील, प्रत्येक जणाला काम व संरक्षण मिळेल आणि विशेष म्हणजे व्यक्तीऐवजीं समाजासाठीं झटावें ही भावना विशेष वाढीला लागेल.

या आशावादांत गांधीजी भागीदार होऊं शकत नव्हते. यंत्राचा उद्देशच मुळीं प्रचंड प्रमाणावर उत्पादन करणें आणि माणसाच्या चैनी प्रवृत्तीला मदत करणें हा असल्यानें यंत्राची मालकी समाजाकडे देऊन कांहीं उपयोग नाहीं असें ते म्हणत. ही मालकी बदलली तर मन थोडेंच बदलणार ? केवळ राज्ययंत्र किंवा व्यवस्था बदलली म्हणजे लागलीच अंतरंगांत कशी क्रांति होणार ? शिवाय ही व्यवस्था बदलतांना जी हिंसा करावी लागेल तिनें सुखशांतीचें वातावरण कसें निर्माण होणार ! हरबरा पेरून गहूं कस उगविणार ? असें गांधीजीचें विचारणें होतें.

याखेरीज यंत्रसंस्कृतीचें मूळ रहस्यच गांधीजींच्या तत्त्वज्ञानाला विरोधी आहे. तें रहस्य म्हणजे मनुष्याच्या इंद्रियविषयक सुखाचे अधिकांत अधिक चोज पुरविणें हें होय. प्रत्येक नवें यंत्र येतें तें मनुष्याला कांहीं तरी स्पर्शाचें, वासाचें, दृष्टीचें, श्रवणाचें असें सुख देण्याचा इरादा करून येतें. निसर्गाचें गूढ स्वरूप उकलण्याची श्रेष्ठ ज्ञानलालसा गेली बाजूला आणि यंत्रानें आणिलें काय ? तर मनुष्याच्या वासनांचे चोज पुरविण्याची योजना ! आणि ही योजना पार पाडण्यासाठींच संहारहि अवश्य झाला. म्हणून कांहीं यंत्रें

त्यासाठीं अवतरलीं. म्हणजे गिरण्या, रेल्वे, सिनेमा, इ० यंत्रें एके बाजूला आणि रणगाडे, तोफा, बॉंबर विमानें इ० शस्त्रास्त्रें एका बाजूला. एका संचाचें उद्दिष्ट भोग, दुसऱ्याचें संहार. भोगवाद आणि हिंसावाद हे अहिमहि राक्षसांसारखे भयंकर भाऊ भाऊ आहेत. अहिमहीच्या प्रत्येक रक्तबिंदूगणिक पुनः जसे नवे अहिमहि निर्माण होत तशा या दोन अनिष्ट प्रवृत्ति जितक्या माराव्या तितक्या अनेक पटींनीं वाढतच जातात ! पण अहिमहीच्या थेंबांतून पुनः त्यांना जिवंत करणारें रसायन कुठून येतें याचा हनुमानानें शोध केला आणि त्या ठिकाणीं जाऊन तें रसायन अहिमहींच्या रक्तावर आणून घालणाऱ्या भुंग्यांना तेथेंच अडवून धरिलें आणि यामुळें अहिमहींची वाढ होण्याचें थांबून त्यांचा नाश झाला. हिंसावाद आणि भोगवाद यांना नवजीवन देणाऱ्या वासनांनाच अशा प्रकारें आवरून धरलें पाहिजे. तर—नव्हे तरच—यंत्रसंस्कृतीनें निर्मिलेलीं हीं भेसुर अपत्यें नष्ट होतील. हें सर्व नीट लक्षांत घेतलें म्हणजे गांधीयोजनेचीं मुख्य सूत्रें पटणें कठीण जात नाहीं.

गांधीयोजनेंतलें अगदीं पहिलें सूत्र म्हणजे ‘ साधी रहाणी ’ हें होय. एकादश व्रतांची चर्चा करतांना आपणांला याची गाढ ओळख झाली आहे. गांधीजी म्हणतात—

“ शरीरसंतर्पण हेंच आधुनिक संस्कृतीनें आपलें ध्येय मानलें आहे ... ... मन हें अधाशी पक्ष्याप्रमाणें आहे. त्याला जेवढें द्यावें तेवढें कमीच पडतें आणि पुन्हां अधिक मिळत नाहीं म्हणून तें अस्वस्थ राहतें. वासनांचे जेवढे आपण लाड करूं तितक्या त्या अधिक अनावर होतात. म्हणूनच आपल्या पूर्वजांनीं उपभोगावर मर्यादा घातल्या. सुख ही पुष्कळ अंशीं मानसिक अवस्था असते हें त्यांनीं ओळखलें. मनुष्य श्रीमंत आहे म्हणून तो सुखी असलाच पाहिजे किंवा गरीब माणूस हा दुःखीच असावा असा कांहीं नियम नाहीं. पुष्कळ धनिक दुःखी दिसतात, तर आनंदित राहणारे गरिबही आपणांला आढळतात. हें सर्व ओळखून आपल्या पूर्वजांनीं आपणांला चैन व उपभोग यांपासून निवृत्त होण्यास सांगितलें. आपणांला यंत्रें शोधून काढणें अशक्य होतें अशांतला भाग नाहीं. पण, आपल्या पूर्वजांना ठाऊक होतें कीं, त्या नादीं आपण एकदां लागलों कीं, आपण गुलाम बनूं. आणि आपल्या हातापायांनीं करतां येण्यासारखें आहे तेवढेंच

आपण करावें असें त्यांनीं ठरविलें. आपल्या हातांचा आणि पायांचा नीट उपयोग करण्यानें आपण सुखी व निरोगी राहूं अशी त्यांना निश्चित कल्पना होती." आपल्या जीवनांतून साध्या राहणीचें अधिराज्य स्थापणें हा गांधीयोजनेचा गाभा आहे.

'अहिंसा' हें गांधीजींच्या अर्थशास्त्राचें एक तत्त्व आहे असें म्हटलें तर प्रथम थोडें आश्चर्य वाटेल. पण आपण गांधीजींची दृष्टि पत्करली तर यांत नवल असें कांहींच दिसणार नाहीं, अहिंसा या तत्त्वाचा अर्थ दुसऱ्याच्या हक्कांवर व न्याय्य सुखावर आक्रमण न करणें असा होत नाहीं का? मूठभर श्रीमंतांनीं अगणित गरिबांच्या श्रमावर जगावें ही अहिंसेची भयंकर पायमल्ली आहे. हें नीतिविरोधी आहे आणि गांधीजी तर स्पष्टच म्हणत, "अर्थशास्त्र व नीतिशास्त्र यांच्यांत फरक करायला अथवा त्यांच्या सरहद्दी वेगळ्या करायला मी तयार नाहीं हें मला मान्य केलेंच पाहिजे. व्यक्तीच्या अथवा राष्ट्राच्या नैतिक जीवनाचा नाश करणारें अर्थशास्त्र हें अनैतिक म्हणूनच पापमय आहे...... अमेरिकन् गहूं खायचा आणि माझ्या शेजारील धान्यव्यापाऱ्याला गिऱ्हाईक नाहीं म्हणून मरूं द्यायचें हें पाप आहे......उद्योगधंद्यांतील निष्क्रिय भांडवलवाल्यांना नफा किती पडला यावर उद्योगधंद्याचें महत्त्व अवलंबून नाहीं तर त्यांत खपणाऱ्या मजुरांच्या शरीरावर, मनावर, आत्म्यावर काय परिणाम झाला यावर तें महत्त्व पारखलें पाहिजे." सर्व प्रकारची पिळवणूक ही अहिंसा. ही बंद करणें हें गांधी-योजनेचें जिव्हाळ्याचें कार्य आहे.

पिळवणूकरूपी हिंसा नाहींशी कशी होईल? जोंवर एकेका ठिकाणीं मालाचे प्रचंड ढीग तयार होऊन पडत आहेत तोंवर हें अशक्य आहे. म्हणून एके ठिकाणीं खूप उत्पादन करायचें ही पद्धतीच नष्ट झाली पाहिजे. एके ठिकाणीं उत्पादन करायचें यालाच केंद्रीकरण म्हणतात. हें नाहींसें करणें म्हणजे 'विकेन्द्रीकरण.' विकेन्द्रीकरण हें गांधीजींच्या अर्थयोजनेचें एक फार मोठें सूत्र आहे. यंत्रसंस्कृतींत वाढलेल्या मोठमोठ्या पाश्चात्य शास्त्रज्ञांनाहि गांधीजींची ही विकेन्द्रीकरणाची विचारसरणी पटूं लागली आहे.

गांधी–योजनेप्रमाणें फार मोठ्या शहरांना वाढायला अवकाश उरणार नाहीं. आणि हिंदुस्थानांत तरी मोठालीं शहरें कितीशीं आहेत? खेडेगांवां-

चाच देश आहे हा ! यांतलें प्रत्येक गांव स्वयंपूर्ण व्हावें हा विकेन्द्रीकरणाचा उद्देश आहे. खेडेगांवांत लागणारें अन्नवस्त्र तेथेंच तयार व्हावें; लाकुडफाटा मिळावा; मृत जनावरांचीं कातडीं तेथेंच कमावलीं जावींत; जोडे, पखाली, दावीं, वाद्यें इ० चामड्याचे पदार्थ तेथेंच तयार व्हावेत; विटा, नांगर, औतें, खतें इ० सर्व आवश्यक वस्तूंची पैदास सर्वांनीं परस्पर-सहकार्यानें करावी अशी गांधी-योजना आहे. महाराष्ट्रांतील वडगांवला कानपुरचे जोडे यावेत, डाक्कयाहून मलमल पुरविली जावी किंवा पंजाबचा गहूं आणावा लागावा हें गांधीजींना मान्य नाहीं. आपल्या गरजा, आपलें हवामान, आपली निसर्गसंपदा हीं सर्व विचारांत घेऊन प्रत्येक खेडें पूर्ण स्वावलंबी व स्वयंपूर्ण कसें होईल याचा विचार मुख्यतः गांधी-योजनेंत आहे.

यायोगें 'ग्रामोद्योग' वाढतील. आणि माणसांना बेकारीचें भय उरणार नाहीं. गांधीजी यंत्राच्या विरुद्ध होते, त्यांचा दृष्टिकोन मागील काळांतला अशी एक ओरड केली जाते. पण आधुनिक दृष्टीचे व नव्या विचाराचे विख्यात प्रणेते पं. जवाहरलाल नेहरू काय म्हणतात पहा :

"हिंदुस्थानांत चीनप्रमाणेंच माणूसबळ खूप आहे. बेकारी आणि अर्धबेकारी भरपूर आहे. म्हणून यूरोपांतल्या लहान व वाढत्या लोकसंख्येच्या व यंत्रविद्येंत पुढारलेल्या चिमुकल्या राष्ट्रांशीं हिंदुस्थानची तुलना करून चालणार नाहीं. आपलें माणूसबळ फुकट घालविणारी किंवा माणसांना बेकार करणारी कुठलीहि योजना वाईटच म्हणावी लागेल. माणसाच्या सुखदुःखाचा विचार बाजूला ठेवून नुसत्या अर्थशास्त्राच्या दृष्टीनें पाहिलें तरी कमी दर्जाचीं यंत्रें ठेवून पुष्कळ माणूसबळ कामाला लावणें हेंच फायदेशीर पडतें. अल्पवेतनावर का होईना पुष्कळ माणसांना काम देतां आलें तर तें त्यांपैकीं बऱ्याच लोकांना बेकार ठेवण्यापेक्षां पुष्कळ बरें. कांहीं कारखान्यांनीं निर्माण केलेल्या संपत्तीपेक्षां गांवोगांव झालेलें उत्पादन अधिक होणेंहि कांहीं असंभवनीय नाहीं." गांधी-योजनेला पाठिंबा देणारे हे पं. नेहरूंचे विचार तर्कशुद्ध वाटतात.

यंत्रानें केलेल्या प्रळयामुळें विस्कटलेली जगताची घडी नीट बसाविण्या-साठीं गांधीजींची योजना आहे. तिचा गाढ अभ्यास केलेले वर्धा येथील कॉमर्स कॉलेजचे प्राचार्य श्रीमन्नारायण अग्रवाल हे एक तरुण व ध्येयवादी

विद्वान् गृहस्थ आहेत. अर्थशास्त्राच्या अगदीं आधुनिक शब्दांचा व संकेतांचा उपयोग करून त्यांनीं गांधी–योजनेला सुसंगत व शास्त्रशुद्ध स्वरूप दिलें आहे. श्री. अग्रवालजी यांनीं गांधी–योजनेचीं तीन सूत्रें सांगितलीं आहेत. (१) साधी राहणी, (२) विकेन्द्रीकरण आणि (३) ग्रामोद्योग. आतांपर्यंत या सूत्रांशीं न विसरण्याइतकी आपली ओळख झाली आहे.

श्री. अग्रवालजींनीं चीनचा महापुरुष सन् यत् सेन यांच्या वचनाचा आधार घेऊन गांधी–योजनेचा ऊहापोह केला आहे. राष्ट्रीयता, चरितार्थाची सोय आणि लोकशाही या तीन तत्त्वांवर कुठलीहि योजना आधारली पाहिजे, असें सन् यत् सेन म्हणत. प्रत्येक राष्ट्राच्या स्वतःच्या म्हणून कांहीं खास शक्ति व वैशिष्ट्यें असतात. या शक्तींना व वैशिष्ट्यांना वाव मिळेल अशा रीतीनें जर त्या राष्ट्रानें आपले व्यवसाय ठरविले तर त्या राष्ट्राचा उत्कर्ष होतो. आपला भारतदेश कृषिप्रधान आहे. खेडेगांवें हा या देशाचा मुख्य आधार आहे. प्राचीन काळीं या देशांत जी संघटना व अर्थयोजना होती ती '**ग्रामीण समतावादा**' ला धरून होती. ती पूर्णपणें राष्ट्रीय होती म्हणूनच परचक्रांच्या, यादवींच्या अथवा दैवी आपत्तींच्या अजस्र माऱ्यांतून ती बचावत राहिली. जीवनार्थाची सोय हें चिनी राष्ट्रपुरुषांचें दुसरें सूत्र राष्ट्रीयतेइतकेंच महत्त्वाचें आहे. प्रत्येक माणसाला देशाच्या अर्थयोजनेंत स्थान पाहिजे, कामाची व संरक्षणाची हमी पाहिजे, त्याच्या जीवनावर कुणी अन्याय्य आक्रमण करणार नाहीं; त्याला लोकांच्या दयेवर जगावें लागणार नाहीं; अशी व्यवस्था पाहिजे. यंत्रसंस्कृतींत माल व भांडवल हें केंद्रित होत जातें. यंत्र आणि त्याचा पट्टा धरून येणारी हिंसा हीं सामान्य माणसाच्या हक्कांची वैरी आहेत. गांधी-योजनेंत असें होत नाहीं. तिसरी गोष्ट लोकशाही. मध्यवर्ती सत्तेकडे उत्पादनाचा वांटा व जबाबदारी अगदीं कमींत कमी पाहिजे. मनुष्य हें हुकूम पाळणारें यंत्र नव्हे. व्यक्तिविकासाला वाव पाहिजे. सन् यत् सेनचीं तीनहि सूत्रें गांधी-योजनेंत नव्या आशयानें पूर्ण विकसित झालेलीं दिसतात.

गांधी-योजनेच्या मंदिरांत सत्याची आराधना मुख्य आहे. साधेपणा, अहिंसा, शरीरश्रमाचें माहात्म्य आणि मानव्याचा गौरव हे या मंदिराचे चार कोपरे होत. गांधीजींची योजना कित्येकांना काळाच्या प्रवाहाला विरुद्ध

दिशेला खेचणारी म्हणूनच निष्फळ वाटते. पण खरें पाहतां, कांहीं बाबतींत ती वर्तमान काळाच्याहि पुढें आहे. हस्तव्यवसाय व ग्रामोद्योग यांचा समावेश कित्येक आधुनिक अर्थशास्त्रज्ञहि आपल्या योजनांत करतात. गांधी-योजना हें कांहीं एखादें मनोरम स्वप्न नाहीं. ती एक निश्चित अर्थव्यवस्था व विचारप्रणाली आहे. आपल्या देशांत प्राचीन काळीं तिचीं पाळेंमुळें खोल गेलेलीं होतीं. आज आधुनिक काळाला जुळेल असें रूप व नवें चैतन्य तिला देणें शक्य आहे. ही पुनर्जीवन देण्याची भाषा गांधीजी केवळ तात्त्विक दृष्टीनें बोलत नव्हते तर 'विधायक कार्यक्रम' जगापुढें मांडून व त्याचा सक्रिय पुरस्कार करून आपली योजना शक्यतेच्या कोटींतली आहे हें त्यांनीं सिद्ध केलें. व्यक्तिजीवनांत 'एकादश व्रतां'चें जें स्थान तेंच राष्ट्रजीवनांत 'विधायक कार्यक्रमा'चें. कागदाच्या चिंध्यांचा चेंडू पाण्यांत टाकला म्हणजे तो जसा हळूहळूं उकलत जातो त्याप्रमाणें विधायक कार्यक्रमाचें एक एक अंग पाहूं लागलों कीं गांधी-योजनेंतलें एक एक सामर्थ्यवान् तत्त्व स्पष्ट होत जातें. म्हणून विधायक कार्यक्रमाचाच आतां विचार करूं.

२९३३२ वा.वा. २००४ ३-२-६१

### गांधी-सूक्ति

"गीता आपणांस सद्गुरुरूप आहे, मातारूप आहे आणि आपण असा विश्वास ठेवावा कीं, गीतामातेच्या अंकावर डोकें ठेवलें असतां आपण सहीसलामत राहूं व गीतेच्या साहाय्यानें सर्व धार्मिक प्रश्न सोडवूं. ह्याप्रमाणें गीतेचें जो प्रत्यहीं मनन करील त्याला गीतेंतून रोज नवा आनंद प्राप्त होईल व नवा बोध होईल."

## विधायक कार्यक्रम : : २२

श्रीमत् शंकराचार्यांचें नांव कोणास माहीत नाहीं? हिंदु वेदांताचा जगभर जयजयकार होण्यास ज्यांचें अलौकिक कार्य कारणीभूत झालें त्या शंकराचार्यांना आतां अमरपद मिळालें आहे. या शंकराचार्यांनीं मोक्षपदाच्या अधिकारासाठीं माणसाचे अंगीं कोणकोणत्या गुणांची अपेक्षा आहे हें सांगतांना, 'नित्यानित्यवस्तुविवेक' हा एक गुण सांगितला आहे. नित्य म्हणजे नेहमींचें कोणतें आणि अनित्य म्हणजे तात्पुरतें कोणतें याचा विचार म्हणजे **नित्यानित्य-विवेक** होय. हा विचार मनांत असला म्हणजे कोणाची फसगत होत नाहीं; कायमचें सोडून तात्पुरत्याच्या मागें लागण्याचा मोह होत नाहीं. मार्ग नीट सांपडतो.

मोक्षमार्गांत प्रगति होण्यास ही जी लायकी शंकराचार्यांनीं सांगितली तीच स्वातंत्र्यसंपादनाचे संग्रामांतहि माणसाला अवश्य आहे. कित्येकदां डोळे दिपविणाऱ्या गोष्टीच आपणाला कायम महत्त्वाच्या वाटतात. शाश्वत महत्त्वाच्या गोष्टींत पुष्कळदां आकर्षण कमी असतें म्हणून त्यांच्याकडे दुर्लक्ष होऊन झगझगीत पण हंगामी स्वरूपाच्या कार्यांत माणसें आपला जीव गुंतवितात. आपल्या राष्ट्रांत अशी अवस्था वेळोवेळीं दुर्दैवानें होत आली आहे. गांधीजींनीं प्रवर्तित केलेल्या विधायक कार्यक्रमाचें खरें महत्त्व अजूनहि कळावें तितकें लोकांना कळत नाहीं. मधून मधून स्वातंत्र्याचे जे संग्राम होतात त्यांना शिथिलता आली, जनता थकली, संग्रामाला तिच्याकडून बळ मिळेनासें झालें, दडपशाहीची शीग पोंचून भकास व भेसूर वातावरण निर्माण झालें म्हणजे लोकांना पुनः उत्साहित करण्यासाठीं सुचविलेला मार्ग म्हणजे विधायक कार्यक्रम होय अशी आपली समजूत असते. सत्याग्रहाचें बळ लटकें पडलें तेव्हां नाइलाजानें पत्करावें लागणारें व्रत म्हणजे विधायक कार्यक्रम अशी त्याची केविलवाणी अवस्था पुष्कळांनीं करून टाकिली आहे.

खरी गोष्ट अशी आहे कीं गांधीजी विधायक कार्यक्रम हेंच नित्याचें व शाश्वत स्वरूपाचें व्रत समजत. सत्याग्रहसंग्राम वेळप्रसंगीं अवश्य असतो. त्यांत राष्ट्राचें शौर्य कसोटीला लागतें, त्यानें ध्येय जवळ येतें हें सर्व खरें असलें तरी संग्राम हीं कांहीं कायमची गोष्ट नाहीं. ती अत्यंत चित्ताकर्षक आहे, भावनेला फुलविणारी आहे यांत शंका नाहीं. पण तिचें आवाहन–विसर्जन यांत लहानसाच काळ जातो. सामना हा खेळांच्या विकासांतला अवश्य भाग असला तरी सामना म्हणजेच क्रीडा नव्हे. दररोज क्रीडांगणावर जाऊन खेळाडू नेमानें व निष्ठेनें जें खेळतो तें त्यांचें खरें जीवन. सामन्याचें स्वरूप त्या दृष्टीनें प्रासंगिकच. सामना देण्यानें कांहीं दररोजच्या क्रीडाक्रमांत भर पडणार नाहीं. पण दररोजच्या पटांगणावरील क्रीडाक्रमांत नीट लक्ष घातलें तर मात्र सामना जिंकण्याची शक्यता खास वाढेल. नायडू, अमरनाथ यांचे प्रेक्षणीय टोले पाहून सहस्रावधि प्रेक्षक आनंदानें नाचूं लागतात. या कुशल खेळाडूंच्या बॅटला लागलेला चेंडू सीमापार होण्यासाठीं हिरवळीवरून धावूं लागला म्हणजे एखादा गालिचा सरसर उलगडला जात आहे असा रमणीय भास आपणांला होतो. पण सामन्यांतील अशा मनोहर क्रीडाविलासामागें किती तरी वर्षांची सतत मेहनत असते हें विसरून कसें चालेल ?

सामना आणि क्रीडांगणावरची दररोजची मेहनत हाच दृष्टांत राष्ट्रीय चळवळ व विधायक कार्यक्रम यांना लावतां येईल. विधायक कार्यक्रम हें नेहमीचें व्रत आहे. चळवळ ही प्रासंगिक आहे. चळवळीला यश येण्यासाठीं विधायक कार्यक्रम अत्यवश्यक आहे. चळवळ संपल्यानंतर राष्ट्रदेहांतील मृत पेशींना सजीव करण्यास या रसायनाची जरूरी आहे. गांधीजी म्हणत, ‘ साधन तत्परतेनें वापरा, साध्य आपली काळजी घेईल. ’ विधायक कार्यक्रमाला सर्वस्व वाहिलें तर त्यांतून जें उच्च सर्वांगीण स्वातंत्र्य गांधीजी सांगत तें निर्विवाद उदयाला येईल. तें साध्य करण्याची किमया जशी विधायक कार्यक्रमांत आहे तसें त्याचें संपूर्ण दर्शनहि याच कार्यक्रमांत होण्यासारखें आहे. म्हणून या कार्यक्रमाची कलमवार सूक्ष्म पाहाणी आपण केली पाहिजे.

## जातीय ऐक्य

हें क्रमानें पहिलें कलम महत्त्वानेंहि पहिलें म्हणण्यास हरकत नाहीं. आपल्या या देशांत अनेक धर्मपंथांचे व मानववंशांचे लोक आले.

दिशि दिशि तव आव्हान प्रचारित
सुनि तव उदार वाणी ।
हिंदु, बौद्ध, सिक, जैन, पारसिक
मुसल्मान, खिस्तानी ॥

या सर्वांनीं हिंदी राष्ट्रपुरुषावर चौऱ्या ढाळाव्या असें त्याचें वैभव आहे. हें आपण लक्षांत घेऊन सर्व जमातींनीं एकमेकांशीं प्रेमानें वागायला शिकलें पाहिजे. आज आपल्या देशांत कोण दुरवस्था दिसते! 'हिंदु जेवण' 'मुसलमानी चहा' या आरोळ्या स्टेशनवर व इतरत्र ऐकूं येतात! हा भेदभाव नष्ट होणें जरूर नाहीं का! शाळा, कचेऱ्या, इस्पितळें इ० सर्व ठिकाणीं सवत्या सुभ्याचें फोफावलेलें हें विषारी पीक समूल नष्ट झालें पाहिजे.

हिंदु-मुस्लिम ऐक्याचे बाबतींत प्रयत्न तोकडे पडले म्हणून या देशाची फाळणी झाली आणि माणुसकीला काळिमा लावणारे अनन्वित अत्याचार घडले! आज परकी सत्ता येथून नष्ट झाली असल्यानें आणि पाकिस्तान निर्माण झालें असल्यानें हिंदु-मुस्लिम ऐक्याच्या प्रश्नाचें स्वरूप बदललें आहे. तरीहि आपल्या सरकारच्या जातिभेदातीत राज्यांत विधायक कार्यक्रमाचें या पहिल्या कलमाचें महत्त्व कमी होत नाहीं. आजहि जे थोडे मुसलमान आपल्या हिंदी संघराज्यांत आहेत त्यांच्यांत शिरून त्यांच्या जीवनाचा अर्थ व रहस्य समजून घेणें जरूर आहे.

## अस्पृश्यता-निवारण

ह्या एका अत्यवश्यक व्रताचा उदय यांतूनच होतो. अस्पृश्यता हा हिंदुधर्मावरील एक फार मोठा कलंक आहे. तो पुसून टाकणें ही स्वराज्यसंपादनाच्या मार्गांतली एक आवश्यक बाब आहे. अस्पृश्यता-निवारणाचे कामीं अडचणी व संकटें पुष्कळच आहेत. पण हें व्रत म्हणून राष्ट्रभक्तांनीं पत्करलें, त्यांत तनमनधनानें काम केलें तर 'सनातनी' समाजाचा हृदयपालट होईल. झुंजार पण अहिंसात्मक वृत्तीनें या कामीं झगडलें पाहिजे. आपल्या घटना-समितीनें तयार केलेल्या घटनेंत सवत्या सुभ्यांना व भेदभावांना मूठमाती दिली हें उत्तम झालें.

## दारूबंदी

ही आपल्या समाजाचा आर्थिक व नैतिक ऱ्हास थांबविण्यासाठीं अत्यंत जरूरीची आहे. 'सुरासुरांचा चुरा' करणारी मदिरा या जगावरील घोर

आपत्ति आहे. अर्भकांचे सांपळे, विधवांचीं पांढरीं कपाळें, कोसळूं पाहणाऱ्या झोपड्या, जिवलगांचे खून, दरवडे आणि मारामाऱ्या हे सारे मदिरादेवीचे विलास आहेत! प्रत्येकीं शेंकडों कुटुंबें दारूपायीं धुळीला मिळत आहेत. इतर मादक पदार्थांचेहि भेसुर परिणाम याहून फारसे कमी नाहींत. मनुष्य-जातींतला मोठा भाग या व्यसनांच्या कर्दमांत रुतला आहे. तो त्यांतून काढणें हें जितकें अवश्य तितकेंच आकर्षक कर्तव्य आहे. व्यसनी माणसांना स्वस्त व सात्त्विक करमणुकीचीं साधनें मिळालीं. त्यांना निर्व्यसनी राहणीची महती कळली, आणि त्यांचीं आर्थिक गाऱ्हाणीं दूर होतील असा विश्वास आला तर हें मदिराराक्षसीचें तांडव सहजच बंद पडेल. यांत आपला भाग कोणता हें सहज कळेल. गांधीजी म्हणतात—

" स्त्रिया आणि विद्यार्थी यांना ही सुधारणा करण्यास झटण्याची विशेष संधि आहे. आपल्या प्रेममय सेवेनें मदिरासक्त लोकांवर वजन मिळवून त्यांना व्यसनापासून परावृत्त करण्याचें पुण्य सहज मिळवितां येईल...हें उद्धाराचें कार्य अति आकर्षक आहे. स्वराज्याकडे जाण्याचा अहिंसात्मक मार्ग अगदीं नवीन आहे. जुन्याच्या जागीं नवीं मूल्यें येतात. हिंसात्मक मार्गांत दारूबंदी-सारख्या सुधारणांना स्थान नाहीं. हिंसा-मार्गाचे अनुयायी अशा सुधारणांना उतावीळपणें आणि मी म्हणतों अज्ञानामुळें कायम दूर लोटतात. पण त्यांना हें कळत नाहीं, कीं शाश्वत आणि निकोप स्वातंत्र्य हें अंतरंगांतूनच म्हणजे आत्मशुद्धीनेंच मिळत असतें." सरकारनें हें काम हातीं घेतलें असलें तरी जनतेची त्याला मदत हवी.

## खादी

हा राष्ट्रीय स्वातंत्र्याचा यशोध्वज आहे. खादी म्हणजे संपूर्ण स्वदेशी. आपल्या गरजा आपल्या देशांतच भागविल्या जाव्या ही खादीची एक बाजू आहे. आणि त्या भागवितांना आपल्या खेडेगांवचे शरीरश्रम व बुद्धि कारणीं लागावी ही दुसरी बाजू आहे. " खादीचा लढा गादीशीं आहे." असें पूज्य विनोबा म्हणतात, याचा अर्थ फार खोल आहे. गादी हें श्रीमंतीचें, संग्रहाचें, केंद्रीकरणाचें प्रतीक आहे. आणि खादीचा विरोध नेमका याच गोष्टींना आहे. खादीला एके ठिकाणीं संपत्तीचे अथवा मालाचे ढीग घालावयाचे नाहींत.

असें केल्यानें ओला दुष्काळ पडतो, हें तिनें जाणलें आहे. प्रत्येक माणसाच्या अंगीं सुप्त असलेलें कौशल्य प्रकट व्हावें, त्याचा आत्मविश्वास वाढावा, आणि हिंदुस्थानांतल्या कोट्यवधि जीवांपैकीं आपण एक आहोंत असें त्याला वाटूं लागावें हें खादीचें ध्येय आहे.

कविसम्राट् रवीन्द्रनाथांची एक सुंदर कणिका आहे.

फूल विचारतें, " फळा, तूं कुठें आहेस ? "

फळ उत्तर देतें, " अरे वेड्या, मी तुझ्या हृदयांतच आहे. "

किती अर्थगर्भ आहे हा लहानसा संवाद ! वेड्या फुलाप्रमाणेंच आपल्या अंगीं असलेल्या विकासाच्या शक्तीची ओळख आपणांला नसते. ही ओळख करून देण्याची जादू खादींत आहे. रामचंद्राच्या पायाचा स्पर्श होतांच ज्याप्रमाणें शिळेची अहिल्या झाली त्याप्रमाणें खादीतत्त्वाचा प्रचार जेथें झाला तेथें नवें चैतन्य आलें. गांधीजी म्हणतात,

" खादी हें हिंदी जनतेचें आर्थिक स्वातंत्र्य, समता आणि ऐक्य यांचें प्रतीक आहे. " जवाहरलाल नेहरूंच्या काव्यमय भाषेंत सांगायचें म्हणजे तें ' हिंदी स्वातंत्र्याचें लेणें ' आहे.

उद्योगधंद्यांची रास एके ठिकाणीं न रचतां प्रत्येक खेडेगांव स्वावलंबी करण्याची जी नवी दृष्टि गांधीजींनीं अंगीकारिली तीच ' खादीदृष्टि ' होय. जितकें विकेंद्रीकरण जास्त तितकीं माल तयार करण्याचीं साधनें सोपीं व साधीं; परस्परांत सहकार्य अधिक; श्रीमंत आणि गरीब आपल्या हातानेंच सूत कातून आपले कपडे विणूं लागला म्हणजे विषमतेची भावना नष्ट होत जाणार. असें हें अद्‌भुत रसायन आहे.

## ग्रामोद्योग

खादींत व्यक्त होणारें रहस्यच इतर ग्रामोद्योगांत सांपडतें. आपल्या खेडेगांवची नैसर्गिक संपदा लक्षांत घेऊन कितीतरी उद्योगधंदे सुरू करतां येण्यासारखे आहेत. तेल गाळणें, कातडीं कमावणें, कागद व साबण तयार करणें, आगपेट्या बनविणें हे व अशा प्रकारचे अनेक धंदे दर एक खेडेगांवीं सुरू होतील. आपल्या स्वयंपूर्ण ग्रामराज्यांत जें कांहीं तयार होईल त्यावर संतोषपूर्वक निर्वाह करायचा हें जीवनसूत्र फार कल्याणकारक आहे.

विनोबांनीं या सूत्राचें आदर्श आचरण करणारा म्हणून भगवान् श्रीकृष्णाचें सुरस माहात्म्य वर्णन केलें आहे. श्रीकृष्ण आपल्या गांवांतलें दूधदुभतें दुसरीकडे जाऊं देत नसे, जे कोणी तें नेतील त्यांना वाटेनें तो अडवून धरी, गोसेवा हें त्याचें व्रत होतें, शरीरश्रमांत तो सामान्य जनतेबरोबर पुढें असे, आपल्या गांवांत सांपडणाऱ्या फुलांनीं व मोरपिसांनीं तो आपला देह सुशोभित करी, दूर स्वर्गांतल्या इंद्राऐवजीं आपल्या गांवांलगतच्या गोवर्धन पर्वताचें पूजन करा असें त्यानें आदेशिलें. जगाच्या संस्कृतींत लोकोत्तर ठरलेल्या या अवतारी पुरुषानें सहस्रावधि वर्षांपूर्वी ग्रामराज्याचा सुंदर नमुना आपणांपुढें उभा केला. गोकुळ हें नंदनवनापेक्षांहि रम्य व सुखी झालें त्याचें कारण ग्रामराज्याच्या कायद्यांचा तेथें आदर झाला हेंच होय. आज स्पर्धा, युद्धें, भोगलालसा, विषमता इ० आपत्तींनीं गांजलेल्या जगाची सोडवणूक व्हायची असेल तर ही गोकुळवासी लोकांची जीवनपद्धतिच पुन्हां अंगिकारली पाहिजे.

## गांवसफाई

हा एक महत्त्वाचा कार्यक्रम आहे. खेडेगांव म्हणजे निसर्गशोभेचें मंदिर अशी आपली कथाकादंबऱ्यावरून समजूत झालेली असते. पण एखाद्या सामान्य खेडेगांवांत तुम्ही गेलां तर काय अनुभवाला येतें? आपलें सुंदर स्वप्न गांवच्या वेशीपाशींच वितळतें आणि अस्वच्छतेचे ढीग चहूंकडे पाहून आपलें मस्तक भणाणून जातें! आपल्या बहुजनसमाजाला स्वच्छतेच्या कल्पना आपण शिकविल्या पाहिजेत. माणसें विहिरीवर स्नान करून शुद्ध होऊं पाहतात, पण आपले अंगावरून सांडणारें पाणी विहिरीच्या स्वच्छ पाण्यांत परत जात आहे याकडे पुष्कळदां दुर्लक्ष करतात! सामाजिक व राष्ट्रीय आरोग्याचे नियम दक्षतेनें पाळणें हा गुण अजून आपण पुष्कळ वाढवावयास हवा. सांडपाणी व घाण यांची व्यवस्था कशी लावावी, धुळीचा उपद्रव नाहींसा कसा करावा, पिण्याचें पाणी स्वच्छ कसें राखावें इ० अनेक गोष्टींचें ज्ञान ग्रामवासी बंधूंना आपण दिलें पाहिजे. हें ज्ञान जितकें दिलें जाईल आणि ज्या मानानें आचरणांत येईल त्या मानानें खेडेगांवांतली अप्रसन्नता व रोगराई नष्ट होण्याच्या पंथाला लागेल. ‘स्वच्छता म्हणजे दुसरा देवपणा आहे’ हें सूत्र प्रत्येक ग्रामीणाला पटलें पाहिजे.

## नवें शिक्षण

हा प्रत्येक कार्यकर्त्याला चित्ताकर्षक वाटेल असा विषय आहे. मुलें ही राष्ट्राची संपत्ति होय. आजची बालसृष्टि हेंच उद्यांचें राष्ट्र. या सृष्टींत ज्या विचारकल्पनांची पेरणी आपण करूं त्याच विचारकल्पनांचे मळे भविष्य-काळांत बहरतील. म्हणून ज्यांना नव्या तऱ्हेची जागृति करून एक विशिष्ट समाजरचना उभी करावयाची आहे त्यांना बालसृष्टीकडे दुर्लक्ष करून चाल-णार नाहीं. गांधीजींच्या प्रेरणेनें 'वर्धा–योजना' म्हणून जी शिक्षणाची नवी पद्धति आतां निघाली ती सध्यांच्या पुस्तकी शिक्षणाहून फार वेगळी आहे. खेडेगांवांतील मुलांना आदर्श ग्रामीण गृहस्थ बनविणें हें या शिक्षणाचें ध्येय आहे. या शिक्षणाला स्फूर्ति खेडेगांवांतूनच मिळाली. या शिक्षणानें मुलांचे हृदयबंध या भूमीशीं प्रथमपासूनच गुंतले जातील. आणि पुढील जीवनांत राष्ट्रकार्याचा आरंभ शाळेपासूनच त्यांना सहजासहजीं करतां येईल. शरीराला चापल्य यावें आणि त्यांतच कारागिरीची अंगीं वाढ व्हावी, ती वाढ होतांनाच अक्षरज्ञान, गणित, जगाची माहिती यांतहि प्रगति व्हावी अशी सुंदर योजना नव्या शिक्षणांत आहे. शरीर, मन, बुद्धि यांच्या विकासांत तोल, संगति व सहकार्य राखण्याचा अपूर्व प्रयत्न या शिक्षण-योजनेंत आहे. पण या पद्धतीचा विशेष असा आहे कीं, शिक्षक जितका कार्यक्षम व प्रतिभावान् असेल, तितकें त्याला हें शिक्षण अधिक सुंदर रीतीनें देतां येईल.

## प्रौढ शिक्षण

आपल्या शहरापासून १०-२० कोस देशाच्या आंतल्या भागांत तुम्ही एकाद्या खेडेगांवीं जा. तुम्हांला अगदीं वेगळ्या जगांत आल्यासारखें वाटेल. तेथील निरक्षर माणसाला आपलें खेडेगांव म्हणजे जग वाटतें. गांवचा फौजदार हा सर्वसमर्थ माणूस, गांवचा सावकार हा कुबेर, गांवचा भिक्षुक हा शंकराचार्य वाटतो! हिंदुस्थान हें एक राष्ट्र आहे आणि आपण त्या राष्ट्राचे घटक आहों या स्वाभिमानी भूमिकेची त्याला यत्किंचित् जाणीव नसते! अशा कोट्यवधि लोकांना आत्मविश्वासाच्या उच्च पातळीवर आणून आपणांला नवें प्रबळ राष्ट्र निर्माण करावयाचें आहे. आपल्या प्रौढ शिक्षणाचें ध्येय एवढें व्यापक असायला पाहिजे.

या बाबतींत येणाऱ्या अडथळ्यांना धैर्यानें तोंड दिलें पाहिजे. वेळांची बचत करण्याच्या दृष्टीनें प्रौढ शिक्षणांत वेगवेगळ्या पद्धति आज अस्तित्वांत आल्या आहेत. साक्षर मुलांनीं आपल्या निरक्षर पालकांना लिहिणें–वाचणें शिकवावें अशी एक चळवळ चीनमध्यें झाली. तिला 'बाल-गुरू' ची चळवळ ( Little teachers movement )म्हणतात.आपल्या देशांत या चळवळीची वाढविलेली आवृत्ति काढण्यास हरकत नाहीं.

## स्त्री–दास्य–विमोचन

**नारी कू निन्दना नही नारी नरकी खान ।**
**जिस खानीमें पैदा हुए राम, कृष्ण, हनुमान ।।**

असा स्त्रियांचा महिमा आहे. परंतु आपण स्त्रियांना फार खालच्या दर्ज्याला पोंचविलें आहे. त्यांना आपण अबला म्हणतों ! पुरुषाच्या सुखाचें एक साधन एवढेंच महत्त्व त्यांना आपण देतों. या जीर्ण मतांत पूर्ण क्रांति झाली पाहिजे. स्त्रियांना पुरुषाबरोबरचें स्थान देणें युक्त आहे. अहिंसात्मक समाजाच्या प्रतिष्ठेसाठीं जर आपण प्रयत्न करीत आहोंत तर स्त्रीचें उच्च स्थान तिला मिळालेंच पाहिजे. कारण स्त्री म्हणजे मूर्तिमंत अहिंसा होय. तिच्या त्यागाला सीमा नाहीं. तिचा सोशिकपणा वंदनीय आहे. तिचे हे गुण प्रकट होतात पण त्यांना पाया असतो तो नेणिवेचा. जेव्हां त्यांना आपल्या खऱ्या सामर्थ्याची जाणीव होईल, मानाचें स्थान मिळेल तेव्हां त्यांच्या अंगचा बिनमोल गुणसंभार अनंत पटींनीं वाढेल; मानवी संस्कृतीला अलौकिक सौंदर्य येईल. स्त्रियांच्या उद्धाराच्या कार्यक्रमाला आरंभ करायला आपलें कुटुंब हेंच उत्कृष्ट स्थान नाहीं का ?

## आरोग्य

याचा गांवसफाईच्या व स्वच्छतेच्या कलमांतच वास्तविक समावेश व्हायला पाहिजे असें प्रथमदर्शनीं वाटेल. पण हा स्वतंत्र विषय आहे. माणसानें आपलें स्वतःचें आरोग्य कसें टिकवावें ही एक कला आहे. आणि माणसाच्या जीवनांतली तीच सर्वांत अधिक महत्त्वाची कला आहे. आपल्या देशांत दुर्दैवानें या कलेचें ज्ञान प्रत्येकाला असावें तितकें नाहीं. सर्व जगां-तल्या सुधारलेल्या देशांत हिंदुस्थानांतल्या मृत्युसंख्येचें प्रमाण मोठें कां

असावें ? आपल्या देशाचें भयंकर दारिद्र्य हें तर एक मुख्य कारण आहेच. पण त्याखेरीज शरीररूपी मंदिराची आपण अक्षम्य हेळसांड करतों हीहि गोष्ट जमेस धरावी लागेल. म्हणून शरीर सुस्थितींत ठेवण्याच्या कलेला विधायक कार्यक्रमांत स्थान देणें जरूर आहे.

आरोग्याचे नियम संख्येनें थोडे आहेत आणि कळायला सोपे आहेत. त्यांची क्षणोक्षणीं आपण पायमल्ली करतों आणि आपलें जीवन क्लेशमय करून घेतों. शरीर आणि मन यांचा गाढ संबंध आहे, हें लक्षांत घेऊन गांधीजींनीं अगदीं थोडक्यांत पण मार्मिक रीतीनें आरोग्य-सूत्रें सांगितलीं आहेत.

" निरर्थक व अशुद्ध विचारांची हकालपट्टी करा. नेहमीं शुद्धांत शुद्ध विचार करीत जा. अहोरात्र शुद्ध हवेंत रहा.

शारीरिक व मानसिक श्रमांत समतोलपणा आणा.ताठ उभे रहा, ताठ बसा.

आपल्या प्रत्येक कामांत टापटीप व स्वच्छता ठेवा, ही टापटीप व स्वच्छता अंतरंगाची निदर्शक असली पाहिजे.

आपल्या बांधवांची सेवा करण्यासाठीं जगतां यावें म्हणून अन्न खात जा. चैनीसाठीं खाऊं नका. अर्थात् मन आणि शरीर यांना सुव्यवस्थित ठेवील एवढाच व असाच आहार तुम्हीं ठेवला पाहिजे. मनुष्य जें खातो त्याप्रमाणें त्याची वृत्ति बनते.

तुमचें पाणी, अन्न आणि हवा हीं स्वच्छ असलीं पाहिजेत. पण ही तिहेरी स्वच्छता केवळ स्वतःपुरती ठेवण्यांत समाधान मानूं नका. तुमच्या भोंवतींचें वातावरणहि याच स्वच्छतेचें माहेरघर होईल असा प्रयत्न करा. "

## राष्ट्रभाषा

हिंदुस्थानांत इंग्रजी भाषेचें वर्चस्व सुशिक्षित जगावर फार आहे. भाषेच्या द्वारेंच संस्कृति आपला अधिकार स्थापन करते. इंग्रजी भाषेनें आपल्या देशी भाषांना तर निष्प्रभ केलेंच; पण स्वतःकडे राष्ट्रभाषेचा दर्जा घेण्याचा खटाटोप केला. इंग्रजी शिक्षणाचा फार थोडा प्रसार झाल्यामुळें व शिक्षणाचें माध्यमही सर्वस्वीं परकीय भाषा झाल्यामुळें मुख्यतः दोन तोटे झाले. एक सुशिक्षितांच्या शक्तीचा प्रचंड प्रमाणावर अपव्यय झाला. आणि दुसरें इंग्रजी न जाणणारा बहुजनसमाज नवीन ज्ञानापासून व लोकसत्तात्मक कल्पनांपासून

दूर राहत गेला ! लोकशाहीची कल्पना सर्वांना करून देणारी एक राष्ट्रभाषा पाहिजे. १९२५ सालीं काँग्रेसनें 'हिंदुस्थानी' ला ही राष्ट्रभाषेची पदवी प्राप्त करून दिली आहे. आपल्या देशांतल्या सर्व प्रांतांतल्या व सर्व धर्मपंथांच्या लोकांना एकमेकांचें मनोगत कळून घेण्यास राष्ट्रभाषाच उपयोगीं पडणार आहे. इंग्रजी भाषेचें सावट उठून आपणांवरील हीनतेची सावली नष्ट होईल हा तर राष्ट्रभाषेचा मोठाच लाभ समजला पाहिजे. म्हणून राष्ट्रभाषेचा प्रचार हें विधायक कार्यक्रमाचें एक महत्त्वाचें अंग आहे.

## मातृभाषा

सर्व विराट् राष्ट्रांतील व विविधभाषी देशबांधवांना एकत्र आणण्यास राष्ट्रभाषेची रज्जू हवी तेवढी लांब व समर्थ आहे; पण प्रत्येकाला आपल्या मातृभाषेचा अभिमान वाटला पाहिजे. राष्ट्रभाषा व मातृभाषा एकमेकांना विरुद्ध असलेलीं प्रमेयें नाहींत; तीं एकमेकांना पूरक आहेत. नाना फडणीस यांच्या चातुर्याच्या आपण अनेक गोष्टी ऐकतों. त्यांतली एक मजेदार गोष्ट ऐका. एकदां एक कलावंत मनुष्य पुण्यास आला. तो अनेक भाषांत पारंगत होता. आपणांस येत असलेली प्रत्येक भाषा तो मातृभाषेच्या सफाईनें बोले. तो कानडी बोलूं लागला कीं अस्सल कर्नाटक हीच याची जन्मभूमि असावी असें वाटे. गुजराथी, तामिल, उर्दू साऱ्याच भाषा तो अगदीं बेमालुमपणें बोले. तो हिंदुस्थानभर हिंडला पण त्याची मूळ भाषा ओळखून काढणें कुणालाच शक्य झालें नाहीं. पण 'भले बुद्धीचे सागर' नाना मात्र चकले नाहींत. त्यांनीं या माणसाला आपल्या वाड्यांत निजविलें आणि तो गाढ झोंपेंत असतां रात्रीं त्याच्या तोंडावर पाणी मारलें. त्याबरोबर तो किंचाळत बडबडत उठला आणि त्या बडबडण्यांत कानडी शब्द त्यानें उच्चारले. तेव्हां त्याची मातृभाषा कानडी हें निश्चित ठरलें. मनुष्याच्या अंतर्मनांत मातृभाषेचेच संस्कार कायम झालेले असतात. म्हणून जें हृदयापासून कळकळीनें बोलायचें असतें तें उत्तमांत उत्तम मातृभाषेंतच बोलतां येणार. ज्ञानेश्वर, तुकाराम, मीरा, तुळशीदास, कबीर इ० कविश्रेष्ठांचें प्रासादिक काव्य इतकें सौंदर्यसंपन्न आहे याचें कारण तें त्यांनीं मातृभाषेंत विरचिलें. परकी भाषा शिकून तीमध्यें एवढे 'भावार्थाचे गिरिवर' आणि 'नवरसाचे सागर' त्यांना निर्माण करतां येणें कठीण होतें. या दृष्टीनें मातृभाषेची

महती अढळच राहणार. हें लक्षांत घेऊन राष्ट्रभाषेच्या अनुरोधानें मातृभाषेचा प्रचार करण्याची कोशिस केली पाहिजे.

## आर्थिक समता

अहिंसेवर आधारलेलें जें स्वातंत्र्य आपणांला मिळवावयाचें त्याचा मूलाधार म्हणजे आर्थिक समता होय. गरीब आणि श्रीमंत यांच्यांतला कायमचा कलह मिटविणें याचें नांव आर्थिक समता. एका बाजूला, गगनचुंबी प्रासाद व त्यांत सुखामध्यें लोळणारे थोडे श्रीमंत आणि दुसऱ्या बाजूला मोडकळीस आलेल्या झोपड्या आणि त्यांत उपासपोटीं विव्हळणारे लक्षावधि गरिब. ही स्थिति जोंवर कायम आहे, तोंवर अहिंसात्मक राज्ययंत्र चालणें अशक्य आहे! श्रीमंतांनीं आपल्या सत्तेचा व संपत्तीचा त्याग लोककल्याणासाठीं स्वेच्छेनें करावा आणि आपण पालक म्हणून राहावें ही गोष्ट कठीण असली तरी अशक्य खास नाहीं. या कामाला आजपासून सुरुवात झाली पाहिजे. स्वातंत्र्य मिळाल्यावर आपण हें काम हातीं घेऊं हें म्हणणारांना स्वातंत्र्याचें रहस्यच कळलें नाहीं असें म्हणावें लागेल.

विधायक कार्यक्रमाचीं हीं मुख्य अंगें झालीं. ही 'त्रयोदशगुणी' योजना ७२ कोटी हातांनीं पार पाडायची आहे. एवढ्या १३ कलमांत सर्व आलें असें नाहीं. माणूस कार्य करूं लागला कीं आपल्या कार्याला पोषक असे नवे कार्यक्रम त्याला सुचतात. कळकळींतूनच नवे शोध लागतात, नवीं कर्तव्यें व नवे मार्ग सांपडतात.

गांधीजींनीं किसान, मजूर आणि विद्यार्थी यांच्याकरितां कांहीं स्वतंत्र आदेश दिले. हा विराट् देश मुख्यतः किसानांचा आहे. किसान हाच आपला अन्नदाता.

पेरील जैं शेतकरी न कांहीं
तैं खावयाला मिळणार नाहीं ।।

ह्या जुन्या बालबोध पुस्तकांतील पद्यपंक्ती परमार्थानें खऱ्या आहेत. शेतकऱ्यांची संघटना हा राष्ट्रीय संस्थेचा मुख्य कार्यक्रम असला पाहिजे. पण राजकारणांतील डाव यशस्वी करण्याकरितां किसान-संघटनांचा उपयोग करणें हें घातुक आहे.

मजूर आणि मालक या लढ्यांत गांधीजींनीं वर्गसलोख्याचें धोरण आदेशिलें. इतकेंच नव्हे, तर अहमदाबाद येथें प्रत्यक्ष एक मजूर–संघटना नांवारूपाला आणून आपल्या तत्त्वाचे प्रयोग यशस्वी होतात हें सिद्ध केलें. तेथें मजुरांकरितां रुग्णालय आहे; त्यांच्या मुलांकरितां शाळा आहेत, प्रौढांसाठीं रात्रींचे वर्ग भरतात, मजुरांचा एक छापखाना चालतो आणि खादीकेन्द्रहि भरभराटीस आलें आहे. प्रत्येक मजुराला मतदानाचा हक्क मिळाला आहे. आजवर ही संस्था सारखी प्रबळ होत गेली आणि अनेकदां अहिंसात्मक संप करून तिनें मालकावर विजय मिळविले. तंटा उपस्थित झाला कीं मालक व मजूर त्रयस्थ लवादाकडे तो प्रश्न सोपवितात. ही 'अहमदाबाद' पद्धति इतरत्र रूढ झाली तर वर्गसलोख्याचें सुखी राज्य सर्वत्र सुरू होईल.

विद्यार्थीवर्ग म्हणजे राष्ट्रपुरुषाचें सळसळणारें रक्त. विद्यार्थी भविष्याचे धनी आणि वर्तमानाचें आशास्थान. गांधीजींनीं त्यांच्याकरितां सुंदर आचार-सूत्रें सांगितलीं.

"पक्षविशिष्ट राजकारणांत विद्यार्थ्यांनीं भाग घेऊं नये......आपल्या विभूति त्यांनीं जरूर निवडाव्या. पण आपल्या ध्येयमूर्तींचे गुण अंगीं आणण्याचा प्रयत्न करणें हें खरें विभूतिपूजन समजलें पाहिजे. त्या विभूति स्वर्गस्थ झाल्या, कारागृहांत पडल्या अथवा फांशी गेल्या तर संपावर जाणें हा विभूतीबद्दल आदर दाखविण्याचा खरा मार्ग नाहीं......शास्त्रीय पद्धतीनें सूतकताई करणें हें विद्यार्थ्यांचें कर्तव्य आहे......संपूर्ण खादी व स्वदेशी यांचा अंगीकार त्यांनीं करावा......राष्ट्रीय निशाणें स्वतःच्या बटनावर डकवावींत. पण इतरांना तीं वापरण्याची सक्ती करूं नये...... जातिभेद व अस्पृश्यता यांना आपल्या हृदयांत थारा देऊं नये...... आपल्या रुग्ण शेजाऱ्यांची शुश्रूषा, गांवसफाई, साक्षरता-प्रचार या कामीं त्यांनीं आपणांला गुंतवून घ्यावें.........राष्ट्रभाषेचा अभ्यास, नवें संपादित ज्ञान मातृभाषेंतून बांधवांमध्यें प्रसृत करणें हाहि उत्तम कार्यक्रम आहे...... भगिनीवर्गाशीं त्यांचें वागणें शुद्ध व दाक्षिण्यपूर्ण असावें......त्यांनीं गुप्तता टाळावी, संशयाला फाटा द्यावा, संयमी व पवित्र जीवन आचरावें, दुर्बळाचें रक्षण करावें, आणि अभय संपादावें. दंगेधोपे झाल्यास अहिंसात्मक पद्धतीनें

ते शमविण्याचा यत्न करावा. या कामीं त्यांनीं प्राणहि धोक्यांत घालावेत आणि जेव्हां स्वातंत्र्य-संग्रामाचा पारा पराकोटीला जाईल तेव्हां आपापल्या शिक्षणसंस्था सोडून देशाच्या स्वातंत्र्याकरितां समर्पण करावें." आदर्श विद्यार्थी-जीवनाचा हा थोडक्यांत पण सर्वांगपरिपूर्ण योगमार्ग आहे.

सत्याग्रह केव्हां, कोणत्या मुद्यावर व कसा सुरू करावयाचा याचें एक निश्चित शास्त्र आहे. सत्याग्रहाचें स्वरूप कांहींसें प्रासंगिक असणार हें उघड आहे. पण विधायक कार्यक्रम हें नित्याचें व्रत आहे. हें ज्या प्रमाणांत आपण आचरूं त्या प्रमाणांत सत्याग्रह यशस्वी होईल. गांधीजींनीं जी अहिंसात्मक समाजाची भव्य कल्पना जगापुढें मांडली आहे तिलाच ते 'रामराज्य' या नांवानें अनेकदां संबोधीत. हें 'रामराज्य' म्हणजे काय? याचें उत्तर गांधीजींनीं दिलें आहे.

"'रामराज्य' म्हणजे परमेश्वराचें भूवरील राज्य. हें धार्मिक दृष्ट्या भाषांतर झालें. हेंच राजकीय दृष्टीनें सांगावयाचें झाल्यास रामराज्य म्हणजे संपूर्ण लोकशाही. ज्या लोकशाहींत वंश, वर्ण, पंथ, संपत्ति इ० गोष्टींवरून ठरणारे उच्चनीच भेद नाहींत अशी लोकशाही. या रामराज्यांत जमीन आणि राज्ययंत्र हीं लोकांच्या मालकीचीं राहतील. न्याय विनासायास व पूर्ण मिळेल. भाषण, लेखन व उपासना यांचें स्वातंत्र्य अबाधित राहील. लोकांनीं आपण होऊन पत्करलेल्या नैतिक संयमाच्या नियमामुळें हें सर्व घडून येणें सुलभ होईल."

हें रामराज्य किंवा ही खरी लोकशाही एकाएकीं अस्तित्वांत येणें शक्य नाहीं. त्यासाठीं सतत वैयक्तिक व सामुदायिक तपश्चर्या करणें जरूर आहे. विधायक कार्यक्रमांत त्या तपश्चर्येचें सार आलें आहे.

० ० ०

अनुक्र. 28337
आ. आ. 2008
दि. 3-3-51

# " अवघाचि संसार सुखाचा करीन "

भगीरथानें घोर तपश्चर्येनें गंगेला प्रसन्न करून तिला भूलोकावर आणिलें आणि भूलोकावरून ती पाताळांत शिरली. स्वर्ग, भूलोक आणि पाताळ अशा तीन प्रदेशांतून ती गेली म्हणून तिला 'त्रिपथ–गामिनी' असें नांव देण्यांत आलें. आतांपर्यंत गांधीजींच्या ज्या तत्त्वज्ञानाचा आपण परिचय करून घेतला तें तत्त्वज्ञान असेंच तीन क्षेत्रांत प्रभावी ठरलेलें आहे. माणसाचें वैयक्तिक जीवन त्यानें उजळलें, राष्ट्राला चैतन्य दिलें आणि आंतरराष्ट्रीय जगाला प्रकाश देण्यांत पुढाकार घेतला. व्यक्ति, राष्ट्र आणि जग या तीनहि क्षेत्रांत त्याचें ऐश्वर्य आतां प्रस्थापित झालें आहे.

वास्तविक 'गांधीवाद' असा एखादा स्वतंत्र धर्मपंथ किंवा एखादें वेगळें तत्त्वज्ञान आहे असें मुळींच नाहीं. खुद्द गांधीजींनीं हें अनेकवार स्पष्ट करून सांगितलें आहे. सत्य आणि अहिंसा हीं तत्त्वें अत्यंत प्राचीन आहेत, त्यांना जगाच्या व्यवहाराचे व राजकारणाचे कामीं आपण जोडण्याचा प्रयत्न केला असें ते म्हणत. मात्र हा प्रयत्न करतांना त्यांनीं जें तंत्र शोधून काढलें तें सर्वस्वीं नवीन आहे. त्यालाच आपण सत्याग्रहशास्त्र म्हणतों.

" कुटुंबांत भांडणें मिटाविण्यासाठीं प्रेममूलक उपाय आपण उपयोगांत आणतों तेंच सर्व जगाच्या व्यवहाराला लावावें हें माझें ध्येय आहे. " असें गांधीजींनीं सांगितलें. महंमद पैगंबर ह्याच्या चरित्रांत एक सुंदर व बोधप्रद गोष्ट आहे. एकदां मक्का येथें मशीद बांधण्याचें काम चालू असतां मधोमध बसवायचा पाषाण कोणीं न्यावा याविषयीं चार अरब जमातींत तंटे सुरू झाले. हा पाषाण सर्वशक्तिमान् परमेश्वरानें स्वर्गांतून टाकला अशी सर्वांची श्रद्धा होती. म्हणून तो पाषाण उचलून त्याची योग्य प्रतिष्ठापना करणें ही मोठी मानाची गोष्ट होती. त्या वेळच्या त्या अरब जमाती म्हणजे क्रूर, अडाणी, असंस्कृत माणसांच्या टोळ्या होत्या ! चार जमातींपैकीं प्रत्येक

जमातीचा मोहोरक्या म्हणे कीं, " मीच तो पवित्र पाषाण नेणार. " कोणी हट्ट सोडेना. अगदीं रक्तपातापर्यंत पाळी आली. ' हो ना ' करतां असें ठरलें कीं अमुक दिवशीं सकाळीं जो मनुष्य अगोदर त्या जागीं येईल त्याला तो पाषाण हलविण्याचा मान मिळावा. सुदैवानें त्या दिवशीं पहिल्यानेंच येणारा मनुष्य महंमद पैगंबरच होता. महंमदाला पाषाण हलविण्याचा मान मिळणार म्हणून सर्व नागरिकांना आनंद झाला. कारण त्यावर सर्वांची भक्ति होती. " अल्–अमीन " ( विश्वासू ) अशी पदवी त्याला लोकांनीं मोठ्या आदरानें दिली होती. आतां महंमदच हा पाषाण हलविणार हें स्वच्छ होतें. पण महंमदानें आपल्या अंगावरील चोगा जमिनीवर अंथरला आणि त्यावर तो पाषाण ठेवला. नंतर चार जमातींच्या चार पुढाऱ्यांना चोग्याचे चार कोपरे धरण्याची विनंति केली; आणि तो पाषाण योग्य जागीं नेऊन ठेवण्यास सांगितलें. महंमदाच्या या उदार वर्तनानें एक मोठा रक्तपात टळलाच आणि त्याच्या अर्धचंद्रांकित ध्वजाखालीं आणखी हजारों अनुयायी उत्साहानें गोळा झाले. स्वतःला लायकीनें मिळालेलें वैभव इतरांना मुक्त हस्तानें देण्याची हीच उदार पद्धति गांधीजींच्या तत्त्वज्ञानांत मुख्यतः अंतर्भूत आहे.

" तेन त्यक्तेन भुञ्जीथाः । मा गृधः कस्यस्विद्धनम् " " सर्वस्वाचा त्याग करून उपभोग घे. कोणाचें धन घेऊं नको. "

या ' ईशावास्योपनिषदां 'तील महामंत्राचा आधार गांधीजी नेहमीं देत असत. या महामंत्राच्या सामर्थ्यावर लहानपणापासून त्यांचा गाढ विश्वास आहे. स्वतः त्यागानें इतरांचें हृदयपरिवर्तन करण्याची पद्धति कुटुंबापुरतीच न ठेवतां सर्व लोकव्यवहाराला लावली तर जग हें नंदनवन होईल.

१९४५ सालीं तुरुंगांतून सुटल्यानंतर महाराष्ट्रीय कार्यकर्त्यांपुढें गांधीजींनीं जें भाषण केलें त्यांत त्यांनीं सांगितलें कीं, ' हातीं शस्त्र नसतांना हिंसात्मक शक्तीपुढें स्वाभिमानपूर्वक कसें राहावें हें मीं जगाला शिकविलें असें ठरलें तर माझें जीवन सफल झाल्यासारखें मला वाटेल. ' इतिहास हें श्रेय गांधीजींच्या चरणीं वाहण्यास आनंदानें तयार होईल. आपल्या सर्वसमर्थ व आसुरी पित्यापुढें सात्त्विक भगवद्भक्त प्रल्हाद ज्या निश्चयानें उभा राहिला आणि पित्यानें केलेले अनन्वित हाल सोसूनहि त्यानें जें सत्त्व रक्षिलें तो

निश्चय व तें सत्त्व गांधीजींनीं हिंदी राष्ट्राला शिकविलें आणि हिंदी राष्ट्राच्या द्वारें तें सर्व जगाला शिकविण्याची उमेद त्यांनीं बाळगिली.

हृदयपरिवर्तन व प्रतिकार यांसंबंधीं गांधीजींची मुख्य भूमिका प्रथम लक्षांत घेतली म्हणजे मग त्यांच्या सर्व उपदेशाचीं मुख्य तत्त्वें उलगडणें जड जाणार नाहीं. ' व्रत-एकादशी ' किंवा ' विधायक कार्यक्रम ' आपण सूक्ष्मपणें पाहिल्यास एकंदर गांधीजींच्या उपदेशांत सात प्रमुख वैशिष्ट्यें दिसतात. सूर्याचा प्रकाश सात रंगांनींच झाला आहे; तसेंच गांधीवादाचें आहे. इंद्रधनुष्य पडलें म्हणजे सूर्यकिरणांचे घटक असलेले सात रंग खुलून दिसतात. पण तांबडा, पिवळा, निळा इ० रंगांच्या पट्टयांचा एकमेकांत झालेला मिलाफ इतका बेमालुम असतो कीं एक रंग संपतो कुठें आणि दुसरा सुरू कुठें होतो हें कांहीं आपणांस कळत नाहीं. गांधीजींच्या तत्त्वज्ञानांतल्या सात सूत्रांचा असाच प्रत्यय आपणांस येईल.

**सत्य** हें अगदीं पहिलें तत्त्व आहे. यालाच गांधीजी परमेश्वर मानीत. सूर्य या अनंत आकाशांत एवढी अजस्र उष्णता व प्रकाश प्रतिक्षणीं ओतीत असतो, पण माणूस आपल्या जीवनपोषणासाठीं त्यांतली किती थोडी उष्णता व प्रकाश घेतो ! तसेंच सत्याचें आहे. अंतिम विराट् सत्याच्या एका कणाचा काय तो आपणांस साक्षात्कार होतो. सत्यरूपी परमेश्वराचा अधिकाधिक साक्षात्कार घेत राहणें हेंच जीवनाचें सार्थक गांधीजी मानीत.

**अहिंसा** पाळल्याशिवाय खरें सत्यदर्शन शक्यच नाहीं. ज्या मानानें आपण अहिंसा पाळूं त्या मानानें सत्यप्रकाश आपल्या जीवनांत येईल. संगीतांतील सप्त स्वरांत **सा** ( षड्ज ) आणि **प** ( पंचम ) हे स्थिर व एकाकी स्वर असतात. इतर स्वरांप्रमाणें त्यांत तीव्र व कोमल असे भेद पडूं शकत नाहींत. तसेंच गांधीजींच्या सप्ततत्वात्मक शिकवणींत सत्य व अहिंसा हीं स्थिर व निरपवाद तत्त्वें आहेत. त्यांना कुठलाहि दुसरा पर्याय व शाखा नाहीं.

**साधी रहाणी** आणि तिला प्रिय सखी शोभणारी उच्च विचारसरणी ही अहिंसामार्गांतूनच प्रकट होते. अहिंसा म्हणजे विकारांवर विजय, भोगलालसेचा विनाश. अर्थात् हें सारें साधी रहाणीच घडवून आणणार.

**उद्योगधंद्यांचें विकेन्द्रीकरण** हें साध्या रहाणीनें सहजासहजीं प्राप्त

होण्यासारखें आहे. आपल्या शरीरश्रमानें व आपल्या आंवतीं–भोंवतीं मिळणाऱ्या सामुग्रीनें ज्या वस्तु निर्माण करतां येतील त्यांवरच संतोषपूर्वक निर्वाह करावयाचा यालाच संपूर्ण स्वदेशी तत्त्व म्हणतां येतें. या तत्त्वाचें परिपालन योग्य केलें म्हणजे एकेका जागीं अजस्र कारखाने घालून मालाचे पर्वत रचण्याचें कारण नाहीं. विकेन्द्रीकरणांत प्रचंड यंत्रांना स्थान नाहीं. स्वयंपूर्ण ग्रामराज्य हें विकेन्द्रीकरणाचें ध्येय.

**वर्गकलहाचा निषेध** या ग्रामराज्याच्या कल्पनेंत सहजच केला जातो. कारण जमीनदार आणि कुळें, मालक व मजूर हें द्वंद्वच मुळीं केन्द्रीकरणाचें दुष्ट अपत्य आहे. कारखाने भरभराटीला येऊं लागले कीं मालक अधिकाधिक संपन्न होत जातात आणि मजुरांना जास्त जास्त कंगालपणा येत जातो. यांतूनच वर्गकलह ( Class Struggle ) उद्भवतो. म्हणून उद्योगधंद्याचें विकेन्द्रीकरण उपदेशून गांधीजींनीं या अनर्थाची मुळांतच वासलात लावली. गांधीजी वर्गकलहाच्या विरुद्ध होते. याचा अर्थ ते धनिकांच्या बाजूचे होते असा कित्येक लोक करतात तें चूक आहे. गांधीजी वर्गकलहाला विरोध करीत म्हणजे वर्गकलह ज्यायोगें पेटतो ती अर्थव्यवस्थाच त्यांना नामंजूर होती.

**आर्थिक नियतिवादाला विरोध** गांधीजी कां करीत हें पाहण्यापूर्वी प्रथम ‘ आर्थिक नियतिवाद ’ ही शब्दसंहति आपण स्पष्ट समजून घेऊं. गेल्या शतकांत युरोपमध्यें एक अत्यंत प्रबळ विचारप्रवाह उदयाला आला. कार्ल मार्क्स हा त्याचा प्रणेता होता. मनुष्य आपल्या जीवनांत अर्थोत्पादन करण्याचीं जीं साधनें वापरील त्यांवर त्याचा स्वभाव, नीति, धर्मतत्त्वें अवलंबून असतात असें मार्क्सनें प्रतिपादन केलें. मनुष्य जेव्हां दगडधोंड्यांचीं हत्यारें वापरीत होता तेव्हां त्याच्या नीतिकल्पना कांहीं वेगळ्या होत्या. त्याचा सामाजिक दृष्टिकोण तसाच भिन्न होता. शेतीची कला शोधून काढल्यावर त्याचें अर्थसाधन बदललें तेव्हां त्याच्या नीतिधर्मादि विचारांतहि क्रांति झाली. मग यंत्रें आलीं. शेतीचें महत्त्व त्या मानानें कमी झालें. पुनः एका नवीन क्रांतीच्या भोंवऱ्यांत माणूस सांपडला. अन्नवस्त्र व इतर सुखसोयी मिळविण्याचीं माणसाचीं साधनें बदललीं कीं, त्याचें मन व त्याच्या सामाजिक कल्पनाहि बदलतात. म्हणजे अर्थ माणसाच्या मनावर प्रभुत्व गाजवितो, अर्थ माणसाला नव्या कल्पना नियत करून देतो. अर्थावर माणसाच्या मनाचे संस्कार ठरत असतात असें

या प्रतिपादनाचें सार आहे. यालाच आर्थिक नियतिवाद (Economic determinism) म्हणतात. ह्या विचाराचा पगडा जगावर फार मोठ्या प्रमाणावर बसला. कला, इतिहास, धर्मशास्त्र इ० वर त्यानें आपली छाप बसविली. अर्थव्यवस्था बदलली कीं, मनुष्यस्वभाव, नीतिमूल्यें, धर्मतत्त्वें सर्व कांहीं बदलतां येतें असें माणसांना वाटूं लागलें.

गांधीजींनीं या पंथाविरुद्ध मोठेंच बंड उभारलें. अर्थ जड आहे. उत्पादनसाधनें हींहि जडच आहेत. मन मात्र जिवंत आहे, चैतन्यमय आहे. या मनाच्या साह्यानें सर्व विश्वाच्या साम्राज्याचा तुम्ही परिचय करून घेऊं शकतां. विश्व चालविणाऱ्या शक्तीशीं मनामुळेंच तुम्हांला ऋणानुबंध जोडतां येतो. ज्या आनंदाला पारावार व मृत्यु नाहीं असा आनंद तुम्ही मनाच्या साह्यानें मिळवितां. अशा या चैतन्यशील मनावर जड अर्थानें राज्य करावें ही कल्पनाच किती क्षुद्र आहे. मनाचे धर्म, नीतिविषयक कल्पना ठरविणार कोण ? तर बँकेंतले पैसे, लोखंडाचीं चक्रें, नांगर इ० जड व अवजड गोष्टी ! गांधीजींचा या तत्त्वाला सक्त विरोध होता. मनुष्याचें जीवन थोडेफार अर्थव्यवस्थेवर अवलंबून असेल, आणि तेवढ्यापुरतें अर्थशास्त्राला महत्त्व आहेहि. पण प्रभु येशूनें म्हटल्याप्रमाणें, " मनुष्य कांहीं केवळ भाकरीवरच जगत नाहीं. " उच्च गोष्टीकडे त्याची ओढ असते. म्हणून बाह्य गोष्टींच्या ताब्यांत मन देऊन मोकळें होण्याऐवजीं मनाचें आधिराज्य बाहेरच्या परिस्थितीवर चालवावें असें गांधीजी म्हणत. पाश्चात्यांचा जडवाद व भारतीय अध्यात्मवाद यांतला फरक आणि समाजवाद व गांधीवाद यांतला विरोध नेमका हा एकच आहे. खाजगी मालकीवर उभारलेली अर्थव्यवस्था बदलली कीं माणूस स्पर्धेऐवजीं सहकार्य करूं लागेल असें समाजवाद म्हणतो. गांधीजी म्हणत, कारखान्यांची मालकी चार धनिकांकडून काढून राष्ट्राकडे दिली कीं मनुष्याची संचयवृत्ति लगेच नष्ट थोडीच होणार ! मनुष्यानें त्या वृत्तीचें आपल्या मनांतून उच्चाटन करण्याचा वैराग्यपूर्वक अभ्यास व प्रयत्न केला आणि तो यशस्वी झाला तरच सर्व समाज स्पर्धेच्या जागीं सहकार्याची स्थापना करील.

सर्वोदय हें गांधीजींच्या कर्मयोगाचें उद्दिष्ट होतें. थोड्या लोकांनीं पुष्कळांच्या जीवावर चैन करावी ही भांडवलशाही रीत झाली. पुढें ' जास्तींत

जास्त लोकांचें जास्तींत जास्त सुख ' हें तत्त्व बळावलें. धनिकांना निर्धन करा, व्यक्तीचें स्वातंत्र्य काढून घ्या आणि बहुजनाचें सुख पहा ही चळवळ आली. गांधीजींच्या जीवनयोजनेंत कुठलाहि एक वर्ग दुसऱ्या वर्गाचा विरोधक नाहीं. व्यक्तीच्या विकासाला स्वातंत्र्य आहे. गरिबांना अन्नवस्त्राचा तुटवडा नाहीं आणि या दृष्टीनें तो वर्ग संपन्नच म्हणावा लागेल. उलट, धनिक वर्ग हा आपल्या संपत्तीचा विनियोग लोककल्याण करण्याच्या वृत्तीनें करणार असल्यानें त्याला श्रमजीवि वर्गापासून फार वेगळेंपण उरणार नाहीं. प्रत्येक वर्गाचा, हरएक व्यक्तीचा उदय हा गांधीवादाचा पुकार आहे.

गांधीजींच्या उपदेशांतील धवलता कोणत्या ' सप्त रंगां ' नीं झाली आहे हें सांगितलें. कित्येकदां इंद्रधनुष्य बराच वेळ राहून विरत चाललें म्हणजे शेवटीं शेवटीं दोनच मुख्य रंग शिल्लक राहिलेले दिसूं लागतात; हा चमत्कार तुम्हीं पाहिला असेल. गांधीजींच्या उपदेशांतले सप्तरंग लोपत गेले तरी ठळकपणें असे मुख्य दोन रंग निश्चित राहतील. ते म्हणजे सत्य आणि अहिंसा.

यावर गांधीजींचें लोकोत्तर अवतारकार्य पारखून पहा ! गांधीजींनीं काय केलें ? यापेक्षां गांधीजींनीं काय केलें नाहीं हाच प्रश्न प्रथम पुढें उभा राहतो. सूर्य उगवल्यावर राजवाड्याच्या उत्तुंग शिखरापासून खोल दरींतल्या झाडझडोऱ्यापर्यंत त्याच्या तेजःकिरणांचा स्पर्श होतो. त्याप्रमाणें राष्ट्रीय जीवनांतल्या सर्व लहानमोठ्या शाखांवर या हिरण्यगर्भाची प्रभा पसरली आहे. गांधीजींनीं राष्ट्राला त्रिगुणात्मक ध्वज दिला, चाळीस कोटी लोकांना एकमेकांचें हृदय व व्यवहार समजावे म्हणून राष्ट्रभाषेचा सर्वत्र प्रचार केला, माणुसकीला कलंक लावणाऱ्या अस्पृश्यतेविरुद्ध निकराची मोहीम करून तीसाठीं पृथ्वीमोलाचे प्राण पणाला लाविले, गोसेवेला प्राधान्य दिलें, ग्रामोद्योग व खादी यांसाठीं जिवाभावानें खपून लक्षावधि अर्धपोटी लोकांना चरितार्थाची सोय दाखविली, शुद्ध, कार्यक्षम व साध्या आहाराचें, निसर्गोपचाराचें व संयमाचें महत्त्व पटविलें, नवी शिक्षणपद्धति जगापुढें मांडली, स्त्रियांच्या उन्नतीसाठीं झटून त्यांच्या नैसर्गिक श्रेष्ठ गुणांना प्रकट होण्यास वाव करून दिला, अव्यवस्थित व भीरु लोकांना संघटित व धीट केलें, प्रांतोप्रांतीं शूर व तेजस्वी कार्यकर्ते निवडून लढाऊ नेत्यांचें एक मोठें दल निर्माण केलें, सर्वधर्मांत समभाव वाढीला लाविला, आणि सर्व जगांत प्रबळ

ठरलेल्या साम्राज्यशाहीला आव्हान देऊन तीविरुद्ध स्वातंत्र्याचा लढा कसा करावा याचें क्रांतितंत्र भारताला शिकविलें. आज जगाच्या कोनाकोपऱ्यांत भारताचें नांव गेलें याला गांधीजींचेंच माहात्म्य मुख्यतः कारण झालें आहे.

या प्रकरणाच्या आरंभींच जी भागीरथीची उपमा दिली तीकडे पुन्हां जाऊं. व्यक्ति, राष्ट्र आणि जग या तीन क्षेत्रांत गांधीवादाचा प्रभाव पडला असें सांगितलें होतें ना? तेंच कसें तें पहा. जग सुखी होण्यास व्यक्ति आणि समाज यांची जीवनयात्रा निर्वेध चालली पाहिजे. यासाठीं समाज किंवा व्यक्ति एकमेकांची शत्रू न होतां सहकारी स्नेही होतील असा त्यांचा जीवनक्रम पाहिजे. हेंच विशद करतांना एका पाश्चात्य विचारवंतानें असें म्हटलें आहे कीं व्यक्तीच्या जीवनांत आत्मसंयमन ( Self-control ) आणि समाजाच्या वागण्यांत सहकार्य ( Co-operation ) हीं आलीं म्हणजे सर्व कांहीं सुरळीत होईल. गांधीजींनीं प्रवर्तिलेला आचारधर्म अगदीं याच तत्त्वांना मान्यता देणारा आहे. व्यक्तीच्या जीवनांत गांधीजींनीं सर्वत्र स्थूल व सूक्ष्म संयमच आदेशिला आहे, ' व्रत एकादशीं 'त दुसरें काय आहे? मनुष्याच्या अंगीं सुप्त व अविकसित असलेला देवपणा ( Godliness ) जागृत व प्रफुल्लित व्हावा हेंच ' व्रत-एकादशी 'चें ध्येय आहे. व्यक्तीला गुलाम बनवून अवनत करूं पाहणाऱ्या वासना-विकारांवर विजय मिळविणें ' व्रत-एकादशी 'च्या पालनानें शक्य होईल. व्यक्तीप्रमाणें राष्ट्रांतहि राष्ट्राला खालीं चेंचून भ्रष्ट करूं पाहणाऱ्या तामसी शक्ति असतात, राष्ट्रांत पारतंत्र्य, वर्गकलह, वतनदारी, विषमता यांचा नंगा नाच चालू असतो. तो बंद पाडण्यासाठीं, ' विधायक कार्यक्रमा 'चें अस्त्र अभिमंत्रित करून गांधीजींनीं राष्ट्रापुढें ठेविलें आहे. आणि आपल्या मातृभूमीबाहेर इतर जीं राष्ट्रें आहेत त्यांनीं आपापसांत भांडून पृथ्वीला स्मशानाची कळा आणूं नये म्हणून अहिंसेची संजीवनी गांधीजी माणूसजातीला देत आहेत. व्यक्ति, राष्ट्र, आणि मानवता या तीन क्षेत्रांतून वाढणारी ही अशी पवित्र भावगंगा आहे. हिच्या पावनतीर्थांत उतरून शुद्ध व सुखी व्हायचें कीं नाहीं हें ज्याचें त्यानें ठरवावें. ती तर अखिल मानवांना कृतार्थ करण्यास उत्सुक होऊन वाहत आहेच.

संयमन व सहकार्य यांवर आधारलेलें जग जर उदयाला आलें तर राज्ययंत्राची गरजहि लागणार नाहीं. पोलिस नकोत, न्यायकोर्टें नकोत, कचेऱ्या

नकोत, कांहींच नको. गांधीजींचें हें खरें स्वप्न होतें. राष्ट्रांत कुठल्या तऱ्हेचें सरकार असण्याची गरज न राहणें हाच अराज्यवाद ( Anarchism ) म्हणतात. पाश्चात्यांत ह्या वादाचे प्रवर्तक होऊन गेले आणि समाजवादाचेंहि अंतिम ध्येय तेंच आहे. गांधीजी त्याच ध्येयाकडे चालले होते. गांधीजींची विचारसरणी काळाच्या पुढें आहे, मागें नाहीं.

पण समाजवाद किंवा इतर अराजक पंथ यांच्यांत आणि गांधीजींच्या मार्गांत मूलतः फरक आहे तो अहिंसेबाबतचा. इतर पंथ हिंसात्मक साधनांनीं रक्ताचे सडे पाडून आपलें ध्येय गांठूं पाहतात. म्हणजेच बाह्य परिस्थिति जबरदस्तीनें बदलून मनुष्याचें अंतरंग निवळून टाकण्याची ईर्षा धरतात. तर गांधीजी अंतःशुद्धीला प्राधान्य देऊन बाह्य परिस्थिति सुधारण्याचें कंकण बांधीत होते. गांधीवाद म्हणजे सेवेचा सत्तेवरील विजय होय; गांधीवाद म्हणजे अहिंसेनें हिंसेवर केलेली मात होय; गांधीवाद म्हणजे चैतन्यमय मनानें जड जगतावर स्थापलेलें प्रभुत्व होय. गांधीवादानें वासनांतून व्यक्तीला मुक्त करण्याचा मार्ग सांगितला; पारतंत्र्यांतून राष्ट्राला वर निघण्याचें ज्ञान दिलें आणि व्यक्ति व राष्ट्र यांच्या उन्नतीबरोबर "**अवघाचि संसार सुखाचा करीन। आनंदें भरीन तिन्ही लोक**" असा विश्वव्यापी संकल्प केला. हें गांधीवादाचें वैभवसंपन्न स्वरूप आहे.

o o o

### गांधी-सूक्ति

"समुद्रापासून वेगळ्या पडलेल्या बिंदूच्या बाबतींत आपण विश्रांतीची कल्पना करूं शकतों, पण समुद्रांत असणाऱ्या बिंदूला विश्रांति कोठची ? समुद्राला एका क्षणाची तरी विश्रांति आहे कोठें ? आपलेंहि तंतोतंत तसेंच आहे. ईश्वररूपी सागरांत आपण मिळून गेलों कीं आपली विश्रांति गेली, विश्रांतीची अवश्यकताहि उरली नाहीं. हीच खरी विश्रांति."

आतां आपण विवेचनाच्या समाप्तीपर्यंत आलों. एखाद्या वस्तूची अथवा व्यक्तीची छायाचित्रावरून संपूर्ण कल्पना येण्यास त्या वस्तूचीं किंवा व्यक्तीचीं निरनिराळ्या कोनांनीं ( Angles ) चित्रें काढतात. चित्रपटांत आपण पाहतोंच ना कीं, एखाद्या प्रमुख पात्राचें अथवा राजदरबारासारख्या भव्य देखाव्याचें संपूर्ण दर्शन होण्यासाठीं बाजूनें, वरून, दुरून, जवळून अशीं अनेक दृश्यें दाखवितात ! हीं दृश्यें चित्रित करण्यासाठीं कॅमेरा दर वेळीं वेगवेगळ्या ठिकाणीं, वर खालीं न्यावा लागतो. गांधीजींच्या तत्त्वज्ञानाचें स्थूल मानानें आकलन व्हावें यासाठीं असेंच निरनिराळ्या बाजूंनीं गांधीतत्त्वाचें आलेखन केलें. आतां एक दोन मुद्दे चर्चिले कीं, गांधीवादाची फलश्रुति सांगितली असें होणार आहे.

गांधीजींनीं हिंदी राष्ट्रवादाला उंची व विशाल स्वरूप दिलें, हें अभिमानानें सांगतांना आपण वर्तमानकाळ व इतिहास यांची पार्श्वभूमि घेऊन या नव्या राष्ट्रवादाकडे पाहिलें पाहिजे. आज तर त्याची विशेष गरज आहे. कारण नुकत्याच संपलेल्या जगड्व्याळ युद्धांत राष्ट्रवाद ह्या पंथाची फार ओढाताण झालेली दिसते. इंग्लंड, अमेरिका आपणांला राष्ट्रवादी म्हणविणार. हिटलरचें बळ राष्ट्रांतूनच आलेलें होतें, आणि रशिया जो एवढा अजिंक्य ठरला तोहि त्यानें राष्ट्रवादाची कांस धरली म्हणून ! ! इकडे आपण आज अनेक वर्षे जो स्वातंत्र्यसंग्राम चालविला त्याची स्फूर्ति राष्ट्रवादांतूनच आपणांला मिळते आहे हें प्रसिद्ध आहे ! मग या पाश्चात्य राष्ट्रांचा राष्ट्रवाद आणि आपला भारतीय राष्ट्रवाद यांतला फरक कोणता ?

हें समजण्याकरितांच गांधीजींनीं हिंदी राष्ट्रवादाला कोणते सात्त्विक रस समर्पण केले हें सूक्ष्म दृष्टीनें पाहिलें पाहिजे. वाली आणि सुग्रीव यांची कथा माहीत आहे ना ? दोघेहि महापराक्रमी वानरवीर; दोघे सख्खे भाऊ. वाली

उग्र, आक्रमक, अन्यायी होता. सुग्रीव नम्र, सोशिक, सत्प्रवृत्त होता. प्रभु रामचंद्रानें सुग्रीवास साह्य करण्याचें वचन दिलें हें साहजिकच होतें. वाली व सुग्रीव यांचें द्वंद्वयुद्ध सुरू झालें. रामचंद्र दूर आड बाजूस उभा राहून हें पहात होता. त्यांचें रंगरूप इतकें सारखें होतें कीं यांतला वाली कोणता आणि सुग्रीव कोणता हें रामचंद्राला कळेना ! आणि यांतला वाली कोणता हें कळल्याशिवाय रामचंद्र त्यावर बाण तरी कसा सोडणार ? अखेर सुग्रीव वालीच्या प्रहारांनीं जर्जर होऊन रामाकडे धांवला. तेव्हां त्याला आश्वासन देऊन व त्याच्या गळ्यांत पुष्पहार घालून रामप्रभूनें त्याला वालीच्या अंगावर जाण्यास सांगितलें. पुनः द्वंद्व सुरू झालें. आतां सुग्रीवाच्या गळ्यांत पुष्पहार असल्यानें सुग्रीव कोणता व वाली कोणता हें रामचंद्र नीट ओळखूं शकला, आणि तात्काळ एक बाण सोडून त्यानें वालीचा वध केला !

या कथाभागांत वर्णिलेली रामचंद्राची जी स्थिति आहे तीच पुष्कळदां आपली होते. आपला राष्ट्रवाद पाश्चात्य राष्ट्रवादाशीं झगडत आहे. यांत दोन्ही राष्ट्रवादांचीं बाह्य स्वरूपें एकसारखींच दिसतात ! म्हणून आपली फसगत होते. ती टाळली नाहीं तर आपण संभ्रमांत पडूं आणि कोणत्या पक्षाला आपलें साह्य द्यावयाचें आहे याविषयीं घोटाळा होईल ! म्हणून गांधीजींनीं आदेशिलेल्या अहिंसा-तत्त्वाची पुष्पमाला जर आपल्या राष्ट्रवादाच्या गळ्यांत घातली तर घोटाळा होणार नाहीं.

लहानमोठे ओहळ व नद्या मिळून महानदी होते. आज हिंदी राष्ट्रवादाची विराट् सरिता जगाचें लक्ष आपल्याकडे ओढून घेत आहे. गांधीजी-नेहरू यांच्या वाढदिवशीं इंग्लंड-अमेरिकेंत अभिनंदन—सभा भरतात व वृत्तपत्रांचे विशेषांक निघतात. हिंदी राष्ट्रवादाविषयीं एवढें कुतूहल उत्पन्न होण्यास गांधीजींचें महत्कार्य कारणीभूत झालें यांत शंकाच नाहीं. पण ह्या महानदींत कोणते लहानमोठे प्रवाह येऊन मिळाले हें पाहणें अवश्य आहे. आणि तें पाहतांना गांधीजींची त्या त्या बाबतींतली कामगिरीहि सहजच कळेल. पितामह दादाभाईप्रभृति आधुनिक भारतांतील आद्य नेत्यांनीं जो जातिभेद–निरपेक्ष देशभक्तीचा मंत्र हिंदुस्थानला दिला त्याला गांधीजींनीं आपल्या साधनेनें विलक्षण सामर्थ्य आणिलें. "आमचें अर्थशास्त्र आमच्या देशाच्या हितावरच रचिलें गेलें पाहिजे" या न्यायमूर्ति रानड्यांच्या सूत्राच्या

आधारें खादी व ग्रामोद्योग यांचा भव्य पसारा मांडला. स्वदेशी, बहिष्कार, स्वराज्य, राष्ट्रीय शिक्षण या लोकमान्य टिळकांच्या चतुर्विध कार्यक्रमाच्या पायावर नव्या झुंझार राष्ट्रीय जीवनाची इमारत गांधीजींनीं उभारली! गोखल्यांच्या आदेशाप्रमाणें 'राजकारण धर्ममय करण्यासाठीं' गांधीजी झटत आहेत; राममोहनप्रभृति समाजसुधारक, विवेकानंद, अरविंद यांच्यासारखे योगीन्द्र यांच्या तपश्चर्येतून गांधीजींनीं राष्ट्रवादासाठीं स्फूर्ति मिळविली आहे; दहशतवादी देशभक्तांच्या वैयक्तिक बलिदानांत जें हिंदी शौर्य प्रकट झालें त्याला अहिंसेची व जनतासंघटनेची जोड देऊन तें गांधीजींनीं देशव्यापी केलें, आणि टागोर-नेहरू यांनीं उपदेशिलेल्या आंतरराष्ट्रीय वादाचा व समतेचा आधार गांधीजींनीं हिंदी राष्ट्रवादाला दिला आहे.

आधुनिक भारतांतील अनेक विभूतींच्या सत्कार्यांचा संगम अशा रीतीनें गांधीजींनीं आतां हिंदी राष्ट्रवादांत घडवून आणिला आहे. अबिसिनियांत, मंचुरिया इ० मागासलेल्या देशांवर इटली–जपानप्रभृति फॅसिस्ट राष्ट्रांनीं आक्रमण करतांच हिंदी राष्ट्रवादानें या आक्रमणाचा सर्वांआधीं कडाक्यानें निषेध केला! जर्मनींत ज्यूंची अथवा अमेरिकेंत निग्रोंची जशी क्रूर पारध केली जाते तशी कोणाचीहि पारध वंशाभिन्नत्वाच्या कारणानें येथें केली जाणार नाहीं याची हमी हिंदी राष्ट्रवादानें वेळोवेळीं दिली आहे. फॅसिस्ट नाझी पंथांचा स्त्रीद्वेष हिंदी राष्ट्रवादांत मुळींच नाहीं. उलट २–३ वेळीं कॉंग्रेसचें अध्यक्षपद नामांकित विदुषींना देऊन व स्वातंत्र्यसंग्रमांत हजारों स्त्रियांचा समावेश करून हिंदी राष्ट्रवादानें आपलें स्त्रीदाक्षिण्य प्रकट केलें आहे. आज मध्यवर्ती मंत्रिमंडळांत, परराष्ट्रीय वकिलातींत हिंद सरकारनें स्त्रियांची मोठ्या जागांवर नेमणूक केलेली आहे. स्वातंत्र्याचा लढा अहिंसेनें लढण्याचें नवें तंत्र हिंदी राष्ट्रवादानें काढल्यानें बहुजनसमाजाचा चढतावाढता पाठिंबा त्याला मिळत गेला आणि अशा रीतीनें लोकशाहीची बैठक तयार होत गेली. इतिहासक्रमांत जागृत झालेला आपला देश स्वातंत्र्याच्या रास्त मागणीसाठीं राष्ट्रवादी वृत्तीनें झगडत आहे; तर आतां हातपाय पसरायला जागा दिसेना म्हणून पाश्चात्य राष्ट्रांचा राष्ट्रवाद आदळआपट करून इतरांवर आक्रमण करीत आहे. या सर्व गोष्टी लक्षांत घेतल्या म्हणजे हा आपला सत्त्वगुणी, अनाक्रमक, उदार मताचा, लोकसत्तावादी हिंदी राष्ट्रवाद पाश्चा-

त्यांच्या आसुरी, आक्रमक, स्त्रीद्वेष्टया, हुकूमशाही राष्ट्रवादापेक्षां कसा वेगळा आहे हें ठळकपणें नजरेंत भरतें.

हिंदी राष्ट्रवादाला हें वैशिष्ट्य व वैभव गांधीजींनींच पुष्कळांशीं मिळवून दिलें यांत तिळमात्र संदेह नाहीं. हिंदी राष्ट्रवाद अशा रीतीनें वैशिष्ट्यपूर्ण असल्यानेंच त्याच्या विजयामुळें जग सुखी होण्याची खात्री येणार आहे. " Quit India " च्या चळवळीपूर्वी ब्रिटन, अमेरिका, जपान प्रभृति प्रमुख युद्धयमान राष्ट्रांतील लोकांना उद्देशून गांधीजींनीं जीं तेजस्वी पत्रें लिहिलीं त्यांत याच मुद्याचें आवाहन मुख्यतः केलें होतें. भारत स्वतंत्र होणें जगच्छांतीच्या दृष्टीनें आवश्यक आहे. ही गाढ श्रद्धा गांधीजींच्या अंगीं होती. राष्ट्रवाद व अंतर्राष्ट्रवाद यांचें विवेचन करतांना त्यांनीं स्पष्ट सांगून टाकिलें कीं,—

" माझ्या स्वतंत्र देशापासून जगाला पुष्कळ शिकतां येण्यासारखें आहे व मानवतेच्या सुखासाठीं माझ्या स्वतंत्र देशाची नैसर्गिक संपत्ति वापरतां येण्यासारखी आहे म्हणून तर मला माझा देश स्वतंत्र व्हायला पाहिजे... सर्व जगाचा उत्कर्ष हिंदुस्थानच्या उन्नतीबरोबरच व्हावा ही माझी इच्छा आहे...माझी देशभक्ति ही माझ्या मानवता–प्रेमाचाच एक भाग आहे. ती धर्माला सहाय्यक आहे. साम्राज्यवादाला माझ्या देशभक्तींत स्थान नाहीं... जगांतील इतर राष्ट्रवाद एकमेकांच्या नाशावर जगूं पाहतात. हिंदी राष्ट्रवादानें स्वतंत्र मार्ग आंखला आहे. अखिल मानवतेला साह्य करतां यावें या एकाच हेतूसाठीं त्याला संघटित व्हायचें आहे, आपला पूर्ण विकास करून घ्यावयाचा आहे...राष्ट्रवादी असल्याशिवाय खऱ्या अर्थानें आंतरराष्ट्रवादी होतां येणार नाहीं...आमचा राष्ट्रवाद कुठल्याहि राष्ट्राला संकटांत पाडणार नाहीं. आम्ही कुठल्याहि राष्ट्राची पिळवणूक करणार नाहीं आणि आमचीहि दुसऱ्या कोण्या राष्ट्रास करूं देणार नाहीं. स्वराज्याच्या द्वारें आम्ही सर्व जगाची सेवा करूं. "

हिंदी राष्ट्रवादाच्या विजयामुळें जगाला कोणती अमोल देणगी मिळणार असेल तर ती भारतीय संस्कृति ही होय. हिंदुस्थानांत गेल्या ४-५ सहस्र वर्षांच्या कालांत शेंकडों लहान मोठ्या देशी विदेशी राजवटी व क्रांत्या

झाल्या, रक्ताचे पूर वाहिले; शहरें बेचिराख झालीं; नररुंडांचे कुतुबमिनार रचिले गेले ! तथापि भारतीय संस्कृतीचा विनाश यापैकीं कशानेंहि झाला नाहीं. त्या संस्कृतींतलीं अमर मूल्यें क्वचित् धुरकटलेलीं दिसतात, क्वचित् लुप्त झाल्यासारखीं वाटतात. पण कोणी ना कोणी अवतार प्रकट होऊन त्यांना नवी झिलई देतो, पुनः उजेडांत आणतो. गांधीजींनीं हेंच केलें आहे.

'धम्मपद' या सुंदर बौद्धग्रंथासंबंधीं लिहितांना रवींद्र सांगतात कीं, "धम्मपदांत भगवान् बुद्धानें नवीन असें कांहींच सांगितलें नाहीं. भारतांत प्राचीन काळापासून जो एक धर्मनीतीचा प्रवाह वाहत येत होता त्याची सांठवण या आपल्या ग्रंथांत बुद्धदेवानें केली." भारताचें भाग्य असें आहे कीं, तो चैतन्यशाली प्रवाह पुढील कालांतहि सारखा वहात राहिला आणि बुद्धदेवाप्रमाणें आणखी कांहीं लोकोत्तर पुरुष वेळोवेळीं अवतरून त्यांनीं त्या प्रवाहाची अशीच आपल्या जीवनदर्शनांत सांठवण केली. अमेरिकेंतल्या एका महानदीच्या पात्रांत जागोजागीं सरोवरें आहेत. म्हणजे तिचा प्रवाह कांहीं मैल गेला कीं, एक सरोवर तयार होतें आणि पुनः त्या सरोवरांतूनच ती नदी पुढें वाहूं लागते. कांहीं अंतरावर पुनः एक जलाशय तयार होतो आणि नंतर पूर्ववत् तिचा प्रवाह पुढील मार्ग आक्रमण करूं लागतो. प्राचीन कालापासून चालत आलेल्या भारतीय संस्कृतीच्या प्रवाहाला या महानदीच्या जीवनक्रमाची उपमा उत्कृष्ट शोभेल. बुद्धदेवांसारख्या अनेक महात्म्यांनीं युगयुगीं त्या प्रवाहाला सांठवून धर्मनीतिज्ञानाचीं रमणीय सरोवरें तयार केलीं आहेत. विसाव्या शतकांत सुफलित झालेला गांधीवाद हें असेंच एक सरोवर आहे.

"मधून मधून सामान्य लोकांहून श्रेष्ठ असे महात्मे उदय पावतात. त्यांनीं परमेश्वराबद्दल खोल विचार केलेला असल्यानें परमेश्वराच्या हेतूविषयीं त्यांना इतरांहून अधिक स्वच्छ कल्पना असते आणि निर्भयपणें ते दैवी आदेशाप्रमाणें वागूं शकतात. अशांचें जीवन या अव्यवस्थित व अंधकारमय जगांत तेजस्वी मशालीप्रमाणें प्रकाश देत राहतें. गांधीजी अशा द्रष्ट्या पुरुषांच्या मालिकेंतले आहेत. हृदयाचें धैर्य, आत्म्याची दयालुता आणि अभयाचें हास्य हीं या महापुरुषांचीं वैशिष्ट्यें असतात. आत्म्यावर श्रद्धा, त्याच्या गूढ व्यापारांविषयीं आदर, पावित्र्याचें सौंदर्य, जीवनांतल्या ऋणाचा

स्वीकार, आणि शीलाची थोरवी या मूल्यांसाठीं युगानुयुगें हा देश झगडत आला आहे. हीं मूल्यें राष्ट्रीयहि नाहींत व अंतर्राष्ट्रीयहि नाहींत तर सर्वकाळीं व सर्वस्थळीं स्वयंसिद्ध अशीं आहेत. गांधींचा आचार व उपदेश याच मूल्यांना साथ देणारा आहे."

हिंदु तत्त्वज्ञानाचे त्रिखंडकीर्ति पंडित डॉ. एस्. राधाकृष्णन् यांनीं वरील अत्यंत थोड्या व समर्पक शब्दांत गांधीजींचें जीवन व भारतीय संस्कृति यांचें रहस्य सांगितलें आहे. भारतीय संस्कृतीचीं मूल्यें म्हणून जीं त्यांनीं सांगितलीं आहेत तीं लक्षांत घेऊन आतांपर्यंतचें विवेचन पुन्हां एकदां पाहणें युक्त ठरेल. व्यक्ति किंवा समाज यांच्या जीवनांत जड यंत्राचा किंवा भौतिक परिस्थितीचा वरचष्मा न होऊं देण्यासाठीं तर गांधीजींचा सारा खटाटोप होता. यांतच आत्म्याचें श्रेष्ठत्व त्यांनीं कसें अबाधित राखलें आहे हें दिसतें. द्रव्य, सुखोपभोग, शरीर या सर्वांना झिटकारूनच आत्मबलाचें श्रेष्ठत्व अचल राखणें हें तर सत्याग्रहाचें ध्येय होय. गांधीजींनीं रुक्ष बुद्धि-वादाला फाटा दिला. अपूर्णतेंतून आपण पूर्णतेकडे जात आहोंत असें ते म्हणत. सत्यसंशोधनाच्या मार्गावर एक एक पाऊल पुढें पडत गेलें तर केवढाले चमत्कार दिसतील, हें गांधीजी जेव्हां सांगत तेव्हां आत्म्याच्या गूढ अनंत व्यापाराविषयीं त्यांचा आदरच प्रकट होत नाहीं काय? अंतर्बाह्य पावित्र्य हा तर त्यांच्या कर्मयोगाचा प्राण आहे. आपण जन्माला येतों तेव्हां पितर, कुल, जाति, मानवता इ० चीं ऋणें बरोबर घेऊन येत असतों. हीं ऋणें फेडणें हेंच जीवनाचें साफल्य आहे असें भारतीय संस्कृति सांगते. गांधीजींच्या सेवाधर्मांत हेंच उद्दिष्ट आहे. मागें प्रसिद्ध इंग्रजी लेखक व तत्त्वचिंतक वेल्स यांनीं "मानवी हक्कांची सनद" तयार केली होती. या सनदेवर गांधीजींना सही करण्याविषयीं वेल्सनीं विनंति केली असतां गांधीजींनीं त्यांना असें कळ-विलें कीं, "माणसांचे हक्क कोणते याविषयींचा खर्डा तयार करण्याऐवजीं माणसाचीं कर्तव्यें कोणतीं याची यादी आपण तयार केली असती तर मीं अवश्य सही दिली असती." या उत्तरांत हक्कापेक्षां कर्तव्याचें श्रेष्ठत्व स्पष्ट सूचित झालें आहे. शीलाची महती गांधीजींइतकी आज कोणी वर्णिली असेल? राधाकृष्णन्नीं वरील अवतरणांत या देशांतलीं जीं श्रेष्ठ मूल्यें सांगितलीं आहेत तीं अशा रीतीनें गांधीजींनीं पुनश्च आपल्या प्रभावसंपन्न

जीवितांत उजळून दाखविलीं आहेत. गांधीवाद म्हणजे भारतीय संस्कृतीला पुन्हां एकदां तिचें प्राचीन ऐश्वर्य देण्याचा विश्वप्रयत्न होय.

गांधीजींच्या एकंदर तत्त्वज्ञानाबद्दल आतां सांगतां येण्यासारखें होतें तें सर्व सांगून झालें असें म्हणण्यास हरकत नाहीं. आतां पुढें महात्माजींचें व्यक्तिदर्शन होईल तेव्हां आणखी कांहीं प्रकाशाचे स्रोत त्या तत्त्वज्ञानावर पडतील आणि क्वचित् संदिग्ध राहिलेले कांहीं मुद्दे स्पष्ट दिसूं लागतील. गांधीजींचें एकंदर तत्त्वज्ञान उदात्त असलें तरी तें एक स्वप्न आहे; तें व्यवहारांत कधींच उतरणार नाहीं हा आक्षेप त्यावर मुख्यतः घेतला जातो. गांधीजी ध्येयवादी होते तरी वस्तुस्थितीकडे ते डोळेझांक करणारे नव्हते. मनुष्यांत बीजरूपानें असलेलें देवत्व त्यांना दिसलें आणि त्या बीजाचा वृक्ष व्हावा यासाठीं तर त्यांचा सारा उपदेश होता. पण माणसाचे अंगीं पशुत्वाचा फार मोठा भाग आहे याचीहि गांधीजींना पूर्ण जाणीव होती. पण तो पशुत्वाचा भाग नाहींसा करणें हें सर्व तर संस्कृतीचें ध्येय आहे. मनुष्यजातीच्या प्रारंभकालीं केवळ ' जंगलच्या कायद्या ' चा अंमल होता. ' बळी तो कान पिळी ' या तत्त्वावर सर्व कांहीं चाले. पण पुढें मनुष्यसमाज जसजसा संघटित व सुरक्षित होऊं लागला, तसतसें त्याच्या संसारांत न्याय व दया यांना स्थान मिळूं लागलें. पोलिस, कोर्टकचेऱ्या इ० च्या भीतीनें का होईना मनुष्य न्यायानें वागण्यास शिकला. यापुढें तिसरी अवस्था येईल त्यावेळीं सक्ती आणि भीति या नाहींशा होतील. मनुष्य स्वेच्छेनें कायदा पाळूं लागेल. स्वतःच्या आचाराला संयमाच्या मर्यादा घालून इतरांचें सुख तो प्रधान मानूं लागेल, स्वार्थ बाजूला होऊन सेवाभाव त्याच्या जागीं विराजमान होईल. हें उच्चतम जग निर्माण होण्याची आशा गांधीजींसारखीं नररत्नें उदयाला येतात तेव्हां माणसांना वाटूं लागते. माणसाची आजवरची प्रगति या आशेला पोषकच आहे. गांधीजींना भौतिक जगांतल्या उणीवा व अपूर्णता समजत. पण जें परमोच्च आहे तें साध्य होणारच नाहीं अशा खात्रीनें त्याच्या प्राप्तीसाठीं प्रारंभच न करणें हें त्यांना पसंत नसे. " एक पावलाचा मार्ग जरी पुढें दिसला तरी मला पुरें आहे " (One step enough for me ) या श्रद्धेनें उन्नतिमार्गावर पुढें जात राहणें याहून जीवनांत श्रेय व प्रेय असें काय आहे !

## ' यद्गत्वा न निवर्तन्ते तद्धाम परमं मम ! '

जेथें गेल्यावर माणसाला परत जायची जरूरीच उरत नाहीं तें देवाचें परम धाम होय. तें मंगल-धाम आहे. झरतुष्ट्री धर्मांत त्याला ' गीत-सदन' ( Abode of songs) असें सुंदर नांव आहे. तेथें अनादि व अनंत असें संगीत सुरू असतें असें झरतुष्ट्र सांगतो. या मंगल धामांत प्रवेश मिळविणें हीच मानवजन्माची सार्थकता. यालाच आपण मोक्ष म्हणतों. गांधीजींनीं याच मोक्षाचा मार्ग आपणांला दाखविला आहे. गांधीजींचा मोक्षमार्ग आपणांला गिरिकंदरीं घेऊन जात नाहीं तर अनाथ, दलित व पीडित यांच्या झोपड्यांकडे नेतो. गांधीजींनीं माणसाच्या मोक्षाला सामाजिक मोक्षाचा एक भाग बनविलें आहे. मोक्षमार्गाला अगदीं नवीन व सामर्थ्यवान् आशय त्यांनीं आणला आहे.

" साचचि बोलाचें नव्हे हें शास्त्र ।
परी संसारजिणतें शस्त्र ।। "

असें गांधीजींच्या उपदेशाबद्दल म्हणतां येईल. गांधीजींचा उपदेश केवळ शब्दाचा खेळ नाहीं, किंवा बुद्धिवादाचा डोलारा नाहीं. व्यक्ति, समाज आणि जग यांनीं एकमेकांच्या सहकार्यानें मुक्त व सुखी कसें व्हावें याचें हें शास्त्र आहे. वासना, पिळवणूक, हिंसा यांचे फांस तोडून टाकणारें हें शस्त्र आहे. हें केवळ विचाराला पटलें तरी केवढीं मानसिक वादळें थांबतील आणि कृतींत अल्प मात्र उतरलें तरी जीवनांत नवा प्रकाश व नवें सौंदर्य अनुभवाला येईल. गांधीवाद ही मनोव्यापारांतली आमूलाग्र क्रांति आहे. गांधीजींचा उपदेश नुसत्या बुद्धीनें समजावून घेण्याचा प्रयत्न केला तर शंकाकुशंकांचीं व संशयाचीं पिशाचें एकदम उद्भवतात. पण तोच हृदयांत आपण ठसवूं लागलों आणि त्याला आचाराची जोड देण्याचा प्रयत्न केला कीं, सर्व भुतें नाहींशीं होतात. धुकें वितळतें, आणि ' मंगलधामा 'चें दिव्य महाद्वार स्वच्छ दिसूं लागतें. या मंगलधामांत आनंद आणि माधुर्य यांखेरीज कशाचेंच वास्तव्य नाहीं.

० ० ०

अनुक्रम 2९33७
क्र. आ.वा.
2007
नों. दि. 3-७-६५

# गांधीजी

एखादें भावना हलवून सोडणारें गायन रेडिओवरून कानीं पडलें कीं अधिक वेळ थांबून आपण कोणत्या गायकाचें नांव शेवटीं सांगितलें जाईल याविषयीं उत्कण्ठित होऊन तिष्ठत उभे राहतों. एखादा भव्य प्रासाद दिसला कीं याचा ऐश्वर्यसंपन्न मालक कोण असेल, कसा असेल याचें कुतूहल आपणांला वाटूं लागतें. निर्मात्याचें व्यक्तित्व जाणून घेण्याविषयीं उत्कण्ठा लागणें हें कलाकृतीच्या श्रेष्ठतेचें एक मुख्य गमक मानतां येईल. याच दृष्टीनें आपल्या डोळ्यांना दिसणारी ही अनंत व आश्चर्यमय सृष्टि पाहून तिचा स्रष्टा कोण आहे याचा शोध घेण्याची बुद्धि आपणांस होते. आतांपर्यंत ज्या रमणीय आणि उदात्त विचारप्रणालीचा आपण परिचय करून घेतला तिच्या प्रवर्तकाचें जवळून दर्शन घेण्याची हुरहूर लागणें आपणांस साहजिक आहे. गांधीजींचें व्यक्तित्व इतकें लोकोत्तर होतें कीं संपूर्णपणें तें वर्णन करणें राहोच, पण समजणेंहि कठीण आहे. " म्हणून वर्णवेना । हेंचि माझी वर्णना ॥ " असेच उद्गार समर्थांप्रमाणें काढावे लागतात.

पण आकाशाचा अंत कळत नाहीं तरी शक्य तेवढ्या उंचीवर चढण्याचे प्रयत्न कांहीं बंद पडले नाहींत. गांधीजींचा सत्य–अहिंसेचा जीवनसंदेश समजावून घेण्याचा व त्यांच्या रहस्यमय व्यक्तित्वाचें आकलन करण्याचा प्रयत्न आज जगांतील महान् पुरुषांनीं केला आहे. त्या प्रयत्नाचा फायदा आपणांला मिळणार आहे. गांधीजींचें व्यक्तिजीवन जितकें आपण नीट न्याहाळून पाहूं तितकें त्यांच्या तत्त्वज्ञानाचा आपला स्नेह दृढ होईल. आपण थोडक्यांत जें त्यांच्या तत्त्वज्ञानाचें दर्शन घेतलें त्याच्या प्रत्यक्ष आविष्कारासाठीं गांधीजी ही व्यक्ति अभ्यासणें जरूर आहे. गांधीजींच्या स्वभावचित्रांचा अभ्यास होतां होतांच आपलें त्यांच्या तत्त्वज्ञानाविषयींचें प्रेमहि वाढत जातें. कुठें संदिग्धता वाटली असेल तर तीं नाहींशी होते, कुठें महत्त्वाचे आणि सुंदर बारकावे दिसूं

लागतात; पहिल्यानें व्रताव्रतांत दिसलेली विसंगति खोटी वाटूं लागते. " गांधीजींच्या प्रत्येक हालचालींत डौल आहे, अर्थ आहे; असत्याचा स्पर्शहि नाहीं. त्यांनीं आपल्या हृदयांत शांति संपादन केली आहे आणि ती आपल्या सहवासानें ते दुसऱ्याला देऊं शकतात." हे पं. जवाहरलालजींचे उद्गार गांधीजींच्या हृदयंगम व्यक्तिजीवनांत जितके आपण आंत शिरूं तितके अधिक खरे वाटूं लागतात.

असामान्य पुरुषाच्या आकृतींत कांहीं तसेंच अलौकिक विशेषपण असतें. पण गांधीजींनीं या नियमाला हरताळ फासला आहे. एवढा जगविख्यात पराक्रमी माणूस इतका लहान आणि काडीजवान कसा याचें मोठें आश्चर्य लोकांना वाटे. गांधीजींची उंची अवघी पांच फूट चार इंच होती. आणि वजन १०८ पौंड असेल. त्यांचें 'तपश्चरणपीडित' शरीर दर्भासारखें कांटकुळें दिसे; तथापि ७९ व्या वर्षींहि त्यांचा उत्साह अतिशय ताजा होता आणि अंगकांति तांब्यासारखी तेजस्वी होती. अत्यंत महत्त्वाचीं कामें ते अपार श्रम करून उरकूं शकत. पत्रलेखन, वाचन, मुलाखती, सभा, प्रवास, प्रार्थना, रुग्णशुश्रूषा, सूतकताई इ० कार्यक्रमांचे डोंगर दररोज ते लीलेनें चढून जात.

गांधीजींना एवढा उरक असण्याचें कारण त्यांचें पूर्ण संयमी व नियमबद्ध जीवन. गांधीजींनीं सत्याप्रमाणें आहाराचेहि अनेक प्रयोग केले. कित्येकदां ते फळावरच राहिले. भुईमुगाचे दाणे हेंच आपलें मुख्य अन्न त्यांनीं कित्येक दिवस ठेवलें होतें! आहाराचे कित्येक प्रयोग त्यांच्यावर उलटलेहि? अनेक वर्षांच्या अनुभवानें पुढें त्यांनीं आपला आहार आतां कायम केला. गायीम्हशींना यातना देऊन त्यांचें जास्तींत जास्त दूध काढण्याची पद्धति उत्तर हिंदुस्थानांत बऱ्याच ठिकाणीं प्रचलित असल्याचें त्यांनीं ऐकलें तेव्हां त्यांचें अंतःकरण द्रवून गायीम्हशीचें दूध न पिण्याची शपथ त्यांनीं घेतली! ते बकरीचें दूध घेत. सामान्यपणें पांच पदार्थांचा शाकाहार हें त्यांचें अन्न असे. ते मित प्रमाणांत सावकाश चावून ते खात.

रात्रीं १० ते ५ एवढी झोंप गांधीजींना लागे. दिवसांहि दुपारीं तासभर ते झोपत. कामामुळें जर रात्रीं झोप कमी पडली तर ती ते दिवसां भरून काढीत. रात्रीं आकाशाच्या विशाल तारकांकित घुमटाखालीं झोपण्याचा परिपाठ असे त्यांचा. विलायतेस मंडलाकार परिषदेसाठीं गांधीजी गेले तेव्हां बोटीवरहि

केबीनमध्यें न झोपतां डेकवर नभोवितानाखालीं ते झोपत. बाहेर निजण्यांत स्वच्छ हवा मिळावी ही आरोग्याची दृष्टि तर आहेच. पण आकाशदर्शन हें मनावर उदात्त संस्कार करतें. परमात्म्याची अगाध लीला आपणांला दाखवून आपल्या नम्रतेला मदत करतें.

"ज्याच्या मनांत दर दिवशीं मलिन विचार येत असतील, त्यानें उघड्यावर झोंपून आकाशदर्शनामध्यें तल्लीन होऊन जाण्याचा प्रयत्न करून पाहावें. त्याला थोड्याच दिवसांत अनुभव येईल कीं असें केल्यानें निर्दोष निद्रा मिळते. आपण या महा दर्शनामध्यें तल्लीन होऊन गेलों असतां क्षणभर अशीच कल्पना होते कीं जसें काय आकाशांत वास करणारे हे गण ईश्वराचें मूक स्तवन करीत आहेत....

"आकाश जसें स्वच्छ आहे तसें आपणहि बनावें. तारे जसे तेजस्वी आहेत तसें आपणहि तेजस्वी व्हावें. ते जसे ईश्वराचें मूकस्तवन करतांना दिसतात तसें आपणहि करावें. ते ज्याप्रमाणें आपला मार्ग क्षणभरहि सोडीत नाहींत त्याप्रमाणें आपणहि आपलें कर्तव्य सोडूं नये." असें गांधीजी म्हणत. प्रार्थनेनंतरसुद्धां पंधरावीस मिनिटें आकाशाकडे टक लावून पाहावें असा त्यांचा उपदेश असतो. महंमद पैगंबर म्हणे कीं, 'मी किंवा मोझेस यांच्यासारखें खुल्या पठारावर पडून ज्यांनीं अनंत आकाश रात्रीच्या रात्री पाहिलें नाहीं त्यांना देवाचा साक्षात्कार होणार नाहीं.' हें महंमदाचें म्हणणें गांधीजींच्या वरील उद्गाराशीं ताडून पाहावें.

'माझी झोंप गेली कीं मी आटोपलोंच' असें गांधीजी म्हणत. झोंपेवर त्यांचें फार प्रभुत्व. एकदां स्टेशनवर गाडीला पंधरा मिनिटें अवकाश होता. तेवढ्यांत त्यांनीं एक डुलकी घेतली. व्हाईसरॉय लॉर्ड आर्विन यांच्याबरोबर वाटाघाटी चालू असतां एकदां मध्यें थोडा रिकामा वेळ होता. तेवढ्यांत ते गाढ झोंपीं गेले आणि पुनः वेळेवर उठले! असे चमत्कार त्यांनीं अनेकदां केले.

सकाळीं आणि सायंकाळीं सहलणें हा गांधीजींचा एक ठरीव कार्यक्रम असे. त्यांनीं शारीरिक कसरत किंवा मैदानी खेळ या बाबतींत लहानपणीं विशेष लक्ष घातलें नाहीं. आखाड्यांचा त्यांनीं जरी निषेध केला नाहीं तरी हिंसात्मक तामसी बळ वाढविण्याच्या कामीं आखाडे पुष्कळदां साहाय्यक

होतात असें त्यांचें मत होतें. शिवाय पट्टीचे मल्ल म्हणून गाजलेले लोक पुष्कळदां मनानें भेकडहि असतात! त्या दृष्टीनें आसनें व प्राणायाम हा सात्त्विक व्यायाम गांधीजी पसंत करीत. शरीर व मन यांचें चापल्य, प्रसन्नता व निर्भयता कायम ठेवण्यास या व्यायामांचा चांगला उपयोग होतो. पण याहि व्यायामाला जीवनाचा एकमेव व्यवसाय करणें व त्यापासून कांहीं सिद्धि मिळविण्यास झटणें हें गांधीजींना पसंत नव्हतें. आपलें शरीर हें कार्यक्षम राहील व कर्तव्यमार्गांत त्याचा जास्तींत जास्त उपयोग करतां येईल यासाठीं व्यायाम हें साधन आहे. चालण्याचा व्यायाम हा सर्व 'व्यायामांचा राजा' ( Prince of exercises ) असें गांधीजी मानीत.

गांधीजी निसर्गोपचाराचे भोक्ते होते. आपण आजारी पडतों याला कारण आपली अनैसर्गिक व स्वैर राहणी, असें त्यांचें ठाम मत असे. या मताचे कामीं सांथीच्या रोगाचाहि अपवाद करण्यास ते तयार नव्हते. मनुष्य निसर्गाचे नियम नीट संभाळील तर त्याच्या शरीरांत रोगप्रतिबंधाची शक्ति भरपूर राहील. रोगजंतु शिरतांच ही शक्ति त्यांचा स्वाहा करील. पण मनुष्यानें चुकीच्या व चैनीच्या राहणीनें ही शक्ति अगदीं घालवून टाकली आहे. म्हणून रोग न होण्यासाठीं अगोदर माणसानें आपली राहणी निसर्गाला जुळती केली पाहिजे. त्यांतून रोग झालाच तर पंचमहाभूतांची मदत घ्यावी. पाणी आणि प्रकाश यासारखें रोगनाशक काय आहे? अग्नीनें शेकलें तरी किती बरें वाटतें? पृथ्वीनें विपुल प्रमाणांत उत्पन्न केलेली माती आपण थंड करून दुखण्याचे जागीं ठेवली तर लागलीच आराम वाटतो हा पुष्कळांचा अनुभव आहे. गांधीजींनीं या प्रयोगांचा दीर्घकाल अनुभव घेऊन व अभ्यास करून त्याचें एक शास्त्र बनविलें. त्याचा स्वतःसाठीं व इतरांसाठीं ते उपयोग करीत.

गांधीजींचें छायाचित्र आतां जगांत घरोघर झालें आहे. त्यावरून त्यांच्या पोषाखाची कल्पना येते. कमरेला एक खादीचा पंचा आणि एक खादीचें उत्तरीय एवढाच त्यांचा पोषाख असे. याहि बाबतींत लहानपणापासून गांधीजी प्रयोग करीत आले. बॅरिस्टर होण्यासाठीं ते विलायतेस गेले तेव्हां अलीकडच्या आंग्लानुकारी युवकासारखा त्यांचा पोषाख होता. मग हिंदुस्थानांत काठेवाडी पागोटें, अंगरखा, धोतर, उपरणें हा पोषाख आला. १९२०

सालच्या असहकारितेच्या काळांत एक सदरा, टोपी व धोतर एवढेंच राहिलें. पण एके ठिकाणीं एका बिहारी स्त्रीला तिचें स्वतःचें असें एक वस्त्रहि पुरें नव्हतें हें गांधीजींनीं पाहिलें. यायोगें कळवळून ते नुसत्या पंचावर राहूं लागले ! पं. जवाहरलालजी म्हणतात त्याप्रमाणें " गांधीजी म्हणजे शेतकरी हिंदुस्थान. त्यांचा दृष्टिकोण संपूर्णपणें शेतकऱ्याचा आहे. " हिंदुस्थानच्या शेतकऱ्यांच्या म्हणजेच बहुजनसमाजाच्या जीवनाशीं गांधीजींचें झालेलें तादात्म्य त्यांच्या वेषावरून व कृश देहयष्टीवरून फार स्पष्ट होतें !

आपण १२५ वर्षें जगण्याची महत्त्वाकांक्षा ठेवली आहे असें गांधीजी सांगत. एका वाढदिवसाचे वेळीं पूज्य मदनमोहन मालवीय यांनीं त्यांना 'शतायु व्हा' असा आशीर्वाद पाठविला. तेव्हां ते हसून म्हणाले, 'मालवीयजींनीं माझ्या वयांतलीं २५ वर्षें उगीच कमी केलीं.' आपणाला ब्रह्मचर्याचें महत्त्व बरेंच उशीरां कळलें. नाहीं तर इतक्या दीर्घायुष्याची मनीषा सहजासहजीं सफळ झाली असती असें गांधीजींनीं म्हटलें. एकदां उन्हाळ्यांत महाबळेश्वरवर हिंडत असतां गांधीजी म्हणाले, " मी १२५ वर्षें निश्चित जगेन जर—" आणि भोंवतालच्या शिष्यांना त्यांनीं हें वाक्य पुरें करण्यास सांगितलें. कोणी कांहीं, कोणीं कांहीं जोडून वाक्य पुरें करीत होते. पण गांधीजींना तें संमत होईना. शेवटीं गांधीजींच्या छायेप्रमाणें सदैव जवळ असणाऱ्या गुरुसेवापरायण डॉ. सुशीला नायर म्हणाल्या, " जर मी माझ्या क्रोधाला जिंकलें तर " " शाबास. बरोबर. " गांधीजी समाधानपूर्वक उद्गारले. हा साधाच सुखसंवाद आहे. पण त्यावरून पुष्कळ बोध घेतां येईल. रागानें माणसाचें आयुष्य घटतें. विकारांचें दमन हाच दीर्घायुष्य मिळविण्याचा खरा मार्ग आहे. हेंच गांधीजींना सूचित करायचें नव्हतें का ?

गांधीजींनीं एवढें महात्म्य मिळविलें त्यासाठीं कोणाचें मार्गदर्शन घेतलें हें कुतूहल आपणांला साहजिकच वाटतें. राजचंद्रभाई हे एक गृहस्थ धर्मनीति इ० बाबतींत आपणांस ध्रुवताऱ्याप्रमाणें होते असें गांधीजी सांगतात. हे गृहस्थ एका पेढीवर काम करीत. अर्थव्यवहारांत चोख राहून विरक्तपणें राहत. हे मोठे साक्षात्कारी पुरुष होते. ना. गोखले हे गांधीजींचे राजकीय गुरु होते हें प्रसिद्धच आहे. गांधीजी गोखल्यांच्या सहवासांत आले तेव्हां गोखल्यांची कळकळ, उदारता, देशभक्ति यांची छाप त्यांच्यावर चटकन् पडली. त्या वेळीं

हिंदुस्थानांत जे इतर कोणी मातब्बर पुढारी होते त्यांतले कोणी हिमालयासारखे तर कोणी समुद्रासारखे दुर्लंघ्य आहेत असा गांधीजींना अनुभव आला. गोखले मात्र ' गंगामाई ' सारखे त्यांना वाटले. या महापुरुषाच्या जीवनप्रवाहांत आपण सहज अवगाहन करूं शकूं असा गांधीजींना विश्वास वाटला. गोखल्यांच्या सहवासांत असतांना गुरुसेवेचा आनंद गांधीजींनीं मनमुराद लुटला. गोखल्यांच्या कपड्यांना ते इस्त्री करीत! उलट गोखल्यांनाहि हा आपला शिष्य अद्वितीय आहे याची ओळख होती. ' गांधींच्या सहवासांत असतांना क्षुद्र विचार दुरूनहि आपणांला स्पर्श करीत नाहींत. जगांतले महावीर ज्या द्रव्यानें घडविले त्याच द्रव्यानें परमेश्वरानें या माणसाची घडण केली आहे. ' असे हृद्य उद्गार गांधीजींविषयीं गोखल्यांनीं काढले होते. गुरुशिष्यांची एकमेकांवर भक्ति करण्याची जणूं स्पर्धाच लागली होती असें रमणीय दृश्य आपणांला दिसतें. " राजकारण अध्यात्ममय करा. " हा गोखल्यांचा संदेश गांधीजींनीं विशाळ प्रमाणावर कृतींत उतरविला.

अमेरिकन ध्येयदर्शी ग्रंथकार थेरो हा गांधीजींच्या गुरुमालिकेंतला एक होता. रस्किन्ची तर गांधीजींवर विलक्षण पकड बसली. श्रमसौंदर्याचा साक्षात्कार त्यांना रस्किनच्या लिखाणानेंच झाला. त्याच्या ' Unto This Last ' या पुस्तकाचें भाषांतर ' सर्वोदय ' नांवानें गांधीजींनीं केलें. थेरो आणि रस्किन् यांच्याहूनहि रशियाचे महर्षि कौन्ट लियो टॉल्स्टॉय् यांनीं गांधीजींना विलक्षण विमोहित केलें! गांधीजी लिहितात—

" चाळीस वर्षांपूर्वी मानसिक संघर्षांत सांपडून अश्रद्धावादाच्या भोंवऱ्यामध्यें गटांगळ्या खात असतां ' 'The Kingdom of God is within you.' (देवाचें राज्य तुमच्या हृदयांत आहे. ) हा टॉलस्टॉयचा ग्रंथ माझ्या हातीं आला आणि त्या ग्रंथाची माझ्यावर विलक्षण छाप बसली. त्या वेळीं मी हिंसेवर विश्वास ठेवणारा होतों. पण या ग्रंथानें अश्रद्धावादांतून मला काढून पूर्ण अहिंसाप्रेमी केलें. दुसऱ्याला जो उपदेश करायचा त्याप्रमाणें आचरण आणि सत्याच्या शोधासाठीं वाटेल तें मूल्यवान् गमावण्याची तयारी या दोन गोष्टी टॉलस्टॉयच्या जीवनांत मला हृदयंगम वाटल्या! "

आफ्रिकेंत स्थापलेल्या आश्रमाला गांधीजींनीं " टॉल्स्टॉय् फार्म् " हें

नांव मोठ्या भक्तीनें दिलें होतें. गांधीजींच्या सत्याग्रहाच्या प्रयोगांतलें नावीन्य व सामर्थ्य यांनीं मोहित होऊन टॉलस्टॉय्‌नीं गांधीजींना धन्यवादाचें पत्र पाठविलें हें प्रसिद्धच आहे. पण पूर्वीचे साधुसंत ज्याला गुरुकृपा म्हणतात ती आपणांला मिळाली आहे असें गांधीजींना कधीं वाटलें नाहीं. असा सद्‌गुरूच आपणांला भेटला नाहीं असें गांधीजी म्हणत. कदाचित् आपली तपश्चर्याच अजून पुरी झाली नसेल, कारण शिष्यानें अमुक एक उच्च अवस्था गांठली म्हणजे सद्‌गुरूच त्याला शोधीत येतो अशी गांधीजींची श्रद्धा होती.

धार्मिक वृत्ति हाच गांधीजींच्या जीवनाचा प्राण होय. गांधीजी जन्मानें हिंदु होते आणि हिंदुधर्म माणसाला परमोच्च पद मिळवून देण्यास पूर्णपणें समर्थ आहे अशीं त्यांची गाढ श्रद्धा होती. श्रीमद्‌भगवद्गीता हा आपल्या मोक्षमार्गावरील ज्ञानमय प्रदीप आहे असें गांधीजी म्हणत.

" माझी माता मला जन्म देऊन लहानपणींच निवर्तली. त्यानंतर आजवर गीतामाउलीनेंच माझा संभाळ केला आहे. ही विश्वमाता आहे. कुणाहि लेंकराला तिच्या दारीं आश्रय मिळतो. कुणालाहि ती निराश करून परत पाठवीत नाहीं. हें एक सुंदर धर्मकाव्य आहे. यांत जितकें खोल शिरावें तितका अधिकाधिक अर्थ सांपडत जातो. " असा गीतेचा गौरव गांधीजींनीं केला. गीतेच्या अर्थाची संगति त्यांनीं वेगळीच लाविली. कुरुक्षेत्रांतल्या ज्या भारतीय युद्धाचे प्रसंगीं श्रीकृष्णांनीं गीता सांगितली तें भौतिक युद्ध होतें असें मानण्यापेक्षां सुष्ट व दुष्ट प्रवृत्तींतला तो एक कायमचा झगडा आहे असें मानणें युक्त होईल. आपलें मन हें एक समरांगण आहे. तें एक कुरुक्षेत्र आहे, तसेंच धर्मक्षेत्र आहे. सुष्ट दुष्ट प्रवृत्तींच्या झगडयांत सुष्ट प्रवृत्तींनीं दुष्ट प्रवृत्तींवर विजय मिळविण्याचा हा धर्ममार्ग होय. या ठिकाणीं पांडव हे सुष्ट प्रवृत्तीचें प्रतीक समजावयाचें. पण गीताप्रणीत धर्ममार्ग हा सोपा नाहीं, निष्क्रियतेहून तर तो सर्वांशीं वेगळा आहे. त्यांत कर्माला प्राधान्य आहे. " मी युद्ध करणार नाहीं " असें वैतागानें म्हणून स्वस्थ बसणारा अर्जुन " मी तुझ्या म्हणण्याप्रमाणें करतों " असें अखेर श्रीकृष्णास सांगतो आणि युद्धाला प्रवृत्त होतो एवढा विकास म्हणजेच खरा धर्मसाक्षात्कार. अर्जुनाचें असें सुंदर परिवर्तन श्रीकृष्णाच्या ज्या उपदेशामुळें झालें त्या उपदेशानें प्रत्येक मनुष्य कर्ममार्गी झाला पाहिजे. पण हें कर्म कुठलीहि अपेक्षा न ठेवतां करावें

असें श्रीकृष्णांनीं सांगितलें आहे. हेंच त्या उपदेशांतलें अमृतत्व अनेक पुरुष–श्रेष्ठांप्रमाणें गांधीजींना रमणीय वाटलें आहे. अनासक्ति-आसक्ति सोडणें हाच खरा धर्ममार्ग. गांधीजींच्या मतें खरी अहिंसा आसक्ति सोडल्याशिवाय शक्यच नाहीं. म्हणून अनासक्तिपूर्वक कर्तव्यपालन व सेवा करीत राहणें आणि त्यांत अहिंसेचा उत्कर्ष करणें ही गीतेची शिकवण आहे असें गांधीजींचें भाष्य आहे. गीता हा तत्त्वज्ञानाचा सागर आहे. त्याचें मंथन करून श्रीमत् शंकराचार्योनीं ‘ अद्वैत सिद्धान्त ’ वर आणला, ज्ञानेश्वर महाराजांनीं ‘भक्तियोगा’चा कौस्तुभ जगाला दिला, श्री अरविंदांनीं ‘पुरुषोत्तमयोग’ आणि लोकमान्य टिळकांनीं ‘ निष्काम कर्मयोग ’ हीं रत्नें काढलीं. गांधीजींनीं ‘ अनासक्तियोगा ’ ची देणगी जगाला दिली. ‘ विद्वत्ता या दृष्टीनें गीतेवर लिहिण्याचा माझा अधिकार जरा सुद्धां नाहीं. आचरणाच्या दृष्टीनें मात्र मी कांहीं सांगू शकतों, ’ असें गांधीजींनीं म्हटलें आहे. गीतेप्रमाणें ‘ तुलसी-रामायण ’ हा एक त्यांचा अत्यंत आवडता ग्रंथ होता. मनुष्याला अध्यात्ममार्गांत हे दोन ग्रंथ अगदीं अखेरपर्यंत नेऊन सोडण्यास पुरेसे आहेत असें गांधीजींचें मत होतें.

गांधीजींना हिंदु धर्मांतल्या वर्णाश्रमाची योजना अत्यंत सौंदर्यपूर्ण वाटे. वर्णाप्रमाणें कामें विभागून दिल्यानें प्रतिस्पर्धा थांबते, कौशल्य वाढतें आणि समाजजीवन निरोगी होतें. चार वर्णांनीं जें स्थैर्य व सौष्ठव समाजाला दिलें तें चार आश्रमांनीं व्यक्तीला दिलें. लहानपणीं ब्रह्मचर्यपालन करून विद्याभ्यास करावा, तरुणपणीं गृहस्थाश्रम पत्करून समाजसेवा करावी, मध्यम वयाचे शेवटीं वानप्रस्थ स्वीकारून संसारांतून आपलें मन हळूहळू आवरून घेत जावें आणि अखेर संन्यास घेऊन देह सार्थकीं लावावा हा आश्रमधर्म सर्व दृष्टींनींच सुंदर आहे. यांत उपभोग आणि त्याग यांचा बेमालुम सांधा जुळवून देण्यांत आला आहे. यांत निसर्गाचा योग्य तो मान राखला आहे, शिवाय त्यावर विजय मिळविण्याची सोय आहे. वर्णाश्रमधर्म हा हिंदु धर्माचा अनन्य-साधारण विशेष आहे.

वर्णाश्रमाप्रमाणें ‘ गो-पूजन ’ हेंहि हिंदुधर्माचें एक हृदयंगम वैशिष्ट्य आहे असें गांधीजी म्हणत. गाईचें पूजन ज्या महर्षीनें सुरू केलें त्यानें माणसांना आपल्या योनीपलीकडे जाऊन सर्व जीवसृष्टीशीं तादात्म्य होण्याचा दिव्य संदेश दिला. ज्यांत प्राण म्हणून चीज आहे ते सर्व प्राणी

एकाच परमात्म्याचे अंश आहेत हा थोर प्रत्यय आणून देण्यास गोपूजना-सारखें दुसरें कोणतें व्रत आहे ? गाय म्हणजे मूर्तिमंत करुणा. तिच्या विशाल नेत्रांतून मनुष्येतर प्राणिसृष्टि मुकेल्या दृष्टीनें आपणांकडे पहात असते. आपण तिला दिलासा देणें हें आपलें श्रेष्ठ व प्रियतम कर्तव्य असलें पाहिजे. समतेच्या आणि सेवेच्या मर्यादा गोपूजनाच्या द्वारें हिंदुधर्मानें माणसांच्या पलीकडील अफाट जीवसृष्टीशीं नेऊन भिडाविल्या आहेत.

मात्र वर्णाश्रमधर्म व गोपूजन याची चालू युगांत जी विकृति झाली आहे ती गांधीजींना मान्य नव्हती. अस्पृश्यतेसारख्या गोष्टीचे ते केवढे कट्टे विरोधक होते हें जग जाणतेंच. आपल्या धर्माचें प्रेम इतकें तीव्र पाहिजे कीं त्यांत थोडीशीहि हीनता शिरणें आपणांला सहन होतां कामा नये. ती हीनता काढून टाकण्यासाठीं आपण सर्वस्व पणाला लाविलें पाहिजे; त्यांत मृत्यु आला तरी चालेल. " स्वधर्मे निधनं श्रेयः " या वचनाचें खरें रहस्य असें आहे. तसेंच आपला धर्म आपणाला श्रेष्ठ वाटला तरी त्यामुळें इतर धर्म कमी लेखण्याची वृत्ति नसावी. धर्मवेड व धर्मश्रद्धा यांत फार अंतर आहे. स्वधर्मप्रेम आणि सर्व धर्मांविषयीं समभाव यांत विरोध असण्याचें कारण नाहीं. इतकेंच नव्हे, तर खऱ्या धर्मप्रेमांतूनच खऱ्या सर्वधर्मसमभावाचा विकास होतो असें गांधीजी म्हणत. इतर धर्मांचा सादर अभ्यास आपल्या स्वधर्मनिष्ठेची बैठक अधिक विस्तृत करण्यास सहायक होतो.

भारतीय संस्कृतींतल्या श्रेष्ठ मूल्यांवर श्रद्धा आणि त्याप्रमाणें आचरण हें गांधीजींचें वैशिष्ट्य आपण पाहिलें. अशी श्रद्धा आणि तिला अनुसरून आचरण असणारे अनेक लोक आपण पाहतों. पण आधुनिक हिंदुस्थानावर व जगावर त्यांची गांधीजींइतकी छाप आहे का ? मुळींच नाहीं. मग याच अर्धनग्न, विरागी कर्मठ माणसाची सुधारलेल्या जगावर इतकी कां मोहिनी पडते ? शास्त्रीय दृष्टीचे पाश्चात्य लोक, जडवादी, कम्युनिस्ट ही देखील मंडळी गांधीजी या व्यक्तीकडे कां आकर्षिली गेली ? याचें कारण गांधीजी फकिरी वृत्तीनें रहात असले आणि त्यांचीं धर्मनीतिविषयींचीं मतें जुनीं असलीं तरी नव्या जगांतले कित्येक गुण त्यांच्या अंगीं फार मोठ्या प्रमाणावर होते. कुठल्याहि गोष्टीचा विचार व्यक्तीच्या सुखदुःखाच्या दृष्टीनें करण्याऐवजीं तो सामाजिक भूमिकेवरून करावयाचा हें आधुनिक युगाचें

लक्षण आहे. राजकीय क्रांति काय किंवा अर्थयोजना काय सामाजिक जाग्रति व उन्नति या हेतूनें आणण्याची व पार पाडण्याची आधुनिक युगाची वृत्ति असते. गांधीजींनीं हा आधुनिक युगधर्म आपल्या तत्त्वांत प्रामुख्यानें गोवला. सत्य, अहिंसा, मोक्ष इ० जुन्या शब्दसंहतींचा उपयोग गांधीजी मोठ्या प्रमाणावर करीत. पोषाखापासून प्रार्थनेपर्यंत सारा मामला जुना वाटतो. पण या सर्वांचे मुळाशीं आधुनिक युगधर्माची जाणीव आहे. मोक्ष आणि समाजसेवा यासंबंधीं एके ठिकाणीं आपल्या अनुपम भाषाशैलीनें गांधीजी सांगतात—

" मी आत्मस्वरूप जाणण्यास आणि 'याचि देहीं याचि डोळां' मुक्ति मिळविण्यास उत्सुक आहें. देहांतून आत्मा मुक्त व्हावा यांसाठीं मी जी साधना करीत आहें त्यांपैकींच देशसेवा हा एक भाग आहे ... देवाच्या राज्यांत प्रवेश म्हणजे मोक्ष मिळविण्याचा माझा प्रयत्न आहे. पण त्यासाठीं मला गुहेंत जाऊन राहण्याची जरूरी भासत नाहीं. देशसेवेसाठीं अविश्रांत श्रम आणि त्यायोगें मानवतेची सेवा हाच माझा मोक्षमार्ग मी समजतों. जीवमात्राशीं मला समरस व्हावयाचें आहे. म्हणूनच देशभक्ति म्हणजे शाश्वत सुखशांतीच्या मार्गावरील एक टप्पा मी मानतों." जी सामाजिक जाणीव ( Social consciousness ) माणसाच्या जीवनविकासांत असलीच पाहिजे असें आधुनिक युग मानतें तिचा असा एक सुंदर सांधा गांधीजींनीं व्यक्तिधर्माला जोडला आहे.

लोकशाही हें आधुनिक युगाचें आणखी एक ठळक वैशिष्ट्य आहे. याहि वैशिष्ट्याला आपल्या आचारमार्गांत गांधीजींनीं मानाचें स्थान दिलें. गेल्या पन्नास वर्षांत आफ्रिकेंत व हिंदुस्थानांत जे प्रचंड झगडे गांधीजींनीं परसत्तेशीं केले ते उदात्त स्वातंत्र्यप्रेमाच्या उर्मीनेंच केले. आणि स्वातंत्र्य आणि लोकशाही या एकाच तत्त्वाच्या दोन बाजू नाहींत काय ? उद्योगधंद्यांत स्पर्धा व केंद्रीकरण यांना समूळ फाटा देण्याचा जो उपक्रम ते आग्रहानें सुचवीत त्यांत देखील लोकशाहीबद्दलची त्यांची आस्था स्पष्ट व्यक्त होते. आपला ठराव कानामात्रा न बदलतां पास झाला पाहिजे असा गांधीजींचा आग्रह असे म्हणून कुणीं त्यांना लोकशाहीचे द्वेष्टे म्हणत ! ! पण ठराव लिहिण्यापूर्वीं कॉंग्रेसनेते, अनुयायी, कॉंग्रेसबाहेरचे वजनदार

सद्गृहस्थ आणि एकंदर जनता यांच्या हृदयाचा ठाव घेऊन मगच गांधीजी आपल्या ठरावाची रचना करीत हें त्यांच्या टीकाकारांच्या लक्षांत येत नाहीं! कॉंग्रेसचा कारभार, चर्चा, वादविवाद, उजव्या-डाव्या गटांचें मतप्रदर्शन, ऑ. इं. कॉं. कमिटीच्या बैठकी सर्व कांहीं उघड चाललेलें असे. मोठमोठाले क्रांतिकारक निर्णय हेहि उघड चर्चेंतून निघाले पाहिजेत असा गांधीजींचा कटाक्ष असे. हा उघडपणा लोकशाहीचा प्राणवायूच म्हणावा लागेल. अहिंसात्मक समाजाची त्यांची कल्पना हा तर लोकशाहीचा परम उत्कर्ष होय.

लोकशाही मिळविण्यास आणि टिकविण्यास संघशक्ति व शिस्त ह्या दोन गोष्टी आजच्या जगांत अवश्य असतात. आणि गांधीजींइतका संघटनाकुशल दुसरा नेता आजच्या युगांत क्वचितच असेल! आफ्रिकेहून परत आल्यानंतर हिंदी राजकारणांत एकाएकीं न पडतां गांधीजींनीं उदंड देशाटन केलें. प्रांतोप्रांतीं कोण कोण उदयोन्मुख व नेकीचे पुढारी आहेत यांचें मनानें टिपण केलें. लोकांच्या खऱ्या गरजा व गाऱ्हाणीं काय आहेत याचें सूक्ष्म ज्ञान मिळविलें. कोणत्या वळणावर राजकारण नेलें तर जनतेच्या सुप्त शौर्याला व त्यागवृत्तीला फुलोरा चढेल याचें नीट चिंतन केलें आणि मगच जनतेला आत्मविश्वासपूर्वक हाक दिली. जे राजकारणाविषयीं उदासीन होते पण ज्यांचे-जवळ कर्तृत्व आणि कळकळ भरपूर होती त्यांना हरिजनकार्य, खादी, ग्रामोद्योग, शिक्षण इ० कार्यांत ओढलें.

आधुनिक जगाला गांधीजींनीं कां आकर्षित केलें याचें रहस्य आतां नेमकें लक्षांत येईल. सामाजिक जाणीव, लोकसत्तेचें प्रेम, संघटनाचातुर्य या मोठ्या गोष्टींप्रमाणें कांहीं सूक्ष्म पण महत्त्वाचे गुण गांधीजींनीं काळजीपूर्वक वाढविले आहेत. आधुनिक काळांतल्या यंत्रारूढ जीवनांत क्षणाक्षणाचा हिशेब ठेवावा लागतो. वक्तशीरपणा हा गुण यामुळें अतिशय अवश्य होऊन बसला आहे. आणि ज्यावर पर्वताएवढ्या जबाबदाऱ्या आहेत त्याला तर वेळाच्या बाबतींत फार कृपण व्हावें लागतें. गांधीजी या कामीं दक्षच नव्हेत तर थोडेसे निष्ठुरहि होते असें म्हटलें तरी चालेल. प्रख्यात अमेरिकन् प्रवासी लेखक लुई फिशर हे गांधीजींची मुलाखत घेत होते. अगोदर ठरविलेला वेळ संपतांच गांधीजींनीं त्यांना घड्याळ दाखविलें आणि स्मितपूर्वक मुलाखत आवरण्याची सूचना दिली! जगांतल्या अनेक महापुरुषांच्या आपण गांठीभेटी घेतल्या, पण

गांधीजींनीं आणून दिलेला हा अनुभव अगदीं नवीन होता असें फिशर सांगतात ! या वक्तशीरपणामुळेंच गांधीजींचे अनेक व्याप गुंतागुंत न होतां उरकले जात. 'यंग इंडिया,' 'नवजीवन,' 'हरिजन' इ० पत्रांत लिहावयाचें लेखन गांधीजी प्रवासांत असोत, परिषदेंत असोत, वेळच्या वेळीं छापखान्यांत येऊन पडावयाचेंच ! हीच गोष्ट पत्रव्यवहार, मुलाखती, पत्रकें यांची !

नागरिक हक्कांचें पालन व शिष्टाचार याहि कामीं आधुनिक जगाला मोहित करण्याइतकें प्रावीण्य गांधीजींनीं संपादन केलें. मौज ही कीं, गांधीजींच्या शिष्टाचारांत कृत्रिमता नसे. आणि नागरिक हक्क ते जणूं नैसर्गिक प्रवृत्ति अशा तऱ्हेनें पाळत. तुरुंगांत जेव्हां हरिजनकार्याची सवलत सरकारनें गांधीजींना दिली त्या वेळीं निरनिराळे कार्यकर्ते त्यांना भेटायला येत. चुकून कुणी राजकारणाच्या बाजूला बोलणें फिरवूं लागला कीं, गांधीजी त्याला इषारा देत, "सरकारनें मला फक्त हरिजन-कार्याची परवानगी दिली आहे. येथें राजकारण बोलणें बेकायदा ठरेल. तो सरकारचा विश्वासघात होईल." बाहेर आश्रमवासीयांना पत्रें पाठवितांनासुद्धां 'स्वदेशी' सारख्या व्रताची चर्चा ते करीत नसत. कारण 'स्वदेशीं'त प्रत्यक्ष राजकारणाची चर्चा टाळणें शक्य नसे. शिष्टाचाराचें तर त्यांनीं मधुर शास्त्रच बनविलें. त्यांची स्मृति फार प्रखर असल्यानें मनुष्य भेटला कीं, त्याच्या पूर्वायुष्यांतील एखाद्या प्रसंगाचा किंवा त्याच्या कार्याचा उल्लेख करून त्याच्या अंतरंगांत एकदम कसें प्रविष्ट व्हावें ही कला त्यांना सहज साधे. एखादा शेतकरी असो किंवा बादशहा जॉर्ज असोत आपल्या अकृत्रिम व प्रसन्न शिष्टाचारानें गांधीजी त्यांना सहज वश करूं शकत.

आधुनिक जग हें चिकित्सेचें व बुद्धिवादाचें आहे. आणि गांधीजी तर पूर्ण श्रद्धावादी, अंतःप्रेरणावादी ! पण असें असूनहि गांधीजींच्या तत्त्व-ज्ञानाचा विचार केल्याशिवाय आधुनिक बुद्धिवाद्यांचा पराक्रम लंगडा पडतो. गांधीजींचा मूळ कंद श्रद्धामय असला तरी आपल्या कर्मयोगी जीवनांत आपल्या साऱ्या कल्पना-विचारांना मूर्त स्वरूप देतांना त्यांनीं प्रखर बुद्धिप्रकर्ष दाखविला. त्यांची म्हणून एक तर्कपद्धति होती. गांधीजींच्या मूळ तत्त्वबिंदूविषयीं ममत्व वाटूं लागलें कीं पुढले सिद्धान्त बुद्धीच्या भूमिकेवरूनच

उलगडूं लागतात. मांडणी, आग्रह, तर्कपद्धति, प्रत्युत्तरें यांत गांधीजींचें बुद्धिवैभव आधुनिक मनाला चकित करून सोडतें. गांधीजी व वेव्हेल किंवा गांधीजी व जिना यांच्यांत अगदीं अलीकडे झालेला नुसता पत्रव्यवहार जरी आपण पाहिला तरी गांधीजींच्या बुद्धीची तीक्ष्ण धार प्रत्ययाला येईल. याखेरीज आधुनिक जगांतली प्रसिद्धि-प्रचाराचीं साधनें वापरण्यांत गांधीजी निष्णात होते. तसेंच हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे कीं आपल्या स्वतःच्या कर्तृत्वाची स्फूर्ति त्यांनीं प्राचीन धर्मग्रंथांतून व मूल्यांतून मिळविली असली तरी नवीन युगांत सामर्थ्यवान् होऊं पाहणाऱ्या शक्तींशीं ते फटकून तर वागत नसतच, उलट साहचर्य वाढवीत. तुरुंगांत त्यांनीं मार्क्सवादाचा भरपूर अभ्यास केला. आपणांशीं सर्वस्वी सहमत असणाऱ्या आपल्या कट्टर अनुयायांना दूर सारून पं. जवाहरलाल नेहरू यांच्यासारख्या आधुनिक जगाच्या प्रातिनिधिक पुरुषाला आपला राजकीय वारस म्हणण्यांत गांधीजींनीं फार मोठें समदर्शित्व दाखविलें. आधुनिक युगांतल्या नव्या सामर्थ्याला गांधीजींचें हें एक प्रकारचें अभिवादन आहे.

पण जुन्या, नव्या आणि येऊं घातलेल्या सर्वच काळाला विमोहित करील अशीहि अमोल गुणसंपदा गांधीजींजवळ निसर्गतःच होती आणि उग्र तपश्चर्येनें त्यांनीं ती उदंड वाढविली. शौर्य हा त्यांचा एकच गुण घेतला तरी सर्वकाळ व सर्वदेशीं त्यांना मानाचे मुजरे मिळतील अशी स्थिति आहे. आफ्रिकेंत ज्या परिस्थितींत ते गेले ती फार भयंकर होती. गाडीबाहेर त्यांना फेंकून देण्यांत आलें, त्यांच्या डोक्यांत सोटा बसला, त्यांना खवळलेल्या गोऱ्या लोकांनीं धोंडमार केली पण अंगीकृत कार्य सोडण्यास ते तयार झाले नाहींत किंवा स्वदेशीं पळूनहि आले नाहींत. एखाद्या श्रेष्ठ तत्त्वाच्या विजयासाठीं प्रायोपवेशन करून कणकणानें झिजत मृत्यूशीं झगडण्याचा विक्रम त्यांनीं दाखविला. पण या शारीरिक धैर्यापेक्षांहि त्यांचें आत्मिक धैर्य अनंत पटींनीं मोठें होतें. १९१६ सालीं बनारस विद्यापीठाच्या उद्घाटनसमयीं हिंदुस्थानांतल्या सरंजामी सत्तेचे मिरासदार व सरकारचे श्रेष्ठ प्रतिनिधी भव्य शामियान्यांत बसले असतां, दरिद्री हिंदुस्थानच्या वतीनें जें क्रांतिकारक भाषण गांधीजींनीं केलें त्यायोगें धैर्याची एक नवी व उंच पातळी त्यांनीं जगाला दाखविली. कराची कॉंग्रेसच्या वेळीं ( १९३१ ) सरदार भगतसिंग हे नुकतेच फांशीं गेले

होते; बहुजनसमाज खवळला होता; लोकांना समेट नको होता आणि गांधीजी तर आर्विन–कराराला कॉंग्रेसची संमति मिळविण्यासाठीं येत होते ! हजारों लोक गांधीजींच्या निषेधासाठीं समोर गेले. वातावरणांत स्फोटक द्रव्यें सुप्तावस्थेंत होतीं. केव्हां कसली कठीण वेळ येईल याचा नेम नव्हता ! पण गांधीजी क्रोधाविष्ट झालेल्या त्या लोकसमुदायांत निर्भयपणें गेले ! एखाद्या देशाच्या ही चळवळीचें रान उठविण्यांत ते जेवढें शौर्य दाखवीत त्याहूनहि मोठें शौर्य त्या चळवळीचें विसर्जन करण्यांत प्रकट करीत. चौरीचुऱ्याचे अत्याचार झाले तेव्हां देश अजून अहिंसात्मक चळवळीला तयार नाहीं यासाठीं असह्-कारितेची चळवळ गांधीजींनीं मागें घेतली या वेळीं केवढें मेरूसारखें धैर्य त्यांना दाखवावें लागलें असेल याची कल्पनाच करणें बरें ! कारण चळवळ भडकून दिल्यामुळें सरकार गांधीजींवर चिडलें होतें आणि आतां लोकांची ईर्षा व शौर्य जागें झालें अशा वेळीं चळवळ मागें घेण्यानें लोकांना चीड येणार होती. पण सरकार व लोक दोघांच्याहि क्रोधाग्नीच्या ज्वाळा आकाशाला भिडल्या तरी गांधीजींनीं आपला संकल्प तडीस नेला ! असें धैर्य दाखविण्याचे त्यांच्यावर अनेक प्रसंग आले होते. सारें जग एका बाजूला गेलें तरी निःसंगपणें सत्याचा शोध घेत एकाकी वाट चालण्याची हिंमत त्यांच्या अंगीं होती. “ गांधीजीं महात्मा आहेत म्हणून मी त्यांना चाहत नाहीं तर ते एक शूर वीर आहेत म्हणून त्यांच्यावर माझी भक्ति आहे. ” असे उद्गार सरहद्द प्रांताचे पंतप्रधान डॉ. खानसाहेब यांनीं एकदां काढले होते. लक्षावधि पहाडासारखे पठाण ज्यांच्यासाठीं कुर्बानी करण्यास सिद्ध आहेत, अशा एका श्रेष्ठ व शूर पठाण पुढाऱ्याचें हें शिफारसपत्र आहे हें लक्षांत घेण्यासारखें आहे.

शौर्याइतकाच दीर्घोद्योग हा त्यांचा एक फार मोठा गुण म्हणून सांगतां येईल. विश्रांति आणि काम यांचा सुंदर मेळ त्यांनीं घातला. सात आठ चिटणिसांना पुरेल एवढें काम एकदोघां सहकाऱ्यांच्या साह्यानें गांधीजीं उरकीत. जें कार्य हातीं घेतलें त्यासाठीं अविश्रांत श्रम करून रान उठविण्यांत ते गढून जात. “ एक तर ते कामाचा शेवट करतील किंवा आपला शेवट करून घेतील. ” असें कृपलानी म्हणाले होते तें अक्षरशः खरें आहे.

गांधीजींइतकें लोकसंग्रहाचें चातुर्य इतरत्र शोधूं जातां सांपडणार नाहीं. एखादा मनुष्य आपला म्हटला कीं त्याच्या योगक्षेमापासून त्याच्या आत्मिक

विकासापर्यंतची सारी जिम्मेदारी ते स्वतःवर घेत. एक नामांकित महाराष्ट्रीय पुढारी सेवाग्रामला गेले असतां स्नान उरकून भोजनास बसले. गांधीजींची व त्यांची भेट तोंवर झाली नव्हती. त्यांना पथ्य असल्यानें दूध जास्त लागे. त्यांनीं न मागतां त्यांच्यापुढें दुधाची दुसरी वाटी आली. त्यांनीं चौकशी केली तेव्हां व्यवस्थापकांनीं सांगितलें कीं, ' आपण येणार म्हणून आम्हांला बापूजींनीं आपल्यासाठीं जास्त दुधाची व्यवस्था करण्यास अगोदरच सांगितलें होतें. ' एवढा देशाचा व्याप शिरावर असतां आपल्यासारख्या एका अनुयायाची पथ्याची काळजी हा महात्मा वाहतो हें पाहून त्या गृहस्थाला केवढी कृतज्ञता वाटली असेल ! कुष्ठरोगानें पछाडलेल्या आपल्या एका विद्वान् भक्ताची गांधीजींनीं जातीनें शुश्रूषा केली हें प्रसिद्ध आहे. आपल्या रुग्ण मित्रांची व अनुयायांची विचारपूस शेंकडों कामांच्या धांदलींतहि ते न चुकतां करीत. परिवारांतील माणसांच्या मानसिक अस्वस्थतेंत धीर देणें, त्यांना मार्गदर्शन करणें यांत गांधीजी मुळींच कसूर करीत नसत. कोणी अनुयायी, मित्र अथवा त्याचे कुटुंबी दिवंगत झाले तर गांधीजींचा सांत्वनपर संदेश तर जायचाच, पण जुळल्यास प्रत्यक्ष घरीं जाऊनहि चार समजुतीच्या गोष्टी सांगून शोकसमाचार घेतला जायचा. हा आपलेपणा व दक्षता यांमुळें गांधीजींनीं शेंकडों लोकांना प्रेमरज्जूंनीं जखडून टाकलें.

शौर्य, दीर्घोद्योग, लोकसंग्रह यांच्या जोडीला मानवताप्रेमाचा सागर गांधीजींच्या हृदयांत उचंबळतांना दिसे. बहुजनसमाजाविषयींचें त्यांचें प्रेम इतकें अगाध आहे कीं, ' ते लोक आहेत म्हणून माझें अस्तित्व आहे. ' अशी एकात्मता गांधीजी सांगत. हे सर्व गुण कोणत्याहि काळीं माणसाला जनतेच्या हृदयसिंहासनावर नेऊन बसवितील असेच नाहींत का ? आणि या गुणांची कांति अपरंपार वाढण्यास गांधीजींचें त्यागी व संयमी जीवन केवढें सहाय्यक झालें आहे हें तर सूर्यप्रकाशाइतकें स्पष्टच आहे.

गांधीजी कलेचे चहाते नसतील असें त्यांच्या तापसी जीवनावरून प्रथम वाटतें. पण गांधीजींच्या जीवनांत आपण खोल उतरलों म्हणजे त्यांच्या सौंदर्यदृष्टीची व कलाप्रेमाची प्रचीति आपणांला अधिकाधिक येऊं लागते. त्यांचा विनोद, त्यांचें संभाषण व लेखन, त्यांची शुश्रूषा, त्यांची निर्मळ

राहणी, त्यांचा दिनक्रम या सर्व गोष्टींत त्यांचें उदात्त कलाप्रेम अगदीं स्पष्ट दिसून येतें.

संगीताचें गांधीजींना फार वेड होतें. "संगीत ही अखिल मानवांची वाणी आहे" असें ते म्हणत. येरवडा तुरुंगांत उपवास चालू असतां अनेक संगीतज्ञ दररोज जाऊन हजेरी लावीत आणि भजनें गाऊन तेथील गंभीर व कडक वातावरणाला कांहींशी मृदुता आणीत. एकदां "**अबकी टेक हमारी। राखो लाज गिरिधारी॥**' हें सूरदासाचें पद एका गायनाचार्यांच्या तोंडून ऐकत असतां गांधीजी इतके तन्मय झाले कीं त्यांच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहूं लागल्या! पुढें त्यांनीं त्या पदाचे स्वर शिकून घेण्याकरितां मीराबेनना सदर गायनाचार्यांकडे कित्येक दिवस धाडलें होतें! 'आश्रमभजनावली' ची काव्य व गायन या दोनहि दृष्टींनीं असलेली संपन्नता गांधीजींच्या रसिकतेचेंच फळ होय.

टापटीप, स्वच्छता, प्रसन्नता इ० वैशिष्ट्यांनीं भोंवतालचें वातावरण उत्साहजनक ठेवण्यांत गांधीजी दक्ष राहत. ज्या रस्किनपासून ते शरीरश्रमाचें महत्त्व शिकले तोच कलादृष्टीचे बाबतींत गांधीजींचा गुरु होता. रस्किननें युरोपीय आदर्शकलेवर पुष्कळ विचारप्रवर्तक लेखन केलें आहे. यंत्रयुगाला सुरुवात झाल्यानंतर युरोपीय कला निसर्गापासून दूर जाऊं लागली. वस्त्रापासून प्रासादापर्यंतच्या नक्षींत त्रिकोण, चौकोन, पंचकोन इ० अवजड व रुक्ष नमुन्यांचें प्राबल्य झालें. यावर रस्किननें कडक टीका करून सांगितलें कीं, "निसर्गाचें जें सौंदर्य आपली नजरबंदी करतें तें काय त्रिकोण-चौकोनाच्या निर्जीव सरळ रेषांनीं बनलेलें आहे? पानें, फुलें, वृक्ष, नदीप्रवाह, समुद्रतरंग, ढग, क्षितिज इ० सर्व लयदार वक्ररेषांचे विलास होत. हें रहस्य चित्रकारांनीं लक्षांत घेऊन कला ही निसर्गानुसारिणी करावी." रस्किनच्या उपदेशाचा फार मोठा परिणाम युरोपीय विशेषतः इंग्लिश कलेवर झाला. असें सांगतात कीं रस्किनच्या क्रांतिकारक संदेशानें मोहित होऊन एंजिनच्या फळीवर गुलाबपुष्पांच्या कुंड्या लोक ठेवूं लागले. कलेचा निसर्गाशीं गाढ ऋणानुबंध असावा हें मत लोकांना मनापासून पटलें, गांधीजींवर रस्किनच्या मताचा फार परिणाम झाला.

जगविख्यात हिंदी चित्रकार नंदलाल बोस हे गांधीजींना भेटावयास गेले असतां गांधीजींची सूक्ष्म कलादृष्टि पाहून चकित झाले असें खुद्द नंदलालबाबूंनींच लिहून ठेविलें आहे. गांधीजींचें पिण्याचें पाणी ज्या तांब्यांत होतें त्यावर एक लोखंडाचें सुंदर पिंपळपान झांकणासारखें ठेवलेलें होतें. ती वस्तु त्याच गांवांत तयार झाली होती असें मागाहून कळलें. कलेंत स्वदेशीपण त्याप्रमाणें निसर्गानुसारित्वहि पाहिजे हें गांधीजींचें मत या पिंपळपानावरून नंदलालना उमगलें. याच नंदलालबाबूंनीं गांधीजींचें नेतृत्व पत्करून फैजपुर, हरिपुरा इ० ठिकाणीं काँग्रेस अधिवेशनाचे वेळीं साध्या स्वदेशी सामग्रीनें रमणीय नगरें उभारलीं हें सर्वविश्रुतच आहे. या अधिवेशनाचे वेळीं मंडप व प्रतिनिधिनिवास, प्रदर्शनमंदिरें इ० ची जी साधी आणि सुंदर भव्य सृष्टि दिसली तिचे कलाकार नंदलाल होते; पण तिची सर्व स्फूर्ति व मूलतत्त्वें गांधीजींपासून त्यांनीं घेतलीं होतीं.

पण गांधीजी कलाप्रेमी असले तरी त्यांचें कलाप्रेम त्यांच्या निसर्गप्रेमाचे मानानें दुय्यमच ठरेल. निसर्ग जे अगम्य चमत्कार दाखवितो त्याची बरोबरी कोणत्याहि मानवी कलाकाराला करतां येणार नाहीं असें त्यांना वाटतें. 'कलेकरितां कला' हें तत्त्व गांधीजींना मान्य नव्हतें. "कलेकरितां कला' या तत्त्वाचा आश्रय करून पाश्चात्य राष्ट्रें थेट नरकांत उतरलीं आहेत." असें गांधीजी एके ठिकाणीं लिहितात. कलेनें निसर्गावर मात करण्याचा प्रयत्न करणें हास्यास्पद होय. तसेंच आत्म्याचें अधःपतन होईल असें भडक रूप तिनें धारण करूं नये यावर गांधीजींचा कटाक्ष असे. आहारापासून अर्थशास्त्रापर्यंत सर्वांना नीतिदेवतेचें पाईक करूं झटणारे गांधीजी कलेसारख्या चंचल पण तीव्र शक्तीला त्या देवतेच्या हुकमतीखालून कसे दूर जाऊं देतील! एके ठिकाणीं ते म्हणतात—

"खऱ्या कलेचें उद्दिष्ट म्हणजे आत्म्याचें सत्यरूप त्याला दाखविणें हें होय. माझ्याविषयीं म्हणाल तर कुठल्याहि बाह्य उपाधीखेरीज मी आत्मरूप पाहूं शकेन. तुम्हांला माझ्याभोंवतीं उत्कृष्ट कलाकृति दिसत नसल्या तरी माझ्या जीवनांत पुरेशी कला आहे असें मी म्हणतों. माझ्या खोलीच्या भिंती साध्या आहेत. वरचें छप्पर मी कदाचित् दूर करीन आणि मग तारकांकित अनंत आकाशाच्या सुंदर घुमटाकडे मला दृष्टिक्षेप करतां येईल. या लखलखीत

तारकांपेक्षां अधिक विशाल दृश्यें कोणता मानवी कलाकार मला दाखवूं शकेल ? याचा अर्थ सर्वसामान्यपणें उच्च ठरल्या गेलेल्या कलाकृतींचें मोल मी कमी लेखतों असें नाहीं. मला एवढेंच सांगायचें आहे कीं निसर्गानें निर्माण केलेल्या सौंदर्याच्या शाश्वत प्रतीकांच्या मानानें आपल्या कलाकृति फारच अपुऱ्या पडतात......सत्यांत सौंदर्य पाहण्याची वृत्ति माणूस पत्करतो तेव्हांच खरी कला उदयाला येते."

कलेंतल्या अभिरुचीप्रमाणेंच उच्च दर्जाची विनोदबुद्धि गांधीजींचे अंगीं होती. त्यांच्या बाह्यतः विरक्त व तापसी दिसणाऱ्या चर्येवरून विनोदाचें त्यांना वावडें असावें असें प्रथम वाटे. पण खरी गोष्ट अगदीं उलट होती. सुंदर व समर्पक कोट्या करून दुसऱ्याचा मुद्दा उलटवणें किंवा खेळकर वातावरण निर्माण करणें ही कला त्यांचे अंगीं पुरापुर आहे.

एकदां सेवाग्रामला एक पाहुणे आले. हे खमंग व चुरचुरीत जेवणाचे भोक्ते होते. गांधीजींच्या झोपडीत रांधल्या जाणाऱ्या स्वयंपाकांत मसाले नाहींत, मीठहि नाहीं ! अतिथि महाशयांना या गोष्टीचा अंदाज असल्यानें त्यांनीं मुकाट्यानें जेवणाची व्यवस्था दुसरीकडे केली. जेवणाचे वेळीं पाहुणे महाशय कुठें आहेत असें कुणी कुणी विचारूं लागले. गांधीजी हंसून म्हणाले, "अरे, माझ्या बिनमिठाच्या समुद्रावर तो का आपलें तारूं आणील ?" पाहुण्यांच्या जिव्हालौल्याचा हा खुबीदार उल्लेख ऐकून सर्वजण हंसूं लागले.

एकदां उद्योगसम्राट् बिर्लाशेटजी म्हणाले, "बापूजी, तुमच्या कडक व्रतामुळें तुमच्या निकटच्या अनुयायांपैकींसुद्धां एक एक तुम्हाला सोडून जात आहेत. धर्मराज स्वर्गाला गेले तेव्हां वाटेनें जसा एक एक पांडव गळत गेला तसें तुमचें होणार आहे. अखेर स्वर्गद्वारापर्यंत कुत्रा काय तो राहिला." यावर सुशीला नायरनीं गमतीनें विचारलें, 'बापूजी, कुत्रा कोण होणार हो ?' गांधीजींनीं उलट हसून प्रश्न केला, 'पण युधिष्ठिर कोण होणार तें सांग ना ! तें अजून ठरलेलें नाहीं.'

एकदां म्हैसूरच्या बाजूला गांधीजींचा तळ पडला असतां काकासाहेब कालेलकर गांधीजींना आपल्याबरोबर गिरसप्पा पाहायला चलण्याचा आग्रह

करूं लागले. तेव्हां गांधीजी म्हणाले, "काकासाहेब, गिरसप्पा ७–८ शें फुटां-वरून खालीं पडत असेल; पण ईश्वरानें निर्मिलेला याहून उंच धबधबा मी नित्य पाहतों " " कोणता तो ? " " पावसाचें पाणी आकाशांतून हजारों फूट उंचीवरून खालीं आदळत नाहीं का ? तें ! " यावर काकासाहेब काय बोलणें शक्य होतें ?

सात्विक उपरोध व चेष्टा, निरुपद्रवी विडंबन, कित्येकदां स्वतःच्याच वैगुण्याचें निदर्शन इ. अनेक प्रकार गांधीजींच्या विनोदांत आढळत. " प्रार्थनेच्या खालोखाल विनोदबुद्धीनेंच मला वांचविलें आहे. " असें एकदां गांधीजी म्हणाले होते.

गांधीजी हे लोकोत्तर साहित्यिक होते. त्यांची भाषा शुद्ध, वेधक, रसाळ आणि रेखीव असे. त्यांनीं पवित्र व वंद्य अशा थोड्याच पुस्तकांचें पण अतिशय खोल अध्ययन केलें; आपणांस पटलेलीं तत्त्वें आचरणांत आणण्यासाठीं खडतर यातना सोसल्या; आणि आपणांस जें नीट पटलें व जशा रीतीनें पटलें तें तशाच रीतीनें लोकांना पटावें अशी तीव्र तळमळ त्यांना होती. यांत गांधीजींच्या वाङ्मयीन यशाचें मर्म आहे. पर्वताचें काठिण्य व भव्यता, सागराची विशालता व खळबळ आणि निर्झराची शुद्धता व माधुर्य सर्व कांहीं गांधी-वाङ्मयांत तुम्हांला मिळेल.

आपल्या मायबहिणी झोंपाळ्यावर बसून गाणीं गातात. त्या गाण्यांतलें सौंदर्य किती अपूर्व असतें ! शृंगाराशिवाय ती भाषा किती मनोहर वाटते !

जन्मामध्यें जन्म बाई । केळीचा चांगला ।
बाळकाचे आधीं प्राण । देतसे आपुला ॥

या दोन ओळींत मातृप्रेमाची अगाध महती जेवढी वर्णिली आहे तेवढी अनेक विद्वत्ताप्रचुर प्रबंध किंवा रसाळ खंडकाव्यें लिहून वर्णन करतां येणार नाहीं. याच्या उलट टोकाला जाऊन गीतेंतला एक श्लोक पाहूं.

ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति ।
भ्रामयन्सर्वभूतानि यंत्रारूढानि मायया ॥

यांत परमेश्वरी शक्तीचा अगाध आत्मविश्वास दिसतो. याशिवाय अखिल

मानवांना आश्वासन वाटावें असें सामर्थ्य या शब्दांत आहे. गांधीजींच्या भाषेंत असें दोनही प्रकारचें सौंदर्य आढळतें. स्त्रीगीतें किंवा लोकगीतें यांतला रसाळपणा व हळुवारपणा आणि आदर्श ग्रंथांतलें ओज व सामर्थ्य गांधीजींच्या भाषासरणींत आहे.

" गाय ही एक करुणतेची कविता आहे. "

" सत्याच्या सागराचे मध्यभागीं तुम्हांला पोहायचें असेल तर स्वतःला अगोदर शून्यवत् लेखा. "

" माझ्या कल्पनेंतलें प्रेम हें गुलाबपाकळीपेक्षां नाजुक पण गारगोटीपेक्षां टणक असें आहे. "

" गीता ही विश्वमाता होय. "

अशीं गोळीबंद मोत्यासारखीं सत्यें गांधी–वाङ्मयांत इथें तेथें विखुरलेलीं आढळतात. गांधीजींच्या भाषेचें आकाशयान साध्या विषयाचें भूमिपृष्ठ सोडून झटकन् तत्त्वज्ञानाच्या अंतराळांत फिरूं लागतें. आणि आपणहि आश्चर्य व आनंद यांनीं पुलकित होऊन सभोंवार पाहूं लागतों.

गांधीजी जें सांगत तें त्याहून अधिक सुंदर रीतीनें किंवा सुबोधपणें कोणालाच सांगतां येणार नाहीं. एकाद्या रमणीय फुलाला रंग देऊन तें तुम्ही अधिक सुंदर करूं शकाल काय ? कधींच नाहीं. गांधीजींच्या विवेचनांत विद्वानांनीं खोल खोल उतरावें तरी त्यांना तळ अजून दूरच आहे असें वाटेल. पण म्हणून सामान्य जनांना गांधीजींच्या विवेचनांत अवगाहन करतां येणार नाहीं असें मात्र नाहीं. विद्वानांच्या बुद्धीला चकित करील आणि सामान्यांचीं अंतःकरणें वितळून टाकील अशी भाषा गांधीजींच लिहूं शकतात.

मोठे साहित्यकार हे नवीन निर्मिति करतात त्याप्रमाणें आपल्या विशाल समाजाच्या अंतःकरणांत ज्या यातना–कल्पना असतात त्यांना अचूक असें शब्दरूप देतात. गांधीजींनीं वेळोवेळीं केलेल्या घोषणांना आसेतुहिमाचल एवढी लोकप्रियता मिळाली याचें कारण हा मोठ्या साहित्यकारांचा गुण गांधीजींच्या लेखनांत उत्कटत्वानें आढळतो हें होय. ' Quit India ' किंवा ' करेंगे या मरेंगे ' या घोषणा ऐकतांच पारतंत्र्यांत खडणाऱ्या कोट्यवधि लोकांना एकदम हर्ष झाला. आपणांला म्हणायचें होतें तें हेंच असें समाधान

प्रत्येकाला वाटलें. संयम आणि उच्च अभिरुचि न सोडतां गांधीजी निकरावर येऊन बोलतात तेव्हां त्यांच्या भाषेंत एक प्रकारचा जाज्वल्य निःसंगपणा येतो.

" ' फोडा आणि झोडा ' ही कधींहि न आटणारी विहीर आहे. "

" चर्चिलच्या मनांत मला चिरडून टाकायचें आहे; पण यांत त्यांना यश येणार नाहीं. सत्याग्रही हा स्वेच्छेनें आपलें शरीर समर्पण करतो आणि अशा रीतीनें त्याचा आत्मा कायमचा मुक्त होतो. "

असे धगधगीत निखारे गांधींजींच्या भाषेंत सर्वत्र फुललेले आढळतात.

" एक शब्द नीट समजला आणि नीट योजतां आला तर स्वर्गात तो आपल्यासाठीं कामधेनूसारखा होतो. " असें एक संस्कृत सुभाषित आहे. याचें रहस्य गांधीजींनीं नीट ओळखलें होतें. त्यांच्या भाषेंत एका शब्दाचीहि फिरवाफिरव करतां येणार नाहीं, इतक्या काळजीनें प्रत्येक शब्द योजलेला असे. डौलदार वटवृक्षांतलें शिल्प पाहून जसा आपणांला आनंद होतो तसा आनंद गांधीजींचें लेखन पाहून प्रत्ययाला येईल. प्रमाणबद्धता, भव्यता आणि लय या तीन गुणांचा परमोत्कर्ष गांधीजींच्या लेखनांत झालेला दिसतो. एक वाक्य पुढील वाक्याच्या स्वागताची तयारी करून ठेवतें. पुढील वाक्य मागील वाक्याला फुटलेला कोंबच आहे असें वाटतें. एक लहानसा उतारा पहा—

" लोकमान्य दिवंगत झाले ! सिंहाची गर्जना बंद पडली ! ते आपणांत नाहींत हें पटवून घेणें अशक्य जातें, इतके ते आपल्या जीवनाशीं समरस झाले होते. " एकच कल्पना एकामागून एक येणाऱ्या वाक्यांनीं अधिक अधिक स्पष्ट होत जाते. अशा तेजस्वी वाक्यांनीं गांधीजींची साहित्यसृष्टि समृद्ध आहे. तत्त्वजिज्ञासू जे असतील त्यांना गांधीजींच्या वाङ्मयांत उच्च जीवनाचीं सूत्रें मिळतील. पण केवळ वाङ्मयाचे रसिक असतील त्यांनाहि त्यांत 'भावार्थाच्या खाणी' अगणित सांपडून सात्त्विक आनंदाचा लाभ होईल.

स्त्रियांबद्दलचें सौजन्य हा उच्च संस्कृतीचा एक मोठा गुण असतो. स्त्रियांविषयींच्या श्रेष्ठ भावना ज्या समाजांत असतात तोच समाज आदर्श समजण्यास हरकत नाहीं. श्रीराम व श्रीकृष्ण हे हिंदूंचे दोन प्रतापशाली अवतार स्त्रियांचा मान ठेवण्यासाठींच आमरण झटले. इस्लामी धर्माचा

संस्थापक महंमद पैगंबर यानें आपल्या रानटी अनुयायांना प्रथम ज्या गोष्टी शिकविल्या त्यांत स्त्रियांचा सन्मान ही प्रमुख होती, " या जगांतील सुगंध आणि ललना यांमुळेंच हें जग मला आवडतें." हें त्याचें वचन प्रसिद्ध आहे. आपल्या मुलीसमोरहि महंमद उभा राहून बोलत असे आणि अशा रीतीनें स्त्रीजातीविषयीं आदर व्यक्त करी. इतिहासकाळांत शिवाजी महाराजांचें स्त्री-दाक्षिण्य केवढें अलौकिक होतें याचा पुरावा आहेच ! या व अशा अनेक थोर पुरुषांप्रमाणेंच गांधीजी स्त्रियांशीं वागण्यांत अत्यंत आदर दाखविणारे होते.

गांधीजी स्त्रियांकडून फार मोठ्या त्यागाच्या अपेक्षा करतात. पुरुषांना कल्पनाहि करविणार नाहीं असें शौर्य व त्याग स्त्रिया करूं शकतात. गांधीजी म्हणतात—

" व्यक्ति अथवा राष्ट्र यांच्या जीवनाच्या प्रत्येक शाखेंत सत्य व अहिंसा आणणें हें माझें जीवनकार्य मी समजतों. या कामीं स्त्री ही निरपवाद नेतृत्व पत्करील ही आशा मीं उराशीं बाळगली आहे ... ... अहिंसात्मक युद्धांत स्त्रियांचे विजय पुरुषाहूनहि मोठे असले पाहिजेत. स्त्रियांना अबला म्हणणें हा त्यांचा अपमान आहे. पुरुष हा स्त्रियांवर अन्याय करतात. शक्ति याचा अर्थ पाशवी शक्ति असाच जर असेल तर स्त्री ही पुरुषाहून खरोखरच दुर्बळ म्हणावी लागेल. पण शक्ति म्हणजे नैतिक बल असल्यास स्त्री ही पुरुषाहून किती तरी बलवान् ठरेल. तिच्या अंगीं पुरुषाहून अधिक सहनशक्ति, अधिक धैर्य नसतें काय ? तिच्यावांचून माणसाचें जीवनच अशक्य होतें. जीवनांत अहिंसेचें राज्य आलें तर भवितव्य हें स्त्रियांच्या हातीं राहील."

स्त्रियांनीं आपापल्या संसारांतच गुरफटून जावें हें गांधीजींना संमत नव्हतें. पुरुषाप्रमाणें तिनेंहि सामाजिक कर्तव्याचा वांटा उचलला पाहिजे " पुष्कळ वेळां स्त्रीचा वेळ आवश्यक तीं घरगुती कामें आवरण्यांत न जातां आपल्या 'पतिदेवा'ची बडदास्त ठेवण्यांत व स्वतःची छानछोकी पुरविण्यांत जातो. स्त्रीची ही गुलामगिरी जंगलीपणाचें चिन्ह आहे. चुलीचें दास्य हा जंगली-पणाचा अवशेष होय असें मला वाटतें. या चिंताभारांतून आपल्या स्त्रियांची जितकी लौकर सुटका होईल तितकें बरें. घरगुती कामांतच स्त्रीचा सर्व वेळ खर्च न व्हावा हें बरें."

शील हें प्रत्येक मानवाचें सर्वांत श्रेष्ठ साध्य गांधीजी अर्थातच मानत पण कांचेंत ठेवलेल्या फुलझाडांसारखें अव्याहत जपणूक करून शील संभाळणें त्यांना पसंत नव्हतें. खरें शील स्वातंत्र्य व निर्भयपणा यांनींच मिळतें. म्हणून पडदा-पद्धतीस गांधीजींचा कसून विरोध होता. बालविधवांनीं अवश्य पुनर्विवाह करावेत. पण पति म्हणजे काय हें समजण्याइतका व त्याची श्रेष्ठता पूर्ण पटण्याइतका काळ जिला वैवाहिक जीवन लाभलें तिनें पतिनिधनानंतर व्रतस्थपणें पतीचें चिंतन करीत त्याचेंच कार्य पुढें चालवावें. विवाह म्हणजे नुसतें दोन शरीरांचें मीलन नव्हे तर ती दोन आत्म्यांची एकतानता असते. म्हणून एक आत्मा अंतर्धान पावला तरी दुसऱ्या आत्म्यानें त्याच्या कार्याचा वारसा आपणांकडे घ्यावा.

स्त्रीमधील अथांग प्रेमभाव गांधीजींना वेडावून सोडीत असे. " एकेक गोपीके प्रेममें । डुब गये कोटि कबीर " हें स्त्रीच्या प्रेमाचें माहात्म्य गांधीजींना पटलें होतें. शारीरिक आकर्षणाची भूमि ओलांडल्यानंतरच स्त्रीप्रेमाच्या अथांग सागराचें खरेंखुरें दर्शन घडतें असें गांधीजींचें सांगणें असे. ब्रह्मचर्याचा हा एवढा कडक कैवारी स्त्रियांच्या समुदायांत अत्यंत मोकळेपणानें हास्यविनोद करूं शकतो याचें कारण त्यांची स्त्रीजीवनाकडे पाहण्याची उदात्त व निर्मळ दृष्टि हेंच होय.

गांधीजींनीं आपल्या चळवळीच्या अग्रभागीं नेहमीं स्त्रियांना स्थान दिलें. गेल्या २५ वर्षांत झालेल्या २–३ प्रचंड चळवळींनीं हिंदी स्त्रियांतल्या अनेक सुप्त शक्ति प्रकर्षानें प्रकट झाल्या. हरिजनकार्य, खादी, शिक्षण, ग्रामोद्योग इ० कार्यक्रमांत गांधीजींनीं अनेक महिलांना उच्च जीवनाचा व्यवसाय निर्माण करून दिला. गांधीजींच्या स्वर्गस्थ पत्नी परमपूज्य कस्तुरबा यांच्या स्मारकासाठीं हिंदी राष्ट्रानें ४–६ महिन्यांच्या अवधींत १।। कोटी रुपयांचा निधि गांधीजींना दिला. या निधीचा उपयोग मुख्यतः स्त्रियांच्या उन्नतीसाठीं व्हावयाचा आहे. आणि यांत जाणत्या सुसंस्कृत स्त्रियांनींच पुढाकार घ्यावा असे गांधीजींचे प्रयत्न होते.

भूत निघाला तव उदरांतुन, वर्तमान घे अंकीं लोळण ।
भविष्य पाही मुली, रात्रंदिन, —तव हाकेची वाट मनीं ।।

अशा विशाल व उच्च दृष्टीनें स्त्रीरूपी आदिशक्तीकडे गांधीजी पाहत आणि तिच्या दिव्यत्वाची पूजा नीट व्हावी यासाठीं अगोदर तिला तिच्या दिव्यत्वाची जाणीव करून देत. स्त्रीकडे अशा उदात्त दृष्टीनें पाहणारा योगी विरळा. गांधीजींइतकें अगणित स्त्रियांचें अनुयायित्व तर एखाद्याच सत्पुरुषाला लाभलें असेल.

गांधीजी प्रेमधर्मांत जसे ख्रिस्ताचे अनुयायी होते तसे मुलांविषयीं वाटणाऱ्या प्रेमांतहि त्यांचें येशूशीं साम्य होतें. महात्माजी मुलांत मिसळले कीं आपल्या उच्च भूमिकेचा त्यांना पूर्ण विसर पडत असे. ते मुलांहून मूल होत. आश्रमवासी मुलांना त्यांनीं ‘ चिमण्या पक्ष्यांनो ! ’ असें संबोधून जीं पत्रें तुरुंगांतून पाठविलीं त्यांत अपार वात्सल्य दिसतें. आफ्रिकेंत असतां सत्याग्रही वीराच्या मुलांबाळांना हा महात्मा आपल्या बरोबरीचा मित्र वाटे. मंडलाकार परिषदेच्या वेळीं लंडनच्या पूर्व भागांतलें त्यांचें निवासस्थान म्हणजे ब्रिटिश मुलांचें एक क्रीडास्थान झालें होतें ! झुंजुमुंजु होण्याचे सुमारास शेंकडों ‘ गोरे ’ बाळगोपाळ ‘ गांधीकाकां ’ शीं हितगुज करायला येत, त्यांच्याशीं खेळूं लागत किंवा अनेक प्रश्न विचारून त्यांना नकोसें करीत ! तिकडे मुत्सद्यांची गंभीर बैठक चालू असतां इकडे ही आनंदमय सृष्टि गांधीजींच्या भोंवतीं निर्माण झाली होती. मुलांवरील अगाध प्रेमामुळेंच सध्यांच्या सदोष शिक्षणपद्धतींतले दोष गांधीजींना दिसले आणि एक नवी शिक्षण-योजना त्यांना आंखावीशी वाटली. गांधीजी म्हणतात—

“ माझें असें मत आहे कीं हात, पाय, डोळे, कान, नाक इ० अवयवांना योग्य मेहनत व व्यायाम देण्यांतच खरें बौद्धिक शिक्षण मिळतें. मुलांच्या अवयवांना हुशारीनें कसें कामाला लावावें हें मुलाला शिकविलें तर त्याची बौद्धिक प्रगति जलद व उत्कृष्ट होते. पण मन आणि शरीर यांची वाढ एकाच वेळीं होत राहिली नाहीं आणि त्याच वेळीं आत्म्याला जागृति न आली तर हें शरीर-शिक्षण निरुपयोगी ठरेल. आत्मिक शिक्षण याचा अर्थ मी हृदयाचें शिक्षण असा करतों. मुलाच्या आत्मिक व शारीरिक गुणांच्या विकासाबरोबरच मन प्रगत होत राहिलें तरच त्याची योग्य व सर्वांगीण वाढ होईल...मनुष्य केवळ बुद्धि, किंवा शरीर, आणि हृदय वा आत्मा यांचा

बनलेला नाहीं. या तीनहि घटकांचें योग्य व बेमालुम मिश्रण झालें म्हणजे मनुष्याचा पूर्ण विकास होतो. खऱ्या शिक्षणाचें हें मूलतत्त्व होय. ''

गांधीजींच्या जीवनाच्या विविध बाजू याप्रमाणें आपण पाहिल्या. त्यांच्या लहानथोर कार्यावर साऱ्या जगाची नजर खिळलेली असते. विसाव्या शतकांतला एक अद्भुत चमत्कार म्हणून गांधीजींकडे पाश्चात्य लोक पाहतात. जीवनांतल्या प्रत्येक शाखेंत त्यांना कांहीं ना कांहीं सुधारणा करावयाची होती आणि त्यासाठीं ते क्षणोक्षणीं झटत गेले, हा प्रत्यय आतां सर्वांना आला आहे. त्यांचें जीवन जितकें उघडें आहे तितकेंच तें पांचही खंडांत ज्ञात आहे. गांधीजींचा पंचा, त्यांची शेळी, त्यांचें सोमवारचें मौन, त्यांची प्रार्थना इ० गोष्टी आतां जगांत कुणास माहीत नाहींत असें नाहीं. एकादी महत्त्वाची घटना झाली कीं, त्यावर गांधीजी काय म्हणतात याची जग अधीर होऊन वाट पाहूं लागे. आणि एखाद्या महत्त्वाच्या प्रश्नावर त्यांनीं मत दिलें कीं, आकाशांत तरंगणारे पांढरे काळे मेघखंड सूर्यकिरणांच्या स्पर्शानें जसे सुरंजित होतात तसें राजकीय वातावरणाला एक नवें तेज येई. गांधीजी सत्यसंशोधनाचे बाबतींत स्वतः क्षणभर स्वस्थ बसत नसत आणि आपल्याविषयीं विचार करण्याचे कामीं इतर लोकांनाहि उसंत मिळूं देत नसत.

पण प्रसिद्धीचे झगझगीत विद्युद्दीप गांधीजींच्या जीवनावर सदैव प्रकाशत असूनहि त्यांच्या चरित्रांतला केवढा तरी भाग लोकांना गूढ वाटतो. एवढी अपरंपार प्रसिद्धि मिळूनहि त्यांच्याबद्दल गैरसमज आहेत ! गांधीजी जेवढे लोकप्रिय आहेत तेवढेच भयंकरहि वाटत. भांडवलवाल्यांना ते मजुरांचे कैवारी वाटत, उलट गांधीजींच्या मित्रपरिवारांत नवकोटनारायण बरेच असल्यानें गांधीजींचा जीव त्या श्रीमान् लोकांत तर घोटाळत नसेल ना असा मजुरांना संशय येई ! वर्णाश्रमाची महती गाणारे महात्माजी सुधारकांना दूरचे वाटावे आणि अस्पृश्यता-निवारणाच्या कामीं झगडणाऱ्या महात्माजींवर सनातन्यांनीं रुष्ट व्हावें असा प्रकार होई. हिंसेला गांधीजी कधींच मान्यता देणार नाहींत म्हणून दहशतवादी नाराज होत तर कायदेभंगासारखे जहाल मार्ग ते स्वीकारतात म्हणून नेमस्त खवळत ! गांधीजींना सर्व वर्गाला, सर्व थरांना सुधारायचें होतें आणि सर्व वर्गांतच दोष आहेत; ते गांधीजी दाखवीत म्हणून प्रत्येक वर्गच गांधीजींवर रुष्ट असत. पण गांधीजींची निष्ठा इतकी अचल आणि जगाला

सुधारण्याचा संकल्प इतका जबरदस्त होता कीं, सर्व वर्गांचे शिव्याशाप पत्करण्यासहि ते मागेंपुढें पाहात नसत, देवावर भार टाकून सत्याच्या मार्गावर एक एक पाऊल ते पुढें गेले. कित्येकदां सारें जग विरुद्ध दिसेला आणि ते एकटेच आपल्या वाटेनें चाललेले असा देखावा दिसतो !

पण याचा अर्थ जगापासून फटकून वागणारा कोणी विचित्र माणूस म्हणून गांधीजींची ख्याति आहे असा मात्र नव्हे. ज्या मानवतेच्या उन्नतीसाठीं गांधीजी जिवाचें रान करीत त्यांतल्या पुष्कळांना गांधीजींचें विभूतिमत्त्व केवढें उच्च आहे याचा अंदाज नाहीं हें खरें. पण प्रत्येक वर्गाला ममत्व वाटावें असें गांधीजींच्या जवळ कितीतरी होतें. आपलें ऐश्वर्य जबरदस्तीनें हिसकवून देण्याच्या विरुद्ध गांधीजी आहेत म्हणून भांडवलवाले गांधीजींना मान देत; उलट आपलीं गाऱ्हाणीं हा महापुरुष जगाच्या वेशीवर टांगणार आहे असा मजूर-किसानांना विश्वास वाटे; नेमस्तांना त्यांच्या अहिंसाव्रताबद्दल आदर असे तर सामुदायिक उठावणीचें क्रांतिशास्त्र गांधीजींनीं काढलें याबद्दल जहाल त्यांच्यावर खूष होते. श्रद्धावादामुळें सनातनी व सुधारणावादामुळें सुधारक गांधीजींनीं आपलेसे केले; स्वातंत्र्यवादी हिंदी लोकांना ते आपले नेते वाटत यांत नवलच नाहीं; पण इंग्रज सरकारलादेखील हा सौजन्यशील प्रतिस्पर्धी वचनाचा धड आहे व उगाच आपणांला अडचणींत टाकण्याकरितां दगाफटका करून कायदेभंग करणार नाहीं याची पक्की खात्री असे. जन्मानें व कर्मयोगानें गांधीजी कट्टे हिंदु आहेत याचा हिंदुमात्राला तर अभिमान वाटेच पण कित्येक थोर ख्रिस्त्यांनीं आपणांला गांधीजींनीं 'पर्वतावरील प्रवचना' चें रहस्य पटवून दिलें असें कृतज्ञतेनें म्हटलें ! मोठ्या झाडांचीं मुळें पाण्याचा आसरा शोधत भूमीखालीं सरकतात त्याप्रमाणें अगदीं दूरच्या क्षेत्रांतल्या जिवांनीं शांतिसुखासाठीं गांधीजींच्या सहवासाचा शोध घेतला आहे. 'महापुरुष म्हणजे परमेश्वरानें जगतावर फेकलेली जळती मशाल आहे.' असें कार्लाईल म्हणतो. गांधीजी ज्या तेजस्वितेनें आज अर्धशतक आधुनिक जगावर प्रभुत्व गाजवीत राहिले ती पाहिली म्हणजे कार्लाईलचे उद्गार खरे वाटूं लागतात.

महापुरुषाचें रहस्य जाणण्यास महापुरुषच पाहिजेत. म्हणून शेवटीं जगांतल्या कांहीं थोर विभूतींचे गांधीजींबद्दलचे विचार पाहणें युक्त ठरेल. समारोपाला त्यायोगें केवळ डौलच येईल असें नाहीं तर, गांधीजींचें तत्त्वज्ञान

व व्यक्तिजीवन यांचा शाश्वत ठसा राहण्यास त्यायोगें मदत होईल. गांधीजींवर पंचखंडांतून प्रत्यहीं स्तुतिसुमनांच्या माळा येऊन पडत त्यांसर्वांचा परामर्श घेणें आवांक्याबाहेरचें आहे. नमुन्यादाखल कांहीं थोडे उद्‍गार मात्र आपण पाहूं. गांधीजींइतकेंच आधुनिक भारताचें वैभव ज्यांनीं पंचखंडांत वाढविलें ते भारतकविसम्राट् रवीन्द्रनाथ म्हणतात, " गांधीजी हें यज्ञाचें मूर्त रूप होय. सत्ता किंवा जबरदस्ती त्यांचेजवळ नाहीं. आत्मक्लेशानें त्यांनीं मिळविलेलें सामर्थ्य, सौंदर्य किंवा संगीत याप्रमाणें लोकावर सत्ता चालवितें. " गांधीजींनीं आपले राजकीय वारस म्हणून मानलेले हिंदुस्थानचे जगविख्यात पंतप्रधान पं. नेहरू यांनीं गांधी-माहात्म्य फार समर्पक सांगितलें आहे.

" या किरकोळ दिसणाऱ्या माणसांत पोलादाचें व खडकाचें सामर्थ्य आहे. तें कुठल्याहि भौतिक शक्तीला दाद देणार नाहीं. याच्या साध्या चेहऱ्यामोहऱ्यांत व अर्धनग्न शरीरांत असें कांहीं बादशाही वैभव आहे कीं, तें तुम्हांला आपणांपुढें नमवितेंच...याच्या अंतरंगीं विलक्षण बल सांठून राहिलें आहे असा प्रत्यय येतो आणि याच्या बोलण्यांतला व व्यक्तित्वांतला प्रामाणिकपणा एकदम तुमची पकड घेतो...गांधीजींची भाषा अनलंकृत व सुबोध असते, त्यांची मुद्रा स्वच्छ, शांत व अक्षुब्ध दिसते; पण बाह्यतः दिसणाऱ्या या थंडपणामागें प्रखर अग्नि व तीव्र भावना आहे आणि म्हणूनच त्यांनीं उच्चारलेले शब्द आपल्या अंतर्मनांत भरारी घेऊन जातात आणि तेथें घर करून राहतात. त्यांनीं दाखविलेला मार्ग कष्टाचा होता पण तो शूराचा मार्ग होता आणि स्वातंत्र्याच्या मंदिराकडे त्याच मार्गानें जातां येईल हें निश्चित दिसत होतें...गांधीजी किती आश्चर्यजनक विभूति आहेत नाहीं ? त्यांचे अंगीं अनिवार्य आकर्षकपणा आहे आणि स्वबांधवांवर त्यांची सूक्ष्म हुकमत चालते. त्यांचें लेखन आणि भाषण त्यांच्या व्यक्तित्वाचें फार थोडें प्रतिबिंब आपल्या मनावर उमटवितें, कारण त्यांच्या लेखन-भाषणावरून त्यांच्या व्यक्तित्वाची कल्पना केली तर तिच्या मानानें तें केवढें तरी थोर आहे. गांधीजींनीं आपल्या देशबांधवांत शौर्य व मर्दपणा ओतला, त्यांना शिस्त व सोशिकपणा शिकविला आणि ध्येयाकरितां आनंदानें आत्मसमर्पण करण्याचे पाठ दिले. आणि हें सारें अभिमान व भूतदया यांसह शिकविलें. धैर्य हाच शीलाचा पाया; धैर्यावेरीज धर्म नाहीं, प्रेम नाहीं, नीति नाहीं

असें गांधीजी सांगत...गांधीजी म्हणजे हिंदुस्थान. गांधीजींत उणीवा असल्या तरी त्या हिंदुस्थानच्याच उणीवा आहेत. गांधीजींनीं असंख्य लोक आपणांकडे खेचले. हें केवळ भावनात्मक आकर्षण नव्हतें. बुद्धिवादाला त्यांचें नेतृत्व पटल्यामुळें हा समुदाय त्यांच्याकडे आला आणि त्यांच्याजवळ स्थिर झाला. कित्येकांना त्यांचें जीवनविषयक तत्त्वज्ञान व त्यांचीं कित्येक ध्येयें मान्य नव्हतीं. कित्येकदां त्यांना गांधीजींचा उमग पडत नसे. पण प्रत्यक्ष कृतीची जी शिकवण गांधीजी देत ती मात्र भरीव वाटे आणि तीयोगें बुद्धीचें समाधान होई." गांधीवधानंतर तर शोकमग्न पंडितजींची प्रतिभा विशेषच प्रकट झाली. आपल्या परमपूज्य राष्ट्रपित्याच्या स्तुतिपर पंडितजींनीं केलेलीं भाषणें म्हणजे अमर भावकाव्येंच होतीं. "ज्या सूर्यानें आजवर आपणांस प्रकाश व ऊब दिली तो गेल्यामुळें आपण थंडींत काकडत आहोंत. गांधीजींच्या शिकवणीची दिव्य प्रभा हजारों वर्षें मावळणार नाहीं. त्यांनीं स्पर्श केला तेथें चैतन्य आलें. ते जेथें जात तेथें मंदिर निर्माण होई." त्या भाव-काव्यांतले काय उद्धृत करावें आणि काय नाहीं याचाच संभ्रम पडतो.

आशियांतील एक विचारवंत लेखक डॉ. लीन यूटांग हे गांधी-नेहरूंचे संबंध वर्णन करतांना म्हणाले, "हिंदी लोक नेहरूंचें ऐकतात; नेहरू गांधींचें ऐकतात; गांधी फक्त परमेश्वराचें ऐकतात." जपानचे राष्ट्रकवि योनु नोगुची यांनीं गांधीजींवर पुढील उत्कृष्ट काव्यपंक्ति रचिल्या आहेत.

जगताकडून न दान घे प्रभुराज देइल ही स्पृहा
सुरलोकसंनिध जाउनी लढतो अदृष्ट जयार्थ हा
गगनांतही रणभेरिचे घुमती प्रतिध्वनि याचिया
भवितव्य देइल साथ ही दृढ आस वीरवरास या
कृश देह हा तरि पृथ्विचा थरकांप आत्मबलें करी
प्रभुची कृपा नयनीति ही उतरो झणीं अवनीवरी
यावीण थोर न दुजा कुणि देशभक्त
हा मातृभूमिवर जीवन-गीत गात
हा संयमी सतत जागृत-चित्त रातीं
पाही कसें झडुनि येइल सत्य हातीं."

गांधीजींनीं पहिल्यानें असहकारितेचा प्रयोग करून ज्यांच्याशीं सामना दिला ते फील्ड मार्शल स्मट्स गांधीजींना ' असंख्य जनसमुदायाला उच्च मार्गानें एका भवितव्याकडे नेणारे महापुरुष ' मानतात. रिचर्ड ग्रेग यांनीं लोकोत्तर समाजशास्त्रज्ञ ठरविलें आहे. रोमां रोलां सांगतात—

" हिंदुस्थानच्या जनतेंत स्वतःच्या एकीची, स्वातंत्र्याची व स्वसामर्थ्याची अभिमानास्पद जाणीव जागृत करणाऱ्या कार्यप्रवण जीवनाची प्रेरणा देणें एवढेंच कांहीं त्यांचें कार्य नव्हे. पाश्चात्य देशांतील लोकांसाठीं त्या लोकांच्याच खिस्ताचा विस्मृत व भ्रष्ट झालेला संदेश पुनरुज्जीवित करण्याचें कार्य गांधीजींनीं केलें आहे. मानवजातींतल्या ऋषींच्या आणि संतांच्या मालिकेंत त्यांनीं आपलें नांव चिरस्थायी केलें असून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची प्रभा पृथ्वीच्या पाठीवर देशोदेशीं फाकली आहे. "

अमेरिकेचे रे. होल्म्स हे एक निःसीम गांधीभक्त असून गांधी-तत्त्वज्ञानाचा प्रसार करणारी जी एक संस्था अमेरिकेंत निघाली आहे, तिचे ते अध्यक्ष आहेत. रे. होल्म्सनीं पुढील उताऱ्यांत गांधीजींच्या श्रेष्ठतेचें रहस्य किती सुंदर व सुबोध शब्दांत व्यक्त केलें आहे पहा !

" गांधीजी नम्र, सभ्य आणि अत्यंत दयाळू आहेत. त्यांचे अंगीं अनावर विनोदशक्ति आहे. शिष्टाचारांतील साधेपणानें ते माणसाला तत्काळ वश करतात. वागणुकींत मृदु आणि शांत असून त्यांची इच्छाशक्ति कणखर आहे आणि त्यांचें धैर्य पोलादी आहे. त्यांचा प्रामाणिकपणा स्फटिकासारखा निर्मळ आणि सत्याचें प्रेम केवळ अनिवार्य आहे. त्यांच्या जवळ गमवायला कांहींच नसल्यानें एका परीनें त्यांची भूमिका अजिंक्य आहे. स्वतःच्या सर्वस्वाचा त्याग त्यांनीं केलेला असल्यानें दुसऱ्याकडून कुठलीहि गोष्ट ते मागूं शकतात. भौतिक सुखाचे विचार, सांसारिक चिंता, आणि महत्त्वाकांक्षा या त्यांच्या जीवनांतून केव्हांच अदृश्य झाल्या आहेत. सत्य आणि प्रेम यांत प्रकट होणाऱ्या तेजानें त्यांना व्यापून टाकलें आहे.

जर्मनीचे एक चिकित्सक लेखक कौंट कायसरलिंग यांच्या मतें, नवीन निर्माण होणारे मानवांचे नमुने हे पूर्ण मानवांचे असतील आणि त्या पुरुषश्रेष्ठाच्या उदयाची पूर्वतयारी ज्या एका श्रेष्ठ पुरुषानें केली आहे तिचें नांव **गांधी.**

गांधीजींचा वध झाल्यावर तर त्यांच्यावर चारी खंडांतून स्तुतिसुमनांच्या माळांचे ढीग पडले त्या सर्वांचा परामर्श घेणें अशक्यच !

आजच्या युगाचे सर्वांत थोर विज्ञानमहर्षि आलबर्ट आइन्स्टाईन यांचे उद्गार देऊन ही स्तुतिसुमनांजलि पुरी करूं. “ कुठल्याहि बाह्य सत्तेवांचून झालेला लोकांचा नेता;मुत्सद्दीपणानें नव्हे तर आत्मप्रत्ययानें यश मिळविणारा राजकारणी; हिंसेचा तिरस्कार करणारा विजयी योद्धा; दयालुता व शहाणपणा यांची मूर्ति; निश्चयाचा व सुसंगतीचा महामेरु; आपल्या लोकांच्या उन्नतीसाठीं सारें जीवनसामर्थ्य वेंचणारा पुरुष. या पुरुषानें (गांधीजींनीं) यूरोपच्या पाशवीपणाला साध्या माणसाच्या श्रेष्ठतेनें तोंड दिलें आणि कित्येकदां त्यांत आपलें वर्चस्व प्रस्थापित केलें. या भूमीवर एवढा महात्मा शरीररूपानें वावरत होता हें कदाचित् पुढील पिढ्यांना खरेंच वाटणार नाहीं. ” अनन्त विश्वाच्या सरहद्दी शोधावयास निघालेल्या एका अलौकिक प्रतिभावंताचे हे उद्गार आहेत एवढें सांगितलें म्हणजे पुरे.

गांधीजी अपूर्ण होते हें स्वतः गांधीजींइतकें कोणीच जाणीत नव्हतें. पण या अपूर्णतेमुळेंच सामान्य माणसाला ते जवळचे वाटत. या अपूर्णतेंतच मानवतेला आशावाद वाटते. पण गांधीजी अपूर्ण होते याचा अर्थ हिमालय आकाशाहून ठेंगणा आहे एवढाच घेतां येईल. एवढा शूर, त्यागी, जितेंद्रिय, मानवताप्रेमी, प्रगतिवादी, प्रतिभासंपन्न कर्मयोगी नेता आपल्या या राष्ट्राला लाभला हें आपलें भाग्य, भूत व भविष्य काळांतल्या माणसांनीं हेवा करण्यासारखें आहे. या नेत्यानें प्रज्वलित केलेल्या दीपाच्या उजेडांत आपल्या मोक्षाचा मार्ग चोखाळून पुढें जात राहणें हें आपलें पवित्र कर्तव्य आहे. या कर्तव्यांत सत्याची पूजा आहे, शिवाची शाश्वति आहे आणि सौंदर्याचा साक्षात्कार आहे. महात्मा गांधीजींना अगणित प्रणाम असोत.

वंदे मातरम्
२८६३ ... ५३२२
२००७
IRBK-0105323
IRBK-0105323